
दुःख पचवता येणे ही सुखाची पहिली पायरी
धां डो ळा
विक्रम त्र्यंबक भागवत

# धांडोळा

**(PRE-PUBLICATION COPY)**
(for limited distribution only)

विक्रम त्र्यंबक भागवत

पुस्तकाचे नांव: धांडोळा
प्रकार : कादंबरी

लेखक : विक्रम त्र्यंबक भागवत
8879115114
vikram.bhagwat09@gmail.com

मुखपृष्ठ, अंतर्गत चित्रे : कनक वाईकर
8888899126
kanak.waikar@gmail.com

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान®
9869674820

esahity@gmail.com

esahity@gmail.com
www.esahity.com
www.ednyaneshwari.com
http://etyarth.blogspot.in/
http://esahityapratishthan.blogspot.in/
www.marathiriyasat.com

- *विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध*
- *आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.*
- *हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.*
- *या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा नाटक, सिनेमा, सिरियल, स्टेज शो किंवा तत्सम रुपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे.*

©esahity Pratishthan® 2013

# अर्पणपत्रिका

अबोलपणे सर्व काही सांगणारी व समजून घेणारी माझी जीवनसाथी अदिती,

सोडून गेल्याला दोन दशकं झाले तरी अजूनही माझे सर्वस्व असलेले दादा (प्रभाकर पाध्ये),

आशूसारख्या व्यक्तीरेखांची प्रेरणा असलेली माझी मैत्रीण नीला गोखले,

यांना माझी ही पहिली कादंबरी कृतज्ञतापूर्वक अर्पण.

# धांडोळा -भारतातील आतंकवादाचा

-श्रीनिवास हवालदार

“कला किंवा कविता ह्यांना मी निर्मितीचे क्षेत्र समजतो. कलेची निर्मिती ही एकांतात होत असते. एकांत ह्या शब्दाचा अर्थ आपण समजावून घ्यावा. एमिली डिकन्सनचे एक फार सुंदर वाक्य आहे,

‘इट माईट बी लोनलिअर विदाऊट लोनलीनेस’.

ते केवळ निर्मितीचेच क्षेत्र नाही तर जगाच्या आणि जीवनाच्या पुनर्निर्मितीचे ते क्षेत्र आहे.

कलावंत कोणताही अनुभव निर्माण करीत नाही. त्याच्या जगण्याच्या प्रक्रियेमध्ये त्याच्या भोवतालचा पूर्वोक्त, आदिम, ऐतिहासिक आणि वर्तमानाचा जो अनुभव असतो त्या अनुभवाची तो पुनर्निर्मिती करत असतो.” ग्रेस

-

साहित्य हे समाजाचे दर्पण असते. मराठी कादंबरीही यास अपवाद नाही.बाबा पद्मनजी यांनी लिहिलेली ‘यमुनापर्यटन’ (१८५७) ही मराठीतील पहिली कादंबरी हिंदू विधवांच्या प्रश्नांवर केंद्रित होती.हिंदू विधवांना ज्याज्या दिव्यातून जावे लागत असे त्याचे चित्रण या कादंबरीत केले होते.त्यानंतर अनेक कादंबरीकारांनी समाजातील विभिन्न प्रश्न हाताळून ही परंपरा चालवली.या कादंबऱ्यांतून स्त्रीशिक्षण, पुनर्विवाह, प्रौढविवाह इत्यादी तत्कालीन सामाजिक प्रश्नांचा ऊहापोह केलेला आढळतो. तसेच काही कादंबरीकारांनी ऐतिहासिक आणि पौराणिक कादंबऱ्या तसेच एखाद्या महानेत्याच्या किंवा महानायकाच्या जीवनावरील आधारित कादंबर्या ही लिहिल्या परंतु १९६० नंतरच्या मराठी कादंबरीचे वास्तवाशी अतूट नाते आहे. उपेक्षितांच्या जीवनाचे आपल्या अनुभवाने केलेल्या लेखनाद्वारे तसेच ग्रामीण जीवनाचे दर्शन घडवणाऱ्या अनेक कादंबऱ्या या काळात लिहिल्या गेल्या आहेत

भारतात आतंकवाद हा गत काही दशकांपासून एक ज्वलंत प्रश्न म्हणून उभा आहे. भारतातील काश्मीर, नागालैंड, पंजाब, असम, बिहार, छत्तीसगढ ,मुंबई, दिल्ली आणि उत्तरपूर्वातील सात

राज्य,[स्वतंत्रता और स्वायत्तता मिळविण्यासाठी]इत्यादि विशेषरूप से आतंकवादाने प्रभावित आहेत. यांत पाकिस्तानी, इस्लामी, माओवादी, नक्सली, हिंदू, शीख , क्रिश्चन वगैरे आतंकवादी संगठनांचा समावेश आहे. मराठीत या विषयावर लिहिली गेलेली 'धांडोळा' ही पहिलीच कादंबरी असावी.मुंबई महानगरात वेळोवेळी घडलेल्या आतंकवादी घटनांची पार्श्वभूमी समोर ठेऊन विक्रम भागवत यांनी कादंबरीचे कथानक गुंफले आहे.

या काल्पनिक घटनाक्रमावर आणि पात्रांवर आधारित आहे. पण लेखकाने आपल्या सशक्त लेखणीच्या माध्यमाने त्यास एक जीवंत स्वरुपात प्रस्तुत केले आहे. कादंबरीची नायिका आशू काळसेकर मुंबईतील एका वृत्तपत्रात क्राईम रिपोर्टर.म्हणून काम करते . प्रेमानंद हिर्लेकर Anti terrorist squad मध्ये encounter killings प्रसिद्द्ध पोलिस अधिकारयावर indiscriminate firing चे आरोप लावून त्यास निलंबित करण्यात येते. आशु त्याचा पक्ष जाणून त्यावर एक स्टोरी करून Tribune वृत्तपत्रात करते आणि नंतर परत आतंकवादी कारवाई सुरु होते. प्रेमानंद हिर्लेकर बंदी असताना पोलिस स्टेशनवर झालेल्या हल्यामुळे गंभीर रूपाने जखमी होतो आणि शेवटी प्राणास मुकतो.

कादंबरीचे कथानक मुंबईतील Chambers Towers च्या २४व्या मजल्यापासून रमाईनगरच्या झोपडवस्तीपर्यंत पोहोचलेले आहे. रमाई नगरची झोपडवस्ती गलिच्छ झोपडपट्टीत जन्मलेल्या आणि राहणाऱ्या माणसांच्या दैनदिन आयुष्यावर जयवंत दळवी यांच्या 'चक्र ' कादंबरी या कादंबरीची पुनः आठवण करून देते. दारिद्र्याची अनेकानेक रूपे,आणि सर्वसाधारण मध्यमवर्गीय माणूस ज्याची कल्पनाही करू शकत नाही असे भीषण चटके लेखकाने चित्रित केले आहेत. वाचकाचे कुतूहल सतत जागे ठेवणारी कथानकाची गुंफण ,जिवंत व्यक्तिचित्रण आणि अस्खलित प्रवाहित होणारी भाषा यांचा अद्भुत मिलाफ या कादंबरीत झाला आहे. कथानकाच्या या प्रवासात समाजातील विभिन्न स्तरातील माणसे आपणास सापडतील. ही कादंबरी निःसंशय सामाजिक आहे परंतु प्रेमानंद ने शरद गोखलेकडे दिलेली CD कथानकात आल्यावर कथानकास काही वेळेसाठी रहस्य कथेचे स्वरूप प्राप्त होते परंतु नंतर ते पुनः आपल्या मूळ स्वरुपात प्रकट होते.

संवाद हा हा कुठल्याही कथेचा किवा कादंबरीचा महत्वाचा घटक आहे.पात्राने वापरलेली भाषा त्याच्या स्वतःच्या चारीत्रिक वैशिष्ट्याप्रमाणे आणि तो सामान्यतः ज्या वातावरणात वावरतो त्यावर अवलंबून असावयास पाहिजे.दुसरेम्हणजे उद्देश प्रधान कादंबरीत जो 'टार्गेट ग्रुप' असेल त्याचाही विचार करणे आवश्यक आहे कारण त्या शिवाय लेखकाचे उद्दिष्ट पूर्ण होणार

नाही.लेखकाने या बाबतीत थोडी काळजी घ्यायला हवी होती. माझे मन्तव्य कादंबरीत प्रयोग केलेल्या Four letter words आणि शिव्यान बद्दल आहे. कादंबरीच्या प्रारंभिक अध्यायात नायिका आशु च्या तोंडातून येणाऱ्या शिव्या आणि Four letter words तिच्या मूळ चरित्राशी सुसंगत नाहीत.या द्वारे ती आपला संताप व्यक्त करत आहे हे देखील पटण्यासारखे नाही कारण मराठी भाषेत संताप व्यक्त करण्यासाठी कमी शब्द नाहीत. दुसरे म्हणजे कादंबरीच्या प्रारंभीच explosive language चा प्रयोग केल्यामुळे कादंबरीचा मूळ उद्देश काय आहे हे लक्षात येण्या पूर्वीच सामान्य वाचकाची दिशाभूल होऊ शकते.

या कादंबरीतील सर्वच प्रमुख पात्रे ठाम ध्येयवादी आहेत. 'मोडेल पण वाकणार नाही ' अशी आशु , रमाई नगर झोपड वस्तीतील सखू चा आदर्श पुढे ठेऊन सगळ्या नराधम भिकू मान्गल्याना कोयता मारून ठार करण्याचे ठरविणारा प्रेमानंद हिर्लेकर, खिशात राजीनामा घेऊन हिंडणारा 'होमो 'संपादक पसरिचा , वृत्तपत्राचे निकष कठोरतेने लागू करणारा Tribune चा मालक ललित सिबल आणि दशग्रंथी ब्राह्मणाचा बोकड कापणारा मुलगा शरद गोखले हे सर्वच आपापल्या विश्वातील ध्येयवादी माणसे आहेत.सामाजिक व्यवस्थेत हे लोक किती Fit बसतात हे गोष्ट निराळी! लेखकाने स्वतःच आशू च्या स्वगताने या शब्दात व्यक्त केली आहे "त्याच्या सारख्या ऑफिसर्सना वाटत असत की ते व्यवस्थेला फाट्यावर मारतात ...पण ते शक्य नसत ...शेवटी सिस्टिम व्यवस्थाच तुम्हाला manipulate करते" ...

लेखकाने आपल्या पात्रांच्या माध्यमाने ठिकठिकाणी वाचकांच्या विचारास चालना देणारी अनेक विधाने केली आहेत आणि त्यांच्याशी संवाद स्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यापैकी काही खाली देत आहे:

“माणसाच्या सर्व समस्या स्वतः पाशी सुरु होतात आणि स्वतः पाशी संपतात ...इतर फक्त निमित्त मात्र असतात “.

“आपसुक रुमाल नाकावर ...हा सुद्धा वस्तूस्थिती नाकारण्याचा एक केविलवाणा प्रयत्न ...नाकावर रुमाल धरला म्हणजे दुर्गंधी नष्ट होईल का? सगळयांनाच दुर्गंधीवर मात करायची आहे ... पण आधी root cause वर कधी काम करणार?”

“सारं आयुष्य घालवूनही माणसं एकमेकाला ओळखत नाहीत ...आणि कधी कधी पहिल्या भेटीचा पहिला क्षणही पुरेसा असतो .”

“मला न्याय प्रक्रियेचे एक मूल तत्व त्या दिवशी कलळे होते. न्याय हा आम जनतेचा विश्वास बसेल असाच असयला हवा आणि त्याची अमलबजावणी तात्काळ ,त्वरित ,तुरंतच व्हायला हवी अन्यथा लोकांचा न्यायावर विस्वास बसत नाही."

"आम्ही लहानपणी पंधरा ऑगस्ट, सहवीस जानेवारीला शाळेत झेन्डा वंदन करायला जायचो .गणवेश घालून शाळेपर्यंत जातानासुद्धा आमची छाती अभिमानाने फुलून यायची......... झेंडा तोच आहे ...मी बदलले आहे तो झेंडा उभारणारे हात बदलले आहेत. ज्यांच्याबद्दल आदर वाटावा ज्यांचा अभिमान वाटावा अशी माणसेच उरली नाहीत."

कादंबरीतले आशु काळसेकरचे प्रेमानंदच्या मृत्युशैय्ये जवळ केलेले स्वगत देशाच्या वर्तमान स्थिती बद्दल बरेच काही बोलून जाते:

"...............जसा जसा तुझा धांडोळा मी घेत गेले तेह्वा जाणवले की हा चिखल प्रेमंद हिर्लेकरचा नाहीए. त्याने नाही केला हा चिखल. आजू बाजूचा समाज ,सरकारी यंत्रणा आणि राजकारण ....यांच्या चिखलात तू रुतला आहेस. मला आजही कळत नाही प्रेमानंद तुझी कहाणी आज संपणार आहे की ती आज खर्या अर्थाने सुरु होणार आहे? "

विक्रम भागवत यांची ही कादंबरी मराठी कादंबरीच्या इतिहासात Milestone ठरेल यात शंका नाही. त्यांचे हार्दिक अभिनंदन आणि शुभेच्छा.

या कादंबरी सर्व पात्र आणि घटना काल्पनिक आहेत. कुठल्याही जीवित किंवा मृत व्यक्तीशी त्याचा संबंध नाही आणि आढळल्यास तो निव्वळ योगायोग समजावा "



एक

# आश्विनी काळसेकर

'प्रेमानंद हिर्लेकर...'

मी अक्षरे टाइप केली आणि मी स्तब्ध झाले!

पुढे काय? ॲम् आय् नाऊ कमिटेड्? कमिटेड् टू व्हॉट्? कमिटेड् टू द स्टोरी...

दीर्घ उसासा

नजर भिरभिरते. अचानक पोटात कालवाकालव. पण ती भुकेपोटी. गेल्या काही दिवसांत जेवलेले नाही नीट...

पायावरून एक झुरळ घरंगळत जातं. त्याला झटकायची सुद्धा इच्छा नाही. झुरळाची सुद्धा संगत असतेच. एकटेपणाची जाणीव जरा कमी होते.

भूक...

उपाशी राहायची सवय का होत नाही?

मायकल फासबेंडर सहाशे कॅलरीजवर जगू शकत होता.. एका भूमिकेसाठी...

म्हणजे एक उद्दिष्ट हवे.

'यू हॅव पुल्ड् डाऊन... डोळ्यांभोवती काळं...' एडिटर पसरिचा म्हणे.

त्याला दुधाच्या ग्लासवर दिवस काढायला आवडतो. तो दुधावर जमा झालेली साय एका बोटाने तोलतो आणि हलकेच जिभेवर ठेवतो.

पसरिचा... थिक् स्किन् बास्टर्ड ऑफ ॲन एडिटर...

मनात शब्दच्छल... पसरिचा बास्टर्ड आहे म्हणून एडिटर झाला की, एडिटर आहे म्हणून बास्टर्ड झाला?

'फक् यू पसरिचा,' मी थुंकते.

पसरिचाचे गलेलठ्ठ, थुलथुलीत पोट गदागदा हलते.

'यू नो किड्.. वुमेन डोण्ट टर्न मी ऑन... मला बायकांमध्ये इंटरस्ट नाहीये.'

त्याच्या बकाल खुर्चीच्या पाठी ॲँटिक वाटावं असं घड्याळ... त्यात नऊचे ठोके. पसरिचा समलिंगी संभोगी आहे. होमो! तो होमो आहे म्हणून इतक्या रात्री सुद्धा आपण बिनधास्त त्याच्या खोलीत.

तो टेबलावर हात आपटतो. एखादी गोष्ट शोधायची त्याची अंगवळणी पडलेली सवय. चौथ्या प्रयत्नात सिगरेटचं पाकीट त्याच्या हाताला लागतं. तो सिगरेट काढतो आणि नुसताच वास घेतो. डॉक्टरांनी त्याला सिगरेट प्यायची बंदी केली आहे.

'लूक आशू... राइट वन फायरी स्टोरी... प्रेमानंद हिर्लेकर... सनसनाटी स्टोरीच्या सर्व एलिमेंट्स आहेत भडव्यात... मदरफकर इज् फायर्ड,' तो सिगरेट नाकात कोंबतो. वेडझवा आहे पसरिचा.

'सस्पण्ड्ेड...' मी पसरिचाला करेक्ट करते.

'व्हॉटएव्हर... साला सस्पेण्ड केला काय आणि फायर केला काय, सन ऑफ अ् बिच् लॉस्ट हिज बेल्ट्... ॲण्ड रिव्हॉल्व्हर... बास्टर्ड... दारूत बुडालाय.. चिखलात रुतलाय..' तो नाकपुडीतून सिगरेट काढतो.. शेंबडात बुडालेली... आणि दुधाचा घोट घेतो.

'आणि मी त्या चिखलात उडी टाकू?' मला थोडासा वास येतो.

'येप्.. अशी उडी टाक की, चिखल सगळीकडे उडाला पाहिजे,' पसरिचा मॅड्सारखा हसतो. तो सगळ्या गोष्टींचा धंदा म्हणून विचार करू शकतो. नथिंग मोअर्... नथिंग

लेस... जगात घडणारी प्रत्येक गोष्ट वर्तमानपत्राचा खप वाढायला उपयोगी पडू शकते की नाही, ह्यावरच तोलली जाते.

'यू.. मदरफकर!' मी संतापते.

'आय टोल्ड् यू किड्... वुमेन डोण्ट् टर्न मी ऑन्'

मादरच्योदवर आपल्या संतापाचा परिणामच होत नाही. भोकाचोद आहे ना!

'साला अशी एक्सप्लोझिव्ह लँग्वेज वापर.. यू नो किड्.. व्हेन य् स्टार्ट फायरिंग युवर वर्ड्स.. आय गेट ह्युज इरेक्शन.. साला इंडस्ट्रीमध्ये तुझा हात धरणारा कोण नाही..' पसरिचा खूप सिरियसली बोलला.

'गेल्या महिन्यात तू माझं एकही आर्टिकल छापलेलं नाहीस.. लहान मलांचं हागू पुसायला सुद्धा माझी आर्टिकल्स वापरणार नाहीत, असं तू बोलला आहेस,' माझे डोळे आग ओकतात.

'राग आला? अँग्री?' पसरिचा खुर्चीतून स्वतःला वर खेचतो. तिच्या जवळ येतो. त्याचे हात तिच्या खांद्यावर.

रडायचं नाही. मी स्वतःला बजावते. पसरिचा असा वागायला लागला की, मला खूप रडावंसं वाटतं. मोकळं व्हावसं वाटतं.

'युज युवर अँगर इन युवर आर्टिकल. भांचोद... इंपोटेंट राग काय गाढवाच्या गांडीत सारू?' मी फिसकारते. वेडझवा आहे पसरिचा. असे काही बोलतो की, रागावताही येत नाही.

'लेट मी थिंक्' मी त्याचा हात खांद्यावरून दूर करते.

'लेट मी थिंक्?' तो माझ्या आवाजाची नक्कल करतो, 'साला आत्ता तर रडत होती.. पैसे नाहीत.. तीन महिन्यांत काही कमावलं नाही.. सब साला ॲक्टिंग..' तो स्वतःला पुन्हा खुर्चीत कोंबतो.

'पसरिचा.. माझं नाव.. आशू.. आशू काळसेकर आहे. मराठी.. मोडेन पण वाकणार नाही...' आता तिला अभिनय सुद्धा जमतो.

'भ्क.. संपूर्ण आठवडा.. अध पोटी आहे मी,' मी त्याच्या समोरच्या खुर्चीच्या हातावर टेकते.

'ओके.. वीस हजार..' पसरिचा पुढे झुकतो. त्याला गरज आहे.

'मिरा रोड ते चर्चगेट.. विदाऊट तिकीट.. नरिमन पॉइंटपर्यंत पायी.. बँकेत पैसे शून्य..'

'किड् पंचवीस हजार.. ऑल राइट्स माझे.. लॉक् स्टॉक् बॅरल्,' तो निर्वाणीला येतो.

'उद्या सांगते..' मी उठते.

'फक् यू..' पसरिचाचा आवाज सगळ्या ऑफिसमध्ये घुमत जातो.

'मग्रुर.. माजोरडी साली.. फक् यू..' तो दणादणा टेबलावर हात आपटतो. ग्लासमधले दूध त्याच्या राखाडी पँटवर पडते. ती नको तिथे ओली होते.

'हाऊ डू आय् एक्सप्लेन धिस?' तो पँटच्या झिप्‌कडे पाहात मला विचारतो.

'फक् यू..' मी हसत त्याच्या खोलीच्या बाहेर पडते.

स्टाफ माझ्याकडे पाहून हसतो. सगळ्यांना आमचं नातं ठाऊक आहे.

'त्याला एक कोरडी पँट आणून दे.. मुतलाय तो पँटीत.' मी पसरिचाच्या सेक्रेटरीला, सबिनाला सांगते आणि बाहेर पडते.. खदाखदा हसत...

उपाशीपोटी सुद्धा खूप खूष आहे मी.

मी पुन्हा रस्त्यावर.. नवे प्रश्न डोक्यात... नवी कोडी...

'पसरिचाकडे आपण ॲडव्हान्स मागायला हवा होता का?'

'पण ते आपल्याला जमलं असतं का?'

च्या आयला... हा स्वाभिमान सगळीकडे आडवा येतो. हात पसरणं जमलं नाही. ना बापापुढे.. ना आईपुढे.. ना मित्रांपुढे.. ना सावकारापुढे...

चर्चगट स्टेशनच्या आजूबाजूला वेश्या पसरल्या आहेत. त्यांच्यापेक्षा जास्त अस्वस्थ आहेत त्यांचे भडवे. प्रत्येक रात्रीचं टार्गेट त्यांना गाठायलाच हवं. या बाजारात वेश्यांचे सर्व स्तर पाहायला मिळताहेत. इरॉसच्या बाजूला कॉलेजच्या मुली आणि मुलं.. आता वेश्या हा शब्द स्त्रिलिंगी उरलेला नाही. चर्चगेट स्टेशनच्या बाहेर आणि सब वेमध्ये स्वस्तातला माल.. आणि समुद्राकडे जाणाऱ्या पंचतारांकित हॉटेलच्या समोर उभ्या राहणाऱ्या गाड्यांमधून उच्चभ्रू रांडा.

पुन्हा एकदा मिरारोडपर्यंत विदाऊट तिकीट...

आपलं निर्ढावलेपण खूप उपयोगी पडतं. म्हणजे विदाऊट तिकीट प्रवास करताना टीसीला चुकवायचा प्रयत्न करायचा नाही. कन्फ्रंट हिम्. त्याच्यासमोर जायचं.. खिशात (जिन्च्या) हात घालायचा.. जुनाच ठेवलेला पास काढायचा.. फोटो आयडी काढायचा..

'ठीक है.. ठीक है..' तो सज्जन लोकांमध्ये इंटरेस्टेड नसतो. खोटेपणा.. लोकलच्या दांडीला पकडून उगाचच वाऱ्यावर लोंबकळणारा फाटका मुलगा आपल्याकडे पाहून हसतोय.

मलाही हसू येतं. ह्याला संवाद म्हणायचा. शब्दांची गरजच काय?

जिनेकी मजबुरी. आपण जाणूनबुजून तर करत नाही ना? क्राइम रिपोर्टर कॅन मेक ए फॉर्च्युन... अंडरवर्ल्डच्या पैशांवर... पंचतारांकित फ्लॅट्समध्ये काहीजण राहताहेत. टिव्ही चॅनेल्सचे कित्येक काश्मिरी अतिरेक्यांच्या पे रोल्सवर आहेत. भडवेगिरी केली नाही आपण.. रेल्वेला थोडंसं फसवलं, तर काही बिघडत नाही.

फोकस् ऑन हिर्लेकर... काय नाव त्याचं?

प्रेमानंद... ऑफिसर ऑफ एटीएस.. ॲक्युज्ड् ऑफ.. इन्डिस्क्रिमिनेट फायरिंग... ॲण्ड किलिंग्ज्... अनेक वादळांचा केंद्रबिंदू... मानवी हक्कांसाठी लढणाऱ्या संस्था, राजकीय पक्ष सगळ्यांच्याच रोषाचा बळी... फक्त एवढंच नाही, तर बाहेरचं जग त्याच्या विरुद्ध उलटलं, तेव्हा त्याचं जगही त्याच्याविरुद्ध उलटलं. त्याची बायको, मुले, नातेवाइक सगळ्यांनी त्याला दूर लोटलं. त्याच्या यशात सगळे होते.. पण त्याच्या डाऊनफॉलमध्ये त्याला भागीदार नव्हते.. त्याचा एकच सहकारी उरला होता... दारू...

प्रेमानंद हिर्लेकर.. वादळी स्टोरीसाठी आयडियल मटेरिअल...

प्रश्न असा आहे, आपण ही स्टोरी करायची का?

प्रेमानंद हिर्लेकर.. एक की चा स्ट्रोक.. फाइल सेव्ह होईल.. हार्डडिस्कवर!

पण ती एक यांत्रिक क्रिया झाली. त्याहीपेक्षा महत्त्वाची आहे आपली कमिटमेण्ट.. आपली बाधिलकी सेव्ह होईल.. हार्डडिस्कवर.. मनाच्या.. आणि तिच्याशी आपण शेवटपर्यंत प्रतारणा करणार नाही...

प्रश्न असा आहे की, मला काय हवं आहे? व्हॉट् डू आय वॉण्ट?

पैसे की न्याय? प्रेमानंद हिर्लेकरसाठी...

न्याय? म्हणजे त्याच्यावर अन्याय झाला आहे?

एक शक्यता...

पसरिचा हॅज प्रॉमिस्ड् पंचवीस हजार रुपये.. पैशाची सॉलिड गरज आहे.

सगळ्याचं नाटक करता येतं.. पैशाचं नाही...

घरात शिरेपर्यंत डोक्यात प्रश्नाचा भोसडा झाला.

घरात शिरताच... चार भांडी पाणी.. भूकेचा निचरा झाला.. गादी उलगडा.. त्यावर बेडशिड घाला.. फारच सव्यापसव्य... त्यातून गादीवर धुळीची पुटं जमली आहेत. उशी कळकट्ट मळकट्ट झाली आहे. घराकडे आपलं लक्षच नाहीए. मा करवादली असती. मी कोचावर लवंडते.

काल माचा फोन. तसे ते येतंच असतात.

‘कशासाठी एवढा अभिमान? अभिमानसुद्धा नाही आशू.. दूराभिमान.. एक फोन टाक आप्पांना... शेवटी वयाचा मानसुद्धा राखायलाच लागतो.. तुझाही प्रॉब्लेम सॉल्व्ह होईल.. त्यांचाही.. नाही, म्हणजे आशू.. कधीतरी आयुष्यात सेट्ल व्हायलाच लागेल ना? अगं, शेवटी आम्हालाही समाजाला तोंड द्यावंच लागतं.’

ती बोलत राहिली. जितक्या वेगाने तिचे शब्द एका कानात शिरत होते, तितक्याच वेगाने ते दुसऱ्या कानातून बाहेर पडत होते.

मोबाइलचं एक बरं आहे. मध्येच कनेक्टिव्हिटी गेली असं सांगता येतं.

माणसांच्या सर्व समस्या स्वतःपाशी सुरू होतात आणि स्वतःपाशी संपतात.. इतर फक्त निमित्तमात्र असतात.

'माझी बायको वांझ होती.. किंवा मी नपुंसक होतो म्हणून आम्हाला मूल झालं नाही.' आप्पांनी जाहीरच करून टाकलं होतं.

माझं पालकत्त्व नाकारलं की, यांचे प्रॉब्लेम्स संपत होते?

की त्यांच्यासाठी तो एक हवा हवासा वाटणारा आभास होता?

अशी नाळ तोडता येते? कॅन यू सो डिस्कनेक्ट?

प्रेमानंद हिर्लेकर आणि आपण... वूई आर रिजेक्टेड.. कट् ऑफ... आणि हाच आमच्यातला कॉमन डिनॉमिटर... ?

भेटायला हवं त्याला...

५५८, रोशन मंझील, ऑफ सेकंड क्रॉस लेन, वांद्रे पूर्व..

आता हा पत्ता हाँट करत राहील..

प्रेमानंद हिर्लेकर..

फाइलचे नाव अजूनही कॉम्प्युटरच्या स्क्रीनवर ब्लिंक होते आहे.

एक स्ट्रोक की चा..

आय नीड् समथिंग..

आयदर दारू किंवा ड्रग..

विस्मृतीच्या गर्तेत काहीवेळा स्वतःला झोकून दिलं तर मेंदूला जरा विश्रांती मिळेल... येस.. द होल लाइफ इज रॉटिंग बिकॉज ऑफ मेमरीज... नकोश्या वाटणाऱ्या... भूतकाळाकडे सरसरत जाणाऱ्या.. नागमोडी वाटा.. आठवणी..

लक्षात ठेवण्यासारख्या आठवणींचा भूतकाळ होत नाही. त्या आपण वर्तमान आणि भविष्यातही जगत राहतो..

प्रॉब्लेम स्टार्ट्स वुईथ.. नीड टू फर्गेट.. नीड टू वाईप आऊट.. दी पास्ट!!

५५८, रोशन मंझील, ऑफ सेकंड क्रॉस लेन, वांद्रे, पूर्व..

की स्ट्रोक..

प्रेमानंद हिर्लेकर.. फाइल सेव्ह होते.. कॉम्प्युटरच्या हार्डडिस्कवर आणि आय ॲम कमिटेड.. आता पाऊल मागे नाही...

प्रेमानंद हिर्लेकर...

आय नो हिज टाईप्स्.. त्याच्यासारख्या ऑफिसर्सना वाटत असतं की, ते व्यवस्थेला फाट्यावर मारतात.. पण ते शक्य नसतं.. शेवटी सिस्टिम, व्यवस्थाच तुम्हाला मॅनिप्युलेट करते..

कधी डोळा लागला कळलंच नाही. दिवा तसाच ऑन्..

...............................................................

रस्त्यात बकाल गर्दी आहे.. भटकी कुत्री.. या शहराला जडलेला भयानक रोग आहे..

या शहरात बेवारस मुलं आणि कुत्री यांचा सुळसुळाट झाला आहे. बेवारस पोरं आणि बेवारस कुत्री यांच्या डोळ्यात कुठलीही पाऊलवाटच दिसत नाही. फक्त रिकामं कोरडं ठणठणीत माळरान दिसतं...

स्टेशनच्या बाहेर पडून मुख्य रस्ता गाठेपर्यंत असंख्य माळरानं मी पाहते.

मशिदीतून बांग ऐकू येते. एक शब्दही कळत नाही.. प्रश्न.. देवाची प्रार्थना इतक्या कर्कश आवाजात का? का त्याला गाढ झोपेतून जागं करण्याचा हा एकच मार्ग उरला आहे? समहाऊ चर्चमधली धीरगंभीर प्रार्थना छान वाटते..

महानगरपालिकेची कचरा गाडी... उद्दामपणे कचरा रस्त्याच्या छाताडावर थुंकत माझ्या अंगावरून जाते..

अत्यंत घाणेरडा वास.. कुबट.. आपसूक रूमाल नाकावर.. हासुद्धा वस्तूस्थिती नाकारण्याचा एक केविलवाणा प्रयत्न.. नाकावर रूमाल धरला म्हणून दुर्गंधी नष्ट होते का?

माझं किंवा प्रेमानंद हिर्लेकरचं अस्तित्त्व नाकारण्यासारखंच...

वुई मे स्मेल फाऊल.. बट वुई आर अ रिॲलिटी..

एक बाई काखेत तान्हं मुल घेऊन हात पुढे करते. फाटक्या पोलक्याआडून तिचा भिकारडा स्तन डोकावतो आहे...

ते मूल तिचं नाहीए.. तेवढाच तो स्तनही तिचा नाहीए.. म्हणजे कधीकाळी तो तिचा असेलही.. पण या शहराने तो तिच्याकडून हिरावून घेतला आहे..

दॅट्स दी प्रॉब्लेम वुईथ धिस सिटी.. या शहरात.. तुमचं शरीरही तुमचं राहत नाही. समोरच्या फरसाणच्या दुकानात एक जण गरम गरम फाफडा तळतो आहे... नुसत्या वासानेच पोटात भुकेचा आगडोंब उसळतो..

बॉडी इज अ नॅचरल कॉन्स्ट्रेशन कॅम्प फॉर माइंड...

मॅल्थ्युजची थिअरी ऑफ नीड्स... फिजिकल नीड्स आर बेसिक नीड्स..

एक हिजडा टाळ्या पिटत अंगावरून जातो..

तो सुद्धा डिओ वापरतो... अमेझिंग.. सगळ्यांनाच दुर्गंधीवर मात करायची आहे.. मी नाकावर रूमाल धरते.. हिजडा डिओ वापरतो...

पण आम्ही रूट् कॉजवर कधी काम करणार?

'भाईसाब ये रोशन मंझील कहाँ है?'

समोरच्याचा चेहरा मख्ख.. 'मैं भी यहाँ नयाँ हूँ..'

दॅट्स इट.. पाऊलवाटा तयार व्हायला जमिनीत पाय रोवावे लागतात...

भाईसाब.. ऑफ सेकड क्रॉस लेन..

हिंदी में पुछो..

ही आणखी एक गोची.. संवादाची प्रत्येकाची भाषाच वेगळी झाली आहे. साला विश्वबंधुत्त्वाच्या गप्पा मारतात... त्यासाठी वैश्विक भाषा कुठं आहे?

ऑफ सेकंड क्रॉस लेनचं हिंदी भाषांतर काय करणार?

'भाईसाब, दुसरी लेन कहाँ है?'

'आप वापस जाईए'.. आता आपला चेहरा मख्ख...

'आप समझी नहीं, आप उलटी दिशा लेकर जा रहीं है.. ये बोर्ड देखो..'

गल्ली क्रमांक १८.. निळ्या पार्श्वभूमीवर पांढरो अक्षरं फिदीफिदी हसत होती..

'भाईसाब.. थँक्यू'

विचारांच्या तंद्रीत आपण बोर्ड पाहिलाच नाही.

तो हसला..

बार्स्टर्ड.. ही अण्डरस्टुड थँक्यू..

उलटा प्रवास सुरू.. विचारांच्या तंद्रीत हरवता कामा नये.. वाहून जाता कामा नये..

……………………………………………………………………

*'तुझं हेच मला कळत नाही.. तू अशी वाहून कशी जातेस?'*

*नमाला आपण कधी कळणारच नाही का?*

*'वाहून जायचं नाही, तर जगायचं कशासाठी?'*

*'का? मी नाही जगले? आय ॲम मॅरिड.. एक मुलगी आहे.. दुसरी होऊ घातली आहे.. नोकरी आहे.. नवरा चांगला ऑफिसर आहे. वुई हॅव सेक्स... थ्री टाइम्स अ वीक.. आय एक्सपिरिअन्स ऑरगॅझम.. सुख, सुख म्हणजे आणखी काय असतं?'*

*नमा इज इम्पॉसिबल... नोऽऽऽऽ शी इज पॉसिबल.. आप्पांना आणि मला तिचा अभिमान वाटतो.. त्यांची मानलेली मुलगी.. समाजाच्या सर्व प्रस्थापित निकषांवर सुखी..*

*मी नाही, पण माझी बालपणापासूनची मैत्रिण त्यांना आनंद देते, हे काय कमी आहे?*

……………………………………………………………………

एक भोंगा.. बसचा.. बेस्टची बस... सतत वाजत राहतो..

कितीही तांत्रिक प्रगतो झाली, तरी हे बसचे भोंगे कधी बदलणार नाहीत..

'मॅडम, तो बेस्टचा ड्रायव्हर आहे.. बघेल बघेल आणि अंगावर गाडी घालून निघून जाईल.. मुंबईचे रस्ते यांच्या बापाचे आहेत..'

रिक्षावाला समजावतो.. पाय दुखताहेत याची जाणीव रिक्षा पाहून होते.. आणि लगेचच आठवतं, पर्स रिकामी आहे..

पसरिचाकडे मागितले असते, तर त्याने शंभर रुपये नक्की आपल्या हातावर टेकवले असते.. काहीही अपेक्षा न ठेवता.. बायकांचा त्याला काही उपयोगच नाही...

नमाने हे जग कधी पाहिलेलंच नाही.. तिचं जग सुरक्षित आहे... नवरा.. मुलगी.. सासू.. सासरे.. देव.. तिची फॉल बॅक सिस्टिम तगडी आहे..

ती वैतागली की ह्यातल्या कुणाला तरी दोष देते..

आपण फक्त स्वतःलाच दोष देऊ शकतो..

आपण निदान देव तरी मानायला हवा होता. यू नीड टू बिलिव्ह.. टू ब्लेम.. हा! हा! हा!... धिस इज इट्.. लेन नंबर २.. ऑफ क्रॉस लेन..

'सर... रोशन मंझील..'

'मग.. समोर काय आहे?'

'सर... रोशन मंझील...?'

एक बोट तुटक्या फुटक्या आकाराकडे.. म्हणजे? हे असं पडकं.. दुमजली.. धिस्.. डिलॅपिडेटेड्.. बिल्डिंग?

'यू कॉल धिस शेप अ बिल्डिंग?'

तो थुंकतो आणि जातो..

रोशन मंझील म्हणजे आपल्याला स्कायस्क्रॅपर वाटली नव्हती आणि तरीही जुनीपुराणी का होईना, इमारत वाटली होती...

कालाय तस्मै नमः।

ढिसाळलेल्या पायऱ्यांना न दुखावता वर चढायचं म्हणजे एक आव्हानच...

काही विचित्र नजरा, काही प्रश्नचिन्ह अंगावरून पुढे सरकतात..

मग एक बकाल पाटी.. प्रेमानंद हिर्लेकर.. अर्धवट तुटलेली.. म्हणजे प्रयत्न करूनही न निघालेली... किंवा कंटाळा आला म्हणून मध्येच इंटरेस्ट गल्यासारखी.. अर्धवट.. लटकलेली...

दरवाजा बंद.. शेजारची खिडकीसुद्धा बंद...

पण दरवाजाला कुलूप नाहीए.. म्हणजे कदाचित फेरी फुकट जाणार नाही.

शेजारच्या किलकिल्या दरवाजातून एक नजर न्याहाळते.

पण काहीही विचारायच्या आत दरवाजा बंद.

आपलं मन एक्सप्रेस करायला बऱ्याचदा भाषा लागत नाही. ॲक्शन खूप बोलकी असते. एक शेंबडं पोर 'येडा मामा.. येडा मामा' असं ओरडत अंगावरून पळून जातं. कोपऱ्यावर दिसेनासं होतं. पण त्याच्या खिदळण्याचा आवाज कानावर येतो.

लहान मुलाचा निरागस आनंद...

नाल ठोकलेल्या दरवाज्यावरची कडी मी हलकेच वाजवते. वेळ घालवण्यासाठी इतस्ततः पाहते. एक बाप्या गॅलरीत उभा.. त्याचा हात अर्ध्या चट्टेरीपट्टेरी चड्डीच्या आत. चड्डीत त्याचा पुरुषार्थ ताठ.. सकाळचा उन्माद.. इतस्ततः दिसणाऱ्या आणि न दिसणाऱ्या बायका भोगण्यात त्याची नजर मग्न!

प्रेमानंद हिर्लेकर.. नो रिस्पॉन्स..

पुन्हा एकदा दरवाजा खडखडावायचा.. आता जरा जोरात.. आता दरवाजावर नजर हटवायची नाही. न जाणो, तो दरवाजा उघडून पुन्हा पटकन बंद करायचा.. पाठीला अर्ध्या चड्डीतल्या पुरुषाची नजर बोचकारते आहे.. एव्हाना त्याने आपल्या अंगावरचे सर्व कपडे उतरवले असतील.. आपण त्याच्या हस्तमैथूनाचे टार्गेट.. आपल्या अस्तित्त्वाचा कुणाला तरी फायदा.. निनावी अस्तित्त्व! मादीचे! खरं तर हेच सत्य नव्हे का? ॲडम आणि इव्ह.. दोन लिंगांनी संपूर्ण जगाला घडवले. अगदी वैयक्तिक पातळीवर विचार केला तरीसुद्धा हेच खरे ठरते. एक स्त्री.. एक पुरुष.. एका क्षणी संभोगतात.. बीजारोपण होते.. एक अर्भक जन्माला येते.. मग त्याला नाव... त्याचा भूतकाळ, वर्तमान आणि भविष्यकाळ... त्यातून अपेक्षा, अपेक्षाभंग, वेदना, संवेदना, भावना, गुंतवणूक.. गुंतवणुकीवर व्याज... चक्रवाढ दराने आणखी अपेक्षा... फक् इट ऑल... आप्पा आणि ममा... समजा मी जन्माला आल्या आल्या... कुठेतरी मला सोडून दिली असती तर मी काय वेगळी वाढले असते? मग जीन्सना काय अर्थ आहे? डीएनएचा मतलब काय? कधी कळणार आहे त्यांना की, मी जे काही आहे, ते त्यांचंच कतृत्त्व आहे..

प्रेमानंद हिर्लेकर.. नो रिस्पॉन्स..

दरवाजा जोरात बडवला..

ॲम आय फ्रँटिक? घाबरले की काय? सावज हातातून निसटतंय की काय? कुणी पळवून नेलं की काय ह्या हिर्लेकरला.. की आत्महत्या केली त्याने?

पंचवीस हजार रुपयांचा सवाल होता...

पायातल्या रबरी स्लिपर्सचा पचक्.. पचक्.. पचक्.. पचक्... आवाज ऐकू येतो.. म्हणजे तो घरातच आहे..

आवाज अगदी दरवाजाजवळ...

एखाद्या धक्क्याने कडी उघडावी, तशी कडी खाली पडते.. दरवाजा किलकिला उघडतो... आणि तो पटकन बंद होणार तोच आपला पाय त्या फटीत..

'भेटायचंय तुम्हाला.'

आता दरवाजा सताड उघडतो.. प्रेमानंद हिर्लेकर.. फार उंच नाही.. बांधा मध्यम.. दाढीचे खुंट गालांवर... माळरानावर खुरटं गवत उगवावेत तसे.. केस.. विस्कळीत.. डोळे न झोपलेले आणि तरीसुद्धा चकाकणारे... चमकणारे.. जणू काही लेन्स बसवलेले... थोडीशी वेडाची झाक असलेले.. मनस्क डोळे... अतिरेकी... तडजोड न करणारे.. एकाकी... विराण.. पण थोडेसे कंटाळलेले.. ओठांमध्ये सिगरेट लटकतेय.. तपकिरी झब्ब्याला छोटी छोटी भोकं.. सिगरेटच्या निखाऱ्यांनी पडलेली. लेंगा पांढरा.. पण स्वच्छ... इस्त्रीचा.. ओशट झब्बा आणि इस्त्रीचा लेंगा यांच कॉम्बिनेशन.. आणि विसंवादी अस्तित्त्व.. प्रतिकात्मक जणू...

'काय हवंय तुम्हाला?'

एक घोघरा प्रश्न... पण उत्तर देणारे शब्द उभ्या हातापुढे थबकतात..

'तुमचंच काय, कुणाचंही या घरात स्वागत होत नाही... मी कामात आहे.'

बोटं स्टुलावरचा अर्धा भरलेला दारूचा ग्लास दाखवतात. शेजारी दारूची अर्धी भरलेली बाटली. फरशीवर पाण्याचा तांब्या...

'म्हणजे समजा आत्ता इथे कुणी तुमच्यावर बलात्कार करायचा प्रयत्न केला.. किंवा.. भूकंप झाला आणि ही झाटभर इमारत भूईसपाट झाली.. किंवा अतिरेकी या इमारतीत

घुसले आणि त्यांनी आपल्या ऑटोमेटिक रायफलमधून अंदाधुंद गोळीबार सुरू केला आणि किड्यामुंग्यांसारखी माणसं टिपायला सुरुवात केली, तरीही मी दखल घेणार नाही.. आम एम नॉट टू बी डिस्टर्बड्'

या वाक्यावरच माझ्या पावलावर लाथ बसते. पाऊल फटीबाहेर फेकलं जातं आणि दरवाजा धाडकन बंद होतो.. खळ्ळ खट्ट.. कडी लागते.

हे फारच वाईट होतं. कुणीतरी आपल्या मुस्कटात मारल्यासारखं. एका क्षणी वाटतंय, सोडून द्यावा याचा नाद. काय समजतो स्वतःला? चिखलात रूतलाय मे बी... माझ्याशी बोलला, तर कदाचित या चिखलातून बाहेर पडायला त्याला मदतच होईल किंवा मी त्या चिखलात फसेन. त्याला साथसंगत.. कम्पॅनिअन.. आयदर वे.. ही गेन्स.. पण त्याला या चिखलातून पाय बाहेर काढायची इच्छा आहे का?

हा तर सगळ्या जगावर उपकार केल्यासारखा वागतोय...

पण आपण खाली हात परत गेलो तर करायचं काय?

आणखी एक दिवस उपाशी?

मग चिडचिड.. तडफड.. स्वतःवरच... तेसुद्धा उपाशीपोटी..

फारच वाईट...

पुन्हा एकदा दरवाजावर थाप...

'कशाला त्याच्या नादाला लागताय? येडझवा आहे तो.. सणकली, तर काहीपण उचलून फेकतो.' एक अनाहूत, अधांतरी इशारा...

'तुम्ही दरवाजा उघडला नाहीत, तर मी लाथ घालेन दरवाजावर. नाहीतर.. नाहीतर... या दरवाजाबाहेर आरडाओरडा करेन... मी तीन मोजेन..'

'एक... दोन... तीन...'

आपल्या पायाचा स्विंग.. त्याच्या दरवाजावर लाथ बसणार... तोच तो दरवाजा उघडतो. तोल जातो.. आपण त्याच्या खोलीत भूईसपाट...

'मला डिस्टर्ब करायचं नाहो... मी सांगितलं होतं.'


घोघरा आवाज घोंघावत जातो..

खोली कुबट वासांनी घमघमलेली. मोकळ्या हवेची त्या खोलीला सवयच नसावी... सगळीकडे अस्ताव्यस्त पसारा.. सिगारेटची थोटकं.. बेवारस.. चिरलेला कांदा... भूईसपाट नजरेसमोरच लडबडतो.. खोलीच्या एका कोपऱ्यात कळकट्ट मळकट्ट अंडरवेअर.. वर्तमानपत्रांच्या कागदांचे बोळे... चिकनची ग्रेव्ही.. स्टुलाच्या पायावरून घरंगळत खाली येऊन नदीच्या सुकलेल्या प्रवाहासारखी... आणि या सगळ्यांवर मात करून नाकात शिरणारा उग्र वास.. स्टुलावर एका बशीत लसणीची फोडणी दिलेले कुरमुरे.

पोटात भुकेचा आगडोंब.. आवर न घालता येणारा.. अनकंट्रोलेबल.. एखाद्या हावरटाप्रमाणे बशी आपल्या हातात आणि अधाशी, उपाशी मुलाप्रमाणे कुरमुऱ्याचे बकाणे आपल्या तोंडात.. ते खमंग कुरमुरे सोडून या जगात कशाचंही अस्तित्त्व नव्हतं.. आपलं अवघं शरीर त्या कुरमुऱ्यांवर केंद्रीत झालं होतं. हाताच्या मुठीतून आणि ओठांच्या कोपऱ्यातून काही कुरमुरे जमिनीवर ओघळतात.. वेचून वेचून कुरमुरे पुन्हा तोंडात.. अमूल्य असे कुरमुरे.. ध्यानीमनी नसताता एक मूठ उघडते आणि आणखी कुरमुरे बशीत यऊन पडतात. आता घाईगर्दी न करता जमिनीवर बसकण... आश्वासक.. स्थिरावलेली.. कुरमुरे खाताना एका शाश्वत सत्याची चव घेत भूक...

नथिंग लेस... नथिंग मोअर...

भूक...



--दोन--

प्रेमानंद हिर्लेकर

बाप रस्त्यावरच्या कामावर मजुरी करायचा.. दगडावर घण घालून कमावलेलं शरीर होतं त्याचं.. काळंकभिन्न.. हातांच्या दंडावर टचाटच फुगलेल्या नसा त्याची साक्ष द्यायच्या. बापाच्या हाताची बोटंसुद्धा जाडो, घट्ट होती. कडेवर घ्यायचा तेव्हा टोचायची मला ती. बापानं कडेवर घेतलं की मी रडायचो. त्याची राठ दाढी आणि अक्राळविक्राळ मिशी मला घाबरवायची. मऊपणाचा आणि बापाच्या शरिराचा दुरान्वयेही संबंध नव्हता. पण त्याच्या शरिरात नसलेला मऊपणा त्याच्या डोळ्यांमध्ये उतरला होता. आणि माझ्याकडे पाहिलं की बापाचे डोळे आणखीनच मऊ व्हायचे.. कुंभारवाड्यातल्या काळवटलेल्या मऊशार चिखलासारखे.

बापाला नाव होतं... भीमा... पण माझ्यासाठी तो बापच होता. पहिल्यापासून...शेवटपर्यंत.

'बाप गेला '

त्याचे डोळे मिटेनात तसं मीच आयेला सांगितलं होतं. त्यावेळीसुद्धा तो बापच होता आणि तीस वर्षांपूर्वी रेल्वेलगतच्या झोपडपट्टीतही तो बापच होता. आणि तसं ते लॉजिकलसुद्धा होतं.

मला आठवतंय.. आमच्या झोपडपट्टीतल्या बायका दुपारच्याला जमा व्हायच्या. सार्वजनिक नळ आमच्या झोपडीसमोरच होता. बायका पाणी यायची वाट पाहत बसायच्या. बाप कधी दुपारच्याला घरी असला, तर मग आये त्या बायांसमोरच विचारायची.. 'कोण हा तुझा ?'

आता त्या वयात नाती कळत नव्हती. पण एवढं माहीत होतं की, कोपऱ्यावरच्या फळकुटीवरून तो मला बिस्किट घेऊन द्यायचा. पण तरीही 'कोण कुणाचा असतो,' हे त्या वयात कळत नव्हतं.

तसं कोणीच कुणाचं नसतं, हे आता वय वाढल्यावर कळतंय.. ते सोडा.

आयेने विचारलं, 'हा कोण तुझा?' की सगळ्या बायका ओरडायच्या,

'बाप'

आणि खिदळायच्या. त्या असं बोलल्या की, बापाचा चेहरा खुलायचा. मग मला कळलं, आपला बाप असणं याला आवडतं.

तेव्हापासून माझ्यासाठी त्याला 'बाप' हेच नाव पडलं.

'बाप'

तर, रमाई झोपडपट्टीतले आम्ही सगळे पोट हातावर घेऊन जगणारे होतो. संध्याकाळी काय खायला मिळणार आहे, हे सकाळी ठाऊक नसायचं आणि सकाळी काहीच खायला मिळणार नाही, हे रात्रीच ठाऊक असायचं.

बापाचा दिवस अगदीच वाईट असेल, तर संध्याकाळीसुद्धा खायला मिळायची भ्रांत होती. मग बाप रेल्वेच्या कडेला उगवलेला पाला घेऊन यायचा. आये तो शिजवायची. पाणी, पाला, मीठ आणि भात.. भूक भागेपर्यंत काहीच कळायचं नाही. भाताबरोबर पाला गपागप पोटात ढकलला जायचा. पण भूक भागल्यावर त्या पाल्याला हागूचा वास यायचा. सगळी झोपडपट्टी हागायला रेल्वेच्या कडेलाच जायची ना!

पण कधीकधी तो पालासुद्धा नशिबात नसायचा!

ना पाला.. ना भात.. मग बाप चेहऱ्यावर जन्मजात छापलेली अजीजी आणि लाचारी घेऊन भैय्याकडे जायचा. बापाला पाहिलं की भैय्या अंगावरचे कपडे उतरवायचा आणि फक्त लंगोटावरच खाटेवर उताणा पडायचा. बाप त्याचं अंग रगडून द्यायचा.. आणि येताना एका कागदाच्या पुडक्यात कुरमुरे बांधून घेऊन यायचा.

लांबून बापाला हातात कागदाचा पुडा घेऊन येताना पाहिलं की, तो मला आभाळाहून मोठा वाटायचा. आमच्या गोष्टीच्या पुस्तकात आम्हो चित्र पाहायचो ना, तस्साच! झोपडीकडे परतताना बापाच्या चेहेऱ्यावर लाचारी, अजीजी नसायची.

'चुलीवर भाजून घ्ये', तो आयेला सांगायचा.

'आता त्ये बी सांगायला होवं का?' आये विचारायची.

बापाच्या आणि आयेच्या या संवादांवर डोक्यात भुकेचा आगडोंब उसळायचा. हो... भूक पहिले डोक्यात यायची.. मग पोटात!

आये काळं मीठ चुरून तव्यावर टाकायची आणि मग लपवून ठेवलेला एखादा मोठ्ठा दागिना बाहेर काढावा.. तसा एक लसूण चुलीशेजारच्या पोत्याखालून बाहेर काढायची.

कुरमुरे, मीठ आणि लसूण तव्यावर भाजलं जायचं. आणि एकदा का ते समोर येऊन पडले की मी त्यांच्यावर तुटून पडायचो. असा की, मी आणि ते कुरमुर एकजीव होऊन जायचो. एक मात्र मला तेव्हा कळायचं नाही.. मला असं खाताना पाहून आये रडायची का? आता कळतं...

डोळ्यात आलेलं पाणी मी हलकेच पुसलं!

लहानपणातली काही दृष्यं.. कायमीच डोळ्यांवर छापली गेली आहेत. पुसायचा कितीही प्रयत्न केला तरी पुसली जात नाहीत.

मला लहानपणातल्या माझ्या भूकेची आठवण करून देत ती समोर बसली आहे... बसकण मारून.. मी पुन्हा घातलेले कुरमुरेसुद्धा संपत आले होते.

तिचा जीव जरा शांत झाल्यासारखा वाटत होता..

भूक...!

'माझं नाव...' माझ्या तोंडातून नकळत शब्द फुटले.

'प्रेमानंद हिर्लेकर...' माझे शब्द तोडत तिचे उत्तर.

'बाय प्रोफेशन...' मी पुन्हा प्रयत्न करतो.

'एटोएसमध्ये ऑफिसर... सस्पेण्डेड...' ती मला बोलू द्यायलाच तयार नव्हती.

'कारण...' हा माझा शेवटचा प्रयत्न?

'विनाकारण फायरिंग...' ती थांबूच शकत नाही.

'असा आरोप आहे माझ्यावर.. सिद्ध झालेला नाही अजून,' माझ्या कपाळावरची शीर तट्ट फुगते. ही चांगली खूण नाही.

'हेतूपुरस्सर काही तरुणांचा खून...' ती मला डिवचायचा प्रयत्न करते आहे?

'ते संशयीत अतिरेकी...' मी बोलण्याचा प्रयत्न करतो.

'एन्काऊंटर किलिंगसाठी...' ती माझ्याकडे रोखून पाहत आहे.

'मी प्रसिद्ध आहे.' मी तिचं वाक्य पूर्ण करतो.

'तुम्हाला जीव घ्यायला आवडतं.' तिचं हे वाक्य मी पूर्वी ऐकलं होतं. कुठे? केव्हा? मी विचारांची गर्दी दूर सारायचा प्रयत्न करतो.

'कायद्याची प्रोसेस सोप्पी करायची असेल तर...' अचानक मला कंटाळा येतो. कशासाठी ही बकवास बडबड? एक स्पष्ट होतं की, समोर बसलेली व्यक्ती मला आवडत नव्हती. मग मी कशासाठी बोलत आहे?

'भूक भागली?' मी विषय शेवटाकडे आणला.

'येस, धन्यवाद..' तिने ओठांवरून जीभ फिरवली.

'मग निघा,' मी दोन पावलं दरवाज्याकडे सरकलो.

खरोखरच तिनं जावं. वेळ फुकट घालवू नये. कुणाला काहीही पडलेली नाही. परवा एक पाटी वाचली, 'हॉर्न मत बजाइए... देश सो रहा है...'

किती वर्षं देश झोपलेलाच आहे!

देश झोपलेला असायचा... आणि बाप... रात्र रात्र जागा असायचा. मला साथ करत. माझा दहावीचा अभ्यास चालू होता. मध्येच बोटं मोडत आणि आळस देत मी त्याला विचारायचो.

'तू का जागा राहतो?'

तो हसत माझ्याकडे बघायचा.

'ड्राइव्हरच्या शेजारचा झोपला की, ड्राइव्हरलाबी झोप येते...' झोप लागू नये म्हणून उशाशी हिरवी मिरची ठेवायचा. झापड आली की, दाताखाली एक तुकडा तोडायचा.

बाप आता जास्तीचं काम मिळतंय का, ते शोधायचा. मी रात्री अभ्यास करायचो ना! वीजेचं बिल जास्त यायचं, तर त्याला कुणीतरी सुचवलं, 'मीटर कसं वापरायचं ते'. बाप घाबरला. 'आपलं तकदीर बोकडाच्या मेल्या कातड्यापेक्षाबी मुर्दाड हाये. व्हान म्हून पन कुनी पायात घालनार न्हाई.. नगं.. त्येच्यापरीस म्येहनत करेन आनि इजेचं बील भरंन.' बाप जास्तीची महनत करू लागला. मला भीती वाटायची.

'पण तू झोप की.. दिवस रात्र मेहनत करतोस तू... मरशील लवकर अचानक.' मला खरंच भीती वाटायची. बाप मेला, तर आपलं बघणार कोण? आपण कुणाकडे बघणार?

'आरं ह्या जल्माला आलू तवाच निंद इसरून आलो की रं...' बापाला मध्येच हिंदी शब्द वापरायला आवडायचे.

'म्येहनत करून मरनारी जमात न्हाई बाबा आपली... बाबानं सांगितलं हाये, रक्त ओकेपर्यंत म्येहनत करा.. पन भीक मागू नका. मान ताठ ठ्येवा.'

आंबेडकर म्हणजे बापाचं दैवत होतं. झोपडीत एकच फोटो होता. 'बाबां'चा. बाप मला दररोज त्या फोटोपुढे उभं करायचा. हात नाही जोडायला सांगायचा. पण म्हणायचा, 'त्येंच्याकडे बघ... डोळं उघडं ठ्येवून बघ.. त्येनं सांगितलं हाये, मानानं जगा आनि मानानं जगायचं असेल तर शिका...'

'तू का नाही शिकलास?' माझा भाबडा प्रश्न!

'बाबा लइ उशीरा पैदा झाला रं. तोपोत्तुर आमची जिंदगी बरबाद झाली व्हती.. ढोरं व्हडत आनि दगडं फोडून... आता बडबड करू नगंस. पुस्तक वाच,' बाप दटावायचा.

त्याचं सगळं आयुष्य आता माझ्यातच वाहून आलं होतं. जणू तो माझ्यातच जगत होता. मला नेहमीच त्याचं खूप ओझं वाटायचं. न जाणो, आपण परीक्षा नापास झालो तर? माझ्या डोक्यात विचार यायला आणि बाजूनं जाणाऱ्या रेल्वेट्रॅकवरून मोठ्ठी किंकाळी ऐकू यायला एकच वेळ झाली. काही वेळ सगळ्यांची धावपळ. इतस्ततः पडलेले तुकडे गोळा करण्यासाठी! पलिकडच्या झोपडीत राहणाऱ्या बायजेनं आत्महत्या केली होती. काय म्हणे, तिला आजार होता. जगण्यापेक्षा तिनं मरण जवळ केलं होतं.

आपण नापास झालो, तर बाप रेल्वेचा रूळ जवळ करेल का?

जाम भीती वाटायची मला.

'आपण इथे नको राहू या,' मी एकदा आयेला म्हणालो.

'का बाबा?' आयेला अचानक मी असं का म्हणत आहे, ते काही कळेना.

'रेल्वे फार जवळ आहे.. किती लोक मरतात.. कोणी अपघातात, तर कोणी जीव देतात.. आठवड्याभरात एक तरी मुडदा असतोच... परवा मेहमुदचे दोन्ही पाय कापले गेले.' मी माझी चिंता व्यक्त केली.

'त्येचं काय सांगतूस.. सगळे म्हनत्यात, त्येनं मुद्दामूनच क्येलं..' दोन्ही हातांनी आपले गुढगे चेपत म्हातारी बोलली. चेहरा निर्विकार होता तिचा. जीवनातली सर्व कटू सत्य निर्विकारपणे पचवलेल्या योगिनीसारखा त्या माऊलीचा चेहरा शांत होता.

'मुद्दामून? वेडी आहे का तू? कोणी मुद्दामून पाय तोडून घेईल?' जीवनाच्या इयत्तेत मी अजूनही बिगरीतच होतो.

'लुकसान भरपाई मिळत्ये बाबा!'

हा नसताच किडा आयेनं माझ्या डोक्यात सोडला होता. उद्या बाप थकला आणि काम नाही करू शकला, तर घर पोसायला असला वेडझवेपणा करायलाही कमी करणार नाही. त्याच्या बाबाने सांगितलं असेल वा नसेल!

तेव्हापासून रेल्वेची दडस भरली आहे मनात.

वांद्र्याच्या रोशन मंझीलमधली खोली आम्ही पहिल्यांदा पाहिली तेव्हां खरं तर मला ही नको होती. रेल्वे जवळ! पण आमच्या आयेनं हट्टच धरला. इतक्या स्वस्तात मिळते आहे. आपलाच गाववाला आहे.. गावाकडे परत चालला आहे.. हीच खोली हवी.

दहा वर्षं काढली या खोलीत. बापाला आणि आयेला इथूनच बाहेर काढलं.. म्युनिसिपाल्टीच्या हर्समध्ये ठेवून.. दुसरीकडे राहायला गेलो. पण ही जागा नाही विकू शकलो. आयेचा धाक होता... मेली तरी!

सस्पेंड झाल्यावर सगळेच हरवले. तेव्हा हीच खोली जवळची वाटली होती.

आयेची ऊब होती जणू!

सस्पेंड झालो तेव्हा!!

'मला बोलायचं आहे तुमच्याशी'

च्याआयला ही हट्टीच आहे! जरा निरखून पाहू लागलो तिला. बुटकी.. चार फूट.. दहा किंवा अकरा इंच.. पाच फूट निश्चितच नाही.. गहूवर्णी.. अंगाने.. कधीकाळी भरलेली असावी.. कारण अंगावरचे कपडे सैल.. ढिसाळ आणि उतरलेले वाटत होते. वर सरकलेल्या टॉपखालची जीन्सही ढिसाळ वाटत होता. हात बोडके.. रिस्टवॉचसुद्धा नाही.. अलिकडच्या मुली! किंवा आपण बुरसटलेल्या विचारांचे!!

तिचा गळा आवडला. चांगला उभा होता. टॉप छातीपाशी लूज होता. पण गळ्याभोवती घट्ट होता. आणि त्यामुळे गळ्याची उंची जास्त उठून दिसत होती. लहानपणी म्हशीने पाय दिल्यासारखं बसकं नाक.. तिच्या डोळ्यांमध्ये पाहिलं आणि स्तब्ध झालो. आपल्याला अगोदरच कसं नाही जाणवलं? आयुष्य गेलं माणसं वाचण्यात.. डोळ्यांमध्ये पाहून.. पोलीस अंकॅडमीतला पहाड... पवार सर म्हणायचे,

'शरिराचा कुठलाही अवयव खोटं बोलू शकतो.. डोळे नाहीत.. खोट्याच्या थोड्याश्या वजनानेसुद्धा डोळे खाली झुकतात.'

'दोन मिनिटं डोळ्यात रोखून पाहिलं तर माणसाच्या इंटिग्रिटीचा तळ गाठता येतो' पहाड म्हणायचा.

काही वेगळेच होते ते डोळे! ते सुंदर नव्हते. म्हणजे असतीलही! पण आपली पाहण्याची दृष्टी ती नव्हती. ते डोळे बोलके होते. सतत बोलणारे डोळे होते ते! त्यांच्यात एक बंडखोरी तुडूंब भरलेली होती. माझी.. मी! असं म्हणणारे ते डोळे! माझी... मी... माझ्यासाठी... माझ्यामुळे... असे बंडखोर डोळे मी सहसा पाहिलेले नव्हते.

'काय हवंय?'

'तुमची गोष्ट'

'का?'

'खरं सांगू?'

'मला खोटं ओळखता येतं'

'खरं पचेल?'

'अलिकडे सवय होत आहे'

'मला पैशांची गरज आहे.'

'तुम्ही चुकीच्या घरात शिरला आहात.'

'तुमच्याकडे पैसे नाहीत, हे मला माहीत आहे. पण तुम्ही माझे पैसे आहात...'

मी संवादांची फैर हेतूपुरस्सर थांबवली. तिच्या कडेने मुंग्यांची एक रांग दिसू लागली होती. अत्यंत शिस्तबद्ध. ट्रेनिंगसाठी बांगलादेशमध्ये चितगांवला गेलो होतो. तिथे दररोज सकाळी स्टेशनपासून तयार कपड्यांच्या कारखान्यात नोकरीला जाणाऱ्या बायकांची अशीच रांग लागते. सगळ्या अत्यंत शिस्तीत.. माना खाली घालून... चालतात मुंग्या!

'स्टॉप!'

ती दचकते.

'काय झालं?'

'त्या मुंग्यांना मारू नका'

'मी फक्त..'

'त्या काही करत नाहीत... हार्मलेस'

'चावली म्हणून...'

'एका मुंगीचं चावणंही तुम्ही सहन करू शकत नाही?'

'पॉइंट आहे.. सॉरी, मान्य.. नाही मारणार.'

मग एक शांतता. प्रेग्नंट पॉज.. तिने केस एवढे कापायची गरज नाही. जरा वाढले, तर खरं म्हणजे चांगले दिसतील तिला. अगदी फार नाही. पण खांद्यांपर्यंत.. शोल्डर कट्.. दात पांढरेशुभ्र आहेत. म्हणजे ही सिगारेट ओढत नाही. का कुणास ठाऊक.. बरं वाटलं.. च्यामायला.. बंडखोर मुलोंची एक साचेबद्ध इमेज आपल्या मनात तयार झालेली दिसते.

'तुमच्यावर आर्टिकल लिहिण्याचे मला पैसे मिळणार आहेत. एक्सक्लुझिव्ह.. एक्सप्लोझिव्ह.. आर्टिकल.'

मी तिच्या डोळ्यांत पाहत आहे.

'यू नो.. तुम्ही खोटं बोलत आहात.'

'कशावरून?'

'पैशांसाठी आर्टिकल्स लिहिली असतीत, तर तुमच्यावर कुरमुरे खाऊन भूक भागवण्याची वेळ आली नसती.'

'ओह्! मला खरंच खूप भूक लागली होती.'

'आणि त्याबद्दल मला जरासुद्धा शंका नाही. मला भूक खूप चांगली ओळखता येते.. खूप जवळची दोस्ती आहे माझी तिच्याशी.. लहानपणापासूनची!'

'वुईल यू टॉक? बोलाल तुम्ही माझ्याशी? आय वुईल नॉट डू यू इनजस्टिस.'

मला हसूच येतं.

'का हसलात?'

काय उत्तर देणार मी ह्याचं? अन्याय हा इतका नैसर्गिक होता आपल्या आयुष्यात, लहानपणापासूनच!

बापाला बारा तासांच्या मजुरीचे पंचवीस रुपये मिळायचे. एक दिवस तो एक कागद घेऊन आला माझ्याकडे.

'काय लिवलंय ह्यच्यात?' माझ्या डोळ्यासमोर तो कागद फडकावत बापानं मला विचारलं. त्या कागदावर खाली अंगठा उमटवला होता.

'हा तुझा आहे?' मी विचारलं.

'मंग काय माज्या बापाचा हाये?' बाप संतापला. आपल्या अशिक्षितपणावर. सहीसुद्धा करता येत नव्हती बापाला.

'चिडतोस कशासाठी?'

'आता काय लिवलंय ते सांगतूस की हानू कानसुलात?'

ही फक्त बोलायची भाषा होती. बापाने कधी माझ्या अंगाला करंगळी लावल्याचंसुद्धा मला आठवत नाही. मारणं दूरच!

'हसू नगंस..' त्याला सुद्धा माहिती होतं. आमचं नातंच तसं होतं.

'ही मजुरीची पावती आहे.' मी त्याला सांगितलं.

'किती हाये मजुरी?' तो माझ्याकडे पाहत होता.

'पन्नास!' माझ्या डोक्यात थोडाथोडा प्रकाश पडत होता.

बाप गप्प बसला.

'अरे पण तू तर म्हणाला होतास, पंचवीस...' मी वाक्य अधांतरी सोडलं. मला कळत नव्हतं की, या विषयात खोलात जाऊन प्रश्न विचारलेले त्याला आवडतील की नाही.

'मग काय खोटं बोलतू?'

'अरे पण या पावतीवर पन्नास मिळाले म्हणून तू अंगठा लावला आहेस.'

'त्ये बी खरं हाये.' कागद आपल्या हातात घेत बाप म्हणाला.

'म्हणजे पंचवीस रुपये?'

'गळती झाल्ये' आयेनं मध्येच तोंड घातलं.

'गळती?' मला कळेच ना.

'ती पान्याची टाकी बघ की.'

गेले कित्येक दिवस सार्वजनिक नळाला पाणीच येत नव्हतं. त्याबदल्यात पाण्याचा टँकर यायचा. मग एखाद्या कुत्रीला पिलं लुचावीत तसे पंधरा वीस पाइप पाण्याच्या टाकीत शिरायचे आणि तेवढ्याच बादल्या आणि प्लॅस्टिकचे हंडे टँकरखाली लागायचे. हे सगळं चालू असताना टँकरपाठच्या मोठ्या नळातून पाणी गळत राहायचं. आम्ही अनाडी असे की, त्या गळत्या नळाखाली बादली ठेवायचो नाही. आणि ठेवली तरी क्लिनर ओतून द्यायचा. एका टँकरचे दोन टँकर कसे होणार नाहीतर? ड्रायव्हर आणि क्लिनरला ट्रिपचे पैसे मिळायचे. ठेकेदाराला टँकरपाठी पैसे मिळायचे.

'त्येला गळती म्हणायचं.' आयेनं भाकर बडवायला घेतली.

'बाबा मुकादमालाबी द्येयाचं लागतया..' कागदावरच्या सुरकुत्या सरळ करत बाप बोलला.

'म्हणजे तू भर उन्हात बारा तास मेहेनत करणार आणि तो मुकादम नुसताच बसून खाणार?'

'आरं पन सकाळच्याला कामावर कोन ठेवतंय? मुकादम ना? त्येचं डोसकं फिरलं तर पुरा दिस भाकड.. घरी बसाया लागतंय.' बापाने तर्कशास्त्र उलगडून सांगितलं.

तेव्हा काही कळत नव्हतं. पण शिकल्यावर, कॉलेजात गेल्यावर हे प्रसंग आठवायचं आणि सत्तेचा.. पॉवरचा दुरुपयोग कसा होत आहे, ते कळायला लागलं. पॉवर करप्ट्स ॲण्ड ॲब्सोल्युट पॉवर करप्ट्स ॲब्सोल्युटली.. दलालांची सत्ता!

समोर बसलेलीसुद्धा एक दलालच की!

दचकायला झालं. वॉट अ सिमिली! शॉकिंग!! पण खरंच आहे की.. माझ्या सस्पेन्शनचं भांडवल करून ती पैसे कमावणार. मग दलाल नाहीतर काय?

'तू दलाल आहेस?'

तिचा चेहरा क्षणार्धात पडला. वाटलं.. पुढल्या काही सेकंदात तिनं खाल्लेले सर्व कुरमुरे ओकून पडतील.

'तुम्हाला तसं वाटतंय?' ओठ थरथरत होते तिचे. डोळे थोडेसे बावरलेले. अचानक फुटक्या आरशात आपण आपलंच विकृत प्रतिबिंब पाहावे, तस्से!

'होय!' मी तिचे डोळे घट्ट पकडून ठेवले होते.

'कुणालाही आपण केलेल्या कामाचा मोबदला मिळणे म्हणजे दलाली नव्हे.'

'दुसऱ्यांच्या आयुष्याचं भांडवल करणे म्हणजे आपण केलेलं काम नाही.'

'अशाने कुठलाच अन्याय लोकांपुढे येणार नाही.'

'पण त्याची गरज असेल तर..' मी व्हिस्कीचा ग्लास एका घोटात रिकामा केला.

'आणि तुम्हाला गरज का नाही?'

मी व्हिस्की ग्लासात ओतू लागलो. तो आवाज मला नेहमीच आवडत आला आहे. एण्टायर प्रॉमिस ऑफ व्हिस्की इज इन दॅट साऊंड.

'तुम्हाला तुमची बाजू का मांडायची नाही?'

'कोणापुढे मांडायची?'

'लोकांपुढे... माझ्या वाचकांपुढे?'

'गेट आऊट' माझ्या डोक्यातली नस फुटली होती. मी करतोय ते बरोबर नाही, हे कुठेतरी मला एका कोपऱ्यात अस्पष्टपणे जाणवत होतं. पण आता माझा माझ्यावर संयम नव्हता. ही भेट खूपच लांबली होती.

'पण लक्षात घ्या..' हा एक हतबल प्रयत्न होता तिचा.

'गेट आऽऽऽऊट' माझा आवाज घोंघावत गेला आणि ती उभी राहिली.

मी तिचे खांदे पकडले आणि ढकलत तिला दरवाजापर्यंत आणलं.

'पुन्हा या दारावरची कडी वाजवायची नाही.' एखाद्या हिंस्र श्वापदाप्रमाणं माझ्या तोंडातून शब्द बाहेर पडले. तिनं एकवार माझ्याकडे पाहिलं. ती पुसटशी हसली.

'आपण पुन्हा भेटणार आहोत.' ती बाहेर पडली आणि मी दरवाजा धाडकन बंद केला. पुन्हा मी खोलीत... एकटा!!

डोक्यात छोटे छोटे स्फोट होत होते. विचारांच्या सुरुंगांचे.. मेंदूच्या ठिकऱ्या उडवणारे. सगळ्या जाणीवा.. संवेदना बधीर का होत नाहीत? का सगळ्याला आपण असे अतिरेकी रिॲक्ट होतो? का प्रत्येक कृतीपाठी आपल्याला स्वार्थ, खोटेपणा, दांभिकपणा जाणवत राहतो? का त्यावर आपल्याला इतकी तीव्र प्रतिक्रिया नोंदवावीशी वाटते?

मोरीत जाऊन अंगावरचे सगळे कपडे उतरवले. उतरवले नाहीत...ओरबाडून काढले. वाटलं कपड्यांसारखी शरिरावरची सगळी चामडी सोलवटून काढता आली तर? मग शरिरावर एखादी निबर.. संवेदनाहीन कातडी पांघरता येईल? बापाने नव्हती पांघरली? आयेनं नव्हती पांघरली? या शहरातल्या सगळ्या झोपडवस्तीनं नाही पांघरली?

बदाबदा अंगावर पाणी ओतून घेतलं. बादली दाणकन पिंपाच्या तळाशी आपटली, तेव्हा पिंप रिकामं झाल्याचं लक्षात आलं.

टॉवेलने अंग खसाखसा घासू लागलो.

चामडी चरचरली.

तांबूस चट्टे उठले चामडीवर.

समटाइम्स पेन ऑल्सो गिव्ज यू लॉट ऑफ प्लेजर... सुकून मिळतो. पेन प्रोव्हाइड्स यू नेसेसरी डिस्कनेक्ट फ्रॉम रिॲलिटी. बिकॉज, इट फोर्सेस यू टू फोकस ऑन नथिंग बट पेन!

पोलीस ॲकॅडमीतल्या फिजीकल स्ट्रगलमध्ये आपण याचा बऱ्याचदा अनुभव घेतला आहे. बाकीचे, शारीरिक वेदना कधी आटोपते, याची वाट पाहायचे. आणि आपण... आपण ती लांबवण्याचा प्रयत्न करायचो. पुशअप्स करताना थांबावंसं वाटत नाही. आणखी वेदना हवी, असं क्रेव्हिंग वाटत राहतं. गिव्ह मी सम मोअर पेन!!

बापाकडून घेतलं आपण हे.

आरामखुर्चीत नग्नावस्थेत आपण तसेच..

ती डोळ्यांसमोर आली.

काय नाव बरं तिचं?

आपण तिचं नावच विचारलं नाही. अधांतरी दोर कापला गेला, तेच बरं झालं.

दरवाजाच्या फटीतून प्रकाशाचा एक कवडसा.. कुरमुऱ्यांच्या रिकाम्या बशीवर.. बशीखालच्या कागदाच्या चिटोऱ्याला तो खुणावत होता.

मी उठून तो चिटोरा प्रकाशासमोर धरला.

त्याच्यावर तिचं नाव आणि पत्ता होता.

पण तिनं हा चिटोरा कधी लिहीला? ती तयारीनिशी आली होती. शी एक्सपेक्टेड टू बी थ्रोन आऊट.. आपली प्रसिद्धीच तशी आहे.

अंडरवेअर अंगावर चढवायचा कंटाळा आला आहे! कंटाळा आला आहे असं म्हणण्यापेक्षा आपण कित्येक दिवसांत कपडेच धुतलेले नाहीत. आंघोळ किती दिवसांनी केली आपण!! बकाल झालो आहोत!!

शेवटी टॉवेल गुंडाळला आणि इतस्ततः बेवारस पडलेल्या अंडरवेअर्स घेऊन मोरी गाठली.

पाणी संपलं होतं! बादलीत थोडंसं पाणी होतं.. त्यात भिजवून ठेवल्या.

गॅसपाशी काही सापडतं का याची शोधाशोध!

एक काकडी... एक टोमॅटो...

अचानक भूकेची जाणीव.

कुकरला भात आणि डाळ शिजत लावली आणि काकडी टोमॅटोची कोशिंबीर केली.

अलिकडे एक जाणवलं आहे, दैनंदिन.. रोजच्या गोष्टी खूप मन लावून केल्या, तरी वास्तवाला जरा वेळ बस्तानात ठेवता येतं. पण एकदा का या दैनंदिन गोष्टी करून झाल्या, की दुप्पट शक्तीनं वास्तव डोकं वर काढतं.

चिटोऱ्यावर तिचं नाव..

आशू काळसेकर...

पत्तासुद्धा होता.

नो फोन.. लँडलाइन नाही.. मोबाइलही नाही..

हल्ली शेंबड्या पोराकडेसुद्धा मोबाइल असतो.

पण ती सारखी का आठवते आहे? शेवटी रिपोर्टर आहे ती.. मसाल्याच्या शोधात.. माझ्या हाडाला चमचमीत आणि झणझणीत शब्दांचा मसाला लावला की, झक्कास टाइमपास.. सगळ्यांचाच! जरा रॅशनली विचार करायला हवा.

मला काय हवं आहे?

सस्पेन्शन ऑर्डर हा काही जगाचा शेवट नाही. आपण तिचा विरोध करणार आहोतच.. वेळ पडली तर एकट्याने.

एकट्याने?

सुमन.... सायली.... जीवन...

घड्याळाचा लंबक दुसऱ्या टोकाला पोहोचावा, तसं मन पुन्हा एकदा आंदोळतं.

रॅशनल व्हायचं ठरवलं की, हे भावनिक पाश का आठवावेत?

तसं पाहिलं, तर त्यांनी ते भावनिक दोर केव्हाच कापले आहेत.

त्यांनी?

सुमन.. पत्नी..

सायली.. मुलगी..

जीवन.. मुलगा..

'मी खुनी माणसाबरोबर संसार करू शकत नाही.'

'मी खुनी नाहीए.. ज्यांना मी मारलं, ते खुनी आहेत.'

'सो व्हॉट ? यू किल.. यू टेक लाइफ वुईथ युवर गन'

'दॅट्स बिकॉज आय हॅव बीन ट्रेण्ड टू किल.. मी त्यांना मारलं नाही, तर अनेक जीव मारले जातात.'

'तू कुठल्याही प्रकारे तुझं समर्थन करू शकत नाहीस. मी माझ्या मुलांवर अशा खुनी विचारांचं सावट पडू देणार नाही.'

एन्काउंटरवरून परत आलो की, मुलं बावरून जायची. आवाजांच्या पट्टीनं. मी आणि सुमन एकमेकांना सहन करू शकत नव्हतो.

सायली माझ्याजवळ यायला घाबरायची.

अगदी इनोसंटली जीवनने पलंगावर पडलेल्या रिव्हॉल्वरला हात लावला होता. एम्प्टी होतं ते. गोळ्या लोड केलेल्या नव्हत्या. तरीसुद्धा सुमनचं आकांडतांडव!

'असली हत्यारं मुलांसमोर नाचवू नकोस.'

डॅम इट!

प्रेशरकुकरच्या शिट्ट्या वाजून वाजून थकल्या.

ओह् गॉड!

घाईघाईत जाऊन गॅस बंद केला. आता भूक उरली नव्हती.

विचारांचे सुरूंग फुटत राहतात. मेंदूची चाळण करत.

तरीसुद्धा आठवणी संपत नाहीत.

दारूची बाटली. थरथरत्या हातांनी झाकण उघडलं. आता उसंत नाही. काहीतरी जालीम उपाय हवा. बाटली तशीच तोंडाला.

जळजळीत दारू घशाखाली उतरते. पोटात शिरते आणि हळूहळू शरिरात पसरू लागते. गात्रं शिथील होऊ लागतात.

मन निबर होऊ लागतं. डोळ्यावर झापड येते.

खोल खोल खोल...

दरीत मी कोसळत जातो...



# --तीन--

# पसरिचा

मॉर्ग... शवागार...

साला आपल्याला काही कळतच नव्हते.

डोके.. त्याच मॉर्गमधल्या निर्जिव प्रेताप्रमाणे.. थंडगार.. लाईफ लेस...

गेले सहा-सात तास मेंदू डीप स्लंबरमध्ये गेल्यासारखा.

फोन खणखणायला लागला होता.. रात्री दोन वाजता. हेडलाईन आणि टॅगलाईन आणि फ्रंट पेज ॲप्रुव्ह करून मी घरी उशिराच पोहोचलो होतो. काहीही खायची इच्छाच नव्हती. सरळ कोनॅकचा शॉट मारला आणि अंगावरचे कपडेसुद्धा न काढता पलंगावर आडवा झालो.

डोक्यात आशूने पाठवलेले प्रेमानंद हिर्लेकरचे एण्ट्रो आर्टिकल भिरभिरत होते.

इट वॉज अ फकिंग मास्टर पिस...

बेस्ट टिजर आर्टिकल आय हॅड सीन इन रिसेंट टाइम्स..

पोरीत दम आहे! तिचे शब्द डोक्यात थैमान घालत होते. तिने शीर्षकसुद्धा दिले होते. 'फॉर हूम दी बेल टोल'...

पुढचे वाक्य, 'गॉड मेक्स देम मॅड', म्हणजे तो लेख..

कोनॅकच्या प्रभावाखाली डोळे जड झाले.

फोन वाजला तेव्हा एकदम छातीत धडधडले. असे अपरात्री वाजणारे फोन जनरली वाईट बातमी आणतात. त्यात पुन्हा माझ्या अनलिस्टेड फोनची बेल वाजत होती. हे जास्तच वाईट...

'हॅलो', माझा आवाज घोगरा.. त्यातच ठसका लागला. डॅम दिज सिगारेट्स.. डॉ. पुनित म्हणतो, आता तू सिगारेट सोडली नाहीस तर तुझ्या उर्वरित आयुष्याची जबाबदारी मी घेणार नाही.

'गुडमॉर्निंग सर..' एक पुरुषी आवाज.

माझे डोळे टेबलावरच्या घड्याळाचे रेडिअमचे काटे शोधतात.

'रात्रीचे दोन वाजले आहेत.' मी त्या आवाजाला वेळेची जाणीव करून द्यायचा प्रयत्न करतो.

'सर, पहाटेचे..' तो आवाज मला करेक्ट करण्याचा प्रयत्न करतो.

'व्हॉट दी हेल! माझी मध्यरात्र आहे ही. हू द फक यू आर? व्हॉट डू यू वॉण्ट?' माझा नैसर्गिक उद्धटपणा उफाळून वर येतो. माझे डोळे खिडकीबाहेर वळतात. खिडकीबाहेरच्या कॅनोपीला वटवाघूळ... बॅट.. उलटे लटकले आहे. शॉकिंग! पुन्हा एक हार्टबीट चुकतो. छातीत हलकेसे पालपिटेशन.. प्रतिक्षिप्त क्रियेने हात टेबलटॅम्पपाशी ठेवलेल्या अॅलप्रेक्सच्या स्ट्रीपकडे. मी ०.५ एमजीची गोळी जिभेवर ठेवतो.. तशीच पाण्याशिवाय गिळून टाकतो. खिडकोबाहेर घुबड! इज इट अ गुड साईन? इज इट अ साईन? ब्लडी हेल! भूत.. प्रेत.. घुबड.. ड्राकुला!!

'आम्हाला एक बॉडी सापडली आहे सर..' आवाज आणखी माहिती देतो.

'देन कॉल क्राइम डेस्क.. मादरच्योद.. एडिटर म्हणजे वाटला काय तुम्हाला? मध्यरात्री दोन वाजता तू मला फोन करतो.. बॉडी सापडलीय म्हणून सांगायला? यू रिअली गॉट अ नर्व्ह मॅन..'

'सर, मी कंट्रोल रूममधून डीसीपी राणे बोलतोय.' आवाजाने मला शांतपणे समज दिली.

च्या आयला. पुन्हा एकदा हार्टबीट चुकला माझा. मला तातडीने सिगारेटची गरज वाटू लागली. माझे हात कापत होते. धिस इज बॅड.. आय स्मेल्ड रॅट!!!

'कोणाची?'

'माहीत नाही.'

'व्हॉट डू यू मीन?'

'बांडी अजून आयडेण्टीफाय झालेली नाही.'

'डीसीपी राणे, ॲण्ड यू फोन मी...'

'कारण बॉडीवर आम्हाला तुमचा फोटो आणि फोन नंबर मिळाला. तोसुद्धा अनलिस्टेड नंबर... तुम्ही अनलिस्टेड नंबर तुमच्या जवळच्या.. किंवा अत्यंत विश्वासातल्या व्यक्तीलाच द्याल.'

'होमिसाइड आहे.. खून?' मला उत्सुकता वाटू लागली.. शेवटी मी न्यूजपेपर मॅन.

'सर, ही आत्महत्या आहे.. सुईसाईड.'

खिडकीबाहेरच्या वटवाघळाचे डोळे मला लालबुंद वाटत होते. एखाद्या गुंजेसारखे. सिगारेट... मी टेबलावर हात आपटला. टेबलावरचा नाइटलॅम्प लागला. सिगारेटचे पाकीट त्याच्या बाजूलाच होते. एक सिगारेट ओठांमध्ये.

'राणे, होल्ड इट.. मला सिगारेट पेटवू दे.' मी जरा वेळ घेतो.

'कुठे सापडली बॉडी?'

'मरीन ड्राइव्ह'

'फकिंग मरीन ड्राइव्ह इज माइल लॉंग..'

'टाटा थिएटरच्या बाजूला. सी फेसिंग.. मोठ्या खडकांवर पसरली होती. पहिल्यांदा वाटलं कुणी झोपला असेल.. बट देन ही वॉज डेड.. कोल्ड.'

डीसीपी राणे बोलत होता आणि माझ्या पायांमधली शक्ती कमी कमी होतेय असं मला वाटू लागलं. मी बेडवर टेकलो. राणे सांगत होता ते ठिकाण ओळखीचे होते. त्या खडकांशी अनेक आठवणी निगडीत होत्या. अनेक संध्याकाळचे मंतरलेले क्षण त्या ठिकाणाला वाहिलेले होते. अनेक रंगांची उधळण त्या खडकांवर बसून मी पाहिली होती.. ऐकली होती...

*'यू नो.. क्रिटिक्स मला रंगारी म्हणतात.. हिणवतात.. आय केअर अ फक.. तू मला सांग, अस्ताला जाताना आकाशात रंगांची उधळण करणारा सूर्यसुद्धा रंगारीच ना? ..सो ॲम आय,' त्याचे झणझणते वाक्य.. रात्री दोन वाजता माझ्या कानात घोंघावत गेले.*

*'मी सूर्य आहे. माझ्याजवळ याल, तर माझ्यातच नष्ट व्हाल.' गडगडाट हसण्याचा.*

*'मी सूर्य आहे...' त्याच्या डोळ्यांमधला बैरागी अंगार माझ्या शरिराला चटके देऊन जातो. त्या चटक्यांचा स्पर्श आत्तासुद्धा शरीर भाजून काढतो.*

'सव्यासाची रॉय..' नकळत माझ्या तोंडून त्याचे नाव उमटते.

'सर, यू नीड टू आयडेण्टीफाय हिम..' राणे कर्तव्यदक्ष.

'सुईसाइड?' मी नाही कर्तव्यदक्ष होऊ शकत. सव्य डेड ॲण्ड गॉन!

'फेमोरल व्हेन कापली त्यांनी... जांघेमधली.. डीप कट..'

'त्याची तमन्ना होती, आत्महत्या'

*माझे रक्त धो धो वाहताना पाहायचं आहे.. फेमोरल व्हेन.. सच अ फोर्स ऑफ रेड कलर.. स्वताभोवती पसरलेला, काळवंडत जाणारा.. लाल रंग.. पाहायचा आहे मला.*

मी भूतकाळात.

'कधी येऊ शकता?' राणे कर्तव्यदक्ष.

'जस्ट नाऊ' मला सव्यासाचीला भेटायचे आहे. त्याचा हात हातात धरून बसायचे आहे.

'नको, सकाळी आठ..'

'कुठे?'

'सिटी मॉर्ग'

'मी पोहोचतो.'

'गुड मॉर्निंग सर..' राणे फोन ठेवतो.

मी कितीतरी वेळ रिसिव्हर हातात धरून बसलो. सालं आयुष्याचं लॉजिक आपल्याला कधी कळलंच नाही. ज्यांनी जगायला पाहिजे, ते साले लवकर मरतात. म्हणजे त्यांना जगायचेच नसते.. आणि साले.. ज्यांनी ताबडतोब मरायला पाहिजे.. या जगाचा बोज कमी करायला पाहिजे.. ते.. भांचोद, ऐंशी, पंच्याऐंशी.. नव्वदपर्यंत जगत राहतात.

वटवाघूळ... बॅड ओमेन.. माझी नजर राहून राहून त्या वटवाघळाकडे जात होती. वटवाघळं स्वतःला उलटं का टांगून घेतात ?

सव्यसाची..

मी त्याला म्हणायचो. तुम्ही साले बंगाली लोक डेंजरस. तुम्ही डोक्याने जगता. माथेफिरू.. डोकं फिरलं की तुमचं काही सांगता येत नाही.

माझं प्रेम होतं.. सव्यासाचीवर.. आय लव्हड् हिम.. डेस्परेटली. आणि त्याचं माझ्यावर प्रेम नव्हतं.. माझ्यावरच कशाला.. त्याचं कुणावरच प्रेम नव्हतं.

त्याला प्रेम हा शब्दच आवडायचा नाही.

*'आय कॅन अंडरस्टँड सेक्स.. इट्स अ रिअल. यू कॅन फिल दी बॉडी. पण प्रेम! लव्ह इज अ फ्रॉड!!'*

*'स्वतःचा मालकी हक्क शाबीत करण्याचा प्रेम हा एक मार्ग आहे.. हूल आहे.. आणि मी कोणाचाही गुलाम होऊ शकत नाही. ना माणसांचा, ना विचारांचा. माझ्यावर मालकी असलीच, तर ती फक्त मृत्यूची आहे. तुला माहिती आहे? मृत्यू तुम्हाला सर्व जाणीवा नेणीवांमधून मुक्त करतो. तुम्ही जन्म घेता.. तेव्हा ते स्वातंत्र्य तुम्ही परत मिळवता.' तो शहाळ्याचे पाणी पित एकदा मला म्हणाला होता.*

*'साला साची, माझं प्रेम आहे तुझ्यावर... आय लव्ह यू..' मी प्लिड.. आर्ग्यु करायचा प्रयत्न केला. त्याने शहाळे दूरवर समुद्रात भिरकावून दिले. आता कित्येक वेळ तो गटांगळ्या खाणाऱ्या शहाळ्याकडे बघत बसणार. मला माहिती होते.*

*कित्येक संध्याकाळी आम्ही मुंबईच्या या टोकावरच्या खडकांवर बसून काढल्या होत्या. तो कधीही मला स्पर्श करू द्यायचा नाही.*

*'तुझा स्पर्शसुद्धा अडल्ट्रेटेड.. भेसळ झालेला आहे.' तो माझा हात दूर करत म्हणायचा.*

*'व्हॉट द फक..' मला राग अनावर व्हायचा.*

*'भावनांची भेसळ झाली आहे त्या स्पर्शात.. सेक्स हॅज टू बी प्युअर.'*

*मला अचानक व्हिस्कीची खूप गरज वाटू लागली. आम्ही खरंतर कित्येक वर्षांत भेटलो नव्हतो. मला त्याच्यापाशी थांबणं शक्य नव्हतं आणि त्याला तर कुणीच नको होतं.*

………………………………………………………………

पुन्हा फोन वाजू लागला.

'सर, डीसीपी राणे अगेन.. त्यांचे कुणी नातेवाईक.. कुणाला कळवायला हवे? बॉडी कुणाच्या ताब्यात द्यायची?' कर्तव्यदक्ष.

मोमेंट ऑफ द इटर्नल ट्रूथ हॅड कम.. ट्रूथ ऑफ द डेड पर्सन.. त्याला कुणा नातेवाईकाच्या ताब्यात देऊन त्याच्या जगलेल्या आयुष्याची टिंगल मी करू शकत नव्हतो.

'नो राणे.. त्याचं कुणीही नव्हतं.. तसं पाहता, मीसुद्धा त्याचा कुणीही नाही.'

'सर, पण त्यांच्याजवळ सापडलेल्या पत्रात त्यांनी लिहून ठेवलं आहे की, त्यांच्या प्रेताचं काय करायचं हे तुम्हाला ठावूक आहे.'

'येस.. आय नो.. मी.. बॉडी ताब्यात घेईन.'

मी फोन ठेवला.

व्हिस्कीचा ग्लास काढला. फ्रिजमधून बर्फाच्या क्युब्ज काढून त्या ग्लासमध्ये भरल्या आणि त्यावर माझी आवडती ब्लॅक लेबल ओतली. बर्फावरून घरंगळत ग्लासच्या तळाशी जाणारी व्हिस्की मला खुणावू लागली.

व्हिस्कीचा ग्लास घेऊन मी माझ्या रायटिंग टेबलपाशी आलो. एका खणात पत्रांचा गठ्ठा होता. माझी वैयक्तिक पत्रे. सर्वात वरती त्याचं शेवटचं पत्र होतं. शेवटचं

अशासाठी की, त्यानंतर आमचा पत्रव्यवहारही थांबला होता. म्हणजे माझ्याकडून नाही, तर त्याच्याकडून. थाप मारूनही जो दरवाजा उघडत नाही, तो ठोठावण्यातला आपला रस हळूहळू कमी होत जातो. तसं त्याचं आणि माझं नातं हळूहळू विरळ होत गेलं. म्हणजे तसा माझा समज झाला.. पण शेवटचा श्वास घेताना त्यानं मला जवळ केलं होतं, हे ही खरच. माझा अहंकार सुखावला होता.

पत्राचा कागद.. त्यानं स्वतः तयार केलेला होता. तो त्याचा एक छंदच होता. त्याच्या फ्लॅटच्या गॅलरीत त्याने तयार केलेले कागद, कपडे वाळत घालावेत, तसे दोरींवर लटकलेले असायचे. शेवटचे पत्र म्हणजे कविता होती. ती त्याने केलेली नव्हती.. पण त्याच्या मते त्याच्या जीवनाचेच ते काव्य होते..

देअर वॉज ॲन ओल्ड मॅन

ऑफ केप हॉर्न..

हू विश्‌ड ही हॅड

नेव्हर बीन बॉर्न

सो ही संट ऑन अ चेअर

टिल ही डाईड ऑफ डिस्‌पेअर..

दॅट ओल्ड मॅन ऑफ केप हॉर्न..

शेवटी त्याने लिहिले होते..

‘तुझ्या आयुष्याकडून खूप अपेक्षा आहेत.. म्हणूनच तुझी खूप काळजी वाटते.’

मी त्या कागदावरून हलकेच हात फिरवला आणि वाटलं, मी त्यालाच स्पर्श करतो आहे. मला खूप रडावंसं वाटू लागलं. त्याच्यासाठी कुणीतरी रडणं आवश्यकच होतं. रडायचा मला फारसा प्रयत्नही करायला लागला नाही. कळत.. नकळत डोळ्यांमधून पाणी वाहायला लागलं. घशात एक हुंदका दाटून आला आणि नंतर संपूर्ण शरीर गदगदून आलं. मी हमसाहमशी रडू लागलो.

माझं डोकं.. त्याच्या शेवटच्या पत्रावर श्रांत होऊन पहुडलं.

मला डोळा कधी लागला.. कळलंच नाही.

*त्याला शवागरं खूप आवडायची. शवागरं.. आणि स्मशानं. हिंदू धर्मातली प्रेत जाळण्याची क्रिया त्याला अत्यंत नैसर्गिक आणि स्वाभाविक वाटायची. शवागाराचा करडा.. पांढरा रंग.. बर्फासारखा थंडगार आणि पेटलेल्या धगधगत्या चितेचा नारिंगी पिवळा प्रकाश यात तो गुंगून जायचा.*

*एकदा त्याने खोलीच्या भिंतीच्या आकाराचा कॅनव्हास स्टुडियोत ठोकला आणि पांढऱ्या करड्या रंगांच्या छटांनी तो भरून टाकला. काही वेळ त्या कॅनव्हासकडे पाहिल्यावर.. मग त्याने शवागाराच्या पेट्यांचा आकार देणारे स्ट्रोक्स त्या कॅनव्हासवर ओढले. सगळा इफेक्ट नजर गोठवणारा होता. त्याच्या स्टुडियोत अवघं शरीर भेदून जाणारी काळीकुट्ट शांतता पसरली होती. तो अस्वस्थच होता. राहून राहून त्या चित्राकडे पाहत होता.*

*'काहीतरी अर्धवट राहिलं आहे असं वाटतंय.' एवढंच त्याचं वाक्य.. अस्फूट स्वगत..*

*यावर प्रतिक्रिया देण्याचा मुर्खपणा कुणीही केला नसता. मीसुद्धा केला नाही. सॅण्डविचेससाठी टोमॅटो चिरण्यावर मी माझं लक्ष केंद्रित केलं होतं.*

*अचानक बाहेर जायचा दरवाजा धाडकन बंद झाल्याचा आवाज आला. तो तसाच अर्ध्या चड्डीवर बाहेर पडला होता. काही वेळातच तो परत आला. हातात पिवळ्या रंगाचा डबा घेऊन. कटरने त्याने वरचा पत्रा कापला आणि कॅनव्हासच्या उजवीकडच्या कोपऱ्यावर तो ओतून दिला. पाठोपाठ लाल रंगाचा डबासुद्धा रिकामा झाला. त्याने ते दोन्ही रंग हाताच्या पंज्याने एकजीव केले. कॅनव्हासवर.. मग तो काहीवेळ दूर उभा राहून कॅनव्हासकडे पाहत राहिला.*

*'जिथे जीवन संपते तिथे सूर्य उगवतो.'*

*मी आ वासून काहीवेळ त्याच्याकडे आणि काही वेळ चित्राकडे पाहत राहिलो.*

*दी इफेक्ट ऑफ कलर्स वॉज स्टनिंग.*

*'मला चिता आवडते. गेल्यावर मला जाळायला विसरू नकोस.'*

*भोसडीचा काही काही विसरला नव्हता. आपण सगळंच विस्मृतीच्या खोल दरीत फेकून दिलं होतं.*

..............................................................

कुणाच्या तरी हाताचा स्पर्श झाला म्हणून मी मागे वळून पाहिलं.

'तू कधी आलीस?' आता मला आशूची कंपनी होती. डीसीपी राणेची वाट पाहणे सुसह्य झालं.

'आत्ताच.. पहाटे तुझा फोन आला. अँड यू वेअर डेड ड्रंक.. आठ वाजता.. सिटी मॉर्ग.. एवढेच शब्द कळले मला.'

'मी तुला फोन केला?' मला धक्काच बसला.

'यू वेअर ड्रंक.. डेड ड्रंक'

आशू खूप छान दिसत होती. अगदी नेहमीच्या साध्या कपड्यांमध्येच आली होती.. जिन्स, टॉप आणि पायात पांढरे स्पोर्ट शूज.. टॉम बॉय!

मॉर्गच्या करड्या पांढऱ्या रंगाच्या पार्श्वभूमीवर ती खूपच छान दिसत होती.

'स्टोरी?' तिचे डोळे चकाकत होते.

मी काहीच उत्तर देऊ शकलो नाही.

'एनीबडी फ्रॉम अंडरवर्ल्ड? माझ्या माहितीचा?' ती पत्रकार होती. स्टोरीसाठी काहीही, हे तिचं तत्त्वच होतं.

'मी समजू शकतो तुला..' माझा हात तिच्या खांद्यावर, तिच्या टॉपखालच्या ब्रेसिअरच्या पट्ट्याशी चाळा करत. तिला त्याची पर्वा नव्हती. शी न्यू मी!

'तुझं प्रेमानंद हिर्लेकरवरचं आर्टिकल मी वाचलं.' तिच्या शरीरातून वाहत गेलेला एक अस्पष्ट प्रतिसाद मी ओळखला. एक एडिटरच तो ओळखू शकतो.

'ते एक टिझर आर्टिकल आहे. त्यातून काय निष्पन्न होईल, मला माहिती नाही. खूप काही त्या गृहस्थावर अवलंबून आहे.' तिची प्रतिक्रिया सावध होती.

'मी ते रन करतोय. रविवारच्या आवृत्तीत.' मी तिच्या डोळ्यांमध्ये डोकावत म्हणालो.

'आय एक्सपेक्टेड दॅट,' तिचा प्रतिसाद!

'तुला प्रेमानंद हिर्लेकर आवडला आहे!' मी तिला म्हणालो.

'इंटरेस्टिंग.. दॅट्स द वर्ड..' तिने मला करेक्ट केलं.

'काय करतो आहेस?' तिने माझा तिच्या खांद्यावरचा हात झटकायचा प्रयत्न केला.

'मी तुझ्याबरोबर फ्लर्ट करत नाहीये.' माझ्या चेहऱ्यावर नाराजी.

'आय नो दॅट' तिला मान्य करावच लागलं.

'पण तो स्पर्श.. रिॲश्युअरिंग वाटला. ऑलमोस्ट लाइक टचिंग युवर इनर कोअर.'

'व्हॉट द फक!' तिला मी काय बोलतोय ते कळलंच नाही.

'लहान मुल कसं आईचं दूध पिताना.. तिच्या दुसऱ्या स्तनाच्या बोथीशी खेळत असतं. दॅट्स हिज ऑर हर.. इन्शुरन्स.. सिक्युरिटी..' मी ब्रिफकेसमधून एक चेक काढत म्हणालो.

'आशू, ॲडव्हान्स.. प्रेमानंद हिर्लेकरवर तू सिरिज कर' मी चेक तिच्यासमोर फडकावला. एक मोठी शांतता निर्माण झाली. ती माझ्याकडे बघत नव्हती. तिची नजर खाली होती आणि ओठ किंचित थरथरत होते.

'टेक इट बेब्ज.. यू डिझर्व्ह इट..' मी चेक तिच्या दिशेने सरकवला.

'नो...' तिचा आवाज किंचितसा घोगरा झाला होता.

'का?' आय वॉज सरप्राइझ्ड.. आमच्या क्षेत्रात लक्ष्मीला नाही म्हणायची प्रथा नाही. आदर्शवाद टिळक, आगरकरांबरोबरच संपला होता.

'मी या स्टोरीचे.. सिरिजचे पैसे घेणार नाही.'

'पोटात काय गरम हवा सारणार आहेस?' मी थोडासा चिडलो.

'मी पैसे घेऊ शकत नाही.' तिचा आवाज ठाम बनला.

'कमऑन आशू, तू एक रिपोर्टर आहेस. कामाचा मोबदला तुला घ्यायला हवा.'

'कामाचा.. येस.. पण हे काम नाहीए.'

'म्हणजे?' शी वॉज इनव्हायटिंग मी ऑन अननोन टेरिटरी..

'हा एक कॉज होऊ शकेल.'

'आणि तरीही...'

'मला भरीला घालू नकोस.'

मी काहीच बोलू शकत नव्हतो.

'व्हाय द फक आय ॲम सराऊंडेड बाय इनसेन पिपल!' नकळत माझ्या तोंडून चित्कार निघून गेला. एक नर्स माझ्याकडे तिरप्या नजरेने पाहत गेली. इथे प्रेतांनासुद्धा तुम्ही डिस्टर्बकरू शकत नाही, असंच जणू तिला सुचवायचं होतं.

.........................................................

'सॉरी सर, मला दहा मिनिटं उशीर झाला..' डीसीपी राणे मनगटावरच्या घड्याळाचा आधार घेत माझ्यासमोर उभा होता.

'इट्स ओके. पण मॉर्ग म्हणजे चौपाटी नाही ना..' मी माझी नाराजी व्यक्त केली.

'यस, आय अण्डरस्टँड...' त्याने माझा हात हातात घेतला. दिलगिरी व्यक्त करण्याची ती त्याची पद्धत होती.

राणेबरोबर आम्ही थंडगार मॉर्गमध्ये प्रवेश केला. त्याने मॉर्गच्या अटेंडण्टला एक कप्पा उघडायला सांगितला. आतल्या प्रेताच्या चेहऱ्यावरचं कापड राणेनं दूर केलं आणि माझ्याकडे पाहिलं.

तो चेहरा सव्यासाचीचाच होता. त्याचे डोळे सताड उघडे होते. संपूर्ण आयुष्याची पोकळी त्याच्या डोळ्यांमध्ये भरलेली होती.

'येस.. ही इज सव्यासाची..' मी माझी खात्री व्यक्त केली.

'तुम्ही बॉडी ताब्यात घेणार आहात?'

'येस.'

'काही कागदपत्रांवर सह्या कराव्या लागतील..' राणे आणखीनच कर्तव्यदक्ष.

'तुम्ही कागद तयार करा.'

'मी कागदपत्र घेऊनच आलो आहे, म्हणूनच उशीर झाला.'

'कुठे सह्या करू?'

मी कागदपत्रांवर न वाचताच सह्या केल्या.

डेथ सर्टिफिकेट हातात पडताच आम्ही एक हर्स बुक केली आणि स्मशानाच्या दिशेने प्रवास सुरू केला.

'मला का बोलावलंस?' ती अजूनही गोंधळलेली.

'हो.. ते सांगायचं राहून गेलं.'

'म्हणजे, माझा ह्या सगळ्याशी काय संबंध?'

'काहीच नाही.'

'मग?'

'म्हणूनच तू इथं आहेस.'

रस्त्यांवरच्या वाहनांना न्याहाळत ती गप्प बसली.

'मला भूक लागली आहे.' हे मला नवीन नव्हतं. ती वैतागली.. गोंधळली की, तिला भूक लागते.

'त्याच्या फ्युनरलनंतर..' मी.

'तू गेल्या तासाभरात सिगारेट ओढलेली नाहीस.' ती ऑबझर्व्ह करते.

या तिच्या प्रश्नाचं उत्तर मी देऊ शकलो नाही.

............................................................

*'यू आर अ हॉरिबल पर्सन.. तू स्वतः मरणार आहेस आणि मलासुद्धा मारणार आहेस.' तो चिडला होता कारण त्याच्या खोलीत मी सिगारेटच्या थोटकांचा राडा केला होता. त्याने धडाधडा सगळ्या खिडक्या उघडल्या आणि घरातले सर्व पंखे सुरू केले.*

*'अत्यंत डिज्गस्टिंग माणूस आहेस तू.. व्हाय द हेल आय टॉलरेट यू?'*

*'तू सांग मला.' मी उद्दाम.*

*'तेच मला कळत नाही.' तो हताश.*

*'काल मी डॉक्टर पत्कींकडे गेलो होतो.' मी माझ्या छातीवर हात ठेवत त्याला म्हणालो. त्याच्या चेहऱ्यावर एक कुत्सित हास्य.*

*'त्याने इसीजी काढला.. वाईट आहे म्हणाला.. विचारत होता.. माझ्यात सुईसाइडल टेण्डन्सी का आहेत? सिगारेट तुला वर्ज्य आहे, हे माहीत असूनही..'*

*'पॅसिव्ह स्मोकिंग इज इव्हन मोअर डेन्जरस.' सव्यासाची खरंच चिडला होता.*

*'आय ॲम सॉरी.' असं म्हणत मी पाकिटातली सिगारेट बाहेर काढली.*

*'सिगारेट सोडायला वुईल पॉवर लागते.' त्याने मला एक टोमणा मारला.*

*'ही माझी विल्स पॉवर आहे,' मी त्याला माझी सिगारेट दाखवत म्हणालो.*

*'व्हेरी फनी,' तो माझ्या हातातली सिगारेट खेचून घेत म्हणाला.*

*काही वेळ शांततेत गेला. त्याने सिगारेटचा कागद सोडवला आणि त्यातली तंबाखू खाली टाइल्सवर ओतली.. आणि आपल्या हाताच्या अंगठ्याने तो ती चुरू लागला. जणू काही तो माझी सिगारेटची तल्लफ आपल्या अंगठ्याखाली चिरडून टाकत होता.*

*'सिगारेट सोडायलासुद्धा कारण लागतं रे सव्य.' मी सिगारेटचा फाटका कागद हातात घेत म्हणालो.*

*'मी मेलो की सोड' तो माझ्याकडे पाहत शांतपणे म्हणाला.*

*'म्हणजे?' माझ्या हातावर काटा आला होता.*

*'मेलेल्याच्या आठवणीप्रीत्यर्थ सर्वात आवडती गोष्ट सोडतात म्हणे.'*

*'हा.. हा.. मग हरकत नाही. तू काही एवढ्यात मरत नाहीस.' मी हसलो.*

*'वॉट टू बेट.. हंड्रेट टू वन?' तो उठून किचनमध्ये गेला.. कॉफी बनवायला.. आमचा संवाद तिथेच संपला.*

………………………………………………………………

पण हे सुद्धा खरे आहे की, पहाटे तीन वाजल्यापासून मी सिगारेट ओढलेली नाही. कुणासाठी काहीतरी सोडण्याची माझ्या आयुष्यातली ही पहिलीच वेळ होती.

………………………………………………………………

'तुला कुणामध्ये इमोशनली इनव्हॉल्व्ह झालेलं मी पहिल्यांदाच पाहते आहे.' तिने माझ्या हाताला पुसटसा स्पर्श केला.

'आपल्या वयात पंचवीस वर्षांचं तरी अंतर आहे.' मी तिचा हात हातात घेत म्हणालो.

'सो?' तिने माझी बोटं पकडली.

'तू मला पूर्ण ओळखत नाहीस.' मी सव्यासाचीच्या चेहऱ्याची चादर हलकेच दूर केली. दॅट ओल्ड मॅन ऑफ केप हॉर्न... त्याचा चेहरा एवढा श्रांत.. थकलेला वाटत होता. समहाऊ वन टिअर ओव्हरस्टेप्ड माय आइज...

'माझं प्रेम होतं त्याच्यावर.' मी हातांवर ओघळलेला एकच अश्रू पुसून टाकला.

'आणि त्याचं?'

'त्याच्या शब्दकोषात प्रेम या शब्दाला स्थानच नव्हतं. लव्ह मीन्स नथिंग.. ऑब्लिव्हिऑन.. इतका भोंगळ आणि भकास शब्द माणसाने का तयार केला? ही त्याची मतं.' मी हर्सची खिडकी पकडली. एक लाल सिग्नल तोडून तिने उजवीकडे वळण घेतले होते आणि आता तो स्मशानाच्या प्रवेशद्वाराशी उभी राहिली.

वॉचमनला पास दाखवल्यावर त्याने दरवाजा उघडला आणि मी हर्सच्या ड्रायव्हरला इलेक्ट्रिक क्रिमेटोरिअमपाशी गाडी घ्यायला सांगितले.

तिकडे सर्व तयारी होईपर्यंत थांबायला लागणार होतं. सुदैवानं गर्दी नव्हती. शहरातल्या सर्व मरायला घातलेल्या रोग्यांनी आपला मृत्यू जरा पुढे ढकलला होता जणू..

'पाय मोकळे करू या?' मी आशूला विचारलं, 'इथे थोडा वेळ लागणार.'

'येप्..' ती चालायला नेहमीच तयार.

वीस पंचवीस पावलं पुढे गेल्यावर एक चिता.. विझत आलेली पाहिली.

'तू सव्यच्या प्रेताला अग्नी द्यायचा आहेस.' मी आशूला म्हणालो.

'मी? अरे.. मी त्याला ओळखतसुद्धा नाही.' तिला आश्चर्यच वाटलं.

'म्हणूनच... शेवटी त्याला ओळखीच्या व्यक्तीचा स्पर्श नको होता.' मी म्हणालो.

पुन्हा काही क्षण शांततेत गेले.. रस्त्यावर गुलमोहराच्या फुलांचा सडा पडला होता. त्यातली काही फुलं मी ओंजळीत घेतली.

'या फुलांचा रंग आणि विझत आलेल्या चितेतल्या निखाऱ्यांचा प्रकाश.. यात किती साम्य आहे!'

तिनेसुद्धा काही फुलं हातात घेतली होती.

'साब तय्यारी है..' क्रिमेटोरिअमचा कामगार आम्हाला शोधत आला.

'ऐसाही जलाना है?' तिथल्या अधिकाऱ्याने विचारले.

'येस, जस्ट बर्न हिम.. फक्त क्रिमेटोरिअममध्ये बॉडी ठेवायच्या अगोदर ही पेटलेलं चंदन बॉडीवर ठेवेल.' मी त्यांना सांगितलं.

आशूने पेटलेला चंदनाचा तुकडा सव्यच्या छातीवर ठेवला आणि कामगारांनी बॉडी उचलून पट्ट्यावर ठेवली. बटन दाबताच क्रिमेटोरियमचा दरवाजा उघडला आणि पट्ट्यावर सरकत बॉडी क्रिमेटोरियममध्ये शिरली. शिरतानाच तिने पेट घेतला होता.

'कल सुबह आना.' अधिकारी मला म्हणाला.

'जरूरत नहीं. आपको जो करना है वो करो.' उत्तर देऊन मी त्याच्या ऑफिसच्या बाहेर पडलो.

'घरी चल' मी गाडीचा दरवाजा उघडत आशूला म्हणालो. ड्रायव्हर गाडी उभी करून निघून गेला होता. मीच त्याला तसं सांगितलं होतं.

.........................................................

घरापर्यंतचा प्रवास विलक्षण शांततेत झाला. मी यांत्रिकपणे गाडी चालवत होतो. जणूकाही डोक्यात विचार करायला काही जागाच शिल्लक नव्हती. जणूकाही एक मोठा पूर्णविराम देऊन भडवा निघून गेला होता. अत्यंत उद्दाम विधान करून एखाद्याने भरल्या सभेतून उठून जावं, तसा तो उद्दामपणे निघून गेला होता.

आय मिस्ड हिम.. आय मिस्ड हिज कॅनडॉर.. जेव्हा जेव्हा स्वतःविषयी कटू सत्य ऐकायची जबर इच्छा व्हायची, तेव्हा तेव्हा मी त्याचा स्टुडियो गाठायचो.

.....................................................................

*‘तुझे काहीही होऊ शकत नाही. तू म्हणजे धोबीका कुत्ता.. ना घर का, ना घाट का..’*

*माझ्या बाबाने आत्महत्या केली त्या दिवशीसुद्धा मी स्टुडियो गाठला होता.*

*‘शॉट हिमसेल्फ थ्रू हेड..’ मी शून्यात बघत म्हणालो.*

*‘आणि तू स्वतःला दोष देतो आहेस.’ तो कॅनव्हासवर ब्रश फिरवत बोलला.*

*‘माझी होमो सेक्शुॲलिटी तो पचवू शकला नाही.’*

*‘तू पचवू शकला आहेस?’*

*‘वेल.. आय कॅन नॉट डिनाय रिॲलिटी.’*

*‘रिॲलिटी मान्य करणं आणि पचवणं, यात अंतर आहे.’*

*‘तो स्वतःला खूप त्रास करून घ्यायचा..’*

*तो हसला.*

*‘धोबी का कुत्ता.. ना घर का, ना घाट का...’*

मी लॅच उघडून दरवाजा ढकलला आणि फ्लॅटमध्ये शिरलो.

‘मी शॉवर घेणार आहे,’ असं म्हणून आशू बाथरूममध्ये शिरली. मी किचनमध्ये कॉफी बनवायला घेतली आणि पिझ्झा ऑर्डर केला.

आशू येईपर्यंत मी माझी मेल क्लिअर करतो. मला अजूनही हाती लिहिलेली पत्रे येतात आणि मी त्यांना स्वहस्ताक्षरात उत्तरंही पाठवतो.

दरवाजावरची बेल वाजते. पिझ्झा.. डॉमिनोज बेसमेंटला आहे, हा फायदा.

मी कॉफीचा टंबलर ड्रॉइंग रूममध्ये घेऊन येतो. काही वेळाने आशू येते. तिला खूप सुंदर वास येतो आहे. मंद सुवास.. फ्रॅगरन्स.. माझ्या चेहऱ्यावर पसंतीची पावती ती पाहते.

‘खूप दिवसांनी मनसोक्त आंघोळ केली. पुरुषाची बाथरूम असूनही तू छान ठेवली आहेस.’

‘पुरुष...’ मी.

‘नो पन इटेंडेड.. अरे सेक्शुअल प्रेफरन्सेस वेगळे आहेत.. तरीसुद्धा तू पुरुषच..’ ती म्हणते आणि भल्या मोठ्या कोचावर पसरते.

‘पिझ्झा?’

‘माझी भूक पळाली.’

‘कॉफी ओतू?’

‘ब्लॅक.’

मी कॉफी ओतू लागतो.

‘अॅटलिस्ट तुला सेक्शुअल प्रेफरन्स आहे. मी त्याहीपेक्षा गैरगुजरो आहे..’ ती म्हणते.

‘म्हणजे..’

‘आय डोण्ट मिस सेक्स.. माझ्या वयाच्या मुलींना ते किती हवं असतं, मला माहिती आहे.. पण मी नर्मदेतला गोटा आहे..’ ती हसते.

‘प्रेमानंद हिर्लेकर.. तुझं आर्टिकल.. टायटल लाइन आवडली मला. एक गूढ..’ मी विषय बदलला.

‘मी तुझ्या जागी असते, तर आर्टिकल छापायची एवढी घाई केली नसती.’

‘माझ्या कंपल्शन्स.. त्यात आय वॉंटेड टू टेस्ट द वॉटर..’ मी कॉफीचा घोट घेतला. मग एक शांतता.

‘आशू मला बातम्या कळतात. बातमीचा वास मला शंभर मैलांवरून येतो. प्रेमानंद हिर्लेकर इज लाइक अॅन आइसबर्ग.. फक्त एक अष्टमांश वर.. बाकी पाण्याखाली. मला या आर्टिकलवर काय प्रतिक्रिया येतात आणि त्या कुठून येतात, यात इंटरेस्ट आहेत. आपल्या पुढल्या स्टेप्स आखायला त्याचा फायदा होईल. शेवटी सगळा चेसबोर्ड असतो आशू.. यू हॅव टू बी अहेड ऑफ युवर अपोनंट.’

‘यू नो, धिस गेम कॅन टर्न डेंजरस..’ आपलो जांभई आवरत आशू म्हणाली.

‘आर यू किडिंग? थट्टा करते आहेस? ऑफकोर्स इट कॅन... अॅण्ड इट वुईल,’ पुढला बराच वेळ मी तिला माझ्या पुढल्या चाली कशा असतील, हे सांगत राहिलो. काही वेळानं माझ्या लक्षात आलं की, ती गाढ झोपी गेलेली आहे. एखाद्या लहान अर्भकासारखी. पाय पोटाशी घेऊन. मी आत जाऊन माझी आवडती पशमिना शाल

आणली आणि तिच्या अंगावर पसरली. तिने झोपेतच ती आपल्या गळ्याभोवती घट्टं ओढून घेतली.

मी पुन्हा माझ्या स्टडीत आलो. इतका वेळ मागे सारलेला सव्यसाची फणा काढून एखाद्या नागासारखा पुढे उभा होता.

दॅट ओल्ड मॅन ऑफ केप हॉर्न...

मी त्याची सगळी पत्रं पेपर श्रेडरमध्ये टाकायला सुरुवात केली.

**---चार---**

# आशू

'माझी यायची मनापासून इच्छा नव्हती.'

आप्पा समोरच्या खुर्चीत अवघडल्यासारखे बसले होते. मला ते खूप थकल्यासारखे वाटत होते. त्यांचे डोळे.. झोप न झाल्यासारखेच लालसर वाटत होते. पांढऱ्या सदऱ्यावरचे दिसणारे डाग म्हणजे मलाच एक आश्चर्याचा धक्का होता. आप्पांच्या स्वच्छतेच्या आणि शुभ्रतेच्या संकल्पनेत न बसणारा. पायातल्या काळ्या रंगाच्या हाफ शूजना पॉलिश नव्हते आणि त्यांची आंघोळही झालेली नव्हती. जगाच्या पाठीवर कुठेही असले, तरी पहाटे पाचला उठून आंघोळ, तीसुद्धा गार पाण्याने, करणारा गृहस्थ माझ्याकडे आंघोळ न करता आला होता. हे सर्व अनोळखी होते. ओळखीची होती ती फक्त विरक्ती. माझ्या संदर्भातली.. ती त्यांच्या रुक्ष स्वरातूनही व्यक्त होत होती.

'माझी यायची मनापासून इच्छा नव्हती.'

त्यांची नजर घराचा आणि घरातल्या अंदाधूंद पसाऱ्याचा अंदाज घेत होती. मला खात्री होती की, त्यांची दृष्टी अगदी बारीकसारीक गोष्टीसुद्धा टिपत असणार.

'अगोदर कल्पना दिली असतीत, तर घर जरा आवरून ठेवले असते.' मी उभीच होते. कितीही बंडखोर असले, तरी अजूनही आप्पांसमोर बसून बोलणे त्या बंडखोरीला अभिप्रेत नव्हते.

'जिथ यायचीच इच्छा नव्हती, तेथे उत्साहाने अगोदरच कळवण्याचा प्रश्नच येत नाही.' आप्पांनी विषयाचा शेवटच करून टाकला होता. 'एक घाव, दोन तुकडे', हा

आप्पांचा स्वभाव विशेषच होता. विषयाभोवती घोळ घालत बसणे त्यांना कधीची जमले नाही. पुढे काय बोलावे तेच मला समजत नव्हते म्हणून मी स्वयंपाकघर गाठले. पाण्याचा तांब्या फळीवरून काढला. तो अतर्बाह्य स्वच्छ आहे की नाही, ते पाहिले. तो माठातल्या पाण्याने भरला आणि पुन्हा बाहेर आले.

'मुंबई आहे ही, एप्रिल–मे चा उकाडा.. पाणी ठेवतेय.' मी त्यांच्या समोरच्या स्टुलावर पाण्याचा तांब्या ठेवला आणि आप्पांना खाली वाकून नमस्कार केला.

'आप्पा, नमस्कार करते.'

त्यांचा प्रतिसाद शून्य! माझा नमस्कार एका भयाण पोकळीत पोहोचला आहे, याची मला जाणीव झाली. मी त्याची खंत वाटून घेतली नाही. काही गोष्टी आपण स्वतःच्या समाधानासाठी म्हणून करतो. पण मुळात मला त्यांना नमस्कार तरी का करावासा वाटला? म्हणजे मधल्या काळात जे काही घडले होते, त्यांनी जे काही निर्णय घेतले होते, आणि त्यांचा माझ्यावर जो परिणाम झाला, त्यानंतर ते माझे आप्पा नव्हते. आमच्यातले बाप–मुलगी हे नाते संपुष्टात आले होते. आणि तरीही? आपण कधीकधी खूप मुर्खपणा करतो हे मला जाणवले.

'तसे पाहता, हा निरोप नमाच्या मार्फतही देता आला असता किंवा फोनवरसुद्धा कळवता आला असता. पण माईची इच्छा, मी स्वतः भेटून.. तिच्या इच्छेखातर..' त्यांनी स्वतःचा बचाव मांडला.

माईचा उल्लेख करताना का कुणास ठावूक, त्यांचा आवाज उगाचच भावनावश झाल्यासारखा वाटला मला. मी त्यांच्याकडे जरा निरखून पाहिले. त्याचे खांदे मला झुकलेले दिसले. ड्रुपिंग शोल्डर्स! पाठीला किंचित बाक आल्यासारखा वाटला. बोटांची सततची उघडमीट आणि एकावर एक ठेवलेल्या पायांची आंदोलने मला त्यांच्या मनातल्या अस्वस्थतेची जाणीव करून दतहोती.

'परळला टाटा मेमोरिअल हॉस्पिटलमध्ये..' एखादे खांद्यावर खूप जड झालेले ओझे घाईघाईत खाली उतरवावे तसे त्यांनी हे वाक्य उच्चारले.

'टाटा?' माझ्या तोंडून एक अस्फूट प्रश्न.

'माईला तिथे सोमवारी ॲडमिट केले आहे.' त्यांनी माझ्याकडे पाहत मनावरचं ओझं पूर्णपणे खाली उतरवलं.

'मा... ला...' मला ती बातमी पचवायला जरा वेळ लागत होता.

'ल्युकेमिया.. दुर्दैवाने शेवटच्या स्टेजमध्ये..' त्यांच्या बोटांची उघडमिट वाढली होती.

'आधी लक्षात नाही आलं?' माझा आणखी एक मुर्ख प्रश्न.

'अंगावर काढायची सवयच तिला. लिव्हरही खराब झाली आहे. ऑलमोस्ट सेमी कोमॅटोज कंडिशनमध्ये आहे ती.'

मां.. ला कॅन्सर.. लास्ट स्टेज.. कोमा... परिस्थिती हळूहळू माझ्या आत झिरपत गेली. या सगळ्याला कसं रिॲक्ट व्हावं, हे मला लगेच कळत नव्हतं. माझा जितका आप्पांवर राग होता, तितकाच किंबहूना त्यापेक्षा जास्त मावर होता. तिच्या आप्पांवरच्या अढळ भक्तिची आणि त्यातूनच तिच्या मनात निर्माण झालेल्या कमीपणाच्या भावनेची मी सर्वात जास्त किंमत मोजली होती. तिला कुठल्याही प्रकारचे स्वातंत्र्य झेपायचे नाही. ना आर्थिक.. ना वैचारिक.. ना सामाजिक. गुलामगिरी तिच्या नसानसांमध्ये आणि जीवनशैलीत भिनलेली होती. आणि त्या गुलामगिरीसाठी कुणाचाही, म्हणजे अक्षरशः कुणाचाही जीव घ्यायला ती कचरली नव्हती.

प्रत्यक्ष.. माझ्या पोटच्या जीवाचाही!

म्हणजे ना मला आई होण्याविषयी फार मोठे आकर्षण होते, ना माझे लग्न झाले होते, ना ज्या पुरुषामुळे हे माझ्या वाट्याला आले होते त्याच्याबद्दल मला फार जिव्हाळा होता. असे काहीही नसले, तरी त्या जीवाला, अनाम जीवाला आपण जबाबदार आहोत, हे मात्र माझ्या मनात ठाम बसले होते. ज्या दिवशी त्याच्यावर घाला पडला, आणि त्यात मला मा चा सहभाग आहे, हे जाणवलं, अप्रत्यक्ष का होईना, त्याच दिवशी आमच्यातलं नातं संपलं आहे, असंच मला वाटलं.

आणि तरीसुद्धा मा च्या कॅन्सरची बातमी कळताच मी सुन्न झाले. मी भिंतीला टेकत खाली घसरत गेले आणि शेवटी फरशीवर बसले.

आप्पांनी स्टुलावरचा तांब्या उचलला आणि घटाघटा रिकामा कला.

'मी तिला परत घेऊन जाणार आहे.. घरी.. तशी तिची इच्छा आहे.' तांब्या खाली ठेवत ते म्हणाले. त्यांचा हात थरथरत होता.

'कधी?' माझा प्रश्न यांत्रिक होता. एखाद्या प्रतिक्षिप्त क्रियेसारखा.

'लवकर.. तिच्या प्रकृतीवर अवलंबून आहे. काल रात्री खूप ब्लिडिंग झालं.. प्लेटलेट्सचा काऊंट डेंजरसली खाली आला. सगळीकडून ब्लिडिंग झालं.' ते स्वतःशीच बोलल्यासारखं बोलले.

'ब्लडग्रुप?'

'ए-पॉझिटिव्ह.'

मी माझ्या मोबाइलवर नंबर पंच केला.

'मी.. एक कॅप्शन रन करायची आहे. रक्ताची गरज आहे.. ए-पॉझिटिव्ह... टाटा मेमोरिअरल.. प्लेटलेट्स डोनर्सही हवे आहेत.. लगेच रन करशील? बाकीचे डिटेल्स..' मी चॅनलवरच्या मित्राला बाकीचे सर्व डिटेल्स दिले.

'मला भेटायचंय तिला,' अचानक ध्यानीमनी नसताना माझ्या तोंडून वाक्य निघून गेलं. आप्पा काहीच बोलले नाहीत. ते सावकाश उठले. एकवार माझ्याकडे पाहिलं आणि ते घराबाहेर पडले.

मी स्वतःशीच बोलत होते, 'मला भेटायचंय तिला.. मा ला भेटायचंय...'

त्या क्षणी मला सगळ्याचा विसर पडला होता. तिच्याशी असलेल्या वैराचा, माझ्या दुःखाचा, अपेक्षाभंगांचा, मृत झालेल्या माझ्या गर्भाचा.. ती मरत होती. मला कळत होतं ते. शेवट जवळ आला होता. माझ्याशी असलेलं वैर बरोबर घेऊन तिनं मरावं असं मला वाटत नव्हतं. तिच्या आत्म्याला शांती मिळाली नसती. तिने आपल्या शेवटच्या क्षणांमध्ये आप्पांना माझ्या घरी यायला भाग पाडलं होतं. माझ्यासाठी.. आणि आता, ती निघाली होती. फार मोठ्या प्रवासाला... तिला भेटणं आवश्यकच होतं!

..........................................................

१२.०० दुपारी

मी माच्या रुमच्या बाहेर उभी राहिले. संपूर्ण वॉर्डात मृत्यूची अपरिहार्य सावली पसरली होती. कॅन्सर! तिथे कुणालाही मृत्यू नको होता. प्रत्येकाला जगायचं होतं. प्रत्येक जण जगण्याचं आश्वासन मागत होता.

रुमच्या दरवाज्यावरच्या काचेतून आतली खोली दिसत होती. माचा बेड.. मध्ये एक पडदा.. आणि त्यापलिकडे एक बेड. आप्पा माचा हात हातात धरून बसले होते. मला तिचा चेहरा दिसत नव्हता. पण आप्पांनी धरलेला तिचा हात दिसत होता. एरवी तिच्या गोऱ्यापान रंगात नेहमीच एक गुलाबी छटा दिसायची. पण आज तो हात पांढराफटक दिसत होता. त्यात जिवंतपणा वाटत नव्हता.

दरवाज्यावर हलकासा नॉक करून मी खोलीत शिरले. एक विचित्र शांतता त्या खोलीत पसरली होती. अशी शांतता की, जी तुम्हालाही दबक्या आवाजातच बोलायला भाग पाडते. मा चा चेहरा मी खूप दिवसांनी पाहत होते. तिचे डोळे मिटलेले होते. एक विलक्षण थकवा त्या चेहऱ्यावर दिसत होता. नाकात राइस ट्युब खुपसलेली होती. हातात इन्ट्राव्हिनसच्या नळ्या खुपसलेल्या होत्या. शरिराच्या विविध परिमाणांचं मोजमाप करणारा मॉनिटर तिला जोडलेला होता. ती प्रयत्नपूर्वक श्वास घेत होती आणि त्या श्वास घेण्याचा आवाजही त्या खोलीतल्या शांततेचा भंग करतोय, असं वाटत होतं. तिच्या भव्य कपाळावरचा कुंकवाचा ठसठशीत गोल ठिपका तिच्या थकलेल्या चेहऱ्यालासुद्धा खूप खुलवत होता.

मी दबक्या आवाजात आप्पांना विचारलं,

'कशी आहे मां?'

त्यांनी एकवार माझ्याकडे पाहिलं. त्यांची नजर.. खोल, कोरडी आणि तरीसुद्धा एकटेपणाने भारलेली वाटली मला. कदाचित आता स्वतःपुढे वाढून ठेवलेला एकटेपणा त्यांना जाणवला असावा आणि तो स्वीकारण्याची प्रक्रिया त्यांच्या मनात सुरू झाली होती. माचा हात पकडून ते त्या भावी एकटेपणाची तयारी करत होते जणू..

'डॉक्टर आले होते?.. कुणाची ट्रिटमेंट चालू आहे?' त्यांचे काहीच उत्तर आले नाही, म्हणून मी पुढचा प्रश्न केला.

आप्पांनी काही वेळ मा कडे पाहिले. मग तिचा हात हलकेच खाली ठेवला. तेवढ्याश्या हालचालीनेदेखील तिच्या चेहऱ्यावर वेदना उमटली. का त्याही परिस्थितीत तिला त्यांचा हात सोडायचा नव्हता? जणू ती त्यांना सागत होती, 'आहो, वेशीपर्यंत तरी साथ द्या!'

त्यांनी तिच्या अंगावरची चादर एकसारखी केली. तिच्या कपाळावर थोपटल्यासारखं केलं आणि ते खोलीबाहेर पडले. काहोही न बोलता.

मी माच्या शेजारी बसले. तिचा हात हातात घेतला. आयुष्यातल्या दोन अवस्था.. नुकतेच जन्मलेले अर्भक आणि जीवनाची शेवटची स्टेज.. जेव्हा फक्त स्पर्शच बोलत असतो. का कुणास ठावूक पण मला असं वाटलं की, तिच्या पापण्यांची जाणवेल, न जाणवेल, अशी हालचाल झाली. जणू काही तिने माझ्या अस्तित्त्वाची दखल घेतली होती. माझी दोन बोटं तिच्या बोटांभोवती वेढली गेली. जणू काही शाळेतून तिचा हात धरून मी घरी परतत होते.

मी तिच्याकडे एकटक पाहत होते. तिची जराशी सुद्धा हालचाल, जराशीसुद्धा जाणीवेची निशाणी मला चुकवायची नव्हती. मी माझा दुसरा हातही अलगद तिच्या हातावर ठेवला आणि हलकेच तो तिच्या हातावरून फिरवायला सुरुवात केली. शक्य असेल, तर तिच्याबरोबर संवाद साधण्याचा तो माझा एक तोकडा म्हणा, वेडा म्हणा, प्रयत्न होता.

ती हरवली होती आणि एका पोकळीत शांतपणे भटकत होती. मुक्त!

'मा, त् हवी आहेस मला.. तू नको जाऊस इतक्या लवकर.. अजून बरंच भांडायचं शिल्लक आहे.' मी माझे ओठ तिच्या चेहऱ्याच्या अगदी जवळ नेले होते. आणखी जवळ नेले असते, तर तिला त्या ओठांचा स्पर्शच झाला असता.

'मला माहिती आहे.. आपण एकमेकींपासून कोसो दूर आहोत. आणि तरीही..' मी तिच्याशी बोलत होते.

सुरुवातीला मला असं वाटलं की तिची त्वचा आरस्पानी झाली आहे आणि त्या त्वचेखाली असलेल्या रक्तवाहिन्यांमधून वाहणारं तिचं रक्तच मला दिसत आहे. उन्हाने तडकलेल्या जमिनीवर जसे पाण्याचे ओघळ वाहतना दिसतात तसंच. पण नंतर मला जाणवलं की, तो भास नाहीए. ते खरंखुरं रक्त आहे. मी पटकन दूर झाले. माझा माझ्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. माच्या शरीरातून रक्त वाहत होतं. शी वॉज ब्लिडिंग! नाकपुड्या, तोंड, डोळे, तिची त्वचा.. इतकंच काय, तिच्या शरीराखालची चादरही रक्ताने भिजू लागली होती. राईस ट्युबमधूनही रक्त वाहू लागलं होतं. क्षणभर काय करावं, तेच मला कळेना. आपल्या सगळ्या प्रतिक्रिया गोठून जाव्यात, तसं झालं

होतं. म्हणजे मी आयुष्यात रक्त पाहिलं नव्हतं असं नाही. मी क्राइम रिपोर्टर होते. खूप जवळून मी रक्त पाहिलं होतं. पण हे काही वेगळंच होतं. हे माझ्या 'मा'चं रक्त होतं.

मी खडबडून भानावर आले. 'मा'ला मदतीची गरज आहे, हे मला कळत होतं. मी धावतच बाहेर आले आणि ओरडले, 'नर्स... नर्स... हेल्प प्लिज..'

आप्पांनी मला पाहिलं आणि ते घाईघाईने माच्या खोलीत शिरले. दोन नर्सेसही धावत आल्या आणि माच्या खोलीत शिरल्या. मी आत जायचा प्रयत्न करत असतानाच एक नर्स बाहेर आली. 'नो.. डोण्ट गो इनसाईड.. शी इज व्हेरो क्रिटिकल.. वेट आऊटसाईड.'

काही वेळातच दोन डॉक्टर्स घाईघाईत आले आणि त्या नर्सबरोबर माच्या खोलीत शिरले. पाठोपाठ आप्पा बाहेर आले. दरवाज्याच्या खिडकीवरचा पडदा ओढला गेला आणि माचे जग वेगळे झाले. जणू काही त्या पडद्याने आमच्या जगांमध्ये एक भिंत उभी केली. अभेद्य भिंत!

मी बाहेरच्या पॅसेजमध्ये आले. त्या दिवशीचा पेपर खुर्च्यांवर अस्ताव्यस्त पडला होता. फ्रंटपेजवर प्रेमानंद हिर्लेकरचा फोटो आणि कॅचलाइन.. 'फॉर हुम दी बेल्स टोल..' आर्टिकल आतल्या पानावर. पण या सर्वांचा आज विचारच नव्हता. मी वळून माईच्या खोलीकडे पाहिले. पडदा ओढलेलाच होता. माझ्यामध्ये आणि माईमध्ये गेले कित्येक वर्षं भिंत होती. आमचं जग विभक्त करणारी. मी विचारांचा मारा टाळण्यासाठी खिडकीशेजारी आले. परळचा गजबजाट.. चाळवजा वस्ती.. त्या चाळींमधून राहणाऱ्या कुटुंबांचे विश्व न्याहाळू लागले. रस्त्यावर काळ्या-पिवळ्या रंगाच्या मुंग्यांची शिस्तबद्ध रांग सावकाश पुढे सरकत होती. काळजाचा ठोका चुकवणारा सायरन वाजवत एक ॲम्ब्युलन्स त्यांच्या मधूनच वाट काढत केईएमच्या दिशेने जायचा प्रयत्न करतहोती. काही मुलं गल्लीत क्रिकेटचा डाव मांडून बसली होती. मेडिकलची आणि उडप्याची हॉटेल्स सुखाने एकमेकांच्या गळ्यात गळे घालून बसली होती. त्या परिसरात या दोनच व्यवसायांची चलती होती.

डिड आय हेट माई? तिचा मला तिरस्कार वाटतो? राग येतो?

मी स्वतःलाच प्रश्न केला. हाच प्रश्न मी पाच वर्षांपूर्वी गावातल्या परांजप्यांच्या हॉस्पिटलमधल्या बेडवर पडल्या पडल्यासुद्धा विचारला होता.

माझं मूल पाडायला बऱ्याच प्रमाणात ती जबाबदार होती. तिचा कमकुवतपणा... आप्पांवरची आंधळी भक्ती आणि इभ्रतीच्या खोट्या समजुती.

..................................................................

*‘काही दुःख करायचं कारण नाही,’ माई रूक्ष आवाजात म्हणाली.*

*मी भकास नजरेने तिच्याकडे पाहिले.*

*‘हे मूल काही अभिमान वाटावी, अशी गोष्ट नाही.’ तिचे डोळे आग ओकत होते.*

*मी प्रश्नार्थक दृष्टी टाकली तिच्याकडे. कुठलेही अजाण मूल कुणाला लाज कशी आणू शकते?*

*‘अक्करमाशी अवलादच ती.. आई-बाप माहिती असले तरी, ना लग्न.. ना काही संस्कार.. कुत्र्यामांजराच्या जन्माला आला होता का तुम्ही?’ ती कडाकडा सुपारी कातरत मला विचारत होती.*

*‘मुलगी होती का मुलगा?’ मी त्याही थकलेल्या अवस्थेत तिला विचारले.*

*नॉट दॅट आय वॉज इंटरेस्टेड इन दी सेक्स ऑफ दी चाइल्ड.. पण त्या अनाम जीवाची प्रतिमा मनात उभी करण्यासाठी मला हे कळणं आवश्यक होतं.*

*‘कुणाला पडली आहे? दोन इंची जीवाच्या लिंगात आम्हाला काहीही रस नव्हता. म्हणून विचारलं नाही.’ माईने तडकाफडकी उत्तर दिलं.*

*‘तुम्ही त्या जीवाचे कुणीही नव्हता.. मी होते.. मी आई होते त्या जीवाची.’ माझा दुबळा प्रतिकार.*

*‘आशू, जे अनुभव वांझोटे असतात, त्यांच्या आठवणी कधीही ठेवू नयेत. शक्य होईल तितक्या लवकर पाटी कोरी कर.. पुसून टाक.’ माईचा सल्ला.*

*‘यशवंत..’ मी थरथरत्या ओठांनी त्याचं नाव घेतलं.*

*‘त्याचं काय?’ माईच्या स्वरांत कटूता ओतप्रोत भरली होती.*

*‘त्याला माहिती आहे? तोसुद्धा काही होता ना?’ माझा प्रतिप्रश्न.*

*माई काहीच उत्तर देत नव्हती. तिची नजर कधी खिडकीबाहेर, कधी खोलीतल्या छताकडे.. कधी खोलीतल्या पांढऱ्या शुभ्र फरशांकडे फिरत होती. ती मला टाळत होती, हे स्पष्ट होतं.*

*‘मा, मी तुला विचारते आहे.. यशवंत..’ मी तिचा हात पकडत म्हणाले.*

*'तुला आत्ता सांगावं की नाही, विचार करत होते..' आपला हात सोडवून घेत माई म्हणाली. माझा स्पर्श तिला झेपत नव्हता, हे स्पष्टच होतं.*

*'नको विचार करूस.. सगळाच अविचार झाला आहे. आता वाईटातले वाईट ऐकायची तयारी आहे माझी.' मी तिला म्हणाले.*

*'आज पहाटे, पश्चिमेकडच्या रेल्वे फाट्यावर यशवंताचं प्रेत मिळालं. आत्महत्या केली त्यानं एक्सप्रेसखाली..' माईचे शब्द. आपण कितीही वाईट ऐकायची तयारी ठेवली, तरी त्याच्या तीव्रतेचा अंदाज खऱ्या अर्थानं आपल्याला येत नाही, हेच खरं. नाहीतर हे ऐकल्यानंतर मी इतकी सुन्न का झाले असते? मी कॉटची स्टीलची दांडी घट्ट पकडून ठेवली होती. कारण खोली माझ्याभोवती गरागरा फिरत होती. यशवंता गेला होता. म्हणजे गॉन फॉरएव्हर!*

*आत्महत्या! म्हणजे लौकिक अर्थाने असेलही. ही वॉज अ कॉवर्ड! भ्याड होता. ताठ उभे राहणारे लिंग आणि पुरुषार्थ यांचा अर्थाअर्थी काहीच संबंध नसतो, हेच खरं. सेक्स मला सतावत होते हे माहीत होते. कॉलेजच्या एक्सपिडिशन ट्रीपमध्ये आम्ही दोघेच मागे राहिलो होतो. ठरवून की योगायोग, मला सांगता येत नाही. पण त्याने जेव्हा माझ्या छातीवर हात ठेवला तेव्हा असं वाटलं की, अज्ञाताचा एक दरवाजा हळूहळू किलकिला का होईना, उघडतोय. माझी समजावून घेण्याची भूक वाढत गेली. मी त्याच्या पँटच्या झिपला हात घातला आणि माझी बोटं त्याच्या अंडरवेअरमधल्या घट्ट इंद्रियाभोवती वेढली गेली. कथा कादंबऱ्यांमध्ये वाचतो तसं ते काही मला खूप हळूवार, रोमँटिक, श्रृंगारिक नाही वाटलं. किंबहूना काही क्षणांत सगळा वेग इतका वाढला की वाटलं, खरंच सेक्सची मुलभूत जाणीव पशू पातळीचीच आहे. आणि ती पातळी गाठल्याशिवाय आपण सेक्स एन्जॉयच करू शकत नाही. सगळा खेळ दहा-पंधरा मिनिटांत संपला आणि आपापले कपडे सावरत आम्ही पुन्हा इतरांमध्ये मिसळून गेलो. हे इथेच थांबलं नाही. पुढे संधी मिळेल तेव्हा, नाहीतर संधी निर्माण करत आम्ही हा अनुभव घेत राहिलो. प्रत्येक वेळेला काहीतरी नवीन शिकत आणि शिकवत. पण ते सर्व शारीरिकच होतं. आमच्यात एरवी काही बोलणंच होत नसे.*

*कव्हर दी ब्रेन अ‍ॅण्ड फायर दी बेस! आमची मोड्स ऑपरंडी साधी सोपी सरळ होती. त्या सगळ्याचा परिणाम हा होईल, हे तेव्हा माहीत नव्हतं!*

*एका निरपराध, अजाण, अनाम जीवाला त्याची किंमत मोजावी लागेल, हे जर का मला तेव्हा कळलं असतं तर!*

*मला एकदम खूप खूप अपराधी वाटलं. यशवंता तर भ्याडच होता. पण मी... मी त्या जीवाच्या पाठी ठाम उभी राहिले असते.*

*'तू जा!' मी मा ला म्हणाले आणि कुशीवर वळून तिच्याकडे पाठ केली.*

*'आता यशवंताच्या आत्महत्येचं खापरसुद्धा तू आमच्याच डोक्यावर फोडणार आहेस का?' माचा आवाज बर्फासारखा थंडगार झाला होता.*

*'त्याच्या बापानं त्याला भर रस्त्यात फोडून काढला. तोंडाला काळं फासून धिंड काढली. ते त्याला सहन झालं नाही... ' ती आपला बचाव करत राहिली.*

*'आपलं नातं आज संपलं आहे. ना तू माझी आई होऊ शकत ना मी तुझी मुलगी. आपलं नातं हा एक अपघात.. पण ते संपवायची वेळ आली आहे. ' मी भिंतीकडे पाहत बोलले.*

*शेजारच्या खोलीतून ऐकू येणारा लहान अर्भकाच्या रडण्याचा आवाज एकाच वेळी करूण, क्रूर, भयानक, भकास वाटत होता.*

*'हे बघ, डोक्यात राख घालून घेऊ नकोस. आम्ही काही तुला टाकू इच्छित नाही. तू आमचीच मुलगी आहेस. राहशील.. काही दिवस अमरावतीला राहा. लोक काय, विसरून जातात. मग पुन्हा परत ये गावाला. ' जणू काही झालंच नाही, अशा आविर्भावात ती बोलत होती.*

*'तू प्लिज जा..' मी ताडकन उठून बसले. इतक्या जोरात, की माझ्या शिरेत खुपसलेली सलाइनची सुईच वाकडीतिकडी होऊन बाहेर पडली आणि हातातून रक्ताची चिळकांडीच उडाली.*

*'आणखी काही वेळात मला वेड लागेल आणि मी इथे तमाशा करेन.. लिव्ह मी अलोन..' मी ओरडलेच. ती उठली. तिच्या डोळ्यात खंत नव्हती. घराण्याची इभ्रत जपण्याची जबाबदारी घेतलेल्या बाईला ती चैन परवडणारी नव्हती. जाताना तिने खोलीच्या दरवाज्यावरचा पडदा ओढून घेतला. माच्या आणि माझ्या जगात कायमची भिंत उभी केल्यासारखा!*

*मी एकाच वेळी मृत्युही पावले होते आणि पुन्हा जन्मालाही आले होते. वेगळी.. पूर्णपणे वेगळी आशू..*

……………………………………………………

माईच्या खोलीच्या दरवाज्यावरचा पडदा उघडला गेला आणि दोन्ही डॉक्टर्स बाहेर आले. त्यांनी आप्पांच्या खांद्यावर हात ठेवला.

आप्पा निःशब्द खुर्चीत खाली बसले. त्यांचे हात थरथरत होते.

कोणी, काहीही न सांगता मला कळले होते.

माई गेली होती! ती शांतताच खूप बोलकी होती.

कधीही न उघडणारा काळाचा पडदा ओढून... आमच्यातली दरी कायम ठेवून ती गेली..

काही वेळापूर्वी तर ती होती. तिला वेदना जाणवत होती. माझ्यावरचा राग मनात असणार तिच्या?

झालेला मनस्ताप उसळ्या मारून बाहेर पडण्याचा प्रयत्न करत असणार. कदाचित तिला आपण समजलोसुद्धा असू.. शेवटी तीसुद्धा एक स्त्रीच होती ना? जे काही मी केले, जे काही मी जगत होते, जगत आहे.. त्यात खोटेपणा नव्हता, हे तर तिला निश्चितच जाणवलं असेल ना? तो मान्य करायचे स्वातंत्र्य तिला नव्हते. तिने ते कधी मागितले नाही. तिला ते कधी हवं होतं की नाही, मला तरी कधी कळलं नाही. मा ला खरंतर विचारस्वातंत्र्यच नको होतं. कदाचित म्हणूनच तिची ईश्वरावर गाढ श्रद्धा होती. तीनशे पासष्ट कोटी देव मानायची. आणि ते कमी पडले म्हणून की काय, ती ईश्वराचे मानवी अवतारसुद्धा मानायची. सगळं विचारस्वातंत्र्य तिने त्यांच्या पायाशी अर्पण टाकलं होतं. आपला तर कशावरही विश्वास नव्हता. घरातल्या ईश्वराच्या मूर्तीसमोर हात जोडणं तर मला कधी जमलंच नाही. ती चिडायची, रागवायची.

'माझी विचारशक्ती शाबूत आहे.' मी तिला म्हणायची.

'त्याचा ईश्वरासमोर हात जोडण्याशी काय संबंध आहे? आम्ही काय आमची विचारशक्ती गहाण ठेवली आहे की काय? इतकी वर्षे संसार केला, तुला जन्माला घातली.. वाढवली, घर उभं केलं ते काय डोकं नव्हतं म्हणून?' ती करवादली.

'तुझ्या आयुष्यातल्या सगळ्या गोष्टी अपघात म्हणून झाल्या आहेत. जाणीवपूर्वक अनुभव घ्यायचा म्हणून नाही झालेल्या. माझ्या जन्मासकट म्हणतेय मी. सेक्सची तुला काय माहिती आहे? ऑरगॅझम म्हणजे काय?' माझा बेधडक प्रश्न.

'आशू, कुणाशी बोलते आहेस तू? अगं भिंतींनाही कान असतात,' मी असं बोलायला लागले की माई सरभरीत व्हायची.

'हेच ते, मोकळेपणाने श्वास घेणंसुद्धा माहीत नाहीए तुला. ईश्वराला अशीच माणसं आवडतात जे त्याला कधीही प्रश्न विचारत नाहीत. त्याला जाब विचारत नाहीत. सतत भयग्रस्त होऊन जगत राहतात.' मी तिच्यावर हल्लाच चढवला.

'या घरात असलं अभद्र बोलणं मी सहन करणार नाही आशू.' ती उठली आणि तडकाफडकी स्वयंपाकघरात निघून गेली. पाठीमागे पडता खासकन ओढून घेऊन.

आयुष्यावर आणि नात्यांवर असे पडदे पडतच राहिले!

माच्या आणि माझ्या नात्यावर हा शेवटचा पडदा!!

मृत्युमुळे नातं संपत? नात्याचा प्रभाव संपतो?

काही माणसं मृत्यूनंतरही तुमच्यावर प्रभाव टाकत राहतात. माईला जिवंतपणी नाही प्रभाव टाकता आला, मृत्युनंतर काय टाकणार बिचारी!

'लक्ष्मीची इच्छा होती.. मृत्युनंतर देहदान करण्याची. त्यामुळे अंत्यसंस्कारांचा प्रश्नच उद्‌भवत नाही.' आप्पा माझ्यासमोर येत म्हणाले.

निदान शेवटी तरी ती स्वतःचे असे काही मागू शकली ह्याचं मला खूप समाधान झालं. का कुणास ठावूक, तिच्यावरचा राग किंचितसा का होईना, कमी झाला.

काही क्षण आमच्यात एक अवघड शांतता होती. प्रश्न संभाषण पुढे कसे न्यायचे असा नव्हताच. ते संपवायचे कसे, हा होता.

'इथले सगळे सोपस्कार पूर्ण झाले की, मी संध्याकाळीच गावी परतेन.' त्यांनी संभाषण संपवायच्या उद्देशाने पाऊल उचलले.

'पुढचे सर्व..' मी अत्यंत मुर्ख, बावळट प्रश्न विचारला.

त्यांनी काही क्षण माझ्याकडे पाहिले आणि वळून ते निघून गेले.

मला अचानक असे जाणवले की, आपण या हॉस्पिटलमध्ये पाहुणे आहोत. इथे आपले आता कुणीच नाहीए.

माईला शेवटचे बघायची इच्छासुद्धा उरली नाही. तशीच लिफ्ट पकडून खाली आणि हॉस्पिटल बाहेरच्या गर्दीत मिसळून गेले.

आजूबाजूच्या जगाला कल्पनाही नव्हती काय झालं आहे याची. माझ्या संवेदनासुद्धा बधीर झाल्यासारख्या होत्या. यांत्रिकपणे मी एलफिन्स्टन रोड स्टेशन गाठलं. घरी जायची इच्छा नव्हती.

कुणाला भेटावं, असंही वाटत नव्हतं. म्हणजे कुणाकडे बोलून समोरच्या व्यक्तीची संध्याकाळ का म्हणून बरबाद करायची!

जुहू चौपाटी.. उत्तम उपाय होता. भरगच्च भरलेली लोकल आली आणि सर्व विचारांना टांग मारून मी गर्दीत घुसले.

.................................................................

९.३० रात्रौ

'तुम्ही?' माझ्या तोंडून अस्फूट उद्‌गार बाहेर पडला.

माईच्या मृत्यूनंतर लगेच घरी परतण्याची इच्छा नव्हती. गर्दीमध्ये डोक्यांमधल्या विचारांना विसरणं सहज शक्य होतं. म्हणूनच जुहू चौपाटी गाठली. एक कोपरा शोधला आणि निवांत बैठक मारली. पण मन रमत नव्हतं. गर्दीतही विचारांचं विसर्जन करणं शक्य होईनासं झालं. आणि तरीसुद्धा कोणालाही भेटायची इच्छा नव्हती. मोबाइल दुपारपासून बंदच करून ठेवला होता. एकदा मोह झाला तो सुरू करण्याचा. पण बाह्य जगाला तोंड द्यायची माझी अजूनही मनापासून तयारी होत नव्हती. अंधार पडायला लागला, तसं स्टेशन गाठलं आणि ट्रेन पकडली. सुदैवाने ट्रेन रखडत रखडतच चालली होती. आणि मिरारोड गाठता गाठता नऊ वाजले. घरापाशी आले. पर्स उघडून चावी काढली आणि जिना चढायला सुरुवात केली. तो वरच्या पायरीवर बसला होता.

तो.. प्रेमानंद हिर्लेकर.

'तुम्ही?' माझा अस्फूट उद्‌गार.

त्याने शर्टच्या खिशातून कागदाचा एक चिटोरा बाहेर काढला.

'हा तुम्हीच सोडला होतात.. माझ्या घरात.' त्याने तो कागदाचा चिटोरा माझ्या डोळ्यांसमोर नाचवला.

'येस' मी म्हटलं. मी माझा पत्ता त्याच्या घरातून निघताना सोडला होता.

'मी त्याचा आमंत्रण म्हणून स्वीकार केला आणि आलो.' तो हसत म्हणाला.

मी खालच्या पायरीवरून त्याच्याकडे पाहत होते. त्या लो अँगलमुळे तो आहे, त्यापेक्षा मोठा वाटत होता की काय, ना जाणे! माझं लक्ष प्रथमच त्याच्या शरीरयष्टीकडे गेलं.

त्याचा बुशशर्ट दंडांवर रूतलेला होता. बुशशर्टाची वरची दोन बटणे उघडी होती. आत पांढरीशुभ्र वेस्ट. गळ्याभोवती घट्ट बसणारी. त्याला सुट होत होती. आज त्याने शेव्हही केलं होतं. त्याचमुळे की काय, त्याच्या गळ्यापासून वर जाणाऱ्या नसा स्पष्ट उठून दिसत होत्या. त्याचे स्नायू, जिममध्ये वर्कआऊट करणाऱ्या पुरुषाप्रमाणे तयार झालेले होते.

'काय पाहताय माझ्याकडे?' त्याच्या डोळ्यात एक मिष्किलपणा होता.

'माझा माझ्याच डोळ्यांवर विश्वास बसत नाहीए. म्हणजे मला घराबाहेर हाकलून देणारा हाच का तो माणूस? आज चक्क, माझ्या घरापाशी?' मी त्याच्या खालच्या पायरीवर टेकले.

तो खळखळून हसला.

'आता यात हसण्यासारखं काय आहे? अपमान माझा झाला होता, तुमचा नाही.' मी त्याला म्हणाले.

'तू अशी पायरीवरच बसशील, अशी मला खात्री होती. समहाऊ आय रिड पिपल. ॲण्ड रिड देम फास्ट. माझे अंदाज सहसा चुकत नाहीत.' तो 'तुम्ही' वरून 'तू'वर आला होता हे मला जाणवल्याखेरीज राहिलं नाही.

'सॉरी.. मी घर उघडते.. बराच वेळ झाला का?' मी पायऱ्या चढू लागले.

'वेल, मला तासनतास पाळतीवर उभं राहायची सवय आहे. त्यामुळे वेळेचं भान मला सहसा राहत नाही. पण दोन एक तास झाले असतील. पण एकदा आल्यावर परत जावंसं वाटलं नाही. आपलो भेट होणं आवश्यक होतं.' तो माझ्यापाठोपाठ पायऱ्या चढू लागला.

फ्लॅटचा दरवाजा उघडून मी त्याच्याकडे पाहिलं. त्याच्या अंगावर निळ्या रंगाची जिन होती. आणि एक गोष्ट मला प्रकर्षानं जाणवली आणि ती म्हणजे त्याच्या शरीरावर एक काय, अर्धा इंचसुद्धा चरबी नव्हती. फक्त स्नायू.. मसल्स! आणि हा माणूस... दारूच्या आहारी!!

तो माझ्यापाठोपाठ फ्लॅटमध्ये शिरला आणि त्याने माझ्यासमोर एक ब्राऊन पेपर पिशवी धरली.

'नऊपर्यंत तू आली नाहीस तेव्हा मी अंदाज बांधला की, आता यापुढे तू किचनमध्ये जाणं शक्य नाही. तेव्हा खायला घेऊन आलो.' त्याने ती पिशवी माझ्या हातात दिली. त्याची नजर फ्लॅटमध्ये एखाद्या कॅमेराप्रमाणे फिरत होती.

मी त्याच्या हातातून पॅकेट घेतले आणि किचनमध्ये शिरले.

'काही जास्त नाहीए.. झुणका भाकर आहे. मला आवडतं म्हणून आणलं. आय हेट पिझ्झाज अँड बर्गर्स.. तुम्हाला आवडतं की नाही माहीत नाही.' तो टेबलावरची मासिके हाताळत म्हणाला. त्याच्यावर आर्टिकल असलेला पेपर वरच होता. त्याचा फोटोसुद्धा फ्रंट पेजवरचा होता. पण त्याने त्याकडे दुर्लक्ष केलं होतं. तो पुन्हा, 'अहो-जाहो'वर आलाय हेही मला जाणवलं.

'सॉरी.. पसारा आहे.' त्याची भिरभिरणारी नजर पाहत मी बाहेर येत म्हणाले.

'दॅट्स नॉट दी पॉइंट.. सवयीचा परिणाम.. डोळ्यांना एक शिस्त आहे. लोकेशनचे डिटेल स्केच बनवायचे. एकदा का मेंदूच्या मेमरोत ते सेव्ह झाले की पुन्हा कधीही..' वाक्य पुरे न करताच तो खळाळून हसला.

'माझी आई वारली..' माझ्या तोंडून वाक्य निसटले. ॲज इफ कुणाबरोबर तरी ही व्यक्तिगत घटना शेअर करणं मला खूप गरजेचं वाटत होतं. हॉस्पिटलमधून बाहेर पडल्यापासून मी भटकत होते. मला कुणालाही भेटावंसं वाटत नव्हतं. मुंबईची आता मला खूप जवळून ओळख झाली होती. कुणाला किती आणि काय सांगायचे, आणि ऐकणारा सुद्धा किती एकतो हे मला माहिती होतं. पण इथे बसलेल्या गृहस्थाला सांगावंसं वाटलं. हे वाटणं, नाही उलगडून सांगता येत.

तो एकदम गप्प झाला.. माझ्याकडे पाहत.

'आज दुपारी.. टाटा हॉस्पिटलमध्ये.. ल्युकेमिया.. सोमवारी ॲडमिट.. आज गेली.. तिला ल्युकेमिया झाला आहे, हेसुद्धा आजच कळलं. मी भेटायला गेले तिला.. पण आम्ही एकमेकींच्या जवळ नव्हतो.. म्हणजे आमच्यात बोलचाल नव्हती.. म्हणजे.. ती मला फोन करायची.. पण ते जास्त काळजीपोटी.. म्हणजे माझ्या काळजीपोटी नाही, तर मी.. घरावर आणखी काय आक्रित ओढवून आणते, या काळजीपोटी..' मी असंबद्ध बोलते आहे याची मला जाणीव झाली आणि मी एकदम गप्प झाले. तो माझ्याकडे पाहत शांत बसला होता.

टेबलावरच्या घड्याळाची टिकटिकसुद्धा त्या शांततेत अत्यंत कर्कश वाटू लागली.

'तिने देहदान केलं होतं. तेसुद्धा आजच कळलं.. त्यामुळे विधी वगैरे काहीच नव्हते..' मी स्वतःशीच बोलल्यासारखी बोलले. 'आयुष्यात पहिल्यांदाच तिने स्वतःची अशी इच्छा व्यक्त केली.. बॉडी डोनेशनची..' मी खाली बसले ते पाहून तोसुद्धा माझ्या शेजारी येऊन बसला.

'तिने माझं मूल माझ्यापासून हिरावून घेतलं.. दोन महिन्यांचा गर्भ... दोन महिन्यांचाच का होईना.. जीवच होता ना तो? आणि माझा होता ना तो? मग का हिरावून घेतला तिने?' माझी बोटं टाइल्सवर न दिसणाऱ्या रेषा ओढत होती. त्याने ती बोटं आपल्या हातात घेतली. समहाऊ तो स्पर्श मला खूपच आश्वासक वाटला.

'माझी कमिटमेंट होती त्या गर्भाबरोबर.. बाकी कुणाशीही माझी कमिटमेंट नव्हती. ना त्या गर्भाच्या बापाशी.. तो तर भ्याडच होता.. त्याने आत्महत्या केली. त्याला जगायचं नव्हतं म्हणून नाही, तो भ्याड होता म्हणून.. आणि हिने.. फसवून मला डॉक्टरांकडे नेलं. तपासता तपासता मी गुंगीत गेले.. आणि शुद्धीवर आले तेव्हा..' मी भडभडून बोलत होते.

'आणि तरीही... ती आई होती ना?' मी त्यालाच सवाल केला. अनेक आठवणींचे कोलाज डोळ्यांसमोर तरळून जाऊ लागले. अगदी पहिल्या दिवशी.. माझं बोट धरून शाळेत घेऊन गेलेली माई.. बागेतल्या पाळण्यावर इतर मुलींना बाजूला करून मला जागा मिळवून देणारी माई.. देवासमोर हात जोडून शुभं करोति म्हणायला लावणारी मा.. आणि 'घरच्या धन्यालाच उदंड आयुष्य का, तुला का नाही?' असे विचारताच माझ्या इवल्याश्या पाठीत धपाटा घालणारी मा.. माझ्याबरोबरीने आंबे खाताना तोंडाचा रबरबाट करून खिदळणारी माई.. आप्पांच्या उष्ट्या ताटातच जेवणारी माई..

मी निःशब्द रडू लागले. त्याने मला हलकेच जवळ ओढलं आणि मी त्याच्या कुशीत शिरून रड रड रडले.

'यू नो.. एखादी व्यक्ती दूर जाणं कधीच सुखावह नसतं.. सेपरेशन हॅज टू बी बिटर.. मग ते सेपरेशन मृत्यूमुळे असो किंवा अदरवाईज..' त्याने सिगारेटचे पाकीट काढले.

'इथं ॲश ट्रे नाहीए..' मी चेहऱ्यावर पाण्याचा भपकारा मारत म्हणाले. रडल्यामुळे मला हलकं वाटत होतं.

'इट्स ऑल राइट.. तो बोटांचा चाळा होता.. तुम्ही या.. इथे बसा..'

मी आतून दोन डिशेशमध्ये झुणका भाकर घेऊन आले.

'तुम्हाला भूक लागली असेल.' मी त्याच्यासमोर डिश ठेवली.

'खाऊ हो.. तुम्ही बोला. मला ऐकायचं आहे..'

'काय बोलू?'

'सगळं.. जे तुम्हाला सांगावसं वाटतं ते..'

माझं लक्ष घड्याळाकडे गेलं आहे हे पाहताच त्यानं माझ्या हाताला हलकेच स्पर्श केला आणि म्हणाला..

'रात्र आत्ता कुठे सुरू होते आहे...'

--चार---

# प्रेमानंद हिर्लेकर



*'आरं भाड्या.. तू माजं नाव तुज्या त्वांडातून घ्ये तर खरं... हाच कोयता म्या तुझ्या त्वांडात घालन आन् गांडीतून भाईर काढन.. आरं, बारा लवड्याच्या, तुला आयाभईनी न्हाईत का रं?' सखुचा अवतार बघण्यासारखा होता. तिच्या तोंडातून लाळ गळत होती.. केस विस्कटलेले होते.. हातात रक्ताने माखलेला कोयता होता आणि ती कोयत्याच्या घावांनी सोललेल्या भिकू मांगलेच्या छाताडावर पाय ठेवून उभी होती.*

*भिकू मांगले...*

*रमाई नगर झोपडवस्तीत अशी एकही झोपडी नव्हती की, जिच्यातली वयात आलेली मुलगी नासवायचा भिकूने प्रयत्न केला नसेल. भिकूचे शरीर रक्ताने माखले होते. मी हा असा प्रसंग प्रथमच पाहत होतो. आईने मला झोपडीत खेचायचा प्रयत्न केला होता पण बापानेच तिला थोपवलं.*

*'बघू द्ये की पोराला.. माणसाचा राक्षस झाला की, काय हुतं त्ये.. ये सखे, कशापाई जिता सोडत्ये या भाड्याला... आता संपवूनच टाक की.. ए, आनि कुनी बी काय बी पायलेलं न्हाई.. भांचोद, येकानं बी त्वांड उघडलं तर म्या जित्ता गाडंन त्येला..'*

*माझी नजर बापापर्यंत पोहोचत नव्हती, इतका तो उंच.. उंच.. उंच... होत गेला.*

*भिकू मांगले त्याही परिस्थितीत उठून बसायचा प्रयत्न करत होता. ते पाहताच सखूचा संताप पराकोटीला पोहोचला. तिच्या हातातला कोयता.. तिच्या डोक्याच्या वर गेला.*

*'का रं भाड्या.. तू मर ना की रं? लई चरबी हाये तुज्या अंगात.. या वस्तीतले बाप्ये, समदे हिजडे पैदा झाल्ये रं.. लंडावर कुंकू वाहून बशीले समद्ये.. आनं तू... आमच्या पोरीबाळींना झवाया पुडं.. न्हाई का? आज तू इथून जित्ता जानार न्हाईस.'*

*सखू किंचाळत होती आणि डोळ्यांची पापणी मिटते ना मिटते तोच तिच्या हातातला कोयता भिकू मांगलेच्या डोक्यावर येऊन इतक्या जोरात आदळला की, भिकू मांगलेची कवटी दुभंगली आणि तिच्यातला मेंदू दिसायला लागला.*

*भिकू मांगले नामशेष झाला होता.. कायमचा!*

*जसा भिकू मांगले रक्ताच्या थारोळ्यात कोसळला, तसे बायका पोरंवाले आपापल्या झोपडीत बंद झाले. रात्रीच्या अंधारात कोणीही काहीही पाहिलं नव्हतं.*

*एकाने सखूचा कोयता नळाखाली धरून स्वच्छ केला.. कापडात गुंडाळला आणि तिच्या झोपडीत तो ठेवला. तो 'एक'ही गर्दीत नंतर दिसेनासा झाला.*

*चारचौघांनी मिळून भिकूला उचलला आणि रेल्वेट्रॅकच्या बाजूला ठेवून दिला.*

*दररोज इतकी लोकं रेल्वेखाली मरतात.. त्यात भिकूची भर पडली होती.*

*रमाई नगर झोपडवस्तीतल्या जनतेच्या कोर्टात न्याय झाला होता, शिक्षा सुनावली गेली होती आणि शिक्षेची अमलबजावणीही झाली होती.*

मला न्यायप्रक्रियेचे एक मूलतत्त्व त्या दिवशी कळले होते.

न्याय हा आम जनतेचा विश्वास बसेल असाच असायला हवा आणि त्याची अंमलबजावणी तात्काळ, त्वरित, तुरंतच व्हायला हवी.

अन्यथा लोकांचा न्यायावर विश्वास बसत नाही.

.........................................................

'ज्युडिशिअल सिस्टिम ऑफ टुडे हॅज लॉस्ट इट्स क्रेडिबिलीटी!' मी स्वतःशीच बोलल्यासारखा बोललो आणि कॉफीचा मग ओठांना लावला.

मग रिकामा होता.

'मी पुन्हा कॉफी बनवते..' ती दोन्ही मग घेऊन किचनमध्ये गेली.

....................................................

*आमच्या झोपडीतलं वातावरण सुन्न होतं. ना बाप काही बोलत होता, ना आये. दोघेही बहुतेक झालेला प्रसंग पचवायचा प्रयत्न करत होते. तसं पाहिलं तर आमच्या वस्तीतल्या प्रत्येकाला सखूने जे केलं, ते स्वतः करायची इच्छा होती. भिकू मांगलेवर वार करताना सखूच्या डोळ्यांमधला त्वेष मी गर्दीत उभ्या असलेल्या प्रत्येक स्त्री पुरुषाच्या डोळ्यात पाहिला होता. फक्त सखू तो त्वेष कृतीत आणू शकली होती. बाकीच्यांना आपला संताप गिळून टाकून अपमानित जिणे जगायची पिढ्यान्पिढ्यांची सवयच लागली होती.*

*सखूने आज सगळ्यांची सुटका केली होती.*

*'जा रं, आक्काला येवढी मीठ भाकर द्येवून ये.. बिचारी, काय बी खाल्लं नसल तिनं..'*

*आयेच्या वाक्यानं मी भानावर आलो आणि तिच्याकडे पाहातच राहिलो. आई मला सखूकडे जायला सांगत होती. तिने आत्ता, काही वेळापूर्वीच भिकू मांगलेला माझ्या डोळ्यांदेखत ठार केला होता. त्या सखूला मीठ भाकर पोहोचवायला सांगत होती.*

*बापाने माझ्या डोक्यातला गोंधळ डोळ्यात पाहिला.*

*'का रं, बाचकायला काय झालं?' त्याने मला विचारलं.*

*'मी जाऊ सखूकडे?' मी त्याला भाबडेपणानं विचारलं.*

*'घाबरतू का तिला?' बाने मलाच विचारलं.*

*'तसं नाही रं..' पण माझा पाय सखूच्या झोपडीच्या दिशेने उठत नव्हता. खरं तर मला तिची जाम भीती वाटत होती. मला काही कळतच नव्हतं. चूक काय, बरोबर काय...*

*'पोरा.. आम्हाला किड्या मुंग्या बनवणारा कायदा हाये ह्ये दुनियेचा.. तुला आन मला त्याचा काय बी इपयेग न्हाई. माज्या मजुरीतलं पंचवीस रुपय कहाडून घ्येनं, चूक हाये की बरुबर.. त्ये सोडून द्ये रं.. पन येक सांगतू त्ये कंदी इसरू नगस.. आपन कुनाच्या पोटी आन कुटं जलम घ्येनार, आपून न्हाई ठरवू शकत.. पन जलमल्यावर कसं जगायचं, त्ये आपूनच ठरवू शकतो. मला पोरगी जलमली असती, तर म्या तिला सखूवानीच बनिवली असती रं.. आन तू बी सखूसारखाच हो.. जा बाबा, माज्या पोरीसाठी भाकरतुकडा घ्येऊन जा.. आन तिला सांग, बये आज आमी आमची लाचारी तुज्या पायावर ठ्येवली.' बापाच्या डोळ्यातले अश्रू पाहून माझी मलाच शरम वाटली. मी भाकरतुकडा घेऊन सखूच्या झोपडीकडे निघालो.*

.........................................................................

मी कॉफीचा मग.. तोसुद्धा गरम.. हाताला शेकवत पुन्हा बाहेरच्या खोलीत आलो. ती कॉफीचा घोट घेत.. भिंतीला टेकली. बराच वेळ ती काहीच बोलत नव्हती. म्हणजे खरंतर तिने काहीच बोलायचं नव्हतं. बोलायचं होतं मी!

टीपॉयवरचा पेपर मी खाली पसरला. फ्रंट पेजवरचा फोटो.. माझाच होता आणि तरीसुद्धा मी त्याच्याकडे एखाद्या त्रयस्थासारखा बघत होतो.

तिच्या हातातला मोबाईल वाजला. तिने जरा वेळ.. कुणाचा फोन आहे, ते पाहिलं.

'पसरिचा... घ्यायला हवा..' ती मला म्हणाली आणि तिने फोन कानाला लावला.

'येस..'

मग ती शांतपणे ऐकत राहिली. समोरून येणाऱ्या वाक्याला तिची काहीच प्रतिक्रिया नव्हती.

'मग? तू काय ठरवलं आहेस?' बऱ्याच वेळाने तिने प्रश्न केला.

'गूड.. माझा विश्वास आहे तुझ्यावर.. ही तर सुरुवात आहे.. धिस इज जस्ट.. टिप ऑफ अॅन आइसबर्ग.. लेट अस सी.. अरे हो.. तू पाठवलेले पैसे मिळाले.. खर्चाची सोय झाली.. थँक्स..' मग ती हसली आणि तिने फोन बंद केला.

'आजच्या आर्टिकलवर पहिली प्रतिक्रिया आली आहे. तीसुद्धा आत्ताच...'

मी तिच्याकडे पाहिलं. ती प्रतिक्रिया अनुकूल असणं शक्यच नव्हतं.

'ट्रिब्यूनच्या मालकांनी.. उद्या संपादकाला जेवायला बोलावलं आहे.' ती म्हणाली.

हे इतकेच नाही, याची कल्पना असल्यानं मी गप्प बसलो.

'दुपारच्या जेवणाचं आमंत्रण हे झापण्यासाठीच असतं.. तसा त्या कंपनीचा अलिखित संकेतच आहे. सो.. द ओनर ऑफ द पेपर इज नॉट व्हेरी हॅप्पी...' ती म्हणाली.

मी तिला हातानेच थांबायची खूण केली. सडनली माझा त्यातला इंटरेस्ट संपला होता. काय संबंध माझा? जे करायला हवं, ते मी केलं होतं आणि पुढेसुद्धा तेच करणार होतो. मग या संपादकांशी आणि प्रकाशकांशी आणि मालकांशी माझा काय संबंध?

'मला कॉफी खूप आवडली.. जस्ट दी वे आय लाइक इट.. स्ट्राँग अँड स्लाइटली बिटर.. गोड कॉफी मला आवडत नाही.' मी विषय कॉफीसारख्या न्युट्रल पातळीवर आणला.

'थँक्स्.. तेवढी एकच गोष्ट मला चांगली जमते.. आणि करायलाही आवडते.' ती हसत म्हणाली.

मग काही क्षण अवघड शांततेत गेले. हॅव आय ओव्हरस्टेड? रात्र उलटून गेली होती. इतका वेळ मी तिच्या घरी टिकेन.. ह्याची मला कल्पना नव्हती.

'तुम्हाला एक विचारू?' काही वेळाने तिनेच अवघडलेल्या शांततेचा भंग केला.

'येप्.. विचारा..' मी कॉफीचा घोट घेत म्हणालो.

'तुमची भाषा.. शब्दोच्चार...' ती अवघडली.

'विचारा नं.. मला कल्पना आहे, तुम्हाला काय विचारायचं आहे ते.' मी तिला म्हणालो.

'म्हणजे माझ्या डोक्यात असा विचार येणं.. हीच एक ब्राह्मणी विकृती आहे.. अँड आय काण्ट डिनाय माय ओरिजिन्स.. पण.. जाऊ दे.. विचारतेच.. तुमची भाषा.. शब्दांचा वापर.. खूप ब्राह्मणी आहे.. इव्हन शब्दोच्चारसुद्धा..' शेवटी तिने सगळे ओझे उतरवलेच.

मला खूप हसू आलं.

'एस्. जी.. त्याचं कतृत्त्व आहे हे..' मी म्हणालो.

'एस्. जी. ?' ती

'शरद गोखले. माझा मित्र.. वर्गमित्र.. शाळेपासूनचा.. माणसं तिरपागडी असतात, असू शकतात, हे मी तोपर्यंत ऐकून होतो. पण शरद गोखले भेटला आणि माझी सिनिकल असण्याची, सिनिसिझमची व्याख्याच बदलली..' मी आठवणींचे पदर उलगडायला सुरुवात केली होती.

त्याची आणि माझी मैत्री इतकी साधी.. सरळ नव्हती! शांततेला तिच्यात वाव नव्हता. माळरानावर वादळ घोंघावायला लागलं की, जशी धुळवड उडते.. तशीच होती आमची दोस्ती.

...............................................................................

*' मला तुझा हा हट्ट कळतच नाही.' मी गोखलेच्या पाठोपाठ फरफटत जात होतो आणि एस्. जी. झपाटल्यासारखा मला फरफटत नेत होता. रस्त्यातून जाणारे-येणारे आमच्याकडे विचित्र नजरेनं पाहत होते. पण गोखलेला थांबवणं त्या वेळी तरी कुणालाही शक्य नव्हतं. रस्त्यात मुडदाच पाडला असता. मी त्याला पाचवीपासून ओळखत होतो. आता त्याला तीन वर्षे होत आली होती. खरंतर दोस्तीत तीन वर्षं म्हणजे काही फार नव्हेत. सारं आयुष्य घालवूनही माणसं एकमेकांना ओळखत नाहीत.. आणि कधीकधी पहिल्या भेटीचा पहिला क्षणही पुरेसा असतो.*

*दाजीशास्त्री गोखल्यांना कुठे ओळखता आला होता आपलाच मुलगा!*

*आणि पाचवीत, नव्या शाळेत.. नव्या वर्गात आम्ही भेटलो.. आणि एकमेकांचे दोस्त झालो. नाही.. जणू काही आम्ही जुनेच दोस्त होतो. बऱ्याच दिवसांनी जुना मित्र भेटावा, तसे भेटलो आम्ही. आमची शाळा काही म्युनिसिपल स्कूल नव्हती. समाजाच्या वरच्या स्तरामधल्या जाणकार लोकांनी एकत्र येऊन ती आदर्श शाळा बनवली होती. आदर्श विद्यामंदिर. मला त्या शाळेत योगायोगानेच प्रवेश मिळाला.*

*..........................................................*

*चौथीच्या परीक्षेत मराठी सोडून सर्व विषयांमध्ये मला पैकीच्या पैकी मार्क पडले. मराठी भाषेत मात्र मला जेमतेम साठ मार्क मिळाले होते. एकतर रमाई नगर झोपडवस्तीत राहूनही मला मराठीत इतके मार्क मिळाले, हेच खूप झालं होतं. त्यात.. आमची शाळा जरी म्युनिसिपल होती, तरी मराठी शिकवणाऱ्या बाईंचं नाव परांजपे होतं. इथेच सगळा घपला होता. माझं मराठी ऐकून त्यांच्या चेहऱ्यावर फक्त वेदनाच उमटत असत. सगळी वानवा व्याकरणाची आणि भाषेच्या शुद्धतेची होती. मी उदास होतो आणि बाप मात्र भेटेल त्याच्याकडे माझं कौतूक करत सुटला होता. पगाराच्या पावतीवर अंगठा लावणाऱ्या बापासाठी माझे मार्क म्हणजे कौतुकाचा विषय नसते, तरच नवल होतं!*

*रस्त्याचे काम बघणाऱ्या इंजिनीअर देशपांड्यांनी त्याच्या तोंडून माझं कौतूक ऐकलं. दगड फोडणाऱ्याचा मुलगा इतका हुशार? त्यांचं कुतुहल चाळवलं आणि त्यांनी मला बोलावून घेतलं.*

*'तुझं खूप कौतूक ऐकतो आहे..' मला पाहताच ते म्हणाले.*

*'मराठीत कमी पडले.' प्रगतीपुस्तक हातात देताना परांजपे बाई हेच म्हणाल्या होत्या.*

*'बाकी सगळे ठीक आहे. मातृभाषेची अवस्था.. परागंदाच.. ते सुधारा.. अर्थात, त्या झोपडपट्टीत राहून काय सुधारणार ते ईश्वरच जाणे!' त्यांच्या स्वरातला कुत्सितपणा कान चिरीत गेला होता. बापाचे शब्द राहून राहून आठवायचे.*

*'आरं, आपून कुनाच्या पोटी जलम घ्येयाचा, कुटं जलम घ्येयाचा.. न्हाई मागू शकत. पन कसं जगायचं, ह्यो तर आपूनच ठरवू शकतो.'*

*'पण बाकीच्या विषयात तर पैकीच्या पैकी मार्क आहेत.' माझ्या पाठीवर कौतुकाची थाप मारत देशपांडे साहेब म्हणाले.*

*हो... त्यांना साहेबच म्हणायचं हे बापानं रात्रीपासून मला शंभर वेळा तरी बजावलं होतं.*

*'मला मराठी चांगलं बोलायचं आहे.. लिहायचं आहे..' माझा आवाज हिरमुसलेला होता.*

*'वाईट वाटतंय?' त्यांनी विचारलं.*

*'हो' मी त्यांच्याकडे पाहत म्हणालो. इतक्या वेळात पहिल्यांदाच मी त्यांना पाहत होतो. गोरेगोमटे.. भव्य कपाळ.. आणि त्यावर उडणारे कापसासारखे भुरूभरू केस.. हसले, की त्यांचे सलग, सुंदर पांढरेशुभ्र दात दिसले. त्याउलट बाप.. तमाखु खाऊन खाऊन त्याचे आणि आयेचे दात तपकिरी झाले होते.*

*'हे वाईट वाटणं कधीही विसरू नकोस.. जोपर्यंत अपयश जाचत राहतं, तोपर्यंतच आपली प्रगती होत राहते.' त्यांच्या डोळ्यात खरोखरीचं कौतूक होतं.*

*'मोठा झालास की काय व्हायची इच्छा आहे?' त्यांनी विचारलं.*

*'पोलीस अधिकारी.' माझं उत्तर तयारच होतं.*

*'का रे? इंजिनीअर, डॉक्टर, शास्त्रज्ञ नाही व्हायचं?' ते आश्चर्यचकीत झाले होते.*

*माझ्या डोळ्यांसमोर सखू, भिकू मांगले, रक्त, कोयता.. सगळं येऊन गेलं.*

……………………………………………………………

*त्या रात्री सखूला भाकर तुकडा दिल्यावर म्हणाली,*

*'बैस की रं.'*

*मी बाचकतच खाली बसलो.*

*'घाबरलास का रं?' जणूकाही संध्याकाळी काही घडलंच नाही, असं दर्शवत तिने भाकरतुकडा तोडला. सखूने स्वच्छ आंघोळ केली होती आणि कपाळभर कुंकवाचा मळवट भरला होता.*

*मी मान खाली घालून बसलो होतो. माझ्या वयाला संध्याकाळचा तो प्रसंग खूपच जास्त होता.*

*'म्या पन ह्याच झोपडवस्तीत जलमले. आयेला पन ठाव नव्हतं, बाप कोन त्ये.. आसल कुनी अक्करमाशा.. भिकूवानी' ती भाकर इतक्या वेळा चावत होती, आणि मग तोंडातल्या लाळेत घोळवत गिळत होती.*

*'त्ये फळकुटावर थोडं तिकट हाई, द्येतू का?' तिने विचारलं.*

*मी आज्ञाधारकपणे फळकुटावर प्लॅस्टिकच्या विशवीत बांधून ठेवलेलं तिखट तिला दिलं.*

*‘आयेनं बाकी काई बी न्हाई दिलं मला. त्यो कोयता दिला.. म्हनली, ‘त्येच्या जुरावर म्या जित्ती ऱ्हाईली आजपोतुर, आज मी जाईन रेल्वेखाली.. मला कोयता आता उठत न्हाई म्हून न्हाई.. पण ज्ये भडविच्यांनी तुला जलमली सखे, त्येनीच मला रोग बी दिला हाई.. हिथं खायाला पैका न्हाई, औषध कुठून आननार हाई?’ तवा, ह्यो कोयता.. तुझ्यासाठी.. कंधी वापराया बिचकू नगंस..’ यवढं बोलली, आनं गेली. बारक्या, हिथं येकच भिकू मांगले न्हाई रं.. ज्येवढे लंड हायेत, तेवढे भिकू मांगले हाईत. सोताच्या पुरीला झवनारे बी हायेत. कुनालाबी पोलीस कायबी करत न्हाई. हिजडा कायदा हाये.. तवा, कोयताच वाचिवनार ना आपल्याला! तू मोठा झाला की, तुला बी कळल.’ तिने उरलेल्या भाकरीला तिखट चोपडलं आणि ती चघळायला सुरुवात केली. तिच्या डोळ्यांतून वाहणारं पाणी तिखटामुळे होतं की, तिला आईची आठवण झाली म्हणून होतं, याचा विचार करत मी आमच्या झोपडीत परतलो.*

*पण खरंतर त्या संध्याकाळी बापाचा, आयेचा, सखूचा बारक्या, बारक्या उरलाच नव्हता. तो मोठा झाला होता. त्या रात्रीच त्याने ठरवलं होतं, पोलीस व्हायचं आणि सगळ्या भिकू मांगल्यांना कोयता घालून ठार करायचं.*

…………………………………………………………

*‘साहेब, तुम्ही एक दिवस आमच्या झोपडपट्टीत राहा, मग तुम्हाला कळेल, मला पोलीस का व्हायचं आहे ते..’ माझ्या वयापेक्षा खूप मोठी उडी मी मारली होती. पण रमाई नगर झोपडपट्टीत कोणाच्याही वाट्याला बालपण, लहानपण आलंच नव्हतं. मधल्या इयत्ता गाळून, एकदम मोठेच व्हायचे सगळे.*

*देशपांडे साहेबांना काय वाटलं, कुणास ठाऊक.. त्यांनी बापाला एक चिठ्ठी लिहून दिली आणि आदर्श विद्यामंदिराचा पत्ता दिला.*

*‘मुख्याध्यापक पित्रे सर आहेत. मी त्यांना आज भेटेन, तू उद्या त्यांना ही चिठ्ठी घेऊन भेट.’*

*नव्या शाळेची स्वप्नं बघत मी झोपडवस्तीत परतलो.*

*मला आदर्श विद्यामंदिरात प्रवेश मिळाला. शाळा लांब होती. लोकलने प्रवास करायचा होता. पण बापाला आता माझ्या प्रगतीची नशा चढली होती. अडचणी.. अडथळे.. त्याला दिसतच नव्हते.*

…………………………………………………………

*पहिल्या दिवशी मी गोंधळूनच गेलो. सगळी मुलं वेगळीच वाटत होती. वेगळी म्हणजे वर्णाने, नावांनी, बोलण्याने, कपड्यांनी. आपला इथे कसा काय निभाव लागणार, मला काहीच सुधरेना! मी मान खाली घालून सर्वात पाठच्या बाकावर बसायला निघालो, तोच कोणीतरी माझा हात पकडला. म्हणून मी वळून पाहिलं.*

*'माझ्या शेजारची जागा रिकामी आहे. बैस इथेच,' तो म्हणाला. तो एकदम गोरागोमटा होता. त्याचे डोळे किती घारे होते! नाक इतकं टोकदार की, खूप वेळा पाहिलं तर ते टोचेल अशीच भीती वाटली. त्याचे कपडे स्वच्छ आणि इस्त्रीचे होते. त्याचे केस विस्कटलेले असले आणि त्यांना तेल लावलेले नसले, तरी त्याला ते तसेच शोभून दिसत होते.*

*'पण मी.. म्हणजे.. कोणी उठवलं तर?' आत्मविश्वासाची त्या दिवशी तरी माझ्यात बोंब होती.*

*'आपण उठायचं नाही.. सोप्पंय..' त्याने माझं दप्तर ताब्यात घेतलं आणि मला धरून शेजारीच बसवलं.*

*'मी गोखले.. शरद गोखले.. शरद दाजीशास्त्री गोखले.' तो माझ्याकडे बघत म्हणाला. त्याने एक हात माझ्या खांद्यावर ठेवला. वाक्य टप्प्याटप्प्यांनी पूर्ण करण्याची त्याची सवय मला आवडली.*

*'मी.. हिर्लेकर.. प्रेमानंद..' मी त्याच्या शेजारी बसत म्हणालो.*

*'प्रेमानंद आणि हिर्लेकर यांच्या मध्ये कोणीतरी असेलच ना?' तो हसला.*

*'बाप..' मी सहज उत्तर देऊन गेलो. तो इतक्या जोरात हसला की, बाकीची मुलं आमच्याकडे बघू लागली.*

*'म्हणजे, मी त्याला बापच म्हणतो. कारण.. तोच माझा बाप आहे..'*

*'अरे हो, पण त्याला काही नाव असेलच ना?' तो*

*'भीमा.. भीमा.. नाव.. म्हणजे शाळेच्या फॉर्मवर तेच नाव आहे.. रस्त्यांच्या कामावर मजूर आहे तो..' मी म्हणालो.*

*'माझे बाबा, दशग्रंथी ब्राह्मण आहेत. ग्रंथ तोंडपाठ आहेत त्यांच्या. पण त्यात काही दम नाही. संस्कृत पाठ करायला अक्कल लागत नाही. सगळे खूप मानतात त्यांना. आमचं पटत नाही. त्यांच्या मते मी त्यांना लांच्छन आहे.. घराण्यालासुद्धा.. तुला मटका लावता येतो?' एका फटक्यात त्याने मला हादरवूनच टाकलं होतं. माझा बाप, माझं दैवत होता. इथे बापाची अक्कल निघत होती. मटका खेळण्याच्या गोष्टी निघत होत्या.*

*'तुला माहिती आहे, मी तुला माझ्या शेजारी का बसवलं?' त्याचे डोळे मिष्किल झाले होते.*

*'मला कसं कळणार?' मी आधीच गांगरलो होतो.*

*‘काल मोठे सर तुझ्याबद्दल वर्गात सांगत होते. तुला सर्व विषयांमध्ये पैकीच्या पैकी मार्क आहेत?’ त्याच्याही डोळ्यात कुतहलमिश्रित कौतूक होतं.*

*माझ्याबद्दल वर्गात बोललं गेलं! माझ्या मनात आत्मविश्वासाची एक पायरी तयार झाली.*

*‘रस्त्यावर मजुरी करणाऱ्या वडिलांचा मुलगा.. इतका हुशार..’ त्याने आता माझा हात पकडला होता.*

*‘पण.. मराठीत कमी मार्क पडले,’ मी त्याला म्हणालो.*

*‘मराठी शिकून कोणाचं भलं झालं आहे? एकूणच शिकण्यात काही दम नाही. पण मी तेव्हाच ठरवलं, तुला माझ्या शेजारी बसवायचं.’ तो म्हणाला.*

*‘म्हणजे?’ मला समजत नव्हतं.*

*‘कारण मी ‘ढ’ आहे..’ तो हसत म्हणाला.*

*‘ढ?’*

*‘मला रुपयाच्या नोटा मोजता येतात.. पंचवीसचा पाढा येत नाही.. म्हणून मी गोखले घराण्याला लांच्छन आहे, असं दाजीशास्त्री म्हणतात. चुकून आमच्या पोटी जन्माला आलात...’ त्यांची नक्कल करत तो म्हणाला.*

*आम्ही काही वेळ गप्प बसलो.*

*‘तुला माझी एक शंका सांगू का?’ तो काही वेळाने माझ्या कानात कुजबुजला.*

*मी हो किंवा नाही, म्हणण्याचा प्रश्नच नव्हता.*

*‘दाजीशास्त्रींचे, म्हणजे आमचे, घर त्यांना मिळणाऱ्या दक्षिणेवर चालते. मीसुद्धा त्यांना दक्षिणेत मिळालेला असणार... दक्षिणेत मिळालेला खोटा सिक्का..’ तो इतक्या मोठ्याने हसला की, मी घाबरलोच. शाळेची पहिली बेल वाजली. वर्गात शांतता पसरू लागली.*

*‘तर आजपासून तू माझा दोस्त. तुझ्या मदतीने मी किमान शालांत परीक्षा पास व्हायचं ठरवलं आहे.’ त्याचा निर्णय झाला होता.*

*आमच्या मैत्रीत, बहूतेक निर्णय हे गोखलेच घेत असे.*

......................................................................

*आम्ही दोघे.. रेल्वेच्या जवळ असलेल्या किल्ल्यावर जाऊन पोहोचलो. संध्याकाळी शाळा सुटल्यावर आम्ही बऱ्याचदा तिथे जाऊन बसायचो. मी त्याला दुसऱ्या दिवशीचा गृहपाठ पुरा*

*करायला मदत करायचो. एकतर तिथे संध्याकाळ झाली की, कुणी फारसं फिरकायचं नाही. तिथेच तो माझ्याकडून मराठी वाचून घ्यायचा. उच्चार दुरुस्त करायचा. त्याच्या वडिलांकडची मराठी पुस्तकं तो त्यांना न सांगता मला आणून द्यायचा. न सांगता अशासाठी की, दाजीशास्त्री अत्यंत कर्मठ होते. स्पृश्य–अस्पृश्य मानणारे होते.*

*आमच्या नेहमीच्या ठिकाणी पोहोचताच, आजूबाजूला कोणी आहे की नाही, याची पर्वा न करता त्याने स्वतःच्या अंगावरचे कपडे काढायला सुरुवात केली.*

*'एस्. जी., तुला काय झालंय?' अलिकडे आम्ही एकमेकांना आमच्या नावांच्या इंग्रजी अद्याक्षरांनी हाक मारायला सुरुवात केली होती.*

*'तू पण उतरव कपडे..' एखाद्या झपाटलेल्या माणसासारखं तो बोलला.*

*'अरे पण का?' मी कधीच कुणासमोर असा नागडा झालो नव्हतो.*

*'तुला कोणा मुलीसमोर कपडे उतरवायला सांगत नाहीये.. उतरव.' त्याच्या आवाजात कोणालाही भारून टाकेल, अशी जरब होती. काही क्षणांतच आम्ही चक्क जन्माला आलेल्या अवस्थेत एकमेकांसमोर उभे राहिलो.*

*'आता मला सांग, तुझ्यात आणि माझ्यात.. हा रंग सोडला, तर काय फरक आहे?' माझ्याकडे पाहत गोखलेने विचारलं.*

*'काहीच नाही.' मी त्याला उत्तर दिलं.*

*'मग माझ्या बापाला काय अडचण आहे?' गोखलेने संतप्त स्वरात विचारलं.*

*दाजीशास्त्रींना आमच्या घट्ट मैत्रीची कल्पना आली होती. म्हणजे गोखलेकडे माझं नाव असलेली गणिताची वही सापडली. त्यांनी गोखलेला विचारलं. जुजबी उत्तर देऊन विषयाला बगल देणं, हा गोखलेचा स्वभावच नव्हता. त्याने आमच्या मैत्रीबद्दल, माझ्या बापाबद्दल, माझ्या झोपडपट्टीतल्या राहण्याबद्दल आणि विशेषतः आमच्या दलित असण्याबद्दल त्यांना सांगितलं. भरभरून! अभिमानानं!!!*

*'आज घरात तमाशा.. म्हणजे पराकोटीचं भांडण.. तमाशात नाचणारी असते. इथं आम्ही दोघेच होतो. म्हणून तमाशा म्हणवत नाही. दशग्रंथी ब्राह्मणाचा मुलगा एका अस्पृश्याबरोबर... त्याच्या डब्यातलं खातो, त्याच्याबरोबर बसतो, खेळतो, जगतो.. हे.. हे.. धर्म बुडवण्यासारखं आहे, असं ते म्हणाले.' त्याने भांडणाचा शेवट सांगितला.*

*'बाप रे! मग?' माझ्या छातीत धडधडू लागलं होतं. आता याचा परिणाम म्हणून मला शाळेतून काढलं तर? त्याच्या वडिलांचं एवढं वजन निश्चितच होतं. निदान ते एक वाद निर्माण करू शकले असते.*

*'मी त्यांना म्हणालो, तुम्ही मादरच्योद आहात.' इति गोखले.*

*एकीकडे माझी मराठी सुधारत होती आणि गोखले शिव्या शिकत होता.*

*'मी हल्ली घरात शिव्या देतो..' काही वेळाने तो म्हणाला.*

*'का?' मी त्याला विचारलं.*

*'माझा राग, संताप व्यक्त करण्याचा माझ्यापुढे तो एकच मार्ग आहे. माझ्या शिव्यांना दाजीशास्त्रींकडे उत्तर नसते. मग ते माझ्यावर हात उगारतात.' असं म्हणत त्याने एक छोटी ब्लेड मला दाखवली.*

*'हे काय आता?' मी घाबरलोच.*

*उत्तर द्यायच्या ऐवजी त्याने त्या ब्लेडने आपल्या तळहातावर एक जखम केली. तिच्यातून भळाभळा रक्त वाहू लागलं. त्याने ब्लेड माझ्यासमोर धरली.*

*'काप..'*

*'अरे, काप काय?'*

*त्याने माझा तळहात हातात घेतला आणि तशीच जखम केली. माझ्याही तळहातात रक्त वाहू लागलं.*

*'मला सांग प्रेमा, आपल्या कातडीच्या रंगात फरक असेलही. पण आपलं रक्त... ते एकाच रंगाचं आहे.. लाल!' तो आपला हात नाचवत म्हणाला.*

*मी काहीच बोलू शकत नव्हतो. हा झंझावात होता.*

*'आता माझ्या मनात जरासुद्धा शंका नाही. माझा बाप.. दशग्रंथी ब्राह्मण असला, तरी एक नंबरचा घेलचोद्या आहे.' त्याने आपल्या अंगावर कपडे चढवले. मीसुद्धा त्याच्या पाठोपाठ माणसात आलो.*

*'प्रेमा, तू आयुष्यात काही पण हो... पण आजची संध्याकाळ तू विसरणार नाहीस. नाही विसरणार ना?' त्याने माझा हात हातात घेत विचारलं. आमचं रक्त एकमेकात मिसळून एकजीव होत होतं.*

*त्याच रात्री एस्. जी. ची आई हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने झोपेतच मरण पावली.*

*दुसऱ्या दिवशी एस्. जी. आणि मी.. प्रथमच सिगारेट प्यायलो.. चारमिनार!*

..............................................................

'तू सिगारेट प्यायलास तरी हरकत नाही. तो पेपर कप.. अ‍ॅश ट्रे म्हणून वापर.' ती मला म्हणत होती.

'नो.. नो.. मी सिगारेटशिवायही जगू शकतो.' मी भिंतीवर लावलेल्या एका लहान मुलाच्या निरागस फोटोकडे पाहत म्हणालो.

'काय पाहतो आहेस?' तिने माझ्या तंद्रीचा भंग केला.

'समोरचा फोटो..' मी म्हटले.

'मेमरी ऑफ समथिंग आय लॉस्ट.. त्याची आठवण मी स्वतःला सतत करून देत असते. ती टोचणी मला आणखी एका मुर्खपणापासून दूर ठेवेल.' तिने माझे सिगारेटचे पाकीट हातात घेतले.

'स्टॅच्युटरी वॉर्निंग..' ती हसत म्हणाली.

'त्याचा खरंच फारसा उपयोग नसतो. प्रत्येक अनुभव वेगळा असतो. आणि जगणं उत्स्फूर्त असतं.. मी एस्. जी. कडून हेच शिकलो आहे.' मी एक उशी लोडासारखी घेतली आणि रेलून बसलो. मला तिच्या घरात घरच्यासारखं वाटत होतं.

'मला तुझा एस्. जी. खूप आवडला. चक्रम असला, तरी सच्चा होता.' ती हसत म्हणाली.

'होता नाही, आहे.. अजूनही तस्साच आहे. यू.. नो.. त्याचा सगळा चक्रमपणा त्याच्या तिरकस विचारांमुळे.. प्रस्थापित मूल्यांना ठोकरल्यामुळे येतो.. साधं, सरळ जगणं.. त्याच्यासाठी नव्हतंच..' पुन्हा एक शांतता आम्हा दोघांना वेढून बसली.

.........................................................

*म्हणजे ती बातमी ऐकून मी हादरलोच होतो. शालांत परीक्षेचा रिझल्ट लागला होता. अपेक्षेप्रमाणे नव्वद टक्क्यांच्या आसपास मार्क मिळवून मी मेरिट लिस्टमध्ये आलो होतो. माझ्या दृष्टीने सर्वात आनंदाची बातमी म्हणजे.. एस्. जी. सुद्धा बऱ्यापैकी चांगले मार्ग मिळवून पास झाला होता. शाळेत मला रिझल्ट समजला. पण तो काही भेटला नाही. मी त्याची वाट पाहत गेटवरच*

घुटमळत होतो. तेवढ्यात तोतऱ्या पेंढारकर, टीपी, धावत आला.. माझा हात धरून.. मला ओढत बाजूला घेऊन गेला.. माझ्या रिझल्टमध्ये त्याला रसच नव्हता.

'आ.. आ.. आ.. आयला... त.. त.. तुला.. आ..ज..चं तु.. तु.. फान कळलं की नाही?' तो इतका एक्साइटेड होता की, नेहमीपेक्षा जास्तच तोतरा झाला होता.

'काय झालं रे?' मी त्याला शेजारी बसवत विचारलं.

'आ.. आ... आपला एस्.. जी...' त्याच्या तोंडून पुढचे शब्दच येईनात.

'बोल ना.. काय केलं एस्. जी. ने?' मी जरा टेन्स झालो. तशी गेल्या आठवड्याभरात आमची भेट नव्हती.

'ब.. ब.. बोकड' आणि टीपी खिदळायला लागला.

'बोकड? तू जरा मला नीट काय ते सांगशील का?' मीसुद्धा आता अधीर झालो होतो.

'का.. का.. का.. कापला' त्याला शेवटी शब्द सापडला.

'कापला? एस्. जी.... बोकड.. कापला.. तू काय बोलतो आहेस? त्याचे वडील दशग्रंथी ब्राह्मण आहेत.. तुला माहिती आहे ना?' माझ्या अंगाचा थरकाप उडाला. एव्हाना इतर मुलांचा गप आमच्याभोवती जमा झाला होता.

'मी सांगतो काय झालं ते.. ही बातमी मीच आणली आज,' पत्की पुढे आला. 'अरे आज सकाळी बाबा मटण आणायला म्हणून नेहमीप्रमाणे इस्माइलच्या दुकानात, म्हणजे खाटिकखान्यात गेले. आणि पाहतात तो काय, एस्. जी.. हातात सुरा घेऊन... बोकड कापत होता.. त्याने बाबांना पाहिलं. हसलासुद्धा.. गोखले.. खाटिक.. कसं वाटतंय ऐकायला? असं विचारलं त्याने.. बाबा काय उत्तर देणार! ते फक्त खाली पडायचे बाकी होते. आता मी इस्माइलकडे नोकरी करतोय.. असं तो म्हणाला.'

पुढे पत्की काय बोलला, मला ऐकू आलं नाही. माझ्या डोळ्यासमोर दाजीशास्त्री गोखल्यांच्या चेहरा गरागरा फिरत होता.. त्यांच्यापर्यंत ही बातमी पोहोचलीच असणार..

.................................................................

'हे बघ.. टोकदार सुऱ्याचं टोक... जबड्याच्या जरा पाठी.. आणि मानेच्या हाडांच्या खाली आत सारायचं. आणि मग तिथून सुरा सरळ खालपर्यंत ओढायचा..' गोखले मला शांतपणे प्रयोगशाळेत

*प्रॅक्टिकल करतात, त्याप्रमाणे दाखवत होता. मी आयुष्यात प्रथमच बोकड कापताना बघत होतो. गारठलोच मी..*

*'ह्यात काय होतं माहिती आहे.. बोकडाच्या सगळ्या नसा, रक्तवाहिन्या कापल्या जातात. इव्हन त्याचा आवाजही बंद होतो आणि त्याच्या शरीरातलं सगळं रक्त धो धो वाहून जातं. काही मिनिटांतच तो मरतो. ह्याला हलाल म्हणतात..' दाजीशास्त्र्यांनी उषासुक्तातल्या श्लोकांचा अर्थ समजावून सांगावा, त्याच सहजतेने त्यांचा मुलगा 'हलाल' म्हणजे काय, हे मला शांतपणे सांगत होता. आजूबाजूला पडलेली, उघड्या डोळ्यांची मुंडकी, हाडं, कातडी, रक्त आणि त्यावर घोंघावणाऱ्या माशा.. मला एकदम उलटी आल्यासारखंच वाटलं आणि माझा हात तोंडावर गेला.*

*'हे बघ, यात एवढं शॉक होण्यासारखं काहीही नाही..' मला हातातली सिगारेट देत तो म्हणाला. इस्माइलच्या दुकानाच्या पाठी, दोन लाकडी खोक्यांवर आम्ही बसलो होतो.*

*'अरे पण हा, खाटीक होण्याचा निर्णय..' मला शेवटी माझा आवाज सापडला.*

*'माझे वडील दशग्रंथी ब्राह्मण नसते, तर हा प्रश्न तू मला विचारला असतास?' त्याने सिगारेट माझ्याकडून घेतली आणि मोठा झुरका घेतला. मग कितीतरी वेळ तो धुराची वलंयं तोंडातून सोडत होता.*

*'घरात मोठा राडा झाला आहे. त्यांनी मला आत्महत्येची धमकी दिली. मी घरातला दोरखंड आणि स्टूल त्यांच्यासमोर आणून ठेवलं. म्हटलं, माझ्यासमोर द्या.. सोड रे, आयुष्य गेलं ह्यांचं दक्षिणेवर जगण्यात.. आत्महत्या करायलासुद्धा गांडीत दम लागतो. मला म्हणाले, या घरात तुला यापुढे थारा नाही. मी म्हटलं, आनंद आहे. अंगावरच्या कपड्यांनिशी बाहेर पडलो. मोकळं वाटलं. हे बघ प्रेमा, मी.. मी.. आहे.. आणि मी खाटकाचा व्यवसाय करायचं ठरवलं आहे. पण त्याआधी मला हे काम यायला नको का? म्हणून इस्माइलकडे नोकरी. रात्री इथंच झोपतो मी.. सगळं स्वच्छ धुवून काढायचं आणि आडवं व्हायचं.' तो आणखी एक मोठा झुरका घेण्यासाठी थांबला. तो बोलला होता त्यात मला वरवर काही वावगं वाटत नव्हतं. पण मी शॉकमध्ये होतो.*

*'तू काही काळजी करू नकोस.. मी काही चोऱ्या करत नाहीये, दरोडे घालत नाहीये. त्यातून तुला माहिती आहे, पुढे शिकणं मला शक्य नाही. पुस्तकी ज्ञान माझ्यासाठी नाही. आणि कारकून या जमातीबद्दल मला चीड आहे. माझ्या वडिलांच्या पिढीने या देशात नको एवढे कारकून जन्माला घातले. या व्यवसायात मी तुला नाव काढून दाखवेन. या शहरातल्या सगळ्या उंची हॉटेलांना माझ्या खाटिकखान्यातून माल जाईल. तू पाहत राहा..' त्याच्या डोळ्यांत विलक्षण आत्मविश्वास होता.*

*'अरे, पण त्यासाठी पैसे लागतील.. त्याचं काय?' मी त्याला जमिनीवर आणत विचारलं.*

*‘प्रेमा.. या शहरात तुमच्याकडे आत्मविश्वास असेल.. आणि धडकायची ताकद असेल, तर तुम्हाला काहीही अशक्य नाही.. तू पाहत राहा.. हेच दुकान मी सुरुवातीला घेईन.. इस्माइल देईल मला ते..’ त्याला आता कुणीही थांबवू शकत नव्हते. हातातली सिगारेट्स चिरडत तो उठला.*

*‘चल, मला जायला हवं.. धंदे का टायम है.. भाई’ म्हणून तो दुकानात निघून गेला. मला बरंच काही शिकवून.. आयुष्यातल्या कितीतरी इयत्ता मी वर सरकलो. होतो.*

...............................................................

‘यू नो आशू.. तसं, जन्मतः आपण कोणीही नसतो. पण माझा बाप, सखू, आणि एस. जी. अशी बोटांवर मोजण्यासारखी माणसं आपल्या आयुष्यात येतात. आणि मग प्रेमानंद हिर्लेकर पैदा होतो.. त्याला समजायचं असेल, तर या माणसांनासुद्धा समजून घ्यायला हवं.’ एस्. जी.च्या आठवणीतून बाहेर पडत मी आशूला म्हणालो.

ती माझ्याकडे पाहत होती.

‘वेल.. टूडे.. एस्. जी. इज दी मोस्ट फेमस बूचर इन धिस सिटी.. आण मी तुला आणखी एक गोष्ट सांगेन.. पण ती तू छापायची नाहीस..’ मी माझ्या व्यवसायातला एक अलिखित नियम मोडायला निघालो होतो.

ती काही बोलली नाही.. तिने फक्त माझ्या हाताला स्पर्श केला..

बाहेर पहिल्या लोकलचा भोंगा वाजला. मी दारू न पिता.. बऱ्याच दिवसांनी पहिली रात्र काढली होती.

‘वेल.. एस्. जी. या शहरातल्याच नाही, तर देशातल्या अंडरवर्ल्डची सगळी बित्तंबातमी ठेवतो. अंडरवर्ल्ड आणि टेररिस्ट यांचे संबंध मी तुला सांगायला नकोत. इस्माइलच्या दुकानात नोकरी केल्या दिवसापासून त्याने हे संबंध.. कॉण्टॅक्ट्स डेव्हलप केले. तो म्हणतो.. या शहरात एकच एकमेव ॲसेट आहे.. माहिती. यू मस्ट नो व्हॉट अदर्स डोण्ट नो... आणि मी मारलेल्या.. प्रत्येक गुंड, अतिरेक्याची माहिती

त्याने मला पुरवली आहे. ही वॉज.. अँड इज माय बिगेस्ट इन्फॉर्मर..' मी बोलायचा थांबलो.

आता त्या वेळी बोलण्यासारखं काही उरलं नव्हतं.


मी एकदम उठून उभा राहिलो.

'जायला हवं.. पहाट झाली.' मी बोलायचं म्हणून बोललो.

'तू झोपू शकतोस इथे..' ती माझ्याकडे पाहत म्हणाली.

मी क्षणभर थबकलो. पाय अडखळले. मग माझं लक्ष भिंतीवरच्या लहान मुलाच्या फोटोकडे गेलं.. स्टॅच्युटरी वॉर्निंग! संवैधानिक इशारा...

मी दाराबाहेर पडलो. दरवाजा माझ्या पाठीमागे ओढून घेतला.


313

--६--

# पांशी

चेंबर्स टॉवर्स – बरोबर ११.५०ला मी ललित सिबल यांच्या २४व्या मजल्यावरील पेंट हाऊसमध्ये जाण्यासाठी त्यांच्या प्रायव्हेट लिफ्टमध्ये प्रवेश केला. दरवाजा बंद केला. २४व्या मजल्याचे बटण दाबायच्या अगोदरच माझ्या पोटात खड्डा पडला. हे आजचेच नव्हते.. हा माझा नेहमीचाच अनुभव होता. २४ मजले एका भयानक पोकळीत वर चढत जायचं... त्यासाठी स्वतःला एका पिंजऱ्यात कोंडून घ्यायचं.. मध्येच काही झालं, तर बोंबच.. आत शिरताना जिता जागता माणूस, बाहेर पडताना मुडदा!! आणि हे सर्व कशासाठी? ट्रिब्युन या वृत्तपत्र समुहाचे संस्थापक, सर्वेसर्वा ललित सिबल.. उर्फ म्हातारा.. त्याला भेटण्यासाठी!

हा वृत्तपत्र समूह सिबलने पन्नास वर्षांपूर्वी स्थापला होता.. वाढवला होता.. त्या समुहाची स्वतःची अशी एक प्रतिमा बनवली होती आणि त्यासाठी अफाट कष्ट उपसले होते. इमर्जन्सीमध्ये जेव्हा सगळे नको त्या ठिकाणी शेपूट घालून बसले होते, तेव्हा म्हातारा एकाकी झुंज देत होता. संपूर्ण शासनयंत्रणेला अंगावर घेऊन फिरत होता. प्रेसची इलेक्ट्रिसिटी तोडली गेली तरी.. एन्फोर्समेंट डायरेक्टोरेटच्या धाडी पडल्या तरी.. वृत्तपत्र कागदाची टनावारी रिमे जप्त झाली तरी.. इन्कमटॅक्सच्या नोटिशींचा पाऊस पडला तरी... ललित सिबल झुकला नाही. हो लव्हड् बिइंग अ मार्टियर.. लव्हड् बिइंग हाऊंडेड..

हे सुद्धा खरंच की, ललित सिबल या गृहस्थाला आजपर्यंत कोणीही ओळखू शकलं नव्हतं. म्हाताऱ्याचे डोळे पूर्णपणे ओपेक्.. दगडी होते. त्याचा कुणावरही विश्वास नव्हता.

*'भगवान संतान क्यों देता है?' त्यांनी एकदा मला विचारलं होतं.*

*आता माझे सेक्शुअल प्रेफरन्सेस माहीत असूनही त्यांनी मला हा प्रश्न का विचारावा!*

*'पाशी, तुम क्या सोच रहे हो, मुझे पता है' त्यांचे डोळे मिष्किलपणे चमकले होते. मी डिफायंटली त्यांच्याकडे पाहत होतो. मी जो आहे, तो आहे. टेक इट ऑर लीव्ह इट!*

*'अरे भाई, औरोंके बारेमें तो सोच सकते हो,' त्यांचा हात अलगद माझ्या पाठीवर स्थिरावला होता.*

*'यू कॅन स्क्रू ऑल द मेन इन धिस सिटी... ओन्ली डोण्ट स्क्रू माय पेपर..' माझ्या हातात अपॉइंटमेंट लेटर देताना ते म्हणाले होते.*

*मी काहीच बोललो नाही.*

*'नहीं जानते?' त्यांच्या स्वरात छद्मीपणा डोकावला होता.*

*हे संभाषण असंच पुढे सरकावं लागतं, हेदेखील मला अनुभवानं उमजलं होतं. जगात आपल्याएवढं कुणालाही कळत नाही, कळूच शकत नाही, ईश्वरानेच तशी व्यवस्था केली आहे आणि कुणीही पामर त्या व्यवस्थेचे उल्लंघन करू शकत नाही, असा ललित सिबल यांचा ठाम समज होता. म्हाताऱ्याचा इगो दुखावून मला स्वतःचा वेळ बरबाद करायचा नव्हता. मी अलिकडेच आत्मसात केलेले ओशट हास्य चेहऱ्यावर आणलं आणि मान खाली झुकवली.*

*'बापके पिठमें सुरा भोकने के लिए!' जगातलं एक अंतिम, अनादी सत्य ऐकवल्याप्रमाणे म्हाताऱ्याचा चेहरा फुलून आला आणि त्याने आपले हात इलेक्ट्रिक व्हीलचेअरच्या हातांवर आपटले आणि तो खदाखदा हसला.*

गेली कित्येक वर्षं ललित सिबल यांनी आपलं आयुष्य याच व्हीलचेअरमध्ये बसून काढलं होतं. आता ती व्हीलचेअर त्यांच्या व्यक्तित्त्वाचा एक अविभाज्य भाग झाली होती. ती व्हीलचेअर खास त्यांच्यासाठी बनवली गेली होती. त्यांच्या गरजा, अडचणी, सोयी यांची दखल घेत तिची निर्मिती झाली होती. गेल्या कित्येक वर्षांत तिच्यात बदलही करण्यात आले होते. या व्हीलचेअरच्या देखभालीसाठी एक स्वतंत्र इंजिनीअरही नेमलेला होता. त्याची जबाबदारी एकच, दिवसा किंवा रात्री, कुठल्याही क्षणी ही व्हीलचेअर कार्यक्षम ठेवणं. या व्हीलचेअरमध्ये बिघाड म्हणजे, ललित सिबलमध्ये बिघाड! आणि म्हातारा बिथरला तर... ट्रिब्युन वृत्तपत्र समुहात असा

एकही जण नव्हता की, जो अशा शक्यतेचा विचारही करायला धजावला असता. २४व्या मजल्यावरच्या पेंट हाऊसचा पूर्ण नकाशा या व्हीलचेअरसाठी बदलण्यात आला होता. ४००० स्क्वेअर फुटांमध्ये म्हातारा स्वैरपणे फिरू शकायचा.. या व्हीलचेअरच्या जोरावर. म्हाताऱ्याने एकच नियम काटेकोरपणे पाळला होता. कुठल्याही कारणासाठी तो चेंबर्स टॉवर्सचं पेंट हाऊस सोडून खाली उतरायचा नाही. स्वतःच्या अपंगत्त्वाचे जाहीर प्रदर्शन त्यांना अपमानास्पद वाटायचं. आता ऐशी वर्षांचे झाले तरी!

अर्थात वयाचा आणि ललित सिबल यांचा तसा अर्थाअर्थी काहीही संबंध नव्हता. म्हाताऱ्याच्या सगळ्या वासना आजही तगड्या होत्या.

माझी आणि म्हाताऱ्याची रिलेशनशिप लव्ह-हेट सारखी होती. त्याला मी आवडायचो, माझ्या स्वतंत्र शैलीसाठी, विचारांसाठी आणि तरीसुद्धा तो माझा तिरस्कार करायचा. कारण त्याच्या म्हणण्याप्रमाणे वागण्याची बांधिलकी स्वीकारायला मी तयार नव्हतो. त्यांनी ट्रिब्युन जन्माला घातला, त्याला खतपाणी घालून वाढवला, मोठा केला.. मला सगळं मान्य होतं. आणि तरीही त्या वृत्तपत्रावर माझा ठसा उमटवणं ही माझी वैयक्तिक गरज होतीच. माझं अस्तित्त्व मान्य करावं, ही माझी ठाम मागणी होती. आय काण्ट बी अ घोस्ट एडिटर!!

संशय हा जगण्याचा मूलभूत पाया, हे मला कधीही मान्य होणं शक्य नव्हतं. माझा मानवी नातेसंबंधांवर, भावनिक गुंतवणुकीवर पूर्ण विश्वास होता. माझ्यासाठी विश्वास, ट्रस्ट, हाच जीवनाचा मूलभूत पाया होता.

*'पाशी, तूम सिर्फ जर्नलिस्ट हो.. और मैं, जर्नलिस्ट भी हूँ और बिझनेसमॅन भी.. समय समय पे मैं आसानीसे मेरा रोल चेंज करता हूँ...' म्हातारा एकदा मला म्हणाला होता.*

*'विश्वास.. वाईट.. आणि अतिविश्वास.. विनाशाची सुरुवात..' शुद्ध मराठीत एकदा त्याने मला ऐकवलं होतं. म्हातारा ट्रिब्युनची मराठी आवृत्ती दररोज सकाळी संपूर्ण वाचून काढायचा.*

आमच्या पहिल्या भेटीतच मला जाणवलं होतं की, माझ्या वृत्तपत्र व्यवसायातील ही सर्वात कठीण नोकरी असणार आहे. ज्या दिवशी नेमणूकपत्र घेऊन मी माझ्या फ्लॅटवर आलो, त्याच रात्री मी माझा राजीनामा लिहून तयार ठेवला होता. तो राजीनामा शर्टाच्या खिशात ठेवूनच मी दररोज ऑफिसला जायचो. ललित सिबलला विरोध करण्याचं नैतिक बळ मला ते राजीनामा पत्र नेहमी देत राहायचं. मी संघर्षाच्या तयारीतच असायचो. आमचे सहकारी आम्हा दोघांच्या भेटीचं वर्णन, 'दोन बैलांची झुंज', असंच करायचे. फक्त आमच्या झुंजीत कोणीही जिंकायचं नाही. आम्ही दोघेही रक्तबंबाळ व्हायचो आणि युद्धबंदी जाहीर करायचो. तात्पुरती!!

*'सिबल, तुम्ही मला नोकरीतून काढलेत, तरीही तो तुमचा पराभव आहे, आणि नाही काढलेत, तरीही तो तुमचा पराभवच.. यू आर अ लूझर.. ऑल दी वे..' एका भांडणाच्या शेवटी मी त्यांना हसत हसत छेडलं होतं.*

*म्हाताऱ्याच्या कपाळावरची शीर टराटरा फुगली होती. त्यांच्या संतापाचं ते एक व्यवच्छेदक लक्षण होतं.*

मी ठीक बारा वाजता पेंट हाऊसच्या रिसेप्शन एरियात पोहोचलो. वसुंधरा नखांना पॉलिश लावत बसली होती. तिला त्या वेळी तरी आणखी काही काम नसावं! तिच्या आणि ललित सिबलबद्दलच्या अनेक आख्यायिका ऑफिसमध्ये चर्चेत होत्या.

तिने मला थांबायची खूण केली.

'सर इज बिझी..' ती माझ्याकडे न पाहताच म्हणाली.

मी तिच्या टेबलाच्या समोर गेलो आणि तिला माझं रिस्टवॉच दाखवलं.

'माझी बाराची अपॉइंटमेंट आहे.. त्यांनीच मला बोलावलं आहे.'

'सो?' तिचा उद्दाम प्रश्न.

'सो.. मी थांबणार नाही.' माझं मधलं बोट तिला दाखवत मी सरळ पुढे निघालो.

'मिस्टर पसरिचा, यू काण्ट डू धिस.. यू नो दॅट..' तिनं मला अडवायचा प्रयत्न केला.

'आणि मी हेच करेन.. हे तुलाही माहिती आहे.. आणि ललित सिबलनासुद्धा माहिती आहे.' मी पुढे जात राहिलो.

'आय वुईल हॅव टू रिपोर्ट यू,' ती मुर्खासारखं बोलली.

मी थबकलो. तिच्या दिशेने वळलो. मला हसूच आलं.

'ट्राय इट... किड्.. मला ऑफिसमधला पांडू प्युनसुद्धा तुझ्याबद्दल रिपोर्ट करेल बघ' मी तिला म्हणालो. धूर यायला आधी ठिणगी पडावीच लागते ना! ऑफिसमधले प्युन हे असं अस्त्र आहे ज्यांचा भले भले सुद्धा सामना करू शकत नाहीत. ती बर्फासारखी थंडगार झाली. तिच्या खुर्चीत पुतळ्यासारखी स्तब्ध झाली.

'डोण्ट वस्ट यूवर टाइम ओव्हर पुअर गाय लाइक मी... नखं रंगवण्यासारखी खूप महत्त्वाची कामं आहेत तुला.. कीप यूवरसेल्फ बिझी,' मी तिला म्हणालो आणि हसतच पुढे निघालो.

पुढचा रस्ता मला चांगलाच परिचयाचा होता. सुरुवातीच्या दोन खोल्या नजरेआड करून मी छोट्याश्या अंधाऱ्या कॉरिडॉरमध्ये शिरलो. पाचव्या पावलावर मी थबकलो. खोलीवर लावलेला लाल रंगाचा दिवा सांगत होता की, ललित सिबल व्यग्र आहेत. आय जस्ट कुड नॉट केअर.. मी दिलेली वेळ आणि शब्द माझ्या प्राणांपेक्षाही मोलाचे समजतो. वेळ पाळणं, हे व्यसनच होतं मला. बापाकडून मिळालेली ती सवय होती. आत्महत्या करताना त्याने लिहून ठेवलेली शेवटची चिठ्ठी आजही मला आठवते. 'दुपारी ठीक बारा वाजता मी माझं जीवन संपुष्टात आणणार आहे. जगून फारसा फायदा नाही. तोटाच जास्त आहे, असं लक्षात आल्याने मी हा सूज्ञ निर्णय घेतला आहे. १२.१५पर्यंत पाशी घरी, जेवायला येतो. साधारणतः दोन वाजेपर्यंत माझा मृतदेह पोस्टमॉर्टेमसाठी नेण्यात येईल. गेले दोन दिवस मी कडकडीत उपवास केला आहे.. त्यामुळे माझं शव स्वच्छ असेल. पाच वाजेपर्यंत किंवा त्याच्या आधीच पोस्टमॉर्टेम पूर्ण व्हावं. साडेसहा वाजता माझ्या शवाला अग्नि देण्यात यावा. पाशीने एकट्याने स्मशानात यावं. ब्लॅक लेबल ही माझी आवडती दारू.. पाशीला माहिती आहे, काय करायचं ते...'

सगळं वेळेनुसार नियोजन माझ्या वडिलांनी केलं होतं. बरोबर बाराच्या ठोकाल्या रिव्हॉल्व्हरची गोळी कवटी आरपार भेदून टेबलावरच्या घड्याळाला धडकली. दोघेही एकाच वेळी धारातिर्थी. त्या बंद पडलेल्या घड्याळात बरोबर बारा वाजले होते. आजहो त्यात बाराच वाजलेले असतात. त्यांची आठवण म्हणून मी अजूनही ते जपून ठेवलं आहे.

दरवाजावर नॉक् न करताच दरवाजा लोटून मी खोलीत प्रवेश केला.

आतमध्ये एक भयाण शांतता पसरलेली होती.

ललित सिबल त्यांच्या टेबलापाशी आणि त्यांचा गुड फॉर नथिंग मुलगा.. संपत त्यांच्या पाठीशी. दोघेही माझीच वाट पाहत होते. वसुंधराने कळवलं असणार.

'आम्ही मिटींगमध्ये आहोत!' संपत चाचपडला.

'मला बाराची वेळ दिलेली होती. वेळ बदलल्याचं मला कुणीही कळवलेलं नव्हतं. मी दिलेल्या वेळेनुसार पोहोचलो. त्यानंतर मला बाहेर थांबवणं ब्रह्मदेवाच्या बापालाही शक्य नाही.' मी आमंत्रणाची वाट न पाहताच टेबलासमोरच्या खुर्चीवर टेकलो.

काही वेळ एक स्फोटक शांतता त्या खोलीत पसरली आणि अचानक म्हातारा हसू लागला. एखाद्या लहान मुलासारखा. हसता हसता त्याला ठसका लागला. खुर्चीला जोडलेली प्लॅस्टिकची नळी तोंडात घालून तो पाणी पिऊ लागला. ठसका काय कधी सांगून लागतो? शिवाय ललित सिबल दिवसाला चार लिटर पाणी प्यायचे. तर मिनरल वॉटरची एक बाटली त्या खुर्चीला जोडलेली असायची.

'तू बदलणार नाहीस. इन्फण्ट्री सोल्जरसारखा आहेस तू.. हातघाईची लढाई तुझी आवडती. संधीची वाटच पाहत असतोस तू. मीसुद्धा तसाच आहे म्हणा.. म्हणूनच आपलं पटतसुद्धा नाही. एका म्यानात दोन तलवारी, म्हणजे अडचणच! लेट अस हॅव लंच. यू सिम टू बी फॅमिश्ड्.' सिबलनी बेल दाबताच वेशभूषेतील कर्मचारी जेवणाचे टेबल सेट करू लागले. ललित सिबल खूप कमी, पण चवीने जेवणारा गृहस्थ होता. पूर्ण शाकाहारी.

त्याचा मुलगा काही क्षण रेंगाळला. त्याला जेवणाचं आमंत्रण नव्हतं हे स्पष्टच होतं. त्याची चुळबूळ लक्षात येताच सिबलने त्याची सुटका केली.

'आणखी काही डिस्कस करायचं आहे?'

'पापा, रविवारचं आर्टिकल..' संपतची नजर माझ्याकडे गेली.

'प्रेमानंद हिर्लेकर?' मी त्याला विचारलं.

'आणखी कोण? तुला काय वाटतं, आमच्या समोर कमी का प्रॉब्लेम्स आहेत? हे विकतचं श्राद्धं तुला कुणी घ्यायला सांगितलं होतं? व्हाय धिस वॉज नॉट डिस्कस्ड बिफोर हँड?' संपतचा स्वर अत्यंत मग्रुर होता. माझे नाडीचे ठोके वाढू लागले.

'संपादक म्हणून हा माझा अधिकार आहे. काय छापायचं आणि काही नाही, हे तूच काय, ललित सिबलसुद्धा सांगू शकत नाही. आणि कुणालाही उत्तर द्यायला मी बांधिल नाही.' मी ताड्कन उत्तर दिलं.

'यू बास्टर्ड..' संपतचा तोल गेला.

'होल्ड इट.. वन मोअर वर्ड.. तुझ्या बापासमोर मी तुझं तोंड फोडीन..' मी उभा राहिलो.

'बास..' ललित सिबलचा आवाज खोली घुमला. काही क्षण खोलीत शांतता पसरली.
'माझी जेवणाची वेळ झालेली आहे आणि जेवताना मला भांडणं आवडत नाहीत.. तू निघ.. आपण संध्याकाळी पुन्हा भेटू..' म्हाताऱ्याने संपतला निघायची खूण केली.

संपत टेबलावरची कागदपत्रे आवरू लागला.

'तुझं वजन वाढत आहे.' सिबल त्याला म्हणाला.

संपतने त्याला काहीच उत्तर दिलं नाही.

'आफ्टर फॉर्टिज वन शूड टेक केअर.. तू तर पन्नाशी ओलांडली आहेस.. पोट बघ तुझं.. पँटवरून ओघळून जातं आहे. व्यायाम करायलाच हवा तुला..' म्हातारा माझ्यासमोर पोराला चिमटे काढत होता. हे तो खाजगीतही करू शकला असता. पण संपतने त्यांच्यासमोर आवाज चढवून मोठा गुन्हा केला होता. त्याची शिक्षा ही अशी दिली जात होती.

संपत त्यांना काहीही उत्तर न देता खोलीबाहेर पडला. जाताना तो माझ्याकडे खाऊ की गिळू अशा नजरेनं पाहत होता.

आमच्यातल्या वादाची ठिणगी पडली होती. भडका कधी उडतो, हेच पाहणं आता माझ्या हातात होतं.

'कम, जॉइन मी..' म्हाताऱ्याने आपली चेअर डायनिंग टेबलकडे वळवली. आणि मीसुद्धा त्यांच्या उजव्या हाताला बसलो.

जेवण अगदी साधंच पण चविष्ट होतं. टोमॅटोचं सार, कोबीची भाजी, गुजराथी पद्धतीची डाळ, काकडी-टोमॅटोची कोशिंबीर, फुलके आणि शेवटी लस्सी.. गोड पदार्थ त्यांच्या जेवणात कधीच नसायचे.

जेवताना आम्ही कुठलीही गंभीर चर्चा केली नाही.

त्यांना हिमालयाचं वेड होतं. तिथे जाणं आता त्यांना शक्य नव्हतं. पण मग ते अगदी अलिकडचे फोटो जमा करायचे. बराच वेळ ते त्या फोटोंसंबंधीच बोलत राहिले.

'आय लव्ह हिमालयीन रेन्जेस.. तोसुद्धा आता माझ्यासारखा.. विकलांग व्हायला लागला आहे.. ब्लडी फकर्स.. पन्नास डॅम्स बांधताहेत.. गंगोत्रीपासून खालपर्यंत. पाणी वाहिलंच नाही, तर केवढा इकॉलॉजिकल इम्बॅलन्स होणार आहे.. कुणाला कळत नाही, असं नाही. बट् हू केअर्स? कारखाने हवेत, प्रगती हवी, वीज हवी.. आपण ह्यावर एक सिरीज करायला हवी. 'सेव्ह हिमालयाज' नावाची. भिष्मासारखा शरपंजरी पडलाय तो.. शेवटचा बर्फ वितळला की...' मग ते बराच वेळ गप्प झाले. ते जरा गंभीर विषयाकडे झुकताहेत, अशी मला शंका आली.

'यू नो पाशी.. मी अलिकडे मृत्यूचा खूप विचार करतो.' त्यांनी हात टिश्यूपेपरला पुसत माझ्याकडे पाहिलं.

'माझी मुलंसुद्धा माझ्या मृत्यूवर विचार करतात. पण ते मृत्यूपत्राबाबत.. आय होप, दे वुईल नॉट बी डिसपॉइण्टेड व्हेन दे रिड इट्,' ते खुदकन हसले आणि पुन्हा गंभीर झाले.

'मी करतोय तो विचार वेगळा.. आणि का करू नये? मी आता तशा वयातच जाऊन पोहोचलो आहे.. म्हणजे ट्रान्झिशन फ्रॉम लाइफ टू डेथ् इज इमिनण्ट... म्हणजे मी निराशावादी नाही.. किंवा मृत्युबद्दल फार रोमँटिकही नाही.. पण हा शेवटचा प्रवास..

जीवनापासून मृत्युपर्यंतचा.. विलक्षण वाटतोय मला. बघ ना, एका क्षणी तुमचा श्वास सुरू असतो.. ऑल युवर लियाबिलिटीज् आर् इनटॅक्ट्.. कमिटमेण्ट्स आर् ऑन.. यू जस्ट कॅनॉट डिसओन एनिथिंग... आणि दुसऱ्याच क्षणी तुम्ही नसता.. यू आर् डेड्.. यू आर् नो मोअर्... त्यामुळे लियाबिलिटी, ओनरशिप, कमिटमेण्ट.. कशालाही अर्थच उरत नाही.. इट्स फॅसिनेटिंग.. होत्याचे नव्हते.. एक फायनल, मोठा पूर्णविराम!' बोलता बोलता ते गप्प झाले. का कुणास ठावूक, त्या क्षणी ललित सिबल मला खूप दुःखी वाटले. त्यांच्या चेहऱ्यावरचे स्नायू खूप ताणले गेले होते. मला असंही वाटलं की, कुठल्याही क्षणी त्यांना रडू कोसळेल.

'आपण अत्यंत सामान्य कुवतीच्या माणसांनी घेरलो गेलो आहोत, ह्याची जाणीव खूप भीषण असते पाशी.. मी माझ्या मुलांबाबत बोलत आहे.. यू नो.. त्यांना पैसा मोजता येतो. निर्माण नाही करता येत.. ट्रेडर्स मेण्टालिटी आहे त्यांची.. निर्मितीक्षमता नाही.. ह्यांची निर्मिती स्वतःची आणि बायकांची पोटं वाढवण्यातच वाया.. किळस येते या सगळ्यांची.. यू आर् डिफरंट.. तू वाहावत जातोस. पण तू क्रिएटर आहेस.. फार बेटर दॅन माय चिल्ड्रेन.. दोष आहेत तुझ्यात.. चुका करतोस तू.. आणि तरीही..' माझ्यावरच्या या छुप्या हल्ल्याच्या वेळीस मात्र म्हाताऱ्याचे डोळे मिष्कील झाले होते.

मी काहीच बोललो नाही. मोठा हल्ला अजून व्हायचा होता. तो.. कॉफी पिताना होईल, याची मला खात्री होती. म्हातारा जेवल्यावर पान खायचा.

'तू काहीच बोलत नाहीयेस..' त्यांना बहुतेक माझ्या गप्प राहण्याची जाणीव झाली असावी.

'मी जेवणाचा आनंद घेत आहे..' मी वेळ मारून नेली.

'तुला खोटं बोलता येत नाही..' त्यांनी निर्लज्जपणे एक मोठा ढेकर दिला.

'आणि तुम्हाला माझं खोटं बोलणं चांगलंच ओळखता येतं.' मी बाऊलमध्ये हात बुडवले.

'मग खोटं का बोलायचं?'

'तुम्हाला जेवताना भांडण आवडत नाही म्हणून...' मी म्हाताऱ्यावर माझे डोळे रोखले.

'जर का विषय वैयक्तिक पातळीवर गेला, तरच भांडण होतं.. नाहीतर वादविवाद होतात.. मला वादविवादांचं वावडं नाहीये..' त्यांनी आपली खुर्ची त्यांच्या टेबलाच्या दिशेनं न्यायला सुरुवात केली.

'बौद्धिक चर्चेचा विषय, वैयक्तिक स्वातंत्र्य असेल, तर विषय वैयक्तिक पातळीवर जाणारच ना?' मी हात पुसले आणि त्यांच्यासमोर जाऊन बसलो.

'तू सिगारेट ओढू शकतोस.' त्यांनी आपलं आवडतं मघई पान तोंडात ठेवलं.

'मी सिगारेट सोडली,' मी त्यांना म्हणालो.

'डोण्ट टेल मी..' त्यांना आश्चर्यच वाटलं.

'आय ॲम टेलिंग यू..'

'किती तासांपूर्वी?' त्यांनी छद्मी स्वरात विचारलं.

'तास नाही, दिवस.. पाच दिवस झाले. आणि हे मी पाळणार आहे.' मी म्हणालो.

'अफ्रेड टू डाय?' त्यांनी विचारलं.

'नो.. यू नो दॅट.. पण कुणासाठी म्हणून काहीतरी सोडायची माझ्या आयुष्यातली ही पहिलीच वेळ आहे. स्वतःशी प्रतारणा करायला मला आवडणार नाही,' मी कॉफीचा कप ओठांना लावला.

'प्रेमानंद हिर्लेकर..' सिबलनी नाव उच्चारायच्या अगोदर पानाची पिंक गिळली. दिवसातून एकच पान खायचं पण त्यातलं काहीही बाहेर टाकायला त्यांना आवडायचं नाही.

मी सरसावून बसलो. हल्ल्याची सुरुवात होत होती.

'तू ते आर्टिकल छापायच्या अगोदर माझ्याशी बोलायला हवं होतंस.' माझ्याकडे पाहत ते बोलले.

'त्या आर्टिकलमध्ये तुम्हाला काय गैर वाटलं?' मी त्यांच्या नजरेला नजर देत विचारलं.

'काहीच नाही..' क्षणाचाही विलंब न करता त्यांनी उत्तर दिलं.

'मग?'

'काहीच गैर नसणे, हे आर्टिकल छापायचं कारण असू शकत नाही मिस्टर पसरिचा..' त्यांचा स्वर..मिस्टर संबोधन आणि माझ्या आडनावाचा पूर्ण वापर औपचारिकपणा अधोरेखित करत होता.

'माझ्या दृष्टीने आर्टिकल छापायचे काही निकष असतात. एक तर त्यात फॅक्चुअल एरर.. चूक.. असू नये. दोन.. लोकांना त्या विषयात रस असायला हवा किंवा विषयामध्ये लोकांचे कुतूहल जागृत करण्याचं सामर्थ्य हवं.. आणि तीन.. वाचकांच्या विचारशक्तीला त्यातून खाद्य मिळावं.. माझे वाचक विचार करतात तेव्हा त्यांच्याबरोबरच माझं वृत्तपत्रही जिवंत राहतं. जगत राहतं..'

त्यावर पुन्हा काही वेळ शांततेत गेली. त्यांची नजर त्यांच्या पुस्तकांच्या कपाटाकडे गेली. आपली व्हिलचेअर त्यांनी एका कपाटाजवळ नेली आणि त्याचा दरवाजा उघडला. न शोधता आपसूक त्यांच्या लांबसडक बोटांनी त्यांना हवे असलेले पुस्तक निवडले. एखाद्या लहान मुलाला आंजारावे, गोंजारावे तसे त्यांनी ते पुस्तक कुरवाळले.

'इस्लाम.. दी रिलिजन अॅण्ड दी पिपल.. बाय बनीर्ड लेविस अॅण्ड बंटसी एलिस..चर्चिल' पुस्तक न्याहाळत ते पुन्हा आपल्या टेबलापाशी आले. मी त्यांच्या बोलण्याची वाट पाहू लागलो.

'तुला माहिती आहे पाशी.. फंडामेण्टालिझम ही इस्लामिक संज्ञा नाहीए! ती पाश्चात्त्य संज्ञा आहे. अगदी खोलात जाऊन पाहिलं, तर हा अमेरिकन.. प्रोटेस्टंट शब्द आहे. १९१०मध्ये पहिल्यांदा त्याचा वापर झाला. प्रस्थापित विचारसरणीच्या विरोधात अमेरिकन प्रोटेस्टंट चर्चेसनी फंडामेण्टल्स नावाची पत्रकं प्रसिद्ध केली होती.' ते पुन्हा गप्प बसले.

'तुम्हाला काय म्हणायचं आहे?' मी जरा गोंधळलो होतो.

'हे पुस्तक तू वाच.. इट्स मस्ट फॉर यू.. नाऊ..' त्यांनी पुस्तक माझ्या हातात दिलं.

'मला एवढंच म्हणायचं आहे पाशी... बहुसंख्य मुस्लिम फंडामेण्टालिस्ट नसतात. आणि बहुसंख्य फंडामेण्टालिस्ट टेररिस्ट सुद्धा नसतात.' त्यांनी आपलं डोकं खुर्चीच्या हेडरेस्टवर टेकवलं आणि माझ्याकडे पाठ करून ते खिडकीपाशी गेले आणि खाली पसरलेला मरिन ड्राईव्ह पाहू लागल. काही वेळाने ते पुन्हा माझ्याकडे वळले.

'यू नो.. तुझा प्रेमानंद हिर्लेकर.. इज् अनटचेबल! मी त्याच्या जातीचा उल्लेख करत नाहीए.. त्याच्या सध्याच्या दर्जाचा, परिस्थितीचा उल्लेख करतोय. सर्वांच्या दृष्टीने तो अस्पृश्य आहे. नो बडी वॉण्ट टू टच् हिम्.. इव्हन वुईथ अ टेन फुट पोल..' ते आता जरा पुढे झुकले होते आणि त्यांचे डोळे भेदक झाले होते. 'अँड ही लाइक्स बिइंग अनटचेबल.. आय सस्पेक्ट हिम फॉर दॅट्..'

'आय ॲम शॉक्ड्.. माझा माझ्या कानांवर विश्वास बसत नाहीए.. तुम्ही.. ललित सिबल म्हणताय हे?' मी खरोखरंच थक्क झालो होतो.

'हो.. का?' त्यांनी अत्यंत निरागसपणे विचारलं.

'अहो, आणिबाणीत तुम्हीसुद्धा अस्पृश्य होतात आणि तुम्हाला त्याचा सार्थ अभिमान होता.. मलाही तुमचा अभिमान होता.. तुम्ही माझ्या पिढीचे रोलमॉडेल होतात..' मी आता माझ्या खुर्चीतून उठलो होतो. मला हे सर्वस्वी अनपेक्षित होतं. ट्रिब्युनमधल्या नोकरीचे माझे शेवटचे तास उरले आहेत, याची मला तीव्रतेने जाणीव झाली.

अचानक म्हाताऱ्याचा 'न भूतो न भविष्यति' असा स्फोट झाला.

'तू माझी आणि प्रेमानंद हिर्लेकरची तुलना करतोस? व्हॉट द फक यू नो? हाऊ डेअर यू? यू.. सन ऑफ ए बिच.. तू.. तू..' त्यांना वाक्य पूर्णच करता येत नव्हतं. शब्दच सापडत नव्हते. त्यांच्या ओठांभोवती फेस जमा झाला. व्हिलचेअरच्या हातावर त्यांचा हात थडाथडा आपटत होता. त्यांचे किंचाळणे ऐकून त्यांची पर्सनल अटेण्डण्ट.. जी नर्सही होती.. धावतच बाहेर आली आणि तिने ताबडतोब त्यांचे ब्लडप्रेशर मोजायला सुरुवात केली.. मग एक छोटीशी गोळी त्यांच्या जिभेखाली सारली. हे सर्व करताना ती माझ्याकडे अत्यंत संतापाने पाहत होती.

'धिस मिटींग कॅन नॉट कण्टिन्यू.. सर तुमचं बीपी शूट झालं आहे.. १२०-२५०' ती त्यांना म्हणाली. मी माझ्या शर्टाच्या खिशातला कागद काढला आणि त्यांच्या टेबलावर ठेवला.

'माझा राजीनामा.. नो बडी शाऊट्स ॲट मी.. नॉट इव्हन यू..' मी जायला वळलो.

'वेट्' त्यांचा आवाज जरा शांत झाला होता. ते त्यांच्या पर्सनल अटेण्डण्टकडे वळले.

'तू जा.. मी बरा आहे.. हे असं आमच्यात चालतंच.. गो.. गो.. गो..' ती जाईपर्यंत ते थांबले.

‘बैस.. मी जरा जास्तच भावनावश झालो. अभिमान बरा असतो.. दुराभिमान माणसाला दुर्गतीकडे घेऊन जातो. जेपी मला म्हणायचे, इंदिरेचं तेच झालं.. ॲक्चुअली शी वॉज अ गुड किड्.. एकटी.. एकाकी.. एकलकोंडी होती.. पण कणखर व्यक्तिमत्त्व होतं.. दुराभिमान वॉज हर ग्रेव्हयार्ड...’ हे नवं पुराण काय सुरू झालं, असा विचार करत मी पुन्हा खुर्चीत बसलो.

‘संपत घाबरलाय.. कारण कालपासून सीएम, होम मिनिस्टर.. कमिशनर.. सगळ्यांनी हैराण केलंय त्याला,’ ते स्वतःशीच बोलल्यासारखं बोलले.

‘मी काल सीएमशी बोललो.. विषय वेगळा होता.. पण माझ्याशी ते काहीच बोलले नाहीत.’ मी हल्ला परतवला.

‘वुई हॅड लेट नाइट कॉफी.. चव्हाण आला होता. असला सज्जन मुख्यमंत्री काय कामाचा?’ त्यांनी राजीनाम्याचे पत्र हातात घेतले.

‘तू माझ्यासारखाच आहेस.. म्हणूनच मला आवडतोस.. आणि त्याचसाठी तुझा तिरस्कारही वाटतो. कुणाच्याही गांडी दम नाही, असे राजीनामापत्र टेकवण्याचं,’ त्यांनी पत्र उघडलं होतं. पण ते वाचावं, असं काही त्यांना वाटत नव्हतं.

‘तुला एक इस्लामिक विनोद सांगतो.. एक मुस्लिम खुनाच्या आरोपाखाली दोषी शाबित होतो.. काझी त्याला फाशीची शिक्षा सुनावतो आणि त्या कैद्याला विचारतो, फाशी द्यायच्या अगोदर तुझी शेवटची इच्छा काय आहे? तो कैदी काझीला म्हणतो, आज खूप गरम होतंय, खूप तहान लागत आहे.. मला मरायच्या अगोदर पाणी प्यायची इच्छा आहे. काझी नोकराला पाणी आणायला फर्मावतो आणि कैद्याला पाणी पाजलं जातं. त्याचं पाणी पिऊन झाल्यावर काझी सैनिकांना म्हणतो, फाशीच्या शिक्षेची अमलबजावणी करा. त्यावर तो कैदी आश्चर्यचकीत होतो आणि काझीला विचारतो, अहो, आत्ता तर तुम्ही मला पाणी पाजलंत. म्हणजे तुम्ही माझा पाहुणा म्हणून स्वीकार केलात. आता पाहुण्याला जीवे मारणं कुठल्या कायद्यात बसतं? काझीला हा युक्तिवाद बिनतोड पटतो आणि तो सैनिकांना कैद्याची सुटका करण्याचे आदेश देतो.’ ललित सिबल हसू लागले.

‘आपल्यापैकी कैदी कोण आणि काझी कोण, हे सांगा,’ मी त्यांच्या हसण्यात सामील होत विचारलं.

'आपण दोघंही आलटून पालटून कैदी आणि काझी होतो.' असं म्हणून ते अगदी लहान मुलासारखे खिदळू लागले आणि हसता हसता त्यांनी माझं राजीनामापत्र फाडूनही टाकलं.

'ठिक आहे, कर तू ती स्टोरी.. मी वादळ सांभाळेन.. अजूनही या खांद्यांमध्ये भरपूर ताकद आहे.. मजा आला तुझ्याशी भांडून..' त्यांनी मिटींग आटोपती घेतली.

'थँक्स फॉर युवर सपोर्ट..' मी पण त्यांना मोठेपणा देऊन टाकला.

'जणू काही माझ्या सपोर्टची तुला खूप पर्वा आहे.. पण अधून मधून माझा तसा गैरसमज करून दिलास तरी, मला आवडेल,' ते म्हणाले.

मी खोलीबाहेर पडलो. एक मोठी लढाई आपण जिंकलो आहोत, याची मला जाणीव होती. मी दहा पावलं गलो असेन नसेन, तोच त्यांची मोठ्या स्वरातली हाक मला ऐकू आली. आता पुन्हा काय, असा विचार करत मी खोलीत परतलो.

'मला या मुलीची लिखाणाची शैली आवडली.. काय नाव बरं.. आशू.. आशू काळसेकर.. शी हॅज दट् फायर.. मला भेटवशील तिला?' त्यांनी विचारलं.

'नाही' मी ताड्कन उत्तर दिलं.

'बास्टर्ड.. स्केअर्ड ऑफ ॲन ओल्ड मॅन?' त्यांनी हसत विचारलं..

'मला मुलींचा काहीही उपयोग नाही.. तुम्हाला माहिती आहे,' मी त्यांच्या नजरेला नजर भिडवली.

'आणि तरीही?' त्यांचं कुतूहल जागृत झालं.

'आणि तरीही तिच्यावर माझं प्रेम आहे.. एक मित्र म्हणून.. तुम्ही तिच्या जवळपासही फिरकणार नाही, मला वचन हवंय..' मी त्यांना म्हणालो.

'ओके, ॲज यू विश..' त्यांनी टेबलाचा खण उघडून त्यातून एक कागद काढला.

'वाच' त्यांनी कागद माझ्याकडे सरकवला.

'अब्दुल.. मसुद.. पेशावरी' मी नाव वाचलं. खाली पत्ताही होता.

'येस.. अब्दुल त्याचं नाव.. मसुद.. त्याच्या आजाचं.. तिसरं नाव.. मुस्लिम अलिकडे वापरत नाहीत.. हा वापरतो. त्याचे जन्मगाव पेशावर... तिला दे.. याचा मुलगा.. सहा महिने बेपत्ता आहे. भडक माथ्याचा.. हिज बार्क वॉज वर्स्ट दॅन हिज बाइट्स..

हिटॉरिक... बडबड.. अटक झाली होती त्याला.. संशयित अतिरेकी म्हणून.. मग तो कैदेतून पळाला, असं पोलीस म्हणतात. देन देअर आर टू थिअरिज्.. काहींच्या मते तो बॉर्डर क्रॉस करून गेला.. पण बापाला असं वाटतंय, आपल्या मुलाला ठार मारलंय' ते पुढे झुकले आणि माझ्या प्रतिक्रियेची वाट पाहू लागले.

'प्रेमानंद हिर्लेकर?' माझ्या तोंडातून नाव उमटलं.

'मला माहीत नाही. मी पुराव्याशिवाय आरोप करणार नाही. सुचवणार सुद्धा नाही.. पण एक अँगल आहे स्टोरीला.. त्याचा पाठपुरावा करायला काय हरकत आहे?' त्यांनी विचारलं आणि माझ्या उत्तराची वाट न पाहता ते आपल्या विश्रांती कक्षात निघून गेले.

मी जायला वळलो. म्हाताऱ्याने पुन्हा एकदा मला चकवा दिला होता. आमच्या भेटीचा उद्देश त्यांनी सर्वात शेवटी उलगडून दाखवला होता. त्यांना सहभाग हवा होता. ही वॉण्टेड पार्टिसिपेशन.. ही वॉण्टेड टू कॉण्ट्रीब्युट.. ते, ते एखाद्या लहान मुलासारखे होते.

अचानक मला ललित सिबलबद्दल खूप प्रेम वाटलं.

चोवीस मजले उतरून मी ऑफिसमध्ये कधी शिरलो, मला कळलंच नाही. आल्या आल्या आशूला फोन लावला. बेल वाजत होती आणि समोरचं नाव मला खुणावत होतं.

अब्दुल मसूद पेशावरी!!!



# ७

# आश्विनी काळसेकर

दरवाजा ढकलून आत गेल्यावर छोटेसे का होईना, अंगण असेल, असं वाटलंच नव्हतं. मुंबईच्या या गजबजलेल्या वस्तीत ही एक प्रकारची श्रीमंतीच होती. अंगणाच्या समोर बैठ्या घराचं प्रवेशद्वार होतं आणि उजव्या बाजूच्या दिशेला एक मध्यम आकाराची खोली होती. प्रवेशद्वारावर पडदा होता.. जाळीचा.. तसाच पडदा त्या मध्यम आकाराच्या खोलीवरसुद्धा होता. अंगणात गुलाबाची रोपटी होती आणि त्यांच्यावर काही फुलं वाऱ्यावर डुलत होती. माझ्यासाठी अंगणात एक वेताची खुर्ची टाकण्यात आली होती, जिच्यावर बसून मी हे सगळं न्याहाळत होते आणि त्याच वेळी अब्दुल मसूद पेशावरीची वाटही पाहत होते. मध्यम आकाराची खोली म्हणजे त्याचं प्रार्थनागृह होतं आणि तिथेच तो नमाज पढत होता.

मी त्याला खूप निरखून पाहत होते. असं का? मला नक्की सांगता येणार नाही. एखादी व्यक्ती, आपण तिला पाहता क्षणी सूक्ष्म निरीक्षणाची ऑब्जेक्ट होते. तशी दिवसभरात आपण कितीतरी माणसं पाहत असतो पण आपलं लक्ष वेधून घेतील, अशा व्यक्ती किती दिसतात?

अब्दुल मसूद पेशावरी..

मला तो पन्नाशी उलटलेला वाटत होता. या अंदाजात फारसा दम नव्हता कारण हल्ली कित्येक जण अकालीच वृद्ध झाल्यासारखे दिसतात. त्यांच्या आयुष्यातील काही वर्षं त्यांचं जगणं गिळून टाकतं.

*आज सकाळी केसांमधून ब्रश फिरवताना एक पांढरा केस बरोबर डोक्याच्या मध्यभागी दिसला. सुस्त अजगरासारखा कपाळापासून पार पाठपर्यंत पसरला होता. मी स्तब्धच झाले. इतक्या लवकर? सुरुवात या अशा एका केसापासून होते आणि मग पांढऱ्या केसांचं रान डोक्यावर सर्वदूर पसरतं. पांढऱ्या केसांखाली माझा चेहरा कसा दिसेल, यावर मी बराच वेळ विचार करत बसले. एकदा विचार आला, काढून टाकावा, उपटून टाकावा! पिकातला एक तण काढून टाकला, म्हणून बाकीचे तण उगवायचे बंद होतात का? मुळात आपण स्वतःकडे अजिबात लक्ष देत नाही. किती दिवस आपण ठरवतो आहोत, बाथरूममध्ये चांगला उंच आरसा लावून घ्यायचा. स्वतःचं संपूर्ण शरीर पाहता येईल असा! तेसुद्धा होत नाही. पण हा पांढरा केस चांगला ट्रिगर ठरला आहे. सतत खिजवत राहील तो आपल्याला. काढून टाकण्यात अर्थ नाही.*

*पण एकूणच शरिराबद्दलची उदासिनता चांगली नाही. माझा हात आपसूकच माझ्या केसांमधून फिरतो. एक आश्वासक स्पर्श!*

घराच्या मुख्य प्रवेशद्वारावर लावलेल्या पडद्याआडून एक बाई मला न्याहाळते. ती बुरख्यात असली, तरी आत्ता तिचा चेहरा झाकलेला नाही आणि त्या चेहऱ्यावरचा तणावही मला जाळीआडूनही स्पष्ट जाणवतो आहे. ती बाई उंच आणि सडपातळ आहे. मी तिच्याकडे पाहते आहे, हे लक्षात येताच ती पडता सरकवते आणि आत जाते. पण मी इथे आल्यापासून अब्दुल मसूद पेशावरीच्या घरात जबरदस्त तणाव, टेन्शन निर्माण झालं आहे, हे मात्र निर्विवाद.

अब्दुल मसूद नमाज पढतो आहे. आजूबाजूच्या मशिदीतून त्याची प्रार्थना कर्कश आवाजात ऐकू येत आहे. या धर्माला प्रार्थनेच्या बाबतीत सुरांचं वावडं आहे. खरंतर संगीत आणि काव्याला इस्लाममध्ये श्रीमंत परंपरा आहे. पण त्या संगीताला दररोजच्या आणि साप्ताहिक प्रार्थनेत शून्य स्थान आहे. तो प्रार्थना म्हणण्याच्या क्रियेत पूर्णपणे तल्लीन झाला आहे. त्या क्षणी आजूबाजूचं जग त्याच्यासाठी अस्तित्त्वातच नाहीए. मी त्याच्या या भक्तिभावाने अचंबितच झाले आहे. आपल्याला ही पूर्ण शरणागती,

समर्पणभावना कधी भावली नाही आणि झेपलीसुद्धा नाही. कुठून येते ही समर्पणभावना? केवळ परंपरेने चालत येते? घरातली वडीलधारी माणसं सांगतात, म्हणून येते? की आपल्या बरोबरीच्या इतरांना आपण असंच शरण गेलेलं पाहतो, म्हणून?

अब्दुल मसूदचा नमाज संपला आणि तो आपली चटई गुंडाळत माझ्यासमोर आला. कदाचित त्याने माझ्या डोळ्यातले भाव  वाचले असावेत.

'अल्लाच्या मर्जीशिवाय आणि त्याने जे आपल्या भविष्यात लिहिले आहे, त्याव्यतिरिक्त आपल्या आयुष्यात काहीही होत नाही. होऊच शकत नाही' तो बोलत बोलत माझ्या समोरच्या खुर्चीत बसला.

'तस्लिमा बेटी,' त्याने आत बघत हाक मारली.

'अब्बाजान..' आतून एका तरुण मुलीचा प्रतिसाद आला.

'बेटा, मेहमान है.. पानी और.. चाय...' मी चहा पिते की नाही, हे विचारायची तसदी त्याला घ्यावीशी वाटली नाही.

'चहात साखर नको,' मी त्याला माझ्या अस्तित्त्वाची जाणीव करून दिली.

'बेटी, चहात साखर टाकू नकोस.. अलग घेऊन ये.. हां बोला.. मी ओळखत नाही तुम्हाला,' त्याने माझ्याकडे नजर वळवली.

'मला हिंदुस्तानी फारशी येत नाही,' मो ओशाळल्यात.

'लँग्वेज हॅज नथिंग टू डू वुईथ डायलॉग,' इंग्रजीवरचं प्रभुत्त्व दाखवत तो हसला, 'मला तरी तुमची भाषा नीट कुठे येते.. बट वुई वुईल सर्व्हाइव्ह.. बोला, आपकी पेहेचान?' तो मला आजमावत होता आणि त्याचा उजवा हात त्याच्या किंचित राखाडी, पण मुलायम दाढीवरून फिरत होता.

'अब्दुलभाई, माझं नाव.. आशू काळसेकर.. मी एक जर्नालिस्ट आहे. एक स्टोरी मी करत असताना, अचानक तुमचा धागा त्या स्टोरीत आला.. तुम्हाला कळलं असेलच मी कशाबद्दल बोलतेय.. फिरोज..' मी अडखळले. माझं वाक्य पूर्ण व्हायच्या आतच अब्दुल मसूदच्या चेहऱ्यावरचे आणि हातांमधले स्नायू ताणले गेल्याचं मला लगेच जाणवलं. सुरम्याने कोरलेले त्याचे डोळे अचानक लालसर झाले.

'भाई बनाके आपने मुझे मुश्किलमें डाल दिया,' त्याचा आवाज थोडासा घोगरा झाला होता, 'खूप काही सहन केलंय आम्ही अलिकडच्या काळात.. आता आणखी सहन करण्याची ताकद नाही आमच्यात..' तो बोलत असतानाच एक तरुण मुलगा त्याच्या शेजारी येऊन उभा राहिला. त्या तरुण मुलाचा हात अब्दुल मसूदच्या खांद्यावर एखाद्या संरक्षक मित्रासारखा वाटला. जणूकाही तो आपल्या स्पर्शातून अब्दुल मसूदला सांगत होता, 'मै हूँ ना!' त्या तरुण पोराचा पोशाख कॉलेजात शिकणाऱ्या मुलासारखा, म्हणजे जिन्स आणि टी शर्ट.. उभा चेहरा, उजळ रंग, अरुंद जिवणी.. अब्दुल मसूदची कार्बन कॉपीच वाटत होता.

'फिरोजचा भाऊ.. जावेद.. कॉलेजमध्ये शिकतो.. फर्ग्युसन.. इकॉनॉमिक्स आता ह्याच्या भरवश्यावरच सगळं काही आहे,' अब्दुलने अलगद जावेदचा हात आपल्या हातात घेतला.

'मला तुमचा गैरफायदा घ्यायचा नाहीए आणि तुमच्या दुःखावर डागण्यासुद्धा द्यायच्या नाहीत. मी सत्य शोधण्याचा प्रयत्न करतेय,' मी माझी बाजू त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला.

'कौनसा सच?' अचानक जावेदने माझ्याकडे प्रश्न फेकला. त्याच्या आवाजातली कटूता स्पष्टपणे मला जाणवली. त्याला प्रत्युत्तर देण्याऐवजी मी शांतपणे त्याच्याकडे पाहत राहिले. कोणी बोलायच्या तयारीत असलं, तर मी उत्कृष्ट श्रोता होऊ शकते.

'या मोहल्ल्यात प्रत्येक माणसाचं, त्याच्या घराचं, त्याच्या घरातल्या प्रत्येक व्यक्तीचं वेगवेगळं सच आहे.. या भल्या मोठ्या शहरात मुस्लिम म्हणून जगण्याचं एक वेगळंच सत्य आहे. इट् टिचेस यू टू बी अपोलोजेटिक अबाऊट युवर आयडेण्टीटी.. युवर रिलिजन, युवर नेम, युवर ॲपियरन्स.. माझ्याकडे पाहणाऱ्या डोळ्यात मी माझ्याबद्दलचं वेगळंच सच पाहतो.. संशयी, सच और खुद मेरा.. खुद का सच.. अलगही है.. छोडो सच की बात,' जगण्यानं पोळलेला त्याचा आवाज बरंच काही सांगून गेला.

अब्दुल मसूद मात्र त्याच्या रोखठोक हल्ल्याने संकोचल्यासारखा वाटला.

'बेटा, इतनी बातें नहीं करते.. या शहरात ऐकणाऱ्यांचे कान.. त्यांना पाहिजे तेच ऐकत असतात.. फिरोजच्या बाबतीत तेच घडलं.. मी त्याला खामोशीची जबान शिकवत

राहिलो आणि तो बोलता बोलता.. खामोश झाला.. तू का आली आहेस इथे? पुन्हा आमच्या पाठी पोलिसांचा ससेमिरा लावायचा आहे? माझा उरलेला मुलगासुद्धा परागंदा करायचा आहे?' अब्दल मसूद बोलत असताना एक तरुण देखणी मुलगी हातात चहाचा ट्रे घेऊन आली. ट्रेमधले कप आणि किटली खूप छान नक्षीकाम केलेले होते. तिचं नाव तस्लिमा असणार हे स्पष्टच होतं.

'अब्बाजान, चाय..' तिने जावेदकडे पाहिलं. तो पटकन उठला आणि घरातून त्याने टिपॉय् आणला.

तिच्या येण्याने अब्दुल मसूदही गप्प झाला. इट् वॉज अ् वेलकम ब्रेक! जावेदने तस्लिमाच्या हातून ट्रे घेतला आणि तो टिपॉय्वर ठेवला. माझ्याकडे पाहत तो चहा ओतू लागला.

'शक्कर?'

'जी नहीं..'

तस्लिमा न रेंगाळता ताबडतोब आत निघून गेली. अब्दुल मसूदने तिची ओळख करून दिली नाही, हे मी टिपलं. पुढला काही वेळ.. शांततेत चहाचे घोट घेण्यात गेला. हे संभाषण पुढे कसं न्यायचं याचा विचार मी करत होते. सत्याचे अपरिचित कंगोरे अनुभवायला मिळत होते.

धरून चालू या की, प्रेमानंद हिर्लेकरच्या हातून फिरोज मारला गेला आहे. क्षणभर असं गृहित धरू या.. या गृहितामुळे काही प्रश्न निर्माण होत होते.

फिरोज हा अतिरेकी होता?

तो अतिरेकी असेल, तर घरात हे कुणालाही माहीत नव्हतं? निदान अब्दुल.. किंवा जावेद..

अतिरेकी कारवाया घरात राहून आणि तरीही घरच्यांपासून लपवून करता येतात?

अतिरेकी कारवायांपाठची वैचारिक भूमिका घरच्यांपासून अशी लपवून ठेवता येते?

खरंच फिरोज अतिरेकी होता.. तर मग अब्दुल आणि जावेद.. उत्कृष्ट दर्जाचे अभिनेते आहेत?

किंवा फिरोज अतिरेकी नव्हता.. पण संशयित अतिरेकी होता..

केवळ संशय त्याला मारण्याचं कारण ठरू शकतं? सुक्याबरोबर थोडंसं ओलंही जळणारच, हा युक्तीवाद माणसांच्या बाबतीतही लागू होतो?

किंवा फिरोज.. मारलाच गेलेला नाही. तो जिवंत आहे..

पण मग तो सध्या कुठे आहे?

का अतिरेकी बनण्यासाठी सरहद्दपार पसार झाला आहे?

प्रेमानंद हिर्लेकरची स्टोरी एक वेगळंच वळण घेत आहे याची मला जाणीव झाली. त्या कथेला आता अब्दुल मसूद, फिरोज मसूद आणि जावेद मसूद यांच्या कथांची वेगळी परिमाणं मिळताहेत, हेसुद्धा मला जाणवलं.

एका विशिष्ट सामाजिक परिस्थितीमुळे जर का प्रेमानंद हिर्लेकरचा जन्म झाला असेल, तर अशा प्रेमानंद हिर्लेकरमुळे अनेक अब्दुल मसूद आणि त्यांची कुटुंबं यांची निर्मितीही होत आहे, हे वास्तव खूप भीषण, भयावह होतं.

'जावेद, हमें थोडा अकेला छोडो..' अब्दुल मसुदच्या घोगऱ्या आवाजानं मी पुन्हा भानावर आले. जावेद चहाचे रिकामे कप ट्रेमध्ये ठेवून ट्रे उचलून घरात गेला.

'मुस्लिम समाजाबाबत, तुम्हा लोकांच्या भ्रामक आणि चुकीच्या समजुती आहेत,' काही वेळाने अब्दुल मसूद बोलू लागला. बोलता बोलता, उजव्या हाताचं बोट ऐकणाऱ्याच्या डोळ्यांसमोर नाचवण्याची त्याची लकब मला भावली, 'इतिहासातल्या काही आक्रमक सुलतानांमुळे त्या बनल्या आहेत.. वर्ल्ड फिल्स ॲण्ड बिलिव्ह दॅट वुई आर अ रेस ऑफ फेरोशियस, फॅनाटिकल वॉरियर्स.. घोड्यावर स्वार झालेला योद्धा.. ज्याच्या एका हातात तलवार आहे आणि दुसऱ्या हातात कुराण.. बरोबर?' अब्दुल मसूद एकटक माझ्याकडे पाहत होता. मी गप्प राहिले. मला काय वाटतंय, यापेक्षा त्याला काय म्हणायचं आहे, यात मला जास्त रस होता.

'मी तुम्हाला सांगतो, ही प्रतिमा चुकीची आहे. अगदी लॉजिकली.. एकतर कुठलाही मुसलमान कुराण कधीच डाव्या हातात पकडणार नाही. आमच्या धर्मात डावा हात अस्वच्छ, अशुद्ध आणि अपवित्र गोष्टींसाठी राखून ठेवलेला आहे. आणि हे जर का खरं असेल, तर मग मुस्लिम योद्धे तलवार डाव्या हातात पकडणारे असले पाहिजेत. आणि ही शक्यतासुद्धा अतिरेकीच ठरेल ना?' अब्दुल मसूद भाबड्या डोळ्यांनी माझ्याकडे पाहत होता आणि माझ्या ओठांवर एक अपरिहार्य हसू उमटलं.

'संपूर्ण जग इतका तर्कनिष्ठ विचार करणारं असतं, तर काय हवं होतं?' मी माझ्याच नकळत त्याला म्हणाले.

'आप फिरोजक बारेंमें जानती हो?' अब्दुल मसूदने अचानक माझ्यासमोर प्रश्न टाकला. मी ह्या अचानक आलेल्या प्रश्नाने आश्चर्यचकीतही झाले आणि त्याच वेळी सावधही झाले. अब्दुल मसूदची ही नवी बाजू मी पाहत होते. काही विषयबाह्य विधानं करून समोरच्याला गाफील ठेवायचं आणि समोरची व्यक्ती बेसावध असताना आपल्याला हवा तो प्रश्न टाकायचा. तो भाबडा नव्हता.

'आप लॉयर हो?' मी त्याला विचारलं.

'मैं कार्पेट्स बेचता हूँ.. काश्मिर व्हॅलीसे आती है.. युरोप, अमरिका, जपान में मेरी कार्पेट्स जाती है.. लेकीन आपने जवाब नहीं दिया'

'भाईसाब.. आप जो जानना चाहते हो, वो मैं नहीं जानती,' मी त्याच्या डोळ्याला डोळा भिडवला.

'और मैं क्या जानना चाहता हूँ?' त्याचा स्वर आता कुजबुजल्यासारखा झाला होता.

'फिरोज जिंदा है, या फिर...' मी माझं वाक्य अर्धवट सोडून दिलं.

'फिरोज जिंदा नहीं है..' काही वेळाने अब्दुल मसूद म्हणाला. त्याच्या हातांना सुटलेला कंप माझ्या दृष्टीतून सुटला नाही.

'आणि हे तुम्ही कशाच्या जोरावर म्हणत आहात?' मी शांतपणे त्याला विचारलं.

'बाप का दिल यह सच महसूस कर रहा है,' थरथरत्या आवाजात त्याने उत्तर दिलं, 'बाकायदा, मेरे पास कोई और सबूत नहीं है,' त्याची नजर खाली झुकली.

'भाईसाब.. मी एक जर्नालिस्ट आहे. पारखून घेतलेल्या सत्याव्यतिरिक्त मी माझ्या लेखात प्रश्नचिन्हांकित सत्य कधीही छापत नाही. आजमितीला मला एवढंच माहीत आहे की, तुमचा फिरोज हरवला आहे. लापता.. तो काय आहे, कोण आहे, आणि सध्या कुठे आहे.. हे तीन प्रश्न मला भेडसावत आहेत. आणि यातल्या शेवटच्या प्रश्नाचं उत्तर शोधायचं असेल, तर पहिल्या दोन प्रश्नांची उत्तरंसुद्धा मला शोधावी लागतील. आणि त्यासाठी मला तुमची मदत हवी आहे,' या भेटीत खूप काही निष्पन्न

होणार नाही, याची मला जाणीव झाली. अब्दुल मसूद काही बोलायच्या आतच माझा मोबाइल थरथरू लागला. मी त्याला सायलेंट मोडवर ठेवला होता.

'येस पाशी..' मी मोबाइल कानाला लावत बोलले.

'तू नंतर माझ्या घरी येशील..' पसरिचाचा झोपाळलेला आवाज माझ्या कानांवर आला.

'हा प्रश्न आहे, विनती आहे की, ऑर्डर आहे?' मी त्याला विचारलं.

'आशू, अंगात १०४ ताप असताना मला विनोद करता येत नाही,' त्याने फोन बंद केला. त्याच्या घरी जाणं मला भागच होतं. आणि तसंही त्याच्या घरी जाणं मला आवडायच सुद्धा. जाता जाता केमिस्टकडून ताप उतरण्याची काही ठराविक औषधं घ्यायला हवीत. मी फोन पुन्हा माझ्या पर्समध्ये ठेवून दिला.

'तू प्रेमानंद हिर्लेकरला ओळखतेस?' आता अब्दुल मसूद माझ्याकडे पाहत नव्हता.

'हो,' त्याला खरं ते कळणं आवश्यकच होतं.

'त्याने माझ्या मुलाला मारलं?' खूप प्रयत्नपूर्वक अब्दुल मसूदने हा प्रश्न मला विचारला.

'खरं सांगू? विश्वास बसेल तुमचा?' मी त्याला विचारलं.

'हां,' त्याची नजर अजूनही खालीच होती.

'मी हा प्रश्न त्याला अजूनही विचारलेला नाही. अजूनपर्यंत फिरोजची केस आमच्या बोलण्यात आलेली नाही. पण त्याच्यावर फिरोजला मारण्याचा आरोप आहे. मी केसपेपर्स पाहिले आहेत. त्यात फिरोजला हिर्लेकरने मारलंय असं शाबूत करणारा किंवा फिरोज मेला आहे, असं सिद्ध करणारा एकही पुरावा नाही,' मी वास्तव अब्दुल मसूदसमोर ठेवलं.

'तुला काय वाटतं, त्याने माझ्या मुलाला मारलं असेल?' अब्दुल मसूदचा आवाज आता पूर्ण खोल गेला होता. जणूकाही माझ्या उत्तरावर त्याचं अवघं अस्तित्त्व अवलंबून होतं.

'नाही,' मी शांतपणे उत्तर दिलं.

'शुक्रिया,' त्याने सावकाश आपली नजर वर उचलली. एक चुकार अश्रू त्याच्या डोळ्यांतून खाली ओघळला होता. काही वेळ शांततेत गेला. त्याच्या दाढीच्या केसांवर चमकणारा अश्रू पाहण्यात मी गर्क झाले होते.

'गेले कित्येक दिवस माझ्या डोक्यात आत्महत्येचे विचार येतात.. सोचता हूँ, खत्म कर दूँ ये जिंदगी.. पण अल्लातालाला ते मंजूर नाही. प्रत्येकाला आपले भोग भोगावेच लागतात. आमच्या धर्मात आत्महत्येला परवानगी नाही. पाप आहे ते.. एक सच्चा मुसलमान रणांगणावर जखमी होऊन पडला होता.. आता आपण जगत नाही, हे जाणवताच निदान होणाऱ्या वेदना कमी करण्यासाठी त्याने हातातला चाकू भोसकून स्वतःचं जीवन संपवलं. अल्लाने त्याला स्वर्गात प्रवेश नाकारला. अल्ला म्हणाला, त्याने माझ्या इच्छेअगोदर स्वतःची इच्छा राबवलेय. हा नरकात आत्महत्या करत राहील.'

'फिरोज अतिरेकी होता?' मी त्याचंच तंत्र वापरून हा प्रश्न त्याच्यासमोर अचानक ठेवला. माझी नजर त्याच्या डोळ्यांवर स्थिर होती.

अब्दुल मसूदने त्यावर एक दीर्घ श्वास घेतला.

'अतिरेक्यासारखं बोलणं आणि अतिरेकी असणं, एकच आहे?' त्याने मला प्रतिप्रश्न केला.

'अ सीड जर्मिनेट्स ओन्ली ऑन अ फर्टाइल लँड,' मी त्याला म्हटलं.

'येस, बट देन इट शोज पोटेन्शिअल टू बी अ टेररिस्ट.. बट डझ नॉट मेक यू अ टेररिस्ट ॲटोमेटिकली,' त्याने माझा युक्तिवाद परतावून लावला.

'माझे सगळे नातेवाईक काश्मिर व्हॅलीमधले आहेत. माय रूट्स आर इन द व्हॅली.. तिथे जे काही होत आहे, ते मला कळत नाही. पचनो पडत नाही.. पटतही नाही.. मजहब जमीन का बटवारा नहीं कर सकता.. और चाहता भी नहीं.. पण मी जेवढा विचार करतो, तेवढा विचार तरुण पिढी करत नाही. ते विध्वंस पाहतात, जुलूम, जबरदस्ती पाहतात.. यार शहीद होते हुअे देखते है.. मग त्यांची डोकी फिरतात.. त्यांना खटकतं की, वुई आर ट्रिटेड ॲज सस्पेक्ट्स.. जैसे की, हर इक मुसलमान टेररिस्ट है.. हे असं कुठपर्यंत चालणार?'

'मला फिरोजची कहाणी ऐकायची आहे, लहानपणापासूनची..'

तो काहीच बोलला नाही. त्याची नजर पुन्हा एकदा खाली झुकली होती. मी एका कागदावर माझा मोबाइल नंबर लिहीला.

'मेरा कॉण्टॅक्ट नंबर.. मैं आपसे फिर मिलना चाहती हूँ..'

काही वेळ शांततेत गेला. त्याच्या चेहऱ्यावर कुठलेच भाव नव्हते.

'मला विचार करायला वेळ हवा,' तो बचावात्मक आवाजात बोलला.

'जरूर,' मला घाई नव्हती.

वर आकाशात हळूहळू ढग दाटून येत होते. वारा पडला होता. भरपूर पाऊस पडण्याची चिन्हं होती ती. मी काहीच बोलले नाही.

'रागावू नकोस.. पण तुला माझा विश्वास जिंकायला हवा.'

मी काहीच बोलले नाही.

'मी जे काही बोलेन त्याचा गैरवापर होणार नाही, हा विश्वास तू मला द्यायसा हवास.'

'गैरवापर होणार नाही, असा शब्द मी तुम्हाला आत्तासुद्धा देऊ शकते. पण वापर होणार नाही, असं खोटं आश्वासन मी तुम्हाला कसं देऊ?'

पुन्हा काही क्षण शांततत गेले. त्याच्याबद्दल एक अनुकंपा माझ्या मनात दाटून आली होती. तो अचानक उठून उभा राहिला. आमची भेट संपल्याची ती खूण होती.

'भाईसाब, सब अच्छा होगा.. आज आप दुखी हो, शायद कल.. यहीं चेहेरेपे मैं खुशी देखुंगी..'

तो उदास हसला.

'फार पूर्वी खलिफ अल् मन्सूरला काही लोकांनी प्रश्न विचारला, खुशहाल इन्सान कैसा होता है? विचारही न करता खलिफ अल् मन्सूरने उत्तर दिलं होतं, मी त्याला ओळखत नाही, आणि तोसद्धा मला ओळखत नाही.'

मी जाण्यासाठी वळले.

'खुदा हाफिज,' त्याच्या शब्दांनी मला थांबवलं.

मी दरवाजात त्याच्याकडे वळले.

'मी तुमच्या एवढं सोसलेलं नाही.. आणि तेवढं सोसण्याएवढं माझं वयही नाही.. पण जे काहो मी जगले, त्यातून मी एकच शिकले.. सहन करण्याची शक्ती मिळणं, ही सुखी होण्याची पहिली पायरी असते.. खुदा हाफिज..'

तो मंद हसला आणि घरात शिरायला वळला.. मी माझ्या पाठीमागे दरवाजा ओढून घेतला आणि रस्त्यावरच्या गर्दी मिसळले.

कुठेतरी शांतपणे बसावं, असं वाटत होतं आणि या परिसरात शांतता सोडून सर्व काही होतं. फेरीवाल्यांच्या गाड्यांमधून ऐकू येणारा कर्कश कव्वाल्या.. गिऱ्हाईकांची किमतीवरची घासाघीस, टॅक्सी आणि गाड्यांचे हॉर्नस्, हॉटेलमधून वाजणाऱ्या सुफी धुना.. शेवटी मी बसने प्रवास करायचं ठरवलं आणि बसस्टॉप गाठला.

या पसिरात आपल्याच देशात असूनही परदेशात असल्याचा भास होतो. सगळं वेगळंच होतं इथं.. माणसं, त्यांची वेशभूषा, इमारती, त्यावरचे हिरवे झेंडे, उर्दूमधल्या पाट्या.. हे असं का व्हावं? एकत्रित, एकाच मोहल्ल्यात, एकमेकांच्या साथीने राहण्याची गरज त्यांना का वाटावी? असुरक्षेची भावना? फाळणी होत असताना जो रक्तपात झाला, ज्या जखमा झाल्या, माणुसकीची जी विटंबना झाली ती ना आम्ही विसरू शकलो, ना ते विसरू शकले. त्या जखमांवर मलमपट्टी करून त्यांची वेदना शमवण्याचं, त्या जखमा भरून काढण्याचं काम कुणीही केलं नाही. ना आम्ही, ना त्या समाजाने. उलट या जखमा वाहत्या कशा राहतील, दोन्ही समाजांचा अश्वत्थामा तेलाची भीक मागत दारोदारी कसा भटकत राहील, हे मात्र सर्वांनी साध्य केलं.

हा केवळ धर्माचा प्रश्न नाहीए, हे मला जाणवत होतं. जातीजातींमध्ये हीच असुरक्षितता आहे. प्रत्येक जात, या असुरक्षिततेच्या भावनेतूनच घोळका करून राहते आणि जातीजातींमध्ये काय अतिरेकी नाहीत? अन्यायाच्या विरुद्ध बंड पुकारण्याच्या नावाखाली बसेसना आगी लावणं, दुकानं फोडणं, रेल्वेचे रूळ उखडून फेकून देणं, निरपराध लोकांच्या मालमत्तेची नासधूस करणं, घातपाती कारवाया करून अपघात घडवून आणणं, या अतिरेकी कारवाया होत नाहीत?

बसच्या वरच्या मजल्यावर एकदम पुढची सीट मला मिळाली. खिडकीतून मी समोर पसरलेला रस्ता, माणसांचा महासागर, दुकानांची पिलावळ, रस्त्याला लागूनच

असलेल्या चाळींसारख्या इमारतीत उभं राहिलेलं विश्व, सगळं.. सगळं.. आत्मसात करत होते.

खिडक्यांच्या बाहेर लटकवलेले कपडे, स्वतःची अशी कहाणी कुणाला सांगत असतील? जगण्याची उर्मी या माणसांना कुठून मिळत असेल? या कपड्यांच्या आतली असुरक्षित मनं कोणती स्वप्नं पाहत असतील? डू दे प्रॉमिस देमसेल्व्हज अ बेटर टुमॉरो? इफ येस.. ऑन व्हॉट ग्राऊंड्स? उद्याच्या त्यांच्या अपेक्षा काय असतील?

'ताई.. किती वेळ तिकिटासाठी उभा राहू?' कंडक्टरने विचारांच्या तंद्रीतून मला तात्पुरतं जागं केलं.

'मंत्रालय,' मी जरा लांबचा स्टॉप घेतला. तिथून पसरिचाच्या फ्लॅटवर पोहोचायला किमान पंधरा मिनिटं लागतात. माझ्यासाठी ते गरजेचं होतं. मी पुन्हा एकदा विचारांच्या लाटांवर स्वार झाले.

हे.. हे.. सगळं बदलायचं म्हणजे मधली साठ-सत्तर वर्षं पुसून टाकायला हवीत. तरच नव्याने पुन्हा सुरुवात करता येईल ना?

आणि आता इतकी वर्षे पुसायची ताकद असलेला एक तरी नेता आज आहे? सगळेच भूतकाळाच्या टाळूवरचं लोणी खाण्यात मश्गुल आहेत. एका नव्या सुरुवातीची गरज. खरंच.. एक गोखले हवा.. ब्राह्मणापासून खाटकापर्यंतचा प्रवास सहज करू शकेल, असा. पण फक्त गोखलेच का? एक अब्दुल मसूद का नाही? वेदपठण करू शकेल असा? एकमेकांभोवती भिंती उभं करणारं सगळंच नेस्तनाबूत करायला हवं. मी स्वतःशीच हसत होते. विचारांना काय? ते स्वैर असतात. त्यांना काहीच बंधनं नसतात.

पसरिचानं असं बोलावून का घेतलं? फोनवर बोलायचं की नाही?

सकाळपासून प्रेमानंद हिर्लेकरला दहा वेळा फोन केला. स्विच ऑफ! कारण नसताना एक हुरहूर जाणवली. कारण नसताना कसं काय? त्याची सवय व्हायला लागली आहे. दिवसातून एकदा बोलणं, किंवा कॉफी हाऊसमध्ये कॉफी.. भर पावसात भिजत शिवाजी पार्क.. अलिकडे लागलेला नवा शोध.. प्रेमानंदला खूप छान वास येतो. डिओचा नाही. फ्रॅगरन्स ऑफ ॲरोगन्स.. केअर फ्री ॲरोगन्स.. बा झवे! जर का

त्याला येत असलेला वास एखाद्या कुपित बंद करता आला, तर त्याला बा झवे.. असेच नाव द्यायला लागेल. पण गप्पांपलिकडे गाडी सरकतच नाही. ना आपल्याकडून.. ना त्याच्याकडून.. आपली आई गेली, त्या रात्री खूप काही घडू शकलं असतं. पण काहीच घडलं नाही.. असं का?

मंत्रालयासमोर उतरून मी चालायला सुरुवात केली. समुद्रावरून भरभरून वारं येत होतं. या उधळलेल्या वाऱ्याचा आनंद घ्यायचा असेल, तर साडी नेसायला हवी. जिन्सचा उपयोग नाही. उनाड वारं जेव्हा परकरातून अंगात शिरतं, ते फारच भारी.. किती तरी दिवसांत, छे.. वर्षांमध्ये आपण साडीच नेसलेली नाही! मी रिगल सिनेमा गाठला आणि बाजूच्या गल्लीत शिरले. समोर काळेकुट्टं ढग दाटून आले होते. पावसाची सर कोसळायला फारसा वेळ नाही. भिजायला मजा येईल. मन बंड करून उठलं. का नाही भिजायचं? सरळ गेट वे ऑफ इंडियाचा कट्टा गाठला.

आपण एकटेच.. इथे तर जोडपी भिजायला आली आहेत. आपले आपणच जोडीदार..

लाटा धक्क्यावर ज्या त्वेषाने आदळून फुटतात, ते पाहत राहावंसं वाटतं. आपलंच प्रतिबिंब आपण त्या लाटांमध्ये पाहतो, असं वाटतं. गरमागरम उकडलेल्या शेंगा घेतल्या. पावसात त्या खाण्याची मजा काही औरच. पावसाचा एक टपोरा थेंब चेहऱ्यावर येऊन आदळला. अंग शहारून आलं. इथे, आत्ता एक पुरूष हवा होता, असं तीव्रतेनं वाटलं. नाव.. गाव.. अता.. पता.. इतिहास.. वर्तमान.. भविष्य नसलेला पुरुष.. आणि आपण!! पावसाचं थैमान सुरू झालं. खूप आनंद झाला. त्या पावसाच्या थेंबांनी शरिराशी केलेली लगट मस्त बेधूंद, बेफाम वाटली. हाच तर माझा पुरुष.. पाऊसच माझा पुरुष.. नाव.. गाव.. अता.. पता.. इतिहास.. वर्तमान.. भविष्य नसलेला पुरुष! संपूर्ण शरिराला चिंब चिंब भिजवून विळखाच घालून बसला की तो! वाटलं, त्याच्या आणि माझ्यामधल्या कपड्यांच्या भिंती उडवून लावाव्यात आणि आपलं नग्न शरीर त्याच्या स्वाधीन करावं. शरिराच्या कानाकोपऱ्याला त्याचा स्पर्श होऊन द्यावा.

काही वेळानं पाऊस ओसरला आणि मी पसरिचाचं घर गाठलं. दरवाजावरची बेल वाजवली. त्याने चिडूनच दरवाजा उघडला.

'बेल वाजवायच्या अगोदर ही लावलेली नोट वाचायचीस' त्याने दरवाजावर पेस्ट केलेली पोस्ट इट माझ्या हाती ठेवली. 'की इज इनसाइड द लेटर बॉक्स...'

'मी भिजले आहे..' मी त्याला वस्तूस्थितीची जाणीव करून दिली.

'मी आंधळा नाही..' त्याने वाकून लेटर बॉक्समधली चावी घेतली आणि पाय ओढत तो बेडरूममध्ये शिरला.

'मी तुझ्यासाठी औषध आणणार होते,' मी अपराधी स्वरात पुटपुटले.

'होते.. यातच सगळं आलं. मी आत्ताच ॲस्परिन घेतली आहे..' तो डोकं दाबत म्हणाला, 'भांचोद, डोक्यात हातोडे मारल्यासारख्या वेदना होत आहेत.'

'तुला क्रोसिनची गरज आहे.' मी पायातले बूट आणि सॉक्स काढले आणि त्याच्या बेडरूममध्ये शिरले.

'फॉर गॉड्स सेक आशू, तू सगळीकडे पाणी करणार आहेस? कपाटात लेंगा आणि झब्बा आहे.. कपडे बदल पहिले.. आणि ऑकवर्ड वाटत असेल, तर वरून शाल घे..' त्याने डोळे मिटले आणि तो कुशीवर वळला.

'थँक्स..' मी कपाटातून कोरडे कपडे घेतले आणि बाथरूम गाठली. अंगावरचे कपडे काढून बारवर वाळत घातले आणि गरम पाण्याच्या शॉवरखाली शिरले. पाण्याचा फवारा शरीराला मस्त मसाज करत होता. त्याच्या बाथरूममध्ये भला थोरला उंच आरसा आहे. त्यात स्वतःला न्याहाळत शॉवर घेता येतो. माईकडून एकच गोष्ट आपल्याला मिळाली.. न मागता.. तिचा रंग.. गोरा. आणि आता गरम पाण्याच्या फवाऱ्याखाली त्यात एक लाल रंगाची छटासुद्धा दिसत होती. आपण काही फार वाईट नाही. चेहरा.. बसके नाक सोडले, तर नजरेत भरावा असाच. डोळे.. आपल्यालासुद्धा आपले डोळे आवडतातच.. उंच गळा..मध्यम पण पुष्ट स्तन.. अनाहुतपणे माझा हात माझ्या स्तनांवरून फिरला. फर्म.. सपाट ओटीपोट.. मांड्या, पोटऱ्या प्रमाणबद्ध.. नॉट बॅड.. समाधान वाटलं. पसरिचाच्या बाथरूममध्ये एक एकदम मस्त गोष्ट आहे. मऊशार टॉवेल्स.. त्या टॉवेलने अंग पुसणं, म्हणजे आगळावेगळा आनंद.. मी भराभर लेंगा आणि झब्बा अंगावर चढवला आणि केस टॉवेलमध्ये गुंडाळले. समोरच्या आरशात झब्ब्याआडून माझी काळीभोर स्तनाग्रं दिसत होती. हसूच आलं.. पसरिचाला काय उपयोग? आणि ज्याला उपयोग आहे, तो बेपत्ता! मी शाल वापरायची नाही,

असं ठरवलं. पसरिचाचं माझ्याकडे असं लक्षच जाणार नाही हा मला विश्वास होता. किचनमध्ये जाऊन मी कॉफी बनवली आणि दोन मग घेऊन त्याच्या बेडरूममध्ये शिरले.

'कॉफी,' मी त्याच्या बेडशेजारी कॉफीचा मग ठेवला आणि त्याच्या कपाळावर हात ठेवला. ताप एवढा वाटत नव्हता.

'मी क्रोसिन, ॲस्परिन, जे मिळेत ते ढोसलंय,' माझ्याकडे पाहत तो उशीला टेकून बसला, 'तुला शाल नकोयं?' जेव्हा खात्री असते, तेव्हा तो असे उफराटं विचारणारच.

'मला वाटलं, तुझं लक्षच जाणार नाही,' मी त्याला म्हणाले.

'सौंदर्य आणि सेक्स यांचा परस्पर संबंध नसतो आशू..'

'थँक्स.. सोऽ माझ्या सौंदर्याचा आस्वाद घे..' मी त्याच्या नाकाचा चिमटा घेतला आणि बाजूच्या सिटीवर लवंडले.

'का फोन केला होतास?' काही वेळानं मी त्याला विचारलं.

'आय नोड् व्हिस्की,' तो म्हणाला.

'नो.. यू वुईल नॉट हॅव इट.. माझ्या कॉफीचा अपमान मी सहन करणार नाही. मला तेवढी एकच गोष्ट चांगली करता येते.. यू नो दॅट..'

'सॉरी..' त्याने कॉफीचा घोट घेतला.. 'गॉड ब्लेस यू.. नाऊ ब्रेस युवरसेल्फ फॉर अ न्यूज..'

'शूट.. ताणू नकोस..' मी उठून बसले आणि कॉफीचा घोट घेतला.

'हिर्लेकरला अटक झाली.'

माझ्या हातातला कप थरथरला.

'व्हॉट!' तो प्रश्न नव्हता, उद्गारवाचक चिन्हं होतं ते!

'आज भल्या पहाटे पाच वाजता, त्याच्या घरातून उचलला त्याला.'

'जामीन?'

'दोन दिवस बँक हॉलिडे.. कोर्टाला सुद्धा सुट्टी.. मग शनिवार, रविवार.. सोमवारी त्याला कोर्टात उभं करतील.'

'वकील?'

'मी सेटलवाडला फोन केलाय, तो घेईल त्याचं ब्रिफ'

'या रविवारचं आर्टिकल?'

'वुई कन्टीन्यू अवर स्टोरी,' त्याने कॉफीवरची साय बोटावर तोलली आणि मग अलगद जिभेवर ठेवली.

'कोण असेल, या अटकेच्या मागे?'

'माय गेस इज अॅज गूड अॅज युवर्स'

'मला भेटायचं आहे त्याला.'

'का?'

'का नाही?' माझ्यातला बंडखोर उफाळून वर आला.

'आशू, कॉशन.. डोण्ट प्री जज हिर्लेकर..'

'म्हणजे?'

'तुझ्यासाठी तो निर्दोषच असेल, तर या स्टोरीला तू न्याय देऊ शकणार नाहीस.. हाऊ वुईल यू डू जस्टिस टू युवर सब्जेक्ट.. इफ यू गेट इन्व्हॉल्व्ड इन युवर सब्जेक्ट?'

एक स्तब्ध शांतता..

'आय अॅम सॉरी,' मी खाली पाहत म्हणाले.

पसरिचा काही वेळ माझ्याकडे पाहत राहिला.

'माझ्या जवळ ये'

मी आज्ञाधारकपणे त्याच्या जवळ बसले आणि त्याच्या कुशीत विसावले. एक घट्ट मित्राची कुस किती आश्वासक असते, त्याचा अनुभव घेत राहिले.

'आशू, काहीतरी घडतंय, याची मलासुद्धा जाणीव आहे. आणि का घडू नये? बट् दॅट इज पर्सनल.. डोण्ट मेक कॉकटेल ऑफ पर्सनल अॅण्ड प्रोफेशनल मॅटर्स.. दॅट्स पॉयझन..'

'मी सॉरी म्हणाले ना?'

'आय नो..' तो मला थोपटत म्हणाला.

'एवढीच बातमी होती की,.. आणखी..'

'अरे हो.. एक विसरलोच.. त्या टेबलावर एक प्रिंटआउट आहे बघ..'

मी उठले आणि टेबलावरचा कागद घेऊन पुन्हा त्याच्या जवळ आले.

'ईमेल..' मी त्याला म्हणाले.

'वाच.. धमकीची.. आज ऑफिसच्या नेटवर्कवर आली.'

'होली फकिंग शिट्' मी मेल वाचत उद्गारले.

'यू नो किड्.. मला अपेक्षित होतं.. ते.. ते.. सर्व घडत आहे,' पसरिचा हसत हसत म्हणाला.

'ही हसण्यावारी नेण्यासारखी गोष्ट नाही.. तू तक्रार नोंदवलीस?'

'ऑफकोर्स.. ईमेल कुठून आली, ते ट्रेस करता येईल. आयपी अॅड्रेसवरून.. पण तो सायबर कॅफेचा असणार..' त्याच्या आवाजात बेफिकीरी होती.

'सिबलची प्रतिक्रिया काय?' मी त्याला विचारलं.

'ओह! एखाद्या लहान मुलाप्रमाणे संचारलंय म्हाताऱ्याच्या अंगात.'

'पाशी, माझ्या एका प्रश्नाचं उत्तर देशील?'

'विचार.'

'तू आत्ताच म्हणालास.. जे, जे, तुला अपेक्षित होतं.. ते, ते, सर्व घडतंय म्हणून.'


'येस..'

'आणखी काय घडणं अपेक्षित आहे तुला?'

'वेट अॅण्ड वॉच किड्.. तू तुझं काम करत राहा.. परिणाम मी सांभाळेन.. फक्त.. स्वतःची काळजी घे.'

मी कॉफीचा मग खाली ठेवला आणि सिटीवर लवंडले. कधी डोळा लागला, कळलं नाही. पण बराच वेळ पसरिचाचे शब्द कानात घुमत राहिले होते.

'तू तुझं काम कर.. परिणाम मी सांभाळेन.. फक्त स्वतःची काळजी घे...'



# --आठ--

# प्रेमानंद हिर्लेकर

आठ बाय दहाची खोली.. एखाद्या कोठडीसारखीच, पण कोठडी नव्हे. आत एक लांब बाक.. मला झोपण्यासाठी.. एक जीर्ण चादर.. जिचा फारसा उपयोग नव्हता. त्या विभागातलं ते प्रमुख पोलोस कार्यालय होतं आणि तसं मोठं होतं. फक्त ही खोली.. अडगळीची वाटावी अशीच. सगळ्या भिंतींच्या कोपऱ्यात कोळीष्टकं लोंबत होती. एक प्रकारचा कुबट वास त्या खोलीला घेरून होता. नाही म्हणायला, नैसर्गिक विधोंसाठी मला एस्कॉर्टबरोबर खोलीबाहेर जायला मुभा होती. त्यामुळे ती दुर्गंधी नव्हती. त्या खोलीत मला एका नैसर्गिक पार्श्वसंगीताची साथ होती. डासांची गुणगूण.. ती मात्र दिवसभर होती आणि त्यांचे कडाडून चावणारे दंश मला सतर्क राहायला मदत करत होते. एरवी हे डास चावणं मला सहन झालं नसतं. पण आता जाणवतंय की, सर्व वेदना तुलनात्मक पद्धतीने जाणवतात. इतर वेदना इतक्या तीव्र होत्या की, त्यांच्यापुढे डास चावण्याची वेदना काहीच नाही.

वस्तूस्थितीपासून दूर राहण्यासाठी मी इतर सर्व गोष्टींवर माझं लक्ष केंद्रीत करण्याचा नियम कसोशीनं पाळत होतो. ॲकॅडमीतलं ट्रेनिंग हे असं उपयोगी पडणार होतं! रात्री

त्या बाकावर आडवं पडून, मिटलेल्या डोळ्यांच्या आधारे मी कटू आठवणींचे कप्पे बंद राहतील, असा प्रयत्न करत होतो.

.................................

ती मला भेटायला येईल, अशी अपेक्षा मी केलेली नव्हती.

ती... माझ्या खोलीत!!!

बघत होती माझ्याकडे.. एक टक..!!!

मला तर काय बोलावं, हेच सुचत नव्हतं. म्हणजे सगळे विचार, सगळ्या संवेदना जत्रेत हरवलेल्या मुलाप्रमाणं कावऱ्याबावऱ्या झाल्या होत्या. डोळ्यांना ती दिसत होती. तिचे मिष्कील डोळे आणि चेहऱ्यावर एक खवचट हास्य.. जणू काहीही न विचारता, ती मला विचारत होती..

'झालं समाधान? अटक होण्याचीच वाट पाहत होतास ना? आता खूष असशील!'

दरवाजाच्या फटीतून येणारा.. एकच, एकूलता एक किरण तिच्या चेहऱ्याशी लगट करत होता. मला त्याचा हेवाच वाटला. म्हणजे तिच्या चेहऱ्याशी इतकी लगट करायचं धाडस त्याला कसं काय होऊ शकतं? ना ओळख, ना देख.. साला.. गेले बरेच दिवस आपण तिला भेटतोय.. तिच्याशी बोलतोय.. तिच्याबरोबर पावसात भिजतोय.. स्वतःची बाजू न मांडताही, आपल्या मनातली खंत तिच्यापाशी ओकतोय.. पण साला एकदाही तिला स्पर्श नाही करू शकलो आपण.. किती वेळा वाटलं होतं तिचा चेहरा आपल्या ओंजळीत घ्यावा आणि आपले ओठ तिच्या ओठांवर टेकवावेत..

पण ती काहीच बोलत नाहीए.. बसलीय समोर.. एक टक माझ्याकडे पाहत..

'तू येशील असं वाटलं नव्हतं. किंबहुना तू यायला नको होतंस,' मी अवघडलेली शांतता संपवतो.

'तशी मला एकटेपणाची सवय आहे.. म्हणजे, नॉट आऊट ऑफ चॉइस.. बट्, आऊट ऑफ कम्पल्शन,' मी तिला म्हणतो.

आता ती हसत नाही. फक्त माझ्याकडे पाहत राहते. तिचं असं शांत राहणं.. सर्व प्रसंगाला स्वप्नवत रूप देत होतं.. का, स्वप्नच आहे हे?

मी कूस बदलतो. स्वतःलाच सांगतो.. आयुष्य सहन करण्यासाठी असतं.. आजचा दिवस कालच्यासारखा नसतो.. आणि उद्याचा.. आजच्यासारखा असणार नाही.

कुठेतरी जोरात कड्या उघडल्याचा आवाज.. पोलीस स्टेशनच्या कोठड्यांना लॅचेस का नसतात? स्टुपीड्.. पोलीस चौकीच्या आवारात तुम्हाला झोप येणं गृहीतच धरलेलं नसतं.

मी तिच्यावर माझं लक्ष केंद्रीत करतो.

'चोवीस तासात दोन अनपेक्षित भेटी आहेत,' माझे हात सिगारेट शोधतात. म्हणजे मागितली असती, तर मिळाली नसती असं नाही. पण मीच ठरवलं, नाही मागायची.. '........शिवाय जगायची सवय व्हायला हवी.. या 'शिवाय'च्या अगोदर कुठलाही शब्द टाका.. सुमन, जीवन, सायली.. बाप.. माय.. सिगारेट.. रिव्हॉल्व्हर.. वर्दी.. आशू..

आशू.. ढिम्म.. समोर..

'पहिली भेट सुमनची..' मी मनावरचं ओझं उतरवण्याचा प्रयत्न करतो.

ती काहीही बोलत नाही.. शी इज् ऑल्मोस्ट अन्‌रिअल!

'मी तुला इमोशनल कमोडसारखं वापरतोय, असं तुला वाटत नाहीए ना?' माझा अपराधी प्रश्न.

तिचे डोळे फडफडतात. त्यांच्यात नाराजी.. जणू ती मला म्हणतेय, मित्र हा इमोशनल कमोडच असतो. मनातली घाण त्याच्याकडे नाही ओकणार, तर कुठे?

'तू काय मौनव्रत धारण करून आलेयस का?' माझी चिडचिड.

'मला तुझ्या शेजारी बसायचं आहे..' शरीर तरी तिला बोलतं करेल का? मी तिच्या प्रतिसादाची वाट न पाहता तिच्या शेजारी जाऊन बसतो. तिची ऊब मला भावते.

'मी मगाशी खोटं बोललो..' माझी बोटं तिच्या बोटांमध्ये घुटमळतात.

'मला एकटेपणा आवडत नाही.. इव्हन आऊट ऑफ कम्पल्शन..' मी तिच्या बोटांवरचा दाब वाढवतो.

'आणखी जवळ ये..' माझा स्वर आग्रही.

मी तिला ओढून घेतो.. प्रतिकार नसणं ही संमतीच ना?

मला आता शब्दांची, त्यांच्या ध्वनीची गरज वाटत नाही.. मी तिला जवळ ओढतो.. मनापेक्षा शरिराची भूक जास्त तीव्र होते जणू. माझा हात तिच्या टॉपच्या आत शिरतो. माझं अवघं अंग शहारतं. बोटं ब्रेसिअरची क्लिप शोधताहेत आणि अचानक तिचे स्तन बंधनांमधून मोकळे होतात. दे ऑलमोस्ट बाऊन्स इन माय हँड्.. माझी बोटं तिच्या स्तनाग्रांशी खेळू लागतात.. तिचा श्वास संथपणे चालू आहे.. मी हलकेच तिच्या ओठांवर ओठ ठेवतो. आजूबाजूचं जग आता विरल होत चाललंय.. माझी जिभ तिच्या जिभेशी लपंडाव खेळतेय.. माझ्या बोटांच्या स्पर्शाखाली तिची स्तनाग्र आता टोकदार, अणकुचीदार झाली आहेत.

खरं काय आणि खोटं काय?.. सत्य काय आणि आभास काय?

अचानक जवळून किंचाळण्याचा आवाज..

'मादरच्योद.. जाम चरबी झाली का रं तुझ्या अंगात? भडव्या, टायरमध्ये टाकूनच फोडतो आता तुला..'

पाठोपाठ ओळखीची किंकाळी.. ओळखीच्या शिव्या.. रबरी दांडुक्यांचे फटके.. आणखी किंकाळ्या.. अजीजी.. थर्ड डिगो.. मी झोपेतून जागा होतो.. मी खोलीत एकटा.. रात्री बारानंतर मला भेटायला कोण येणार आहे! मग मी सावरतो.. अपरिहार्य एकटेपणाबद्दल तक्रार करायची नाही. तो सहन करायचा.. आणि त्यासाठी आणखी मागून घ्यायचा..

आता झोप लागणार नाही, याची मला कल्पना आहे. मी घड्याळाकडे पाहायचं टाळतो. काटे भलभलती वेळ दाखवतात. मी टोळे मिटून घेतो. ट्रेनिंग ॲकॅडमीत शरिराला एक शिस्त लावलेली आहे. टू ओव्हरपॉवर माइंड.. निपचित पडून राहतं ते.. डोळ्यांसमोर आशूच्या लेखमालेतील तुटक भाग.. एखाद्या पटकथेप्रमाणे.. माझेच क्षण जणू मी पुन्हा एकदा जगतोय..

*रेल्वे स्टेशन.. तुडूंब भरलेली लोकल.. थांबते, ना थांबते तोच.. कानठळ्या बसवणारे स्फोट.. कट् टू.. निरपराध.. बेवारस अवयव.. एक जण आपलाच तुटलेला हात धरून पळतोय.. प्लॅटफॉर्म रक्ताने माखलेल्या मुडद्यांनी भरला आहे.. कुटुंब उध्वस्त.. आयुष्य उध्वस्त.. रक्ताच्या चिळकांड्या.. क्षणार्धात विध्वंस.. कट् टू.. मी.. सगळं असहाय्यपणे पाहतोय.. स्वतःलाच दोष देत.. हा संहार मी थांबवू शकलो नाही.. कट् टू.. इस्टर्न एक्सप्रेस हाय वे.. पहाटेचे दोन वाचून पंचेचाळीस मिनिटे.. मी टाटा सुमोमध्ये.. लांबवर लाल रंगाची रॉयल एन्फिल्ड.. तिला गाठायलाच हवं.. माझा पेशन्स संपतो.. मला कव्हर देणाऱ्या शिर्केची मोटरसायकल मी थांबवतो.. आता मी त्याचा पिलियन रायडर.. आता शिर्के वारा प्यायल्यागत सुसाट निघतो.. हाऽ हाऽ म्हणता लाल रंगाची रॉयल एन्फिल्ड रेंजमध्ये.. मी माझं ॲटोमेटिक रोखतो.. गोळ्यांच्या फैरी.. पुढची मोटरसायकल स्किड होते.. प्रचंड मोठा स्फोट.. एका मोकळ्या कंटेनर यार्डसमोर.. ती जर का चर्चगेट, व्हीटी किंवा गेट वे ऑफ इंडिया किंवा कुठल्याही गजबजलेल्या ठिकाणी पोहोचली असती तर? किमान शंभर सव्वाशे ठार.. आणि तेवढेच जबर जखमी झाले असते.. अतिरेक्यांची अर्धवट जळलेली शरिरं.. आरडीएक्स.. डेटोनेटर्स.. कट् टू.. मी.. बेडरूममध्ये.. डोकं हातात गच्चं.. २६/११.. स्फोटांची मालिका.. सहकाऱ्यांची उध्वस्त घरं.. व्हीटीवर तर रक्ताचा सडा.. या निरपराध लोकांना.. आपण वाचवू शकलो नाही.. संतापाचा उद्रेक.. सुमनची भयभीत नजर.. मुलांचे कावरेबावरे डोळे.. त्याचा शेवट.. भांडण!*

*'मी प्रेमानंद हिर्लेकरवर प्रेम केलं होतं.. एटीएस ऑफिसरवर नाही..'*

*'माझ्या संसाराचा बळी तू का देतोयस?'*

*'हे बघ, मी सामान्य आहे.. माझं जग, माझं घर, ही कच्चीबच्ची पोरं यांच्यापुरतंच मर्यादित आहे.. आम्ही नाहीत तुझ्यासारखे ग्रेट.. सो व्हॉट्!'*

*ओक्साबोक्शी रडणं.. आदळआपट.. वैताग..*

कट् टू.. वर्सोवा बिच.. मी एकटाच.. मुद्दामून.. स्क्वाड न घेताच.. खिशात फक्त ॲटोमेटिक रिव्हॉल्व्हर..

बहुतेक लोकांचा अजूनही विश्वास बसत नाही की, एक गनिमी लढाई आपल्याविरुद्ध छेडली गेली आहे.. अन्‌कन्व्हेन्शनल वॉर.. बट् स्टील अ वॉर.. आमचे नेते लोकांशी

खोटं बोलतात.. वास्तव परिस्थितीची कल्पना देत नाहीत.. खोटं समाधान.. गाफील करणारं.. तेवढंच देतात.

*मी पश्चिम किनाऱ्याच्या अगदी टोकाला.. लांबवर मला दिसतोय सिमेंटचा कोट दिलेला एक ओबडधोबड आकार.. माय टार्गेट.. मी मोटरसायकल दूरवर बंद करतो. अंगावरचे कपडे उतरवून मोटरसायकलच्या डिकीत ठेवतो.. आता मी कोळी.. खांद्यावर फाटकं तुटकं जाळं.. पाय अनवाणी.. अंगावरच्या बंडीत ॲटोमेटिक.. त्या खोलीत चौघेजण असतील.. अबू कासिम.. अब्दुल रझाक.. मेहमूद पाशा आणि चौथा.. अर्जून नेपाळी.. त्यांचा लोकल कॉण्टॅक्ट.. तिघे काल आलेत कराचीहून.. समुद्रमार्गाने.. त्यांचं टार्गेट चर्चगेट रेल्वेस्टेशन आणि गोदी.. डॉकर्याड.. अजून प्रकाश थोडा जास्त आहे.. मी एका खुरट्याआड बसकण मारतो.. जाळं पसरतो आणि शिवायला घेतो.. पंधरा दिवस शिकत होतो जाळं विणायला.. वेळेचं भान नाही. कुठलाही विचार डोक्याला स्पर्श करत नाही. फक्त निरपराध चेहरे डोळ्यांसमोरून तरळून जातात. चर्चगेट स्टेशनवरून ऑफिसला येणारे.. त्यांना आपण दिसतही नाही.. ते आपल्याला ओळखतही नाहीत.. आणि त्यांचा आपल्यावर विश्वास.. त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी आपल्यावर टाकून ते निश्चिंत मनाने लोकलमध्ये प्रवास करतात. दररोजच्या धकाधकीला तोंड देतात. माझ्या छातीचे ठोके वाढतात. हात गरम होतात.. आता विचार.. माझ्यावर हल्ला करतात.. आमच्या राजकीय नेत्यांना ह्या भाबड्या जीवांची काही पर्वा आहे का? माणुसकीचे पोवाडे गाऊन का हे अतिरेकी माणसं होणार आहेत? मला माहितेय, त्यांना कसं तोंड द्यायचं ते.. आय हॅव बीन ट्रेंड.. दिल्लीत, गृहमंत्रालयात, वातानुकूलित चेंबर्समध्ये खुर्ची उबवणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यानं मला शिकवायचं नाही कसं झवायचं ते.. तुम्हाला या अतिरेक्यांचा बंदोबस्त करून हवाय ना? का त्यांना चहापानाला बोलवायचंय? खारी बिस्किटं आणि चहा? माझ्या आजूबाजूला आता अंधार.. मी त्या खोलीच्या दिशेनं सरकायला सुरुवात करतो.. खोलीत आता मिणमिणता दिवा लागलाय.. मी बंडीतून ॲटोमेटिक बाहेर काढतो. त्यावर सायलेन्सर बसवतो.. दीर्घ श्वसन करतो.. हात, मन स्थिर हवेत.. चुकीला वाव नाही.. मार्जिन ऑफ एरर.. झिरो.. मी रिव्हॉल्व्हर पाहतो.. एस्आयजी.. सावर.. पी.. २२६.. चेंबर्ड फॉर.. ९ एमएम.. गोळ्या.. एक्सलंट वेपन.. मी माझी बॉल कॅप.. डोक्यावर चढवली.. मला हसूच आलं.. पवार सरांची आठवण झाली.. ॲकॅडमीमधल्या.. मादरच्योद असण्याएवढंच मादरच्योद दिसणंही महत्त्वाचं असतं, असं ते म्हणायचे..*

*ती खोली आता खूप जवळ.. अंधारही खूप.. खोलीचा दरवाजा उघडतो.. एक जण बाहेर.. तो कोपऱ्याकडे जातो..त्याच्या खांद्यावर रायफल... अॅटोमॅटिक.. तो कोपऱ्यात उभा.. जिनची झीप उघडतो.. त्याच्या मुतण्याचा आणि दीर्घ श्वास सोडल्याचा आवाज.. मी त्याच्या कवटीचा नेम धरतो.. नेहमी येणारा एक प्रश्न डोकावतो, 'मी याला मारू शकतो?'.. माझ्या मनात जरासुद्धा शंका नव्हती की, ज्याला मारतो आहे, तो अतिरेकी आहे.. त्याच्याजवळ अॅटोमॅटिक रायफल कशासाठी आहे? मी चाप ओढतो.. पुढल्या क्षणी तो कोसळतो.. आवाजही न काढता.. आता वाया घालवायला वेळ नाही.. मी बेधडक त्या खोलीत घुसतो.. उरलेले तिघे.. आश्चर्यचकीत... सरप्राइझ इज दी नेम ऑफ द गेम.. अर्धी लढाई तिथेच जिंकली जाते.. पुढच्या काही सेकंदात उरलेले तिघेही टिपले जातात. मी खोलीतले सामान तपासतो.. आरडीएक्स.. टाइमर्स.. वायरलेस.. मोबाइल फोन्स.. रायफल्स.. अॅमो.. मी फोटो घेतो.. हेडक्वार्टरला फोन करतो.. माझं काम झालं आहे..*

पुन्हा स्फोटांच्या कानठळ्या.. निरपराध लोकांची छिन्नविछिन्न शरीरं.. मनात खुपणारी प्रदीर्घ वेदना.. आपण नाही वाचवू शकलो निरपराध जीव..

सगळ्यात शेवटी उरते, ती वेदनाच..

कट् टू.. मंत्र्यांचे दालन..

*'कायदा हातात घेण्याचा तुम्हाला अधिकारच काय?'*

*'कायदा हातात घेण्याचा अधिकार कोणालाही नाही.. जेवढा मला नाही, तेवढाच अतिरेक्यांनाही.. दर्दैवानं कायदा मला लागू होतो.. त्यांना नाही.. कारण ते या देशाचे नागरिकच नाहीत..'*

*'पण हे अतिरेकी जिवंत सापडले असते, तर आणखी बरीच माहिती हाताशी आली असती..'*

*'कुठली माहिती सर? असं काय आहे की, जे आपल्याला माहीत नाही? हजारो टन पुरावा आपण सरहद्दपार दिला आहे.. आणखी कुठला पुरावा शोधतोय आपण.. इट्स नॉट टाइम टू कलेक्ट एव्हिडन्स.. इट्स टाइम टू किल..'*

*'तुमची कार्यपद्धती आम्हाला अडचणीत आणतेय..'*

*‘सर तुम्हाला काय शेवट हवाय? मी कमांडोचं ट्रेनिंग घेतलंय.. शत्रूला मारण्यासाठी मला खास प्रशिक्षण दिलंय. आता त्याला केव्हा, कुठे आणि कसं मारायचं, ह्याचे नियम जर का मंत्रालयात बसून तुम्ही ठरवणार असाल, तर तुम्ही माझ्यासारख्या कमांडोजचं काम कठीणच करत आहात, असं नाही, तर आमच्या जीवाशी खेळत आहात.. ’*

*मी धडाधडा बोलतोय आणि समोर बसलेला राजकारणी माझ्याकडे खाऊ की गिळू, अशा नजरेनं पाहतोय..*

कट् टू ऑफिस.. कमिशनर हतबल..

*‘यू नो प्रेमानंद.. दोन अधिक दोन बरोबर चार.. इतकं व्यावसायिक आयुष्य सोपं नसतं.. अनेक प्रेशर पॉइंट्स असतात.. इट्स अ कोऑलिशन गव्हर्नमेंट ॲट सेंटर.. अल्पसंख्याकांच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत, याची काळजी घ्यावी लागते. आय डोण्ट एन्व्ही पॉलिटिशियन्स देअर जॉब.. आपलं आयुष्य काळंपांढरं असतं.. समोरचा अतिरेकी असतो किंवा नसतो.. पण त्यांचं जग तसं नाहीये.. देअर आर व्हेरिअस शेड्स ऑफ ब्लॅक.. ’*

*ते बोलत राहतात. काही वेळानं मला ऐकू येईनासं होतं. शब्द कानांच्या पडद्यांवर आदळतात.. पण त्यांचा अर्थ मेंदूपर्यंत झिरपतच नाही.*

‘ब्लॅक ॲण्ड व्हाइट!’

हा शब्दप्रयोग पुन्हा एकदा ऐकण्यात आला होता.. वेगळ्या संदर्भात.. वेगळ्या वेळी..

दूरवरून किंकाळ्या.. थर्ड डिग्री! तो जिवाच्या आकांताने किंचाळतोय.. सत्याला बोलतं करायचा एक सरधोपट मार्ग.. शरिराच्याही मर्यादा असतात.. वेदना सहन करण्यासाठी शरिराला उद्दीष्ट लागतं. गुन्हेगाराकडे ते नसतं. परिणामी एका मर्यादेनंतर शरीर बंड करतं. का म्हणून मी सहन करायचं? ते मनाचा ताबा घेतं, आणि बोलतं.

मी डोळे घट्ट मिटून घेतलेत.. डोळ्यांसमोर आता सुमन.. प्रॅक्टिकल, व्यवहारी.. तिला जग ब्लॅक अ‍ॅण्ड व्हाइटच आवडतं.. तिनेच वापरला हा शब्दप्रयोग.. अगदी अलिकडे.. म्हणजे अठ्ठेचाळीस तासांपूर्वी..

*दरवाजावरची कडी वाजली आणि मला वाटलं आशूच.. मी दरवाजा उघडला आणि समोर सुमन.. ती हुशार.. माझ्या चेहऱ्यावरचा इमोशनल ट्रॅव्हल तिच्या तीक्ष्ण नजरेतून सुटला नाही. तिला 'आत ये' असं आमंत्रण काय देणार? तिचंच घर ना? म्हणजे तोपर्यंत तरी माझा तसा समज होता..*

*'अपेक्षाभंग झाला?' तिनं विचारलं.*

*'तू.. इथे येशील, असं वाटलं नाही..'*

*मग ती फक्त हसते. तुम्ही त्या हसण्याचा हवा तो अर्थ घ्या..*

*'मुलांना का नाही आणलंस?' एक कळ.. किती दिवसांत आपण सायली आणि जीवन यांना पाहिलेलं नाही.*

*'तू तरी कुठे भेटायला आलास?' हा बुद्धीबळाचा डावपेच.. नथिंग मोअर.. नथिंग लेस..*

*'तू मला भेटू दिलं असतंस?' माझा प्रश्न.*

*'तू त्यांचा बाप आहेस.. म्हणजे तू त्यांना भेटावंस की नाही, हा प्रश्न वेगळा.. पण मी बापाचा अधिकार कसा नाकारू शकते?' ती बसायला खुर्ची शोधते. मी स्टूल तिच्याकडे सरकवतो.*

*मग एक शांतता.. ती शब्द गोळा करतेय.. ती काहीतरी ठरवून आलेय आणि ती काय ठरवून आलेय, याचा अंदाच घ्यायचा मी प्रयत्न करतोय.*

*'काय मिळवलंस, हे.. हे.. सगळं करून?' तिचा प्रश्न अचानक कानांवर येऊन आदळतो.*

*'हे विचारायला तू तंगड्या तोडत इथपर्यंत येणार नाहीस,' मी तिच्याकडे पाहतोय.. 'अर्थात पुढे जे काही होणार आहे, त्याला मीच जबाबदार आहे, असं तुला सुचवायचं असल्यास.. तुझा हेतू साध्य झाला आहे.' मी तिच्याकडे आता रोखून पाहतोय.. तिने राणी रंगाचा पंजाबी ड्रेस घातलाय.. त्यावर पांढऱ्या रंगाची.. लाल काठाची ओढणी.. ती दिसायला सुंदर, यात वादच नाही.. तिची राहणीसुद्धा तशीच.. आपण कसं दिसावं, या बाबतीत तिच्या ठाम कल्पना आहेत. ती ओठांवरून जीभ फिरवते. तिची लिपस्टिक पॅस्टल शेडची.. ती सहज आपल्या मोकळ्या केसांमधून हात फिरवते.*

*‘आपण वेगळं होण्याची वेळ आलेय..’ ती मनात जमा केलेले शब्द माझ्या पुढ्यात ओकते.. तो उकिरडा मी बराच वेळ पाहत राहतो.*

*‘तू काहीच बोलत नाहीयेस..’ ती काही वेळाने मला विचारातून जागं करते.*

*‘आणखी वेगळं कसं होतात?’ मी तिला विचारतो.*

*‘माझं आडनाव अजूनही हिर्लेकरच आहे..’ ती मला कायदेशीर जाणीव करून देते.*

*‘ते मी विसरलोच,’ मी कबुली देतो.*

*‘तू डायव्होर्सला विरोध करणार आहेस?’ ती मूळ विषयाला हात घालते, ‘म्हणजे त्यात काय अर्थ आहे? आपण नाहीच एकत्र राहू शकत.. आणि आता मला तुझा रागसुद्धा येत नाही. तू, तू आहेस.. मी, मी आहे.. काही वर्षातच आपले रस्ते वेगळे झाले.. इतकं साधं, सरळ, सोप्पं आहे..’ ती स्पष्ट.. पण मी गप्प..*

*मला पाहुणचाराची जाणीव होते.*

*‘तू चहा घेणार आहेस?’ मी विचारतो.*

*‘तू बैस.. विचार कर.. तोपर्यंत मी करते. त्यातून तुझा चहा, मला आवडत नाही,’ ती आत जाते. मी काय करायला हवं? तसा निर्णय सरळसोटच आहे. म्हणजे पुन्हा एकत्र येणं, राहणं, शक्यच नाही. जिथे सध्या ती राहते आणि पूर्वी आम्ही राहायचो तो ब्लॉकही तिचाच होता.. तिने तो विकत घेण्यासाठी कर्ज घेतलं होतं.. आपण तिथेही पाहुणेच.. आमच्या दोघांचे बँक अकाउंट्स स्वतंत्र होते.. तिथेसुद्धा गुंतागूंत नव्हती. मुलांचा प्रश्न आहे. पण त्याचाही विचार तिनं केला असणारच..*

*‘तुला मुलांची कस्टडी मिळणार नाही, याची तुला कल्पना असेलच,’ ती आतूनच बोलते. भांड्यांचा आवाज आणि काड्यापेटीतील काडी पेटवल्याचा आवाज शांतता संपवतात.*

*‘तुला त्यांना भेटायचा हक्क निश्चितच आहे. फक्त तूच ठरव, त्यात त्यांचं भलं आहे की, नुकसान!’ ती मॅटर ऑफ फॅक्ट..*

*‘म्हणजे?’ मी.*

*‘त्यांच्या जगण्यात तू गुंतागूंत का निर्माण करावीस? त्यांचं जग, ब्लॅक ॲण्ड व्हाइट आहे... ते तसंच राहिलेलं बरं नाही का? दूध आहे का रे?’ ती एकाच वेळी बऱ्याच असंबद्ध गोष्टींचा विचार करू शकते.*

*‘नाहीए..’ मी*

*‘काही हरकत नाही.. आपण बिनदुधाचा चहा पिऊ या.’ ती चहाचे कप घेऊन बाहेर येते.*

*'तुला कळतंय का, मी काय म्हणतेय ते? इन एनी केस, तुझ्या प्रायॉरिटीजमध्ये संसार, मुलं, तशीही नव्हतीच..' ती चहाचा कप माझ्या हातात देते आणि स्टुलावर टेकते.*

*'खूप घाई आहे का?' मी तिला विचारतो, 'मला विचार करायला वेळ हवाय.'*

*'थांबून परिस्थितीत काही बदल होणार नसेल, तर वेळ वाया का घालवायचा?' ती विचारते.*

*'म्हणजे मुलांसाठी बाप वाईटच का? त्यांना माझी बाजू कधीच कळू द्यायची नाही?' मी तिला विचारतो.*

*'आत्ता तरी मुलं तुझा विचार करू शकत नाहीत. त्यांना माझी गरज आहे. जेव्हा त्यांना कळायला लागेल, तेव्हा पाहू,' ती म्हणते.*

*'म्हणजे त्यांना बापाशिवाय वाढवणार आहेस?' मी तिच्याकडे पाहतो.*

*'मी पुन्हा लग्न करतेय.. श्रीराम.. चांगला आहे. त्याचं मुलांवर प्रेम आहे आणि त्यांनाही तो आवडतो,' ती सगळे पत्ते उघडे करते.*

*'तू प्रेमात वगैरे..' मी भोचक प्रश्न विचारतो. आता तिची प्रायव्हसी वेगळी झाली आहे, हे विसरून.*

*ती उत्तर देत नाही. पण ती स्वतःव्यतिरिक्त दुसऱ्यावर प्रेम करू शकते? ती तर स्वतःला न विसरू शकणारी. तरीही आत कुठेतरी एक कळ आली. ही आपली होती. एक पलंग आम्ही शेअर केला होता. एकमेकांच्या शरिराचा कानाकोपरा ठावूक होता आम्हाला. आणि आता.. ती दुसऱ्याची!*

*अचानक मला सगळ्याचा कंटाळा आला. जितक्या लवकर संपेल, तितकं बरं.. सर्जिकल ॲप्रोच हवा..*

*'कुठे सही करायची आहे?' मी तिला विचारतो.*

*'तू दुखावला गेलायस..' ती पर्स उघडून एक लिफाफा बाहेर काढते. हिरवट रंगाचे कायदेशीर कागद.. त्याच्यावर काही स्टँप्स चिकटवले आहेत.*

*तिच्या वाक्यावर प्रतिक्रिया द्यावी, असं मला वाटत नाही.*

*'वाच आणि मग सही कर,' ती अनाहुत सल्ला देते.*

*मी न वाचताच सही करतो. ती एक कागद माझ्या हातात ठेवते.*

*'एक कॉपी तुझ्याकडे ठेव.. वाचाविशी वाटली तर.. हो.. एक दिवस कोर्टात यायला लागेल. तू चहा प्यायला नाहीस..' मी स्तिमित होऊन तिच्याकडे पाहत राहतो. घटस्फोटाचा अर्ज, कोर्टात एक दिवस आणि चहा.. तिच्यासाठी सगळं एकच!*

*मी एका घोटात चहाचा कप रिकामा करतो. सेलिब्रेटिंग एण्ड ऑफ वन मॅरेज!!*

*'निघू?' ती उठून विचारते.*

*ती गेली. का कुणास ठावूक, खूप रिकामं रिकामं वाटलं.. म्हणजे आमचा संसार शेवटचा श्वास कधी घेतो, ते पाहणंच हातात होतं, यात वादच नाही. होणार होणार, असं वाटत असतं ती गोष्ट एकदा घडली की, जे रिकामेपण अनुभवायला येतं, तेच रिकामेपण मी अनुभवत होतो. ती किती सहजपणे हे सगळं हाताळत होती.. आणि आपण..*

...............................................

अचानक कोठडीचा दरवाजा उघडतो आणि गोखले आत शिरतो. त्याचा पोशाख काही वेगळाच होता. सिल्कचं धोतर.. त्यावर सिल्कचा झब्बा.. खांद्यावर जरीकाठी उपरणं, कपाळावर उभं गंध, कानात भिक्बाळी आणि डोक्यावर पुणेरी पगडी.. मला काही कळेच ना!

'हा काय विक्षिप्तपणा?' मी त्याच्याकडे पाहतोय.

'काय झालं?' गोखलेचा निरागस प्रश्न.

'मी माझा प्रश्न रिफ्रेज करतो.. ही काय विक्षिप्त वेशभूषा?' मो त्याला माझ्या शेजारी बसवतो.

'मला एक कळतच नाही प्रेमा.. मी जेव्हा एखादी गोष्ट पूर्ण मनापासून, समोरच्याला आनंद मिळावा, अशा उदात्त हेतूने करतो, तेव्हा लोकांना तो विक्षिप्तपणा का वाटावा?' तो हर्ट झाल्यासारखा.

'कोणाच्या समाधानासाठी ही वेशभूषा?' त्याने पुढे केलेली सिगारेट मी ओठांमध्ये ठेवली.

'थँक्स टू इन्स्पेक्टर वागळे.. त्यांना भेटूनच कोठडीत आलो. खूप ओशाळल्यागत झाले होते.. म्हणाले, 'साहेबांना माझ्या पोलीस स्टेशनच्या कोठडीत ठेवावं लागतंय ही माझी नामुष्की आहे. पण काय करू? हात बांधलेले आहेत.' मी त्यांना म्हणालो, 'वागळे साहेब, तुम्ही बोललात खूप झालं. इतकंसुद्धा कोणी बोलत नाही. सिगारेट्स नेल्या तर चालतील ना?' चक्क उठून उभे राहिले. हातात हात घेतला. म्हणाले,

'लाजवताय का? साहेबांनी सांगितलं असतं, तर पाकिटच पाठवलं असतं.' मी म्हणालो, 'अहो, म्हणूनच तो माझा मित्र आहे. स्वतःहून काहीच मागणार नाही. तुम्हाला अडचणीत आणणार नाही.'' त्याने सिगारेटसमोर लायटर धरला. मी दीर्घ झुरका घेतला. अठ्ठेचाळीस तासांत सिगारेट ओढलेली नव्हती.

'अरे, काल तीव्रतेने वाटलं, दाजीशास्त्रींना भेटावं. किती वर्षं वैर जपायचं! बरं, आता काही आम्ही गळ्यात गळे घालणं शक्य नाही. पण मरायच्या अगोदर मुलाचं तोंड पाहिलं नाही, हे दुःख घेऊन उराशी घेऊन त्यांनी राम म्हणावा, हे योग्य नाही. म्हटलं चला, त्यांना आनंद देऊ या. आता नव्वदी गाठली त्यांनी.. अतिशय कमी दिसतं. भलं मोठं भिंग डोळ्यांसमोर धरून पेपर वाचतात, असं कळलं होतं. म्हटलं, डोळ्यांमध्ये चेहरा ठसवण्यासाठी सजवायला हवा. पहिल्यांदा पगडीच भाड्याने आणली. नंतर विचार केला, फक्त पगडीच का? च्याआयला फुल टू बामन होऊया.. म्हणून मग पूर्ण मेकअप करूनच घरी गेलो. चित्पावन होऊन.. किती वर्षांनी.. प्रेमा, काही नाही.. घर जसे होते, तस्सेच..म्हणजे.. सांगाडा तसाच.. वरचं आवरण जीर्ण झालेलं.. खरं तर वाडा रया गेल्यासारखाच.. भिंतीचे पोपडे उडालेले, रंग विटलेला.. बैठकीतल्या गाद्यांमधला कापूस भोसकांडांतून बाहेर.. तक्क्यावरचे अभ्र.. कधी काळी पांढऱ्या रंगाचे असावेत, असे वाटणारे.. लामणदिव्यांच्या काचा कित्येक वर्षांत पुसलेल्या नसाव्यात.. तिच अवस्था झुंबरांची.. लाकडाला वाळवी लागलेली.. अंगण सारवलेलं सद्धा नव्हतं.. तुळशी वृंदावन ओकंबोकं.. रांगोळी वगैरे तर दूरच.. जरा रोमँटिक होतोय.. आईची खूप आठवण झाली. तोल गेल्यासारखा वाटला म्हणून कठडा धरला, तर तो कललाच.. तो काय बिचारा आधार देणार! दाजीशास्त्रींच्या खोलीत शिरलो.. खोलीत अंधार आणि कुबट वास.. पहिल्यांदा खिडकी उघडली.. दिवा लावला.. ते आरामखुर्चीत.. मान कलंडलेली.. कमरेला पंचा गुंडाळलेला.. वर सदरा.. त्यावर स्वेटर.. तशाच कलत्या मानेनं बोळकं वासलं.. बोबडे शब्द माझ्या कानावर आले.'

'प्रकाश दिसायलाही कष्ट पडतात.. पण तुमच्यासाठी खिडकी उघडली असेल, तर माझी हरकत नाही.'

'मी त्यांचा हात हातात घेत म्हणालो, 'दाजीशास्त्री, मी आलो आहे..' त्यांनी आपला हात सोडवला आणि शेजारचे सहा इंची भिंग थरथरत्या हातांनी डोळ्यांसमोर धरलं. मला न्याहाळू लागले. त्यांचा थरथरता हात माझ्या चेहऱ्यावरून फिरू लागला.

कपाळ, डोळे, नाक, ओठ, हनुवटी, गाल, कान.. त्यांच्या डोळ्यांच्या खोबणीतून पाणी ओघळत होतं. ते मी उपरण्याने पुसण्याचा प्रयत्न केला. 'कसे आहात,' मी त्यांना विचारलं. त्यांनी बोटांनीच मला गप्प राहण्याची सूचना केली. जवळ जवळ अर्धा तास माझा हात हातात घेऊन बसले होते. गप्प! नंतर हात खाली ठेवला आणि म्हणाले, 'तुम्हाला कामं असतील, निघा..' मी त्यांना म्हणालो, 'अहो, बोला काही तरी..' तर म्हणाले, 'सगळं वैर बोलण्यामुळे आलं.. शांतता बरी.. येत जा अधून मधून..' प्रेमा, त्या क्षणी बाप पोहोचला आपल्याला.. मीसुद्धा आग्रह धरला नाही. ती भेट काहीतरी बोलून गढूळ करण्यापेक्षा शांततेच्या निर्व्याजतेवर संपवणं, मलासुद्धा इष्ट वाटलं. तर तिथून डायरेक्ट तुला भेटायला..' गोखले काही वेळ सिगारेट ओढत बसला.. शांतपणे.

'आवडलं मला,' मी त्याला म्हणालो. आवाज घोगरा झाला हे सांगताना.

'काय?' तो स्वतःच्याच तंद्रीत.

'तू जे काही केलंस ते'

'ते जाऊ दे.. तुझं काय होणार आहे?' तो माझ्याकडे वळला.

'मी डिपार्टमेंटल चौकशीलासुद्धा घाबरलो नाही आणि कोर्टालासुद्धा.. माझ्या प्रत्येक एन्काउंटरनंतर मिळालेला पुरावा मी दस्तावेज केलेला आहे.. आय वॉज अॅट द फ्रंट.. फक्त मीच निर्णय घेऊ शकत होतो.. समोरची व्यक्ती अतिरेकी आहे की नाही.. इतर कोणीही ते ठरवू शकलं नसतं. ओन्ली वे टू स्टॉप अ टेररिस्ट इज टू किल हिम,' मी त्याच्याकडे पाहत म्हणालो.

'प्रेमा.. पण फिरोजचं काय?'

'मी त्याला मारलेलं नाही..' मी शांतपणे म्हणालो.

'यावर फक्त तुझा आणि माझा विश्वास बसेल. तो तुझ्या कस्टडीमध्ये होता आणि तिथून तो नाहीसा झाला.. रेकॉर्डप्रमाणे.. तू त्याला शेवटचा भेटला होतास,' गोखलेचा आवाज खोल गेला होता.

'वेल.. तो माझ्या कस्टडीतून नाहीसा झाला.. हे खरं आहे.. आणि त्याची जबाबदारी मला घ्यायलाच लागेल.'

'प्रेमा, माझ्या माहितीप्रमाणे फिरोज जिवंत आहे..' गोखले शांतपणे म्हणाला.

'तो कुठे आहे?' आता मी गंभीर झालो होतो.

'ते मला सध्यातरी ठावूक नाही.. बट त्याने बॉर्डर क्रॉस केलेली नाही.'

'मग तो सापडेल.'

'वेल.. त्याला ठार केलं नाही तर?' गोखले म्हणाला. मी गप्प झालो.

'प्रेमा, त्याच्या जिवाला जास्त धोका त्याच्या मित्रांकडूनच आहे,' गोखले धुराची वलयं सोडत म्हणाला.

'म्हणजे?' मी.

'अरे, तो सॉफ्ट टार्गेट आहे.. तुला इथंच डांबून ठेवण्यासाठी ते त्याला मारायलाही कमी करणार नाहीत,' गोखलेचे डोळे बारीक झाले होते. धुरातून त्याचा चेहरा स्पष्ट दिसत नव्हता.

'एवढी एकच शक्यता आहे?' मी त्याला विचारलं.

'तुला काय सुचवायचं आहे?'

'त्याला त्याचेच मित्र का मारतील? माझे हितचिंतक का मारणार नाहीत? ज्यांनी मला अटक करवली आहे, ते या टोकालाही जाऊ शकतात,' मी त्याच्यासमोर माझा संशय व्यक्त केला.

गोखले उठून उभा राहिला.

'काहीही घडू शकतं.. म्हणून फिरोज सापडायलाच हवा..' त्याने सिगारेटचं पाकीट माझ्या दिशेनं फेकलं आणि तो कोठडीबाहेर पडला.

मी बराच वेळ सुन्न बसून होतो. खरंतर फिरोज जिवंत आहे, या बातमीने मला उत्साह वाटायला हवा होता. माझ्यासाठी तो आशेचा अंधुक का होईना, किरण होता. पण मला उत्साही वाटत नव्हतं. उलट जसा वेळ जात गेला, तसा मी आणखीनच उदास होत गेलो. कशासाठी ही लढाई लढायची, हा प्रश्न मला भेडसावत होता आणि मला पटणारं उत्तर मला मिळत नव्हतं.

वॉज आय ए ट्रिगर हॅपी ऑफिसर? व्यवस्था अशी कशी बनली आहे की, आज माझ्यावरच माझा निर्दोषपणा शाबीत करण्याची वेळ यावी?

कुठेतरी वाचलेलं वाक्य सतत माझ्या डोळ्यांसमोर यायला लागलं. 'इट वुईल टेक फोर्स.. इट वुइल टेक व्हॉयलन्स ऑफ ॲक्शन टू क्रिएट अ सिच्युएशन व्हेअर देअर वुईल बी पीस..' आणि हेच खरं नव्हतं का? मला नाही अहिंसा कळत.. मनाचे परिवर्तन चर्चेनं मला नाही कळत..

मी प्रयत्न केला होता.. फिरोजबरोबर. तो बोलतो.. खूप बोलतो.. पण तो अतिरेकी नाही, याची मला खात्री होती.

*'तू मनाने चांगला आहेस.. तू चांगल्या घरातून आलेला आहेस.. तू का या लोकांमध्ये वावरतोस?' आम्ही दोघे त्याच्या सेलमध्ये बसलो होतो.*

*'मैं चला जाऊंगा.. इधरसे.. आप देखते रहना.. वो मुझे लेके जाऐंगे..' तो स्वतःच्या तंद्रीत होता.*

*'फिरोज, तुम ड्रग लेते हो?' मी त्याच्याकडे पाहत विचारलं.*

*त्याने त्याचा हात दाखवला. इंजेक्शनच्या सुयांची बारीक बारीक भोकं त्याच्या हातावर पसरली होती. त्याने हलकेच आपला शर्ट वर केला.. त्याच्या पोटावरही तशीच भोकं होती.. शेवटी त्याने आपली जिन् उघडली. त्याच्या मांड्यांवर त्याच खणा होत्या.*

*'मी तुझी मदत करेन.. तुला ड्रग्जमधून मुक्त करेन,' मी त्याला म्हणालो.*

*'मैं जाऊंगा.. बहोत देर नहीं लगेंगी.. मै, मेरे वतन में चला जाऊंगा.. माझा श्वास अडखळतो.. इथे.. उधार की जिंदगी जी रहे है.. कुछ नहीं बचनेवाला.. कुछ नहीं..'*

*तो अस्वस्थ होत होता. त्याला ड्रग्जची गरज होती. माझ्या दृष्टीने त्याला डॉक्टरची गरज होती. त्याच रात्री त्याला डी टॉक्सिफिकेशनसाठी हॉस्पिटलमध्ये हलवलं.*

*त्याची केस कठीण होती. त्याला भास होत होते.*

*'मुझे वो दिखाई देते है...' तो एकदा मला म्हणाला.*

*'कौन?' मी तो पाहत होता त्या दिशेला पाहिलं.*

*'मुझे लेके जाएंगे वो.. आप देखते रह जाओंगे..'*

*मी त्याच्याशी इस्लामवर बोलण्याचा प्रयत्न केला. पण त्याने तो धुडकावून लावला होता.*

*'तू काफीर आहेस.. तुझा इस्लामवर विश्वास नाही. मी तुझ्याशी बोलणार नाही,' त्याने तो दरवाजाही बंद केला होता.*

हळूहळू तो ड्रग्जच्या अमलाबाहेर आला. पण तो स्थिर नव्हता. रिलॅप्सची जबरदस्त शक्यता होती. पण आमच्यात संवाद होत नव्हता.

आणि एके दिवशी तो पळाला.. रेग्युलर तपासणीसाठी हॉस्पिटलमध्ये गेल्यावर आम्ही त्याचा ताबा गमावला.

मला तो धक्काच होता.. आणि त्यातून आजही मी सावरू शकत नव्हतो. त्याला मदतीची गरज होती. आणि तो मदतीपासून दूर पळत होता.

एकदा तो म्हणाला होता, 'कौन बताएगा.. वर्ल्ड ट्रेड सेंटर किसने गिराया.. मैं बताता हूँ.. ज्यूज्.. दे फोर्स्ड युएस टू डू वर्ल्ड ट्रेड सेंटर.. इस्लाम की गरिमांको खतम करनेंके वास्ते.. लेकीन इस्लाम.. इस्लाम वुईल शाइन.. अमेरिकन्स हार्ड नोज्ड है.. इट्स लाइक प्लेइंग फुटबॉल वुईथ समवन.. हू सेज.. ओन्लो आय कॅन स्कोअर गोल्स.. कश्मिरमें यही हो रहा है.. इंडिया और अमेरिका.. टू साइड्स ऑफ वन कॉइन.. इट्स पॉवर स्ट्रगल.. इट्स नॉट अबाउट पिपल.. इट्स अबाउट लँड.. हु वुईल ओन दी लँड ?' तो असं कधी कधी बोलत राहायचा.

शेवटचं वाक्य मात्र माझ्या आठवणीत कोरलं गेलं होतं.

' इट्स नॉट अबाउट पिपल.. इट्स अबाउट लँड.. हु वुईल ओन दी लँड ?'

लोकांची पर्वा कुणालाच नव्हती.. ना आर.. ना पार..

सगळ्या शोकांतिकेचं हेच तर मूळ कारण होतं.

…………………………………………………

कोठडीचा दरवाजा उघडला. समोर ती उभी होती.. आशू.. मी स्तंभित होऊन तिच्याकडे पाहत राहिलो.

'सगळा सारासार विचार, सगळे सल्ले, मागितलेले, न मागितलेले, सगळी मॅच्युरिटी लाथाडून मी आले आहे.. तुला भेटणं.. तुझा हात धरणं.. तुझ्याबरोबर राहणं..


सगळ्यापेक्षा मला जास्त महत्त्वाचं वाटलं.. सोऽऽ हिअर आय ॲम.. प्रेमानंद हिर्लेकर!' ती हसत होती.

मला एकच विचार आठवत होता.

'जेव्हा एक दरवाजा तुम्हाला बंद होतो.. तेव्हा दुसरा कुठे ना कुठेतरी नक्की उघडत असतो.'

मी तिने पुढे केलेला हात हातात घेतला.

जगायला एक कारण.. लढायला एक कारण..श्वासोच्छवास करायला एक कारण.. त्या स्पर्शातून मिळत होतं.



# नऊ

# पसरिचा

'नो, नो, नोऽऽऽ... आय वॉण्ट दी आर्टिकल पोझिशण्ड प्रॉपर्ली.. ते संपादकीय पानावरच यायला हवं. सॉरी जेकब.. हा माझा निर्णय आहे. आणि मी संपादकीय अधिकार ललित सिबल किंवा त्यांच्या मुलाकडे अजून गहाण टाकलेला नाही.' मी खूप संतापून बोलत होतो. प्रेमानंद हिर्लेकरची स्टोरी मारण्याचा पद्धतशीर पयत्न ललित सिबलचा मुलगा करत होता. साम.. दाम.. दंड.. अशा सर्व मार्गांचा तो वापर करत होता. प्रेसमधला अधिकारी वर्ग, कर्मचारी, सगळेच गोंधळू लागले होते. मालकाच्या डायरेक्ट आज्ञा ऐकायच्या की, संपादकाचा निर्णय मान्य करायचा? मी इतक्या सहज शरणागती पत्करणारा नव्हतो. गरज पडली, तर 'इस पार या उस पार' करायचीही माझी तयारी होती.

पण माझे फोनवरचे संभाषण तिथेच खुंटले.

आता जे काही आठवते आहे.. ते म्हणजे आठवणींचे तुटक तुकडे..

तो आवाज कानांचे पडदे फाडून टाकणारा होता आणि त्या आवाजाअगोदर.. अगदी स्प्लिट सेकंद अगोदर... जो प्रकाश दिसला, तो डोळ्यांपुढे अंधारी पसरवणारा होता. ब्लडी फकर्स!

मादरच्योद... भडव्यांनी जबरदस्त स्फोट घडवला होता.

मी अनुभवलेला पहिला बॉम्बस्फोट!

नो.. आणखी काही वेळातच दुसरा बॉम्बस्फोट झाला आणि मी शुद्धी आणि बेशुद्धी यांच्यामधल्या एका तरल सीमारेषेवर पोहोचलो.

समहाऊ त्या स्फोटांमुळे काही वेळ शरीरावरची सर्व नियंत्रणे शिथील झाली आणि काही कळायच्या आतच मी पॅण्टमध्ये फळाफळा मुतलो. त्याची लाजही वाटत

नव्हती... म्हणजे त्या जाणिवेच्या पलिकडे होतो मी. मला कळत होते की, मला मदतीची गरज आहे. पण मदत का मिळत नाहीए, हे मला उलगडत नव्हते.

माझ्या गाडीचा ड्रायव्हर, शंकर, दिसेनासा झाला होता.

'शंकर.. शंकर.. तू कुठे आहेस? यार मला गाडीबाहेर पडायला मदत कर,' मी बडबडत होतो. मी कुणाशी बोलत होतो? कोणाला सांगत होतो? कारण ड्रायव्हरच्या जागेवर शंकर नव्हताच. म्हणजे काही क्षणांपूर्वी तरी तो गाडी चालवत होता... पण अचानक दिसेनासा झाला होता. समोरच्या विंडस्क्रीनची काचही दिसत नव्हती. ड्रायव्हरच्या बाजूचा दरवाजा दिसत नव्हता. काहीतरी.. नाही.. काहीतरी नाही... पण मांस जळल्याचा वास येत होता.

काही वेळाने मी परिस्थितीला शरण जायचे ठरवले... आणि आहे त्या जागी निपचित पडून राहिलो. कुठलीही हालचाल करण्याच्या मी पलिकडे गेलो होतो. आजूबाजूच्या जगाची जाणीव हळूहळू विरळ होत चालली होती. माझी शुद्ध हरपत होती. आवाजांची तीव्रता क्षीण होत चालली होती. एक बधिरता शरीर जड बनवत होती. शुद्ध हरपायच्या अगोदर एकच गोष्ट मला तीव्रतेने जाणवली की, माझा श्वास सुरू होता आणि मी जिवंत होतो.

...........................

माझ्या डोळ्यांवर पखर प्रकाश पडला होता. मला खूप संताप येतो. मला प्रखर प्रकाश आवडत नाही. डोळ्यांवर तर अजिबात नाही. सगळ्यांच्या शिव्या खातो.. पण माझ्या ऑफिसच्या ब्लाइंड्स मी कधीच उघडत नाही. मिटलेल्या डोळ्यांनाहो तो प्रखर प्रकाश जाणवत होता. सगळे असे निष्काळजी, बेफिकीर, संवेदनारहीत कसे झाले आहेत? पण मी माझा संताप व्यक्त करू शकत नव्हतो. मेंदूत निर्माण होणारा संताप चेहऱ्यावरच्या स्नायूंपर्यंत पोहोचतच नव्हता. इंपोटण्ट झाल्यासारखं वाटत राहिलं.

मला जाणवते की, कोणीतरी माझ्या पॅण्टच्या बटणांशी खेळत आहे. मला तो हात झिडकारायचा होता. पण मी प्रतिकारच करू शकत नव्हतो. कदाचित स्वप्न आहे का हे? ब्लडी शीट! माझी पॅण्ट उघडली गेलीआहे. हळूहळू ती माझ्या शरीरावरून खाली सरकते आहे. भेन्चोद.. मला नागडे करताहेत की काय! मला असे प्रकाशात नागडे व्हायला आवडत नाही. माझ्या शरीराचा आकार बेढब झालाय, कोणालाही दाखवायच्या लायकीचे उरलेले नाही! अंधारात.. झाकली मूठ सव्वा लाखाची!

एका वेदनेची ठिकरी माझे संपूर्ण शरीर चिरत जाते.. मी उत्स्फूर्तपणे किंचाळतो.. कोणीतरी मुर्ख माझ्या केसांमधून हात फिरवतोय.. तो हातसुद्धा मला झिडकारायचा आहे. माझी लायकी नाही.. कोणी माझ्या केसांतून हात फिरवायची. आय ॲम बियॉण्ड लव्ह.. अफेक्शन.. मी निवडुंगासारखा झालोय. मला हसू येतं, पण मी हसू शकत नाहो. केसांत हात फिरवून वेदना कमी होते का? विशेषतः ती वेदना जर का शारीरिक असेल तर? स्टुपिड फूल्स.. इडियट्स..!!

मला थंडी वाजतेय.. प्रचंड थंडी वाजतेय.. शरीराची हालचालही करू न शकणारा मी प्रचंड थरथरू लागतो. ते थरथरणे इतके तीव्र की, मला वाटू लागते की.. की.. मी व्हायब्रेटरवरच आहे. मला ब्लँकेटची गरज आहे. त्यांनी मला व्यवस्थित पांघरूण घालायला हवे. पण.. कुणालाही पर्वा नाहीए.. आणि कितीही चिडलो, तरी आपण कुणाचे काही झाटसुद्धा वाकडे करू शकत नाही.. शेवटी मी पुन्हा एकदा शरण जातो.. ठरवून नाही.. हे सगळे आपोआपच घडत जाते. कुठलीही गोष्ट जाणीवपूर्वक होतच नाही.. आजूबाज्च्या जगाची जाणीव हळूहळू नष्ट होऊ लागते.

तहानेच्या जाणिवेने मला पुन्हा एकदा आजूबाजूच्या जगाची जाणीव होते.. मला खूप तहान लागली आहे. मी डोळे किलकिले करतोय. आता डोळ्यांवर प्रखर प्रकाश नाहीए.. पण आजूबाजूला मंद.. निळसर प्रकाश पसरलाय. हा प्रकाश कुठेतरी पाहिल्यासारखा.. हॉस्पिटल? माझ्या अंगावर मऊशार पांघरूण आहे. मी माझा उजवा हात हलवायचा प्रयत्न करतो. उजवाच का?.. माहिती नाही. म बी कारण मी नैसर्गिकरित्याच उजवा आहे. तो हात सहज हलतो. माझा उजवा हात मी पांघरूणाखाली माझ्या शरीरावर ठेवतो. ब्लडी हेल! माझ्या अंगावर एकही कपडा नाही. आय ॲम इन माय बर्थ डे सूट!.. समहाऊ माझे नागडेपण.. एक वेगळीच

असहायता जाणवून देते. म्हणजे आपण उठून या पांघरूणाबाहेरही पडू शकत नाही. तहान! आता पाणी कोण पाजणार आहे?

मला माझ्या डाव्या बाजूला एक प्लॅस्टिक ट्युब दिसतेय. मी तिचा प्रवास शोधायचा प्रयत्न करतो. वरती ती एका बाटलीला जोडलेली आहे आणि तिच्यावरून घरंगळत माझी नजर खाली येते.. शीट्! ती माझ्या डाव्या हाताला जोडलेली आहे! तिच्यातून एक पिवळसर रंगाचा द्रव माझ्या शरीरात थेंब थेंब झिरपतो आहे. आय्.. व्ही! सुई जिथे माझ्या व्हेनमध्ये खूपसली आहे, तिथे खूप कापूस, पट्ट्या यांचा मारा आहे.

हे हॉस्पिटलच आहे! हे थोडे आश्वासक. म्हणजे कुणीतरी माझी काळजी घेते आह! आय फील बेटर. माझा डावा हात फारसा हलू शकत नाही कारण त्याला आय्. व्ही. जोडलेले आहे. पण उजवा हात हलतोय. मी माझ्या शरीराचा ताळेबंद घ्यायचं ठरवतो. नुकसानीचा प्राथमिक अंदाज! मी माझा उजवा हात हळूहळू डोक्याकडे नेतो. माझ्या बोटांना डोक्यावरच्या तुरळक केसांचा स्पर्श होतो. डोक्यावर बॅण्डेज नाहीए.. खूप मोठा रिलिफ!! भेन्चोद.. आपण एडिटर.. डोक्यानेच काम करणार!! डोके डॅमेज्ड म्हणजे आपण आऊट ऑफ बिझनेस!

माझा हात चेहऱ्यावर उतरतो. एक निःश्वास! सुटकेचा! चेहरासुद्धा बचावला आहे. एक दोन पट्ट्या आहेत चेहऱ्यावर, पण डोळे शाबूत आहेत. मी जबडा हलवायचा प्रयत्न करतो. त्या हालचालीत थोडासा अडथळा जाणवतो.. थोडीशी वेदनाही होते. पण ती वेदना असह्य नाही. छातीवर मात्र भलेथोरले बॅण्डेज आहे. सगळी छातीच बॅण्डेजने झाकली गेली आहे. अचानक माझी छातीच मला शरीराचा सर्वात महत्त्वाचा अवयव वाटू लागली. म्हणजे छातीला एवढी मोठी जखम असेल, तर काहीही होऊ शकतं. इज धिस दी एण्ड? फक्त एकच वस्तूस्थिती या भीतीला छेद देत होती. आणि ती म्हणजे माझा श्वासोच्छ्वास सुरू होता. पर्यायाने माझी फुफ्फुसे आणि हृदय.. दोन्ही काम करत आहेत. म्हणजे जखम.. बाह्यस्वरूपी असण्याची शक्यता जास्त होती. मला बरे वाटते. म्हणजे माझी जगण्याची शक्यता वाढते.. तसा माझा जगाकडे पाहण्याचा दृष्टीकोनही बदलतो.

माझा हात माझ्या शरीराच्या खालच्या भागावर फिरतो. मात्र तो गुढघ्याच्या खाली पोहोचत नाही. गुढघ्यापर्यंतच्या शरीरावर जखम नव्हती. ॲटलिस्ट कुठेही पट्ट्या..

बॅण्डेजेस नव्हती. मग मी हलकेच माझा उजवा पाय हलवून बघितला. त्याची हालचाल मला एकदम मोकळी वाटली. पाय हलवताना कुठेही दुखलं नाही. मी डावा पायसुद्धा हलवून पाहिला. तोसुद्धा मोकळा वाटला. त्याची हालचाल सहज वाटली... कुठलीही वेदना न जाणवता. मी सुटकचा निःश्वास सोडला. तुमचे हातपाय शाबूत आहेत आणि डोके सलामत आहे, म्हणजे काहीही शक्य आहे! माझ्या चेहऱ्यावर नकळत एक हास्य उमटले. माझे हे उद्योग सुरू असतानाच खोलीचा दरवाजा किंचितसा किलकिला झाला आणि नंतर पूर्ण उघडला. एक व्यक्ती खोलीत शिरली. म्हणजे, मी त्या व्यक्तीला ओळखू शकलो नाही. तिच्या चेहऱ्यावर चष्मा होता.. डोक्यावर भुरभुरणारे, सुंदर, राखाडी केस.. त्या कमी प्रकाशातही डोळे विलक्षण बुद्धीमान वाटत होते. तिच्या अंगावर निळसर लेंगा, वर.. निळसर हाफ टी-शर्ट.. बंद गळ्याचा.. कॉलर नसलेला. पायात पांढऱ्या रंगाच्या स्लिपर्स आणि गळ्यात सहज लटकलेला स्टेथस्‌स्कोप होता. त्या व्यक्तीने माझ्याकडे पाहिले आणि तिच्या चेहऱ्यावर मंद हसू उमटले.

'मला वाटलेच होते की, तुम्ही आता शुद्धीवर आला असाल.'

मीसुद्धा काही बोलायचा प्रयत्न केला, पण तोंडातून शब्द फुटण्याऐवजी एक उमासा उमटला. मला ओकारी येते आहे, असे वाटले. श्वास अडकला. ती व्यक्ती पटकन पुढे आली आणि तिने माझ्या ओठांखाली एक स्टीलचा ट्रे पकडला.. आणि मला कम्फर्ट करायला सुरुवात केली.

'काही काळजी करू नका.. पोस्ट ऑपरेशन असं होतं.. थोड्या वेळाने बरं वाटेल. घशाला कोरड पडली असेल ना?' त्या पुरुषाच्या आवाजात एवढे मार्दव कसे?

मला ओकारी झालीच नाही. कोरडे उमासे.. पोटात काही नव्हतेच म्हणा. पण त्या श्रमानेही मला इतका थकवा आला की, ग्लानी आल्याप्रमाणे मऊशार उशीवर डोके टेकवून मी पडून राहिलो.

'ईश्वराची तुझ्यावर फार मोठी कृपा आहे,' त्या व्यक्तीने बोलता बोलता सहज माझा हात हातात घेतला होता.. माझी पल्स चेक करण्यासाठी.

'मृत्यू आणि तुम्ही.. यात फक्त काही मिलीमीटरचे अंतर होते,' तिने आता माझ्या बेडशेजारच्या टेबलवरून एक पॅड उचलले आणि त्यावरच्या नोंदी ती व्यक्ती वाचू लागली.

'गूड..' तिच्या चेहऱ्यावर समाधान.

'मो.. हॉस्पिटलमध्ये आहे.' माझ्या तोंडून एक सरळ, अर्थवाही वाक्य उमटले.

'येस्'

'काय झालं आहे.. मला?'

'आत्ताच जाणून घ्यायचं आहे?'

'साहजिकच'

'नका बोलू.. तुमच्या घशाला जास्त कोरड पडेल. अजून बारा तास तुम्ही पाणी पिऊ शकत नाही.'

'तुमचं नाव..? म्हणजे, आपली या अगोदर ओळख.. नाही.'

'ऑफकोर्स.. कशी असेल?.. डॉ. साने.. थोरॅसिक सर्जन.. वुईथ स्पेशलायझेशन इन.. व्हॅस्क्युलर सर्जरी.. मी.. तुमच्यावर शस्त्रक्रिया केली.. आता मी म्हणू शकतो, यशस्वी! तुमच्या जिवाला आता धोका नाही,' डॉ. साने.

मी त्यांनी दिलेली माहिती पचवायचा प्रयत्न करत होतो.

'आय हॅव अ बॅड हार्ट कण्डीशन..' मी खोल आवाजात त्यांना माहिती पुरवतो.

डॉ. सानेंच्या चेहऱ्यावर मंद स्मित. ॲज इफ.. ते मला सांगत होते.. मी छाती फाडून आत सगळे पाहिलेले आहे, तू काय सांगतोयस मला! कॅरिंग कोल्स टू न्यू कॅसल?

'माझे कसले ऑपरेशन झाले आहे?' मी पुन्हा एकदा त्यांची नजर पकडत विचारतो.

'ओके.. मी थोडक्यात सांगतो.. ते ऐकायचं.. पण आणखी प्रश्न विचारायचे नाहीत.. यू नीड रेस्ट..'

हे बोलेपर्यंत त्यांनी इंजेक्शनची सिरिंज भरलेली आहे. सुईच्या टोकावरच्या एका थेंबाकडे ते एकाग्र चित्ताने पाहत आहेत.

'मिस्टर पसरिचा.. तुम्ही एका बॉम्बस्फोटातून वाचला आहात. या स्फोटामुळे उडालेला एक काचेचा तुकडा तुमच्या छातीला भेदून आत जाऊन बसला.. अगदी तुमच्या हृदयापासून काही मिलीमीटर अंतरावर.. खूप रक्तस्राव झाला.. कारण त्या काचेच्या तुकड्याने आजूबाजूच्या व्हेन्स कापून टाकल्या होत्या.. तुम्ही थोडक्यात बचावलात.. म्हणतात ना, काळ आला होता, पण वेळ आलो नव्हती,' डॉ. सानेंनी एका दमात सर्व माहिती पूर्ण केली आणि आय्. व्ही. मध्ये सिरिंजची सुई खुपसली आणि आतला द्रव त्या प्लॅस्टिक नळीत रिकामा केला.

माझ्या डोक्यात विचारांचे चक्र सुरू झाले. माझी गाडी.. ट्रिब्युन टॉवर्सच्या गेटमधून आत शिरत होती. समोर एक एसयुव्ही वाट अडवून उभी होती. माझ्या संतापाचा पारा वर चढत होता. लोकांना सिव्हिक सेन्स नाही.. कुठेही गाड्या उभ्या करतात.. मी शंकरला हॉर्नवरचा हात काढू नको, म्हणून सांगितले. शेवटी ती एसयुव्ही हलली आणि शंकरने आमची गाडी पार्किंगच्या दिशेने वळवली. त्याचवेळी प्रखर प्रकाशाने मला अंधारून टाकले आणि नंतर कानठळ्या बसवणारा स्फोटाचा आवाज... प्रतिक्षिप्त क्रियेप्रमाणे माझे डोके पुढच्या सीटच्या पाठी.. खाली झुकले. खरे तर ते तसेच राहायला हवे होते. पण माझ्यातला पत्रकार उफाळून वर आला. काय होते आहे, ते आपण आपल्या डोळ्यांनी टिपायला हवे, असे वाटले. हा माझा व्यवसाय आहे, माझा धर्म आहे.. मी सरळ होऊन खिडकीबाहेर पाहू लागलो. त्याचवेळी पुन्हा एक प्रखर प्रकाश.. कानठळ्या बसवणारा आवाज आणि मग छातीत तीव्र वेदना.. आणि शुद्ध हरपते.. पण शंकर?? मला तीव्रतेने शंकरची आठवण होते. मला त्याची चौकशी करायची आहे. माझ्या ओठांची पुसटशी हालचाल होते आणि नंतर माझे शरीर, माझे मन विरळ विरळ होत जाते.. अंधार मला घेरून येतो. सर्व जाणीवा, नेणीवा हिरावून घेणारा.. गिळंकृत करणारा अंधार!

त्या अंधाराला मी शरण जातो!

आय ॲम लॉस्ट!!

......................................

सध्या मी माझे ऑफिस घरातच थाटले आहे. ललित सिबलची कृपा. म्हातारा प्रेमात आहे.. आणि मी.. स्वतःच्या प्रेमात आहे. काहीच न करता हिरो होणे, म्हणजे एक एक्सायटिंग अनुभव. म्हणजे, मी बॉम्बस्फोटाचा टार्गेट होतो की नव्हतो, हा एक अनुत्तरीत प्रश्न. पण बॉम्बस्फोट झाला, तेव्हा मी तिकडे होतो आणि मरायच्या ऐवजी वाचलो होतो. आणि त्यामुळे पुढचे सोहळे पाहायला मोकळा होतो.

थट्टा बाजूला ठेवली, तर विश्रांती घ्यायला वेळच नव्हता. पोलीस तपास आणि अतिरेक्यांचा मुख्य उद्दश शोधून काढणे आवश्यक होते. पोलीस तपास त्यांच्या गतीने चालू होता. पण आमच्या नेटवर्कवरही भरपूर खबरा येत होत्या. त्यांचा अभ्यास करून.. त्यांची विश्वासार्हता तपासणे, हे मोठे काम होते. अशा वेळी बातम्यांचे.. खबरांचे पीक निघते. बहुतांश निर्मित-मॅन्युफॅक्चर्ड असतात. आणि तरीही या निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी त्यांचा अभ्यास करावाच लागतो.

पण सर्वात त्रासदायक होते, सिगरेटवर बंदी आणि अल्कोहोलवर बंदी! या सगळ्यावर आशुची नजर. अर्ध्या तासाच्या वर मी सलग काम केले की, तिचा वॉर्निंग सिग्नल येणारच.

'मला वाटतं पाशी, तू जरा अतीच करतो आहेस.. तुला विश्रांतीसुद्धा घ्यायलाच हवी.. तब्बेतीच्या रस्त्यावर आपल्याला अजून खूप अंतर काटायचे आहे.' आशुने सध्या माझ्याच घरी मुक्काम ठोकला आहे. माझी केअरटेकर म्हणून. म्हणजे तिला मी विनंती करायचा किंवा तिने मला विचारायचा प्रश्नच आला नाही. इट वॉज गिव्हन! एक तर मला नर्स हा प्रकार आवडत नाही. माझ्या शरीराच्या बाबतीत मी अत्यंत प्रायव्हेट माणूस आहे. आणि त्याच्या स्वच्छतेसाठी अजून काही आठवडे तरी मला कुणाच्या तरी मदतीची गरज होती.

शंकरचा मृत्यू मी अजूनही पचवू शकलो नव्हतो. सध्या त्याने माझ्या रात्रींचा ताबा घेतला होता. त्याचा छिन्नविछिन्न चेहरा आणि ठिकऱ्या उडालेले शरीर स्वप्नात येऊन सगळी रात्र उध्वस्त करायचे. घामाने डबडबलेला मी भरकटल्यासारखा आरडाओरडा करायला लागलो की, मला झोपेचे इंजेक्शन देण्याखेरीज आशुसमोर दुसरा पर्यायच उरत नसे. वाईट एकाच गोष्टीचे वाटत होते की, मी अजून शंकरच्या घरी जाऊ

शकलो नव्हतो.. त्याच्या बायकोचे, मुलांचे सांत्वन करू शकलो नव्हतो. आपला व्यक्तिगत ड्रायव्हर आपल्या आयुष्यात किती खोलवर घुसला आहे, हे कळण्यासाठी असे काही घडावे लागत असेल, तर ते दुर्दैवीच!

त्या सगळ्यांना मागे ठेवून, मी नुकत्याच आलेल्या संपादकीय पानाला माझ्या संगणकाच्या मोठ्या पडद्यावर पाहत होतो. अपेक्षेप्रमाणे आशुच्या लेखमालेतले आठवे आर्टिकल डोळ्यात भरत होते. पण बाकीचा ले आऊट अगदीच भुक्कड होता. अजून रागावर संयम मिळालेला नव्हता त्यामुळे सगळ्याच टीमची खरडपट्टी सुरू झाली.

'पाशी.. स्पंजिंगची वेळ झाली आहे..' आशुचा निर्वाणीचा निरोप. मी माझे बोलणे आणि संताप आवरता घेत बाथरूम गाठले. अंगावरचे कपडे उतरवताना पुन्हा हात अडखळतो. आशुला काहीच वाटत नाही. पहिल्या दिवशी तर मी अंडरवेअरच काढली नव्हती. तिनेच ती खस्सकन ओढून काढली.

'कसली लाज वाटते तुला?'

'अगं पण..' मी माझी लाज झाकायचा केविलवाणा प्रयत्न करतो.

'इडियट्.. यू आर सिक.. आजारी आहेस तू.. त्यातून तू आपल्या शरीराची एवढी वाईट अवस्था केली आहेस..'

'वाईट!'

'तुला काय वाटतं? अरे एखादं पिंपसुद्धा बऱ्या आकाराचं असतं.. तुझं शरीर पाहून कोणीही सेक्शुअली अराऊज होऊ शकत नाही.' शब्दांच्या एका फटकाऱ्यात ती मला महत्त्वाच्या परीक्षेत नापास करून टाकते. पण ती म्हणतेय ते सत्य आहे. मी माझ्या शरीराला शक्य तितके बेढब बनवले आहे. स्पंजिंगही मला खूप थकवते आणि मी माझ्या खोलीत येऊन गादीवर लवंडतो. पण खूप बरे वाटत आहे. आशुही आता मला.. माझ्या आईसारखीच वाटायला लागली आहे. कोण कुणासाठी, कुणाचे रूप घेईल.. काही सांगता येत नाही.. हेच खरे.

'आता खरंतर प्रेमानंद हिर्लेकरची जास्त गरज होती.' मी मिटलेल्या डोळ्यांनी म्हणतो. ती काहीच बोलत नाही.

'या बॉम्बस्फोटांचा सूत्रधार कोण.. ते कळायला हवे.' मी.

तिचा प्रतिसाद शून्य!

'माझा या सरकारवर विश्वास नाही.. पूर्ण सत्य ते लोकांपर्यंत पोहोचू देणार नाहीत,' मी.

ती घरात आहे की नाही?

'माझी बातमी अशी आहे की.. एटीएस, फक्त सीएम्‌ला या तपासाबाबत रिपोर्ट करतंय.. आणि सीएम्.. डायरेक्ट पीएम् आणि गृहमंत्र्यांना.. इव्हन देअर कम्युनिकेशन लाइन इज सॅनिटाइझ्ड! काहीही लीक होणार नाही, याची पुरेपूर काळजी घेताहेत..'

ती माझा ब्रेकफास्ट घेऊन माझ्या खोलीत येते. व्हाइट ऑफ टू एग्ज.. बेड.. ओट्स.. पॉरिज् आणि माझा आवडता दार्जिलिंग चहा.. ब्लॅक.. जस्ट द वे, आय लाइक इट.. मी त्या चहाचा सुंदर अॅरोमा अनुभवत राहतो.

'तू ब्रेकफास्ट?' मी तिला विचारतो.

'करणार ना.. ब्रेड आणि चहा..' ती स्वतःशीच बोलल्याप्रमाणे.

'आशु, काय झालंय?' मी जरा चिडक्या स्वरात.

'का?' ती अनाहूतपणे ब्रेड टोस्ट उचलत.. खात नाहीए.. पण हातात चाळा म्हणून.

'मी मघापासून काय भिंतीशी बोलतोय?' मी.

आता ती माझ्याकडे रोखून पाहते.

'पाशी, तुझे स्वतःबद्दलचे काही गैरसमज आहेत,' ती शांत.

मी आता तिच्या हल्ल्याची वाट पाहतो आहे. ही शांतता वादळापूर्वीची नाहीए ना?

'तुला असं वाटतं की, जग तुझ्यापाशी सुरू होतं आणि तुझ्यापाशी संपतं.. आणि तुझ्यापुरतं ते खरंही असू शकतं.. मी नाही म्हणत नाही.. पण ते इतरांसाठी खरं नसतं.. तू मला खूप महत्त्वाचा आहेस.. तू मला खूप जवळही आहेस.. पण काही वेळेला आपल्या गरजा आणि त्यांचं महत्त्व.. वेगवेगळं असू शकत नाही का? प्रॉयॉरिटीज!' तिच्या डोळ्यांमध्ये अश्रू डोकावल्याचा भास मला झाला.

तसे तिचे म्हणणे खरे आहे. लाईफ बिगीन्स अॅण्ड एण्ड्स वुईथ मी. पण प्रत्येक यशस्वी पुरुषाची किंवा स्त्रीची हीच तर गोची असते ना!

'आय ॲम सॉरी किड्,' मी मनःपूर्वक तिची क्षमा मागतो.

'मला प्रेमाची काळजी वाटते,' ती माझ्याकडे पाहत म्हणते.

'काळजी?' मला कळतच नाही.

'त्याला एव्हाना जामीन मंजूर व्हायला हवा होता,' ती स्वतःशीच बोलल्याप्रमाणे.

'आज ना उद्या, तो मिळणारच आहे.' मी तिचे बोट पकडतो.

'मला भीती वाटते..' ती.

'कसली?'

'त्याच्यासारखा माणूस एका ठिकाणी बंदिस्त असता कामा नये.. तो निशाणा बनू शकतो.'

'टार्गेट?'

'एका ठिकाणी स्थिर असलेली व्यक्ती निशाणा साधायला योग्य आणि सोप्पी नाही का? इट्स व्हेरी डिफिकल्ट टू टार्गेट मूव्हिंग ऑब्जेक्ट.'

आता मला तिची भीती समजते.

'माझा मोबाइल दे.' ती माझा मोबाइल माझ्याकडे देते.

मी ललित सिबलच्या मोबाइलवरच फोन लावतो. सीएमसुद्धा त्यांना मोबाइलवर फोन करताना दहा वेळा विचार करतात. एक अलिखित नियम. अत्यंत तातडीच्या वेळेसच मोबाइल वापरायचा.

'पाशी, व्हाट द हेल! व्हॉट्स रॉंग? हॅव यू सफर्ड ॲन हार्ट ॲटॅक?' त्यांचा आवाज माझ्या मोबाइलचा इअरफोन फाडून खोलीत घुमतो. त्याही परिस्थितीत मला हसू आल्याशिवाय राहत नाही.

'मला तुमच्या हस्तक्षेपाची गरज वाटतेय. प्रेमानंद.. नो.. नो.. तो जामिनावर सुटावा म्हणून नाही, पण त्याला सेफ हाऊसची गरज आहे. किंवा त्याला मूव्हिंग ठेवण्याची गरज आहे.. म्हणजे मी तुम्हाला का, ते सांगू शकतो.'

'यू इडियट, आय ॲम नॉट ए सेनाइल ओल्ड मॅन.. बट् यू फकर.. त वरून ताकभात कळतो मला.. मूव्हिंग ऑबजेक्ट इज डिफिकल्ट टू फायर ॲट्' त्यांचा आवाज पुन्हा घुमतो.

'माझा तुमच्याबद्दलचा आदर द्विगुणित झालाय,' मी प्रामाणिकपण म्हणतो.

'फक यू.. पण एका प्रश्नाचं उत्तर दे..' – सिबल , 'ॲण्ड यू काण्ट क्वोट मी.. पण जर का तो टार्गेट व्हावा, अशी कुणाची इच्छा असेल, तर?'

मला असं वाटलं की, कुणीतरी मला खोल खोल दरीत ढकलून देत आहे.

'तुम्ही काय सुचवत आहात, तुम्हाला कल्पना आहे?' मी आशुच्या पांढऱ्याफटक चेहऱ्याकडे पाहत त्यांना विचारले.

'येस्.'

'कोण असेल? म्हणजे कोणाला प्रेमानंदचे जगणे नको असेल.. दहशतवादी सोडले तर..' –मी

'कुणीही! तुला काय वाटतं.. तो मित्रांच्या घोळक्यात आहे?'– सिबल

'दॅट्स नॉट जर्नालिस्टिक ॲन्सर.. इट्स पोलिटिकल ॲन्सर..'–मी

'लेट मी मेक फ्यू कॉल्स.. मग मी तुझ्या प्रश्नाचे उत्तर देईन.. बट नॉट ओव्हर फोन..' आणि त्यांनी फोन डिस्कनेक्ट केला.

खोलीत सन्नाटा पसरला आहे. मी आशूकडे पाहू शकत नाही. ती उठते आणि माझ्या शेजारी येऊन बसते. मी तिला जवळ ओढतो. खरे तर आता मी सुद्धा थरकापलो आहे.

'चहा घे.'

'पाशी, मी हल्ली सतत घाबरलेली असते. आता तू.. प्रेमानंद.. ह्यांना गमावणे सहन करता येईल, असं वाटत नाही.'

'मुर्ख आहेस तू आशू.. नातेसंबंध मालकी हक्कांसारखे नसतात, हे तुलाही माहिती आहे.. वुई मोट, वुई पार्ट.. ॲण्ड दॅट्स लाइफ.. लाइक माय न्यूजपेपर.. येस्टर डे इज पास्ट..इम्मटेरियल.. टुडे इज रिलेव्हंट.. इट्स बिझीनेस.. टुमॉरो.. इज गॉसिप्स..

रुमर.. तू काल आणि उद्या मध्ये आजचा गळा घोटते आहेस.. असं करू नकोस..' ती माझ्याकडे पाहते आणि खुदकन हसते. आता ती खूप सुंदर दिसत आहे. तिच्या डोळ्यांमधे पुन्हा एक चमक, जिवंतपणा जाणवतोय.

'मी प्रेमाला माझ्या घरी राहायला बोलावणार आहे.' ती.

'त्यानं काय होईल?' मी.

'अरे, माझं घर, आमचं होईल.. आय लव्ह दॅट इडियट्' आणि चक्क तिची नजर खाली झुकते. ही आशू माझ्यासाठी नवीन आहे. अपरिचित आहे आणि तरीही खूप लोभसवाणी अशीच आहे.

'तुझा हेवा वाटतो आशू,' मी चहाचा घोट घेत.

'का रे?' ती ब्रेडला लोणी लावता लावता.

'मला नाही वाटत की, आता मी कुणावर एवढं प्रेम करू शकेन.. प्रेमात शारीरिकतेची गरज असते. पण सव्यसाचीनंतर मी अशारीरिक झालोय.. आजही भडवा मला पूर्णपणे गिळून उरला आहे. जरी त्याचं शरीर अस्तित्त्वात नसलं तरी..'

त्याच वेळी दरवाजाची बेल वाजते. आम्ही दोघेही आश्चर्यचकीत.

माझा हात प्रतिक्षिप्त क्रियेने उशीखालच्या रिव्हॉल्व्हरवर.. आशू दरवाजा चेन लावून किलकिला उघडते.

'अब्दुल मसूद पेशावरी..' ती उद्गारते आणि दरवाजा उघडते.

'फिरोज जिंदा है.. और इस शहरमें है.. बंबईमे है..' तो बसायच्या अगोदर जीवावरचे सर्व ओझे उतरवतो. त्याचे हात कापताहेत.. ओठ थरथरताहेत..

ही बातमी धक्कादायक होती.. किंवा अनपेक्षित होती.. अब्दुलचा कापरा स्वर या बातमीवर एक वेगळाच साज चढवत होता आणि तो भीतीदायकच होता.

'तुम्हाला कसं कळलं की, फिरोज जिंदा है?' आशू.

'आणि या शहरात आहे?' मी.

'आप मिले उससे?' आशू.

आम्हा दोघांचे प्रश्न अब्दुलच्या कानावर आदळत होते. तो ते प्रश्न ऐकत होता की नाही, ईश्वर जाणे. तो स्वतःशीच पुटपुटत होता. त्याच्या शरीराच्या अस्वस्थ हालचाली त्याची अस्वस्थ मनःस्थिती सहजपणे व्यक्त करत होत्या. पण तो आपली अस्वस्थता लपवण्याचा प्रयत्न करत नव्हता. आणि ही वस्तुस्थिती माझा त्याच्यावरचा विश्वास वाढवण्यास कारणीभूत ठरत होती. मी उठून त्याच्या शेजारी जाऊन बसलो आणि त्याचा हात हातात घेतला. तो घामाने डबडबलेला होता.

'इतनी घबराहट मैने पेहेली बार महसूस की है.. वह जिंदा है.. और इसी शहरमें है..'

आशू पाण्याने भरलेला ग्लास घेऊन आली. त्याचा थरथरणारा हात पाहून तिने तो ग्लास छोट्या टीपॉयवर ठेवला आणि तो टीपॉय त्याच्यासमोर सरकवला.

'उसके दिमागपे खून सवार है..' अब्दुल मसुदने पँटच्या खिशातून नॅपकीन वजा रुमाल काढला आणि आपले हात आणि चेहरा पुसला.

'आप मिले उससे.. आपकी बातचित हुई उससे?' मी.

आता त्याने पाण्याचा ग्लास उचलला आणि घटाघटा रिकामा केला.

'नहीं.. मैं नही मिल सका उससे.. ना मेरी बात हो सकी..'

'तो?'

'मैं बाप हूँ.. और हर बापको एक सिक्थ सेन्स होता है.. जिससे वह अपनी औलाद की परछाई भी पेहेचानता है.. मी त्या दिवशी संध्याकाळी घरी आलो..' तो बोलू लागला.

'त्या दिवशी म्हणजे..' आशूने त्याला प्रश्न केला.

तो उत्तर द्यायच्या फंदात पडला नाही.

'पाऊल दरवाज्याच्या आत ठेवताच मला जाणीव झाली ती फिरोजची.. घरात सगळे गप्प होते, पण कोणीही माझ्या नजेला नजर देत नव्हते. सगळ्यांची नजर खाली झुकलेली.. खोट्याचे ओझे सहन न झाल्यासारखी.. पण मी स्वतःची समजूत घातली की, हा बापाचा संशयी स्वभाव असेल. कुठल्याही कर्त्या पुरुषाला दाराच्या आत पाऊल टाकताच अपरोक्ष घडून गेलेल्या घटनांचा पुसटसा अंदाज येतोच येतो. मी कुणालाही काही विचारले नाही आणि माझ्या नमाज पढायच्या खोलीत गेलो. पुन्हा

एकदा मला फिरोजच्या अस्तित्त्वाची तीव्रतेने जाणीव झाली. मला असे ठामपणे वाटू लागले को, काही तासांपूर्वी.. काही मिनिटांपूर्वी.. काही सेकंदांपूर्वी फिरोज या खोली होता.. उसकी खुशबू हवा में थी.. और उसके गिले पाव के निशान जमींपर थे.. माझे डोळे पाण्याने डबडबले.. मेरा फिरोज.. मेरा खून.. पण मी मन एकाग्र करून प्रार्थना म्हणायला सुरुवात केली. हळूहळू मनावर ताबा येत गेला.. जर का माझा फिरोज जिवंत असेल, तर तो माझ्यापासून लपेल का? काही गरजच नाही त्याला.. नमाज पढून झाल्यावर मी ऑफिसची बॅग घेऊन घरातल्या कॅशबॉक्सपाशी आलो. कॅशबॉक्स उघडली आणि पुन्हा एकदा माझ्या छातीचा ठोका चुकला.. मी नेहमी कॅश एका विशिष्ट जागी, विशिष्ट दिशेला ठेवतो. तिची जागा बदलली होती.. मो कॅश मोजली.. माझ्या डायरीतील नोंद पाहिली. कॅश बरोबर होती.. कुछ तो गलत हो रहा था.. या मुझे कुछ गलतफैमी हो रही थी.. या घरवाले मुझसे कुछ छुपा रहे थे.. मी कॅशबॉक्स बंद केली आणि जेवायला बसलो.. मी माझ्या पत्नीकडे पाहिले. ती माझ्याशी कधीही खोटं बोललेली नाही. मी तिला सहज स्वरांत विचारले, सब ठिक है? तिच्या चेहऱ्यावर मंद स्मित पसरले. ठिक.. ठिक.. तिने आमचा परवली आश्वासक होतो. मी विषय संपवला आणि तो दिवस.. ती रात्र उलटली. पुढे दोन दिवस काहीच घडले नाही. सगळे शांत.. मी स्वतःवरच चिडलो होतो. संशय.. माणसाचा फार मोठा शत्रू आहे, म्हणतात ते खोटे नाही. पण काल दुपारी मी दुकानातून बाहेर पडलो आणि वाटले.. संपूर्ण जग आपल्याभोवती गरगर फिरतेय की काय! मला खात्री आहे.. गल्लीच्या टोकावर फिरोजच उभा होता.. मी जिवाच्या आकांताने त्याला हाक मारली आणि त्याच्या दिशेने धावत सुटलो.. रस्त्यावरच्या वर्दळीची.. वाहनांची पर्वा न करता.. तो गल्लीच्या टोकावरून दिसेनासा झाला होता. मी त्या टोकापाशी पोहोचलो, तर तो शंभर यार्डावर.. झपाझप चालत होता. मी त्याला पुन्हा हाक मारली. पण तो प्रतिसाद देत नव्हता. मुंडी खाली घालून झपाझप चालत होता. मध्येच तो एका इमारतीमध्ये शिरला. तिच्या कंपाऊंड वॉलवरून उडी मारून तो पलिकडच्या गल्लीत उतरला. मला या वयात ती कंपाऊंड वॉल ओलांडायला वेळ लागला. पडलो, धपडपडलो.. लागलं.. पण मी त्याचा पिच्छा सोडला नाही. पण रस्त्यातली गर्दी, वाहने, विक्रेते, त्यांचे स्टॉल्स.. बेस्टच्या बसेस.. मला वाटतं.. एका धावत्या डबलडेकरमध्ये उडी टाकून तो दिसेनासा झाला.. कुलाब्याच्या बाजूला.. मी

गलितगात्र होऊन रस्त्यातच बसलो. माझ्या शरीरातली सगळी ताकदच संपली होती.. मी टॅक्सी पकडली आणि घरी आलो.. आँसू रुक नहीं रहे थे.. मेरी औलाद.. मेरो आवाज सुननेसे इन्कार कर रही थी.. बाकी सगळे माझ्याशी खोटं बोलू शकत होते.. पण मी खोटं बोलू शकत नव्हतो. माझा चेहरा सगळी गोष्ट स्पष्टपणे सांगत होता.. मी काहीही न बोलता माझ्या खोलीत गेलो. बेगम पाठोपाठ आली आणि तिने दरवाजा बंद केला. फिरोज आया था.. तिचा आवाज माझे काळीज चिरत गेला.. शंका खरी ठरल्याचे दुःख! मुलाने बापाचे अस्तित्त्व नाकारल्याचे दुःख! अपमान आणि भीती.. इतने दिन कहा था? कैस गुजारे इतने दिन? किसके साथ? माझ्यासमोर प्रश्नांचा ढिग होता.. आणि तिच्याकडे एकाही प्रश्नाचे उत्तर नव्हते.. पैसे माँग रहा था.. मेरा भी तो बेटा है.. मै माँ हूँ.. मैं.. ती तुटक तुटक बोलत राहिली.. आम्ही दोघे रडत होतो.. वो अब हमारा फिरोज नही रहा.. वो आपका बेटा नहीं रहा.. तस्लिमा का भाई नहीं रहा.. उसके दिल पे जुनुन सवार है. त्याच्या चेहऱ्यावरची मुस्कुराहट हरवली आहे..डोळ्यांमधले मिष्किल भाव नष्ट झाले आहेत.. आता तो जिहादची भाषा बोलतोय.. स्वर्गातल्या सुखाची स्वप्ने तो पाहतोय.. ती बोलता बोलता ओक्साबोक्शी रडू लागली.. मी काहीच बोलू शकत नव्हतो.. सगळ्यालाचा आता उशीर झाला होता.. झाला आहे..' बोलता बोलता अब्दुल मसुद थबकला. तो आता शांत वाटत होता. त्याचा आवाज स्थिर झाला होता. 'तुम्हाला सावध करणे मला गरजेचे वाटले.. अब मुझे जाना चाहिए..' तो उठला.. दरवाजात थबकला.. 'खुदा हाफिज..' आणि दरवाजा ओढून दिसेनासा झाला..

खोलीत काही वेळ सन्नाटा पसरला होता. मी टिव्ही स्विच ऑन केला..

समोर प्रेमानंद हिर्लेकरचा फोटो..

टिव्ही चॅनेलवाल्यांची झुंबड..

ओबी व्हॅनचे घोळके..

कर्कश्श आवाजात न्यूज अँकर ओरडत होती, 'पोलीस ठाण्यावर अतिरेक्यांचा हल्ला.. पंधरा पोलीस जागीच ठार.. सुप्रसिद्ध उद्योजक आणि वेदशास्त्र पंडित दाजीशास्त्री गोखल्यांचे सुपुत्र.. गोळीबारात मृत्युमुखी.. एटीएस ऑफिसर.. प्रेमानंद हिर्लेकर गंभीर जखमी..'

मी आणि आशू अंगावरच्या कपड्यांनिशी घराबाहेर पडलो.

आमचं संपूर्ण विश्वच कोलमडून पडतंय की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली होती. आशूच्या पहिल्या लेखाचा मथळा राहून राहून आठवत होता.. 'फॉर हुम दी बेल टोल्स.. गॉड फर्स्ट मेक देम मॅड !'...

--दहा--

# आशू काळसेकर

कुणालाही त्याला भेटायची परवानगी नव्हती!

मी गेले शहाण्णव तास त्याच्या खोलीबाहेर बसले आहे. आत.. त्या खोलीत.. तो जीवन मरणाची लढाई लढतो आहे.. आणि मी.. सर्व भान हरपून.. तहान भूक विसरून जीवनाचे सर्व संदर्भ तोडून एक विलक्षण हट्ट घेऊन त्याच्या खोलीबाहेर बसले आहे. तो जगायलाच हवा.. तो जगणारच..

डॉक्टर म्हणतात, तो जगण्याची शक्यता वीस टक्के आहे.. असे सांगताना ते 'फक्त' शब्द वापरतात. फक्त वीस टक्के! पण मला ते वीस टक्के शंभर टक्क्यांहून जास्त वाटतात. कारण ते एकोणीस टक्के नसतात.. मला खात्री आहे की तो जगणार आहे.. डॉक्टर म्हणतात, शरीराच्या आत रक्तस्राव होत आहे. तो कुठून होतो आहे, हे कळेपर्यंत आणि मग तो रक्तस्राव बंद करेपर्यंत कशाचीही हमी देता येत नाही. मग मला वाटणाऱ्या खात्रीची तर्कसंगती कशी लावायची? पण जीवनात तर्कसंगती शोधायचे मी केव्हाच सोडून दिले आहे.

*'च्या आयला.. आजवर मी गुन्ह्यापाठचे तर्कट शोधत राहिलो.. पण स्वतःच्या आयुष्यात तर्कसंगत वागणे मला जमलेच नाही. कदाचित काहीही तर्कसंगती नसणे, हेच माझ्या आयुष्याचे तर्कट असेल,' तो व्हिस्कीचा ग्लास कुरवाळत म्हणाला..*

*प्रेमानंद हिर्लेकर!*

*हल्ली तो माझ्याबरोबर असला की, बाटली काढतो.. पेग भरतो.. आणि मग तो ग्लास हातात कुरवाळत तासनतास बोलत राहतो. नाहीतर माझ्याकडे पाहत राहतो.*

*'तू माझ्या आयुष्यात येण्यापाठचे तर्कट मला समजावून सांगशील?' तो.*

*'का नाही! आपण दोघे..' माझं वाक्य तो पूर्ण करून देत नाही.*

*'का भेटलो?'*

*'तुझ्यावर स्टोरी करण्याचे कॉण्ट्रॅक्ट..' मी.*

*'ते भेटणं नव्हतं.. दॅट वॉज ॲन असाइनमेण्ट.. मी भेटणं म्हणतो ते वेगळ्या अर्थानं..' तो.*

*'अरे, पण सुरुवात जर का तिथे झाली..' मी प्रोटेस्ट करते.*

*'ठिक आहे.. पण तुलाच का निवडलं त्यासाठी?' तो आता रंगात येतो.*

*'कारण मी क्राइम रिपोर्टर आहे.. आणि त्या क्षेत्रात मला बऱ्यापैकी नाव आहे.' मी.*

*'क्राइम रिपोर्टर व्यक्तिचित्रण कला जाणतात?' तो जरा उपरोधी स्वरात.*

*मी नाही उत्तर देत.*

*'तुला माझं प्रोफायलिंग करायचं होतं.. माझ्यात शिरून मला टिपायचं होतं.. आणि जो काही मी तुला कळलो.. तो शब्दात पकडून तुझ्या वाचकांसमोर ठेवायचं होतं.. खरं सांग.. असं काम तू ह्यापूर्वी कधी केलं होतंस?'*

*'नाही..' मी कबूल करते.*

*'तेच मी म्हणतोय,' तो विजयी स्वरात.*

*'यू नो प्रेमा.. मुळात तुझे व्यक्तिचित्रण करण्याचा माझा उद्देश नव्हताच.. ती माझी असाइन्मेण्टच नव्हती.. माझे मॅण्डेट काय होते, तुला ठाऊक आहे?'*

*'सांग..' तो व्हिस्कीचा ग्लास हलवतो.. अजून त्याने एक घोटसुद्धा घेतलेला नाही.*

*'चिखलात इतक्या जोरात उडी टाक की, तो सगळीकडे उडाला पाहिजे.. अरे आम्ही बातम्या विकतो..' मी खरे ते कठोरपणे त्याला सांगते.*

*तो हसतो. ओशाळल्यासारखा.. एरवी त्याला असे हसताना मी पाहिलेले नाही.. पण आत्ताचे त्याचे हसणे, मला खरेच ओशाळल्यासारखे वाटले.*

*'चिखल तर होताच.. मान्य आहे..' तो.*

*'पण त्यात मला खरंच रस नव्हता.' मी.*

*'मग तू ही स्टोरी का केलीस? म्हणजे करते आहेस?' तो.*

*'पहिल्या दिवशी तू जसा मला सामोरा आलास, तसा आला नसतास तर कदाचित नसती केली.. मी तुला पाहिलं, तुझ्याशी बोलले.. तुझा प्रत्येक शब्द माझ्यावर परिणाम करत गेला.. नुसता*

*परिणाम नाही, तर मला बदलत गेला.. त्याच वेळी आईचा मृत्यू.. आणि त्याच रात्री तू माझ्या घरी येणं..' मी सरसर भूतकाळात जात होते.*

*'वेट.. वेट.. वेट..' तो पटकन माझा हात पकडतो. त्याचा स्पर्शही किती नैसर्गिक वाटतो. 'मी हेच म्हणतो आहे.. यातली कुठलीही घटना पूर्वनियोजित नव्हती. गोष्टी घडत गेल्या आणि त्या तशाच का घडल्या, त्या वेळेसच का घडल्या.. हे नाही सांगू शकत.. त्यात एक उत्स्फूर्तताही होती..' तो.*

*'प्रेमा, उत्स्फूतपणे घडणाऱ्या गोष्टींमध्ये तर्क नसतो का?' मी त्याला विचारले.*

*'मला नाही कळत आशू.. बट आय हेट प्रेडिक्टॅबिलीटी.. तार्किक गोष्टी तुम्ही प्रेडिक्ट करू शकता.. ते सोड गं, आज मला तुला काही वेगळंच सांगायचं आहे.' तो विषयाचा सांधा बदलतो. तो गंभीरही होतो.*

*'वेगळं?' माझ्या छातीचा ठोका चुकतो. त्याचे कारण मी सांगू शकणार नाही. पण चुकतो, एवढे खरे.*

*'घाबरू नकोस,' त्याच्या हातातला माझा हात हलकेच दाबत तो म्हणतो. मला कसा प्रतिसाद द्यायचा, कळत नाही. त्याच्या स्पर्शात आजवर कधी सेक्सची जाणीव झाली नाही. आणि त्याचा कधीकधी वैतागही येतो.*

*'माझ्या जीवाला धोका आहे.' तो.*

*'यात नवीन काय आहे?'*

*'आणि तो.. आपल्याच माणसांकडून आहे.' तो शांतपणे एकेक शब्द तोलूनमापून उच्चारतो. माझ्या सर्वांगातून एक वीज चमकल्यासारखी.*

*'प्रेमा, तू मला माझी उद्याची हेडलाइन देतो आहेस का?' माझा रिपोर्टर स्वर अधीर.. माझ्या नाडीचे ठोके जलद पडताहेत.*

*'मी माझ्या मैत्रिणीशी बोलतो आहे.. क्राइम रिपोर्टर आशू काळसेकरशी नाही.. मी विश्वासाने काही गोष्टी तुला सांगणार आहे.' तो माझ्या डोळ्यांत खोल पाहत.*

*'प्रेमा, तू भलतीच व्यक्ती निवडली आहेस.. माझी निष्ठा माझ्या व्यवसायाशी..' माझं वाक्य पूर्ण होत नाही.*

*'मग मी बोलणारच नाही.. मी चूक केली.' तो गप्प होतो. व्हिस्कीचा ग्लास ओठांना लावून एका घोटात रिकामा करतो. मला ते आवडत नाही. त्या क्षणी त्याने माझ्यापेक्षा दारूला जवळ केले होते. मी त्याला दारूबरोबर वाटायला तयार नाही. मी त्याच्या हातातला ग्लास काढून घेते.*

*'ओके. तू तुझ्या मैत्रिणीशी बोलतो आहेस.' मी माघार घेते.*

*तो काही वेळ विचार करत बसतो.*

*'मी तुला वर्सोव्याला टिपलेल्या अतिरेक्यांबद्दल सांगितले आहे.'*

*'येप्..' मी.*

*'मी जेव्हा त्यांना शूट केलं.. तेव्हा तेथे वायरलेस मोबाइल लाइव्ह झाला.. इट वॉज अ कॉन्फरन्स कॉल.. पटकन स्पीकर ऑन करून रेकॉर्ड करायला सुरुवात केली.. जे ऐकू येत होतं.. ते हादरवून टाकणारं होतं.. त्या संभाषणाची सीडी गोखलेकडे आहे.' तो.*

*'म्हणजे ते संभाषण तू इतर पुराव्यांबरोबर.. डिपार्टमेण्टमध्ये जमा केलं नाहीस?' माझा विश्वास बसत नव्हता. तो सांगत होता, तो एक गुन्हाच होता.. पुरावा दडवण्याचा.*

*'एक तर त्यात धोका होता.. आणि दुसरे.. तो ॲक्शनेबल नव्हता.. तो नष्ट झाला असता.. नष्ट केला गेला असता.. या लोकांचे हात खूप लांब आहेत.. पैशासाठी माणसं कुठल्या थराला जाऊ शकतात, तुला कळणार नाही. सगळ्या अतिरेक्यांचे केंद्र हवाला मनी आहे, आशू.. त्यात मित्र आणि शत्रू असा भेदभाव नसतो. पैसा सगळ्यांनाच एकत्र बांधून ठेवतो.. देश.. देशप्रेम.. देशाभिमान, या सगळ्या भाबड्या संकल्पना.. तुमच्या आमच्यासाठी असतात..'*

*'कोण आहेत ती माणस?' मी.*

*तो गप्प!*

*'आणि ती सीडी मला का दिली नाहीस?' मी आता हट्टी.*

*तो उत्तर देत नाही.*

*'माझ्यावर विश्वास नाही?' मी.*

*'स्वतःवरही नाही. म्हणूनच ती सीडी मी माझ्याकडे ठेवली नाही.. पण एक निश्चित.. मी टार्गेट आहे.. आणि काही जणांना माझं अस्तित्त्व नकोसं झालं आहे.. जाचक वाटतंय.' तो.*

*'सोऽऽ पुढे?' मी..*

*'जर कधी माझ्यावर प्राणघातक हल्ला झाला.. तर गोखले ती सीडी तुझ्यापर्यंत पोहोचती करायची व्यवस्था करेल.. कशी, ते विचारू नकोस.. ती सीडी तू, तुझा संपादक.. पसरिचाकडे पोहोचती करायची.' तो.*

*'माझ्याकडे का नाही? मी तिचा वापर का करू शकत नाही? माझी तेवढी पोहोच नाही, असं वाटतंय का तुला?' अचानक माझा संताप होतो.*

*तो उठतो आणि खिडकीपाशी जातो. त्या खिडकीशेजारच्या हूकला त्याने होल्स्टर अडकवला होता. सावकाश तो होल्स्टर आपल्या शरीरावर चढवतो. त्याच्या पांढऱ्याशुभ्र वेस्टवर तो चामड्याचा होल्स्टर शोभून दिसत होता. त्याला असे पाहिले की वाटे.. सगळे बंध तोडून त्याला*

*घट्ट बिलगावे आणि एका घोटात पिऊन टाकावे. पण जेव्हा जेव्हा मला असे वाटायचे, तेव्हा परिस्थिती काही वेगळीच आणि तणावपूर्ण असायची, हा आजवरचा अनुभव पुन्हा खरा ठरत होता.*

*त्याच्या चेहऱ्यावरचा प्रत्येक स्नायू ताणला गेला होता. तो सावकाश कपाटापाशी गेला आणि त्यातून त्याने आपली रिव्हॉल्व्हर बाहेर काढली. सर्व्हिस रिव्हॉल्व्हर त्याच्याकडून काढून घेतली होती.. पण त्याच्यासारख्याला रिव्हॉल्व्हरची कमी थोडीच पडणार होती! तो माझ्या समोर येऊन बसला. मॅगझिन अनलोड केली. टिपॉयवर पसरलेल्या गोळ्या तो पाहत राहिला. काही वेळाने त्याने मॅगझिन पुन्हा लोड केली आणि रिव्हॉल्व्हर होल्स्टरमध्ये ठेवून त्याने बुशशर्ट चढवला. नेहमीप्रमाणे त्याच्या बुशशर्टचे हात त्याच्या दंडावर रूतून बसत होते. तो पुन्हा माझ्या जवळ आला आणि त्याला बिलगण्याची इच्छा मी नाही रोखू शकले. तो नेहमीप्रमाणे अस्पर्श..*

*'आशू, तुझी सुरक्षा माझ्यासाठी खूप महत्त्वाची आहे. तुझ्या केसालाही धक्का पोहोचू नये, असे मला वाटते. तुझ्यामाझ्यासारखे ह्या जगात.. खर्ची टाकायच्या लायकीचे आहेत.. वुई कॅन बी इझीली वेस्टेड.. पसरिचांची गोष्ट वेगळी आहे. ते एका मोठ्या वृत्तपत्र समुहाचे संपादक आहेत आणि तो त्यांचा विमा आहे.. जीवनविमा म्हण, हवं तर! त्यांच्या जीवाशी खेळायचे धाडस ही माणसे करतील, असे मला वाटत नाही.. म्हणून..' त्याचा आवाज बोलता बोलता घोगरा झाला होता. मी त्याच्याकडे पाहिले आणि वाटले तो आता माझ्या ओठांवर आपले ओठ टेकवणार. वाटले, हाच तो क्षण! हीच ती वेळ! धिस इज इट! सर्वस्व उधळून द्यायची.. परिणामांची पर्वा न करण्याची.. पण तसे काहीच झाले नाही. तो दूर झाला.. त्याने माझ्या डोळ्यांमधील निराशा वाचली.*

*'तुझ्या आयुष्यातील कडू अनुभवांची पुनरावृत्ती व्हावी, असे मला वाटत नाही.. जरा धीर धर.. सगळं ठिक होईल..' तो निघून गेला आणि त्याच्या पाठमोऱ्या शरीराची चाहुल घेत मी कितीतरी वेळ दरवाजात उभी राहिले.*

खोलीचा दरवाजा उघडल्याच्या आवाजाने मी गुंगीतून जागी होते. माझ्यासमोर बसलेले सशस्त्र पोलीस पाहून मी दचकते. पण.. काही वेळाने लक्षात येते की, ते प्रेमाच्या खोलीबाहेर पहारा देत आहेत. मी या सगळ्यात खूप ऑड मॅन आउट दिसते. पसरिचाने काय कळ दाबली, न कळे.. पण मला प्रेमाच्या खोलीबाहेर थांबायची परवानगी मिळाली आहे. दरवाजाचे स्प्रिंग लावलेले दार मिटायच्या आधी मी आत डोकावून पाहते. आत गर्दी आहे. डॉक्टर्स.. नर्सेस.. प्रेमाच्या शरीरावर वाकून काहीतरी करताहेत. माझा चेहरा काळवंडतो. काय झाले आहे? इज प्रेमा इन डेन्जर?

खूप एकटे एकटे वाटते. देवाची प्रार्थना करायची, तर आपला देवावरही विश्वास नाही. एकट्यानेच एकट्याच्या ताकदीवर झुंजायचे ही तर आपल्या जगण्याची रित आहे.. निष्ठा आहे. एकटेपणही सोसायलाच हवे. आपला आयुष्याबरोबरचा करार तसाच आहे.

मी उभी राहते. काहीतरी घडते आहे, पण आपल्याला ते माहिती नाही, ही जाणीव अस्वस्थ करणारी आहे.

येऊ घातलेल्या क्षणांची एवढी भीती मला कधीच वाटली नव्हती.

एक नर्स बाहेर येते. मी नकळत तिचा हात पकडते. माझे सगळे प्रश्न माझा स्पर्श विचारतो.

'क्या हुवा?' ती केरळी स्वरातल्या हिंदीत विचारते.

'डर लग रहा है..' मी.

'आप क्यों डरती हो? और डरनेसे कुछ नहीं होता.. ना अच्छा, ना बुरा..' ती आपला हात हलकेच सोडवून घेते आणि नर्सिंग स्टेशनच्या दिशेने जाते.

खरं आहे ती म्हणते ते. भीती जर का मृत्युला दूर पळवू शकत असती, तर! मृत्युला निर्लज्जपणे सामोरे जायला हवे.

वीस टक्के शक्यता आहे वाचण्याची.. खूप आहे! डॉक्टर मर्चंट खांद्यावर हात ठेवून म्हणाले होते.

'माझ्या व्यवसायातल्या पन्नास वर्षांच्या अनुभवाने मी सांगतो.. डॉक्टरच्या निदानावर मी माझ्या शेवटच्या रुपयाचा जुगार खेळणार नाही.. पेशंटची इच्छाशक्ती काय चमत्कार घडवू शकते, हे अजून जगातल्या वैद्यकीय शास्त्राला उमगलेले नाही.'

प्रेमाची जगायची इच्छा होती?

*'मी नाही सांगू शकत..' तो बाकड्यावर बसला होता. त्याच्या अस्तित्त्वाने त्या भिकारड्या खोली वजा लॉकअपलाही शान आली होती.*

*‘तुझा आवाज.. निराश, खोल वाटतो आहे.’ माझी, त्या आठवड्यातली ही तिसरी भेट होती. त्याची बायको त्याला भेटायला आली नव्हती.. आणि ती येणारही नव्हती. तिची घटस्फोटाची तयारी सुद्धा त्याने स्वीकारली होती. त्यात तो तिला दोषही देत नव्हता. पण मुलांशी ताटातूट.. दुरावा.. त्याला सहन होत नव्हता.*

*‘इन-ॲक्शन हर्ट्स.. त्या खोलीत दिवस दिवस बसून काढायचे.. भूतकाळाची जळमटे अंगावर ओरबाडून घ्यायची.. त्या जळमटांचा एक एक धागा सुटा करायचा प्रयत्न करायचा.. आणि मग भीती वाटते.. त्या कोळीष्टकात अडकू की काय! आशू.. हा एकांत, जगण्याची इच्छा......’*

*त्याने वाक्य पुरे केले नव्हते.. हवेत सोडून दिले होते.*

*‘हा माझ्या ओळखीचा प्रेमानंद हिर्लेकर नाही.’ मी त्याच्या डोळ्यांना डोळा भिडवत म्हणाले.*

*‘कारण त्याने आजपर्यंत आयुष्यातल्या जमाखर्चाची शिल्लक मोजायचा प्रयत्न केला नव्हता.. पण गेले तीन आठवडे.. दुसरा उद्योगच नाही.. बाप.. माय.. गोखले.. आणि तू.. ही जमेची बाजू. पण खर्चाची यादी खूपच मोठी.. इट्स हॉरिबल.. मुलं.. खूप त्रास होतो.. तिला आयुष्यात गुंतागूंत नको.. तिला.. सगळं काळं पांढरं हवं आहे.. म्हणून त्या मुलांच्या मनातली माझी आठवण.. खुनी बाप अशी? म्हणजे हीच शिल्लक असेल, तर कशासाठी झवाझव करायची? प्रामाणिकपणे सांगतो.. रात्री झोपताना मला प्रश्न पडतो.. का? कशासाठी जागं व्हायचं? तर या अशा टप्प्यावर मी येऊन पोहोचलो आहे.’*

*‘आणि मी.. गोखले..’ मी गोखलेचा आधार का घेते, मला कळतच नाही.*

*‘तुम्ही जगाल गं.. तू तुझ्या बाळाशिवाय नाही जगलीस! जखमा उराशी बाळगत जगायलाही एक कारण लागतं. तुला ते सापडेल.. अजून बऱ्याच पाऊलवाटा तयार करायच्या आहेत तुला.. माझी नवीन पाऊलवाट तयार करायची ताकद किती शिल्लक आहे, कळत नाही मला.’*

*तो कोसळेल की काय, अशी भीती तेव्हा मला वाटली होती. हा प्रेमानंद हिर्लेकर मला पाहायचा नव्हता. काही माणसांना कोसळायची परवानगी नसते. त्यांनी एखाद्या मोठ्या खडकासारखे उभे राहायचे असते. मी त्याचा हात उचलला आणि माझे ओठ त्याच्या तळव्यावर टेकवले.*

*‘डोण्ट!’ त्याने हात आखडता घेतला.*

*‘का?’*

*‘ही जागा त्यासाठी नव्हे.’*

*‘आपण आपले जग कुठल्याही जागेत तयार करू शकतो.’*

*‘ही कॉलेजची एक्सपिडीशन ट्रीप नाहीए.. ना तू कॉलेजमध्ये आहेस, ना मी तुझा कॉलेजमधला मित्र.. डोण्ट एव्हर ट्राय धिस अगेन..’ त्याचा आवाज रोखठोक, खरमरीत झाला.*

*‘माझा अपमान करून तुला काय मिळतं प्रेमा?’ माझा व्याकूळ प्रश्न. ‘का आता तुला कळलंय की, तू माझी भावनिक गरज झाला आहेस?’*

*एक शांतता त्या खोलीत पसरली होती. मला विरळ विरळ करणारी.*

*‘का जेत्याला गुलामाला कसेही वागवायची परवानगी असते?’ मी.*

*तो उठतो आणि कोठडीच्या दरवाजापाशी जातो.*

*‘मला जरा एकटं सोडशील?’ तो शांत स्वरात मला विचारतो.*

*आमची भेट अशी संपावी, असे मला निश्चितच वाटत नव्हते. पण त्याचा मूड आणखी खराब करावा, असेही वाटत नव्हते. मी माझी पर्स आणि हँडबॅग उचलली आणि दरवाजा गाठला.*

*‘आशू,’ तो माझा दंड पकडतो.*

*मी जखमी नजरेने त्याच्याकडे पाहते. माझा दंड त्याच्या हातातून सोडवायचा प्रयत्न करते.*

*‘आपल्या दोघांमध्ये जेता कोण आहे आणि गुलाम कोण आहे, हे जेव्हा तुला कळेल.. तेव्हा फार उशीर झालेला नसो, एवढीच माझी इच्छा आहे..’ तो माझा दंड सोडतो आणि दरवाजा माझ्यापाठी बंद करतो.*

‘एक्सक्युज मी..’ मी भानावर येते.

खोलीच्या बाहेर पडणाऱ्या डॉक्टरचा रस्ता मी अडवला आहे.

‘आय ॲम सॉरी.. एनिथिंग सिरियस?’ माझी काळजी.

‘नो.. बट आम्ही आणखी एक सर्जरी करायचा निर्णय घेतला आहे.’

‘आणखी एक?’ मी घाबरते.

‘इंटर्नल ब्लिडिंग थांबायलाच हवं.. सम व्हेसल इज रप्चर्ड.. डॉक्टर शास्त्री.. व्हॅस्क्युलर सर्जन वुईल.. ऑपरेट..’

‘आतापर्यंत त्याच्यावर तीन शस्त्रक्रिया झाल्या आहेत.’ मी खरंच काळजीत. ‘तो आणखी एका शस्त्रक्रियेचा ताण सहन करू शकेल का?’

'ते तुम्ही आमच्यावर सोडा आणि मला रस्ता देणार का?' डॉक्टरच्या चेहऱ्यावर मंद हास्य.

मी बाजूला होते, तो पुढे निघून जातो.. पण चार पावले जाऊन पुन्हा परत फिरतो.

'एक सुचवू?' तो माझ्या प्रतिसादाची वाट पाहत नाही, 'घरी जा.. मस्त शॉवर घ्या आणि एक झोप काढा.. तुम्हाला काय वाटतं, इथे बसून तुम्ही घडणाऱ्या घटना टाळू शकता? गोऽ गोऽ टेक रेस्ट..' तो वळतो आणि काही सेकंदात दिसेनासा होतो.

वॉर्डबॉइज येतात. त्याचा संपूर्ण बेडच हलवून नेताहेत.. त्याच्या सगळ्या शरीराला प्लॅस्टिकच्या ट्युब्ज जोडलेल्या आहेत आणि चेहऱ्यावर ऑक्सिजनचा मास्क.. त्याच्यासाठी हा दररोजचा रूटीन आहे.

सम वीन.. सम लूज..

सम लिव्ह.. सम डाय..

माझ्या गळ्यात एक हुंदका अडकतो.

तो काही 'सम' पैकी नाहीए..

तो प्रेमानंद आहे.. प्रेमा आहे.. माझ्यासाठी तो एकच एकटा आहे.. वॉर्डबॉइज बेड ढकलत घेऊन जातात..

एक भयाण पोकळी..

तो परत येईल अशी खात्री आणि तरीही ती खात्री.. पोकळी भरून काढू शकत नाही..

मी खुर्चीवर टेकते.. अंगातली सगळी ताकद संपल्यासारखी.. वीस टक्के शक्यतेला बिलगून..

मी हॉस्पिटलबाहेरच्या रस्त्यावर उभी. का कुणास ठाऊक, अंधारातून प्रकाशात आल्यावर डोळे दिपतात. तसेच मन बावरले होते... कुठे जावे, ठरत नव्हते. घरी? शक्यच नाही! पाशी? मे बी.. तो भेटण्यापेक्षा त्याच्या बाथरूममध्ये शॉवर घ्यावासा वाटला. आणि तरीही पाऊल उचलत नव्हते. अचानक शरद गोखलेची तीव्रतेने आठवण झाली. आपण किती संवेदनाहीन होऊ शकतो! आपल्या काळजीसमोर, आपल्या दुःखासमोर इतर सर्व अत्यंत नगण्य वाटतात आपल्याला. माझी मलाच लाज

वाटली. शरद गोखले.. वॉज नो मोअर.. ही वॉज डेड.. त्याच्या प्रिय मित्राचे प्राण वाचवताना.. स्वतःच्या प्राणांची पर्वा केली नाही त्याने.

का गोखलेला त्याच दिवशी, त्याच वेळी प्रेमानंदला भेटावेसे वाटले? जेव्हा अतिरेक्यांनी पोलीस स्टेशनच्या आवारातच अंदाधूंद फायरिंग सुरू केली तेव्हा.. प्रेमानंदच्या अंगावर स्वतःला झोकून देण्याचा वेडेपणा त्याला का करावासा वाटला? माणसाला मारायला जिथे एक गोळी पुरेशी असते, तिथे अतिरेक्यांना त्याच्या शरीरात पंचाहत्तर गोळ्या का ठासाव्याश्या वाटल्या? सीसीटीव्हीच्या फुटेजमध्ये त्याच्या शरीराची गोळ्यांच्या वर्षावात अक्षरशः चाळत होताना पाहून भल्याभल्यांच्या डोळ्यात अंगार उतरला होता. या क्रौर्याचे वर्णन तरी काय करावे?

मी गोखलेला एकदाच भेटले होते.

*तो कोठडीत शिरत होता आणि मी बाहेर पडत होते.. मला पाहताच त्याने हात पुढे केला..*

*'अश्विनी काळसेकर?'*

*'शरद गोखले' त्याचा हात हातात घेत मी म्हणाले.*

*'आगीशी मैत्री करत आहात,' प्रेमानंदकडे पाहत तो म्हणाला.*

*'सो?' माझ्या डोळ्यांमध्ये जन्मसिद्ध बेफिकीरी..*

*'ही आग.. उब देणारी नाहीए.. जाळणारी आहे..'*

*'प्रत्येकाला आपले भोग भोगायलाच लागतात ना..' मी त्याला विचारले.. तो खोऽ खोऽ हसत आत शिरला आणि मी पुढे झाले.*

माझा निर्णय झाला, दाजीशास्त्री गोखल्यांना भेटायचे. गोखलेच्या पाठीमागे आता तेच एकटे उरले होते. गोखलेने वंशविस्ताराचा प्रयत्न केलाच नव्हता. लग्न आपल्यासाठी नव्हे.. असा त्याचा ठाम समज होता. मी पर्समधून डायरी काढली.. प्रेमानंदकडून एकदा कधीतरी दाजीशास्त्रींचा पत्ता घेतला होता. का?

दैवयोग! नियतीचा संकेत!! काहीही म्हणा.

अर्थात समजा पत्ता नसता, तरी शोधणे काहीच कठीण नव्हते.

मी टॅक्सी पकडते आणि डोळे मिटते. झोप लागत नाही, पण विचारांचे अतिक्रमणही होत नाही. दाजीशास्त्री गोखले.. अभेद्य चायना वॉलसारखे सगळ्या विचारांना रोखून धरतात. मी त्यांना पूर्वी भेटलेले नाही. पण त्यांचे कल्पनाचित्र मनात आहे. काय बोलायचे नाही, आपली ओळख कशी करून द्यायची.. अनेक फालतू प्रश्न.. पण या वेळीस महत्त्वाचे.. चायना वॉल.. दी ग्रेट चायना वॉल!!

'कोण हवं आहे?' एका मध्यमवयीन स्त्रीने दरवाजा उघडला.

मी माझे कार्ड पुढे केले.

'इंग्रजी वाचता येत नाही.' बाईंचा प्रांजळपणा.

'दाजीशास्त्रींना भेटायचं आहे.'

'आपण?'

'अश्विनी काळसेकर.. पत्रकार'

मी गुन्हे वार्ताहर, हा शब्दप्रयोग टाळते. त्या बाई घड्याळाकडे पाहतात.

'वेळ गैरसोयीची आहे, मान्य आहे..' मी.

'नाही, तसं काही नाही.. दाजीशास्त्रींची वेळ अशीच असते.. तुम्ही आत या.. बसा.. मी बोलते दाजींशी..' त्या बाई बोलतात.

'आपण?' मी.

'तसे नातेवाईक नाही आम्ही.. पण शेजारी.. त्यांच्या मुलाचे, शरदचे निधन झाले.. वर्दळ वाढली. कुणीतरी असायलाच हवं ना इथं? मी मोकळीच होते. इतक्या वर्षांचा शेजार आहे आमचा.. शरदला आम्ही अंगाखांद्यावर खेळवला आहे..' बाई जाताजाता नऊवारीच्या पदराने डोळे टिपतात.

मी फाटक्या कोचावर टेकते. एका बाजूला फाटक्या रेझिनखालच्या स्प्रिंग दिसताहेत.. गंजलेल्या.. जुन्या काळातले कोच.

समोर गोखलेच्या आईचा फोटो.. त्याच्या आईचे खानदानी सौंदर्य डोळ्यात भरते. जुन्या काळातल्या सरदार कुटुंबातली असावी अशी.. कपाळावरचे भव्य गोल कुंकू.. नाकातली नथ.. गळ्यातला साज.. आणि डोळ्यांमधले मार्दव.. अशी माणसे प्रेम करायलाच जन्माला येतात.

कोनाड्यात मेणबत्ती.. उदास.. ओघळलेली..

बाइ परत येतात.

'या माझ्याबरोबर.. त्यांना कमी दिसते आणि जवळपास ऐकू येत नाही.. तेव्हा तेच बोलतात.. काही विचारायचे असल्यास.. मोठ्याने बोलावे लागेल..' त्या सूचना देतात.

पोपडे उडालेल्या भिंतींवरून हात फिरवत मी त्यांच्यापाठोपाठ.. मनात एक गंभीर प्रश्न.. ओरडून सांत्वन कसे करतात?

त्या दाजीशास्त्रींच्या खोलीबाहेर थांबतात.. पडदा हाताने बाजूला सारतात आणि मला आत जायची खूण करतात.

खोलीत गूढ वातावरण होते. अंधूक.. पिवळसर प्रकाश.. उदबत्ती आणि धुपाचा धूर.. खोली आणखी धुसर करतो आहे. समोर एक मोठ्या आकाराची ओंकाराची प्रतिमा.. त्या प्रतिमेशेजारी मोठे देवघर.. शिसवी लाकडाचे.. आत तांब्याच्या आणि पितळेच्या देवांच्या मूर्ती.. शंकराची पिंड काळ्या रंगाची.. दगडी.. आणि देवघरासमोर लाल कापडात गुंडाळलेली एक पोथी.. तिच्यावर मोठ्या आकाराच्या रुद्राक्षांची माळ.. एक पलंग.. स्वच्छ चादर घातलेला.. त्याच्यावर केशरी रंगाची शाल.. पलंगाशेजारी आरामखुर्ची.. जिच्यात दाजीशास्त्री.. त्यांना पाहताक्षणी गोखलेची प्रचंड आठवण..

दाजीशास्त्री थरथरत्या हातांनी पलंगावर बसण्याची खूण करतात.

मग काही वेळ शांतता.. पुढे काय बोलावे किंवा कुठून सुरुवात करावी, मला पटकन सुचत नाही.

'मृत्यूनंतर अश्रू ढाळायची, या घराची रीत नाही..' दाजीशास्त्रींनी तोंडात कवळी घातलेली नाही. त्यामुळे त्यांचे शब्द गोलाकार स्वर धारण करतात. शब्दांच्या उच्चाराबरोबर त्यांची मानही हलते. 'जन्माला येताना मृत्यु लिहिलेला असतोच.. विधिलिखित टाळता येत नाही.. ते त्रिवार सत्य आहे.. मग दुःख कसले करायचे? शरदचा मृत्यू.. आम्हाला ठाऊक होता. त्याची पत्रिका आम्ही कित्येक वेळा वाचली

आहे.. तुलेत मंगळ आणि शनी यांची युती.. रक्तपात अटळ असतो.. विधिलिखितावर मात करण्याचे उपाय हे थोतांड आहे.. आम्ही ते कधी केले नाही. मनास अधिक घट्ट करत गेलो..' त्यांचे बोलणे ऐकत असताना त्यांच्याशी एक नाते जुळते आहे, असे वाटू लागले होते. त्यांच्या हाताला सहानुभूतीचा स्पर्श केला. पण त्यांनी आपला हात पटकन दूर केला.

'तुमचं नाव ऐकलं आहे.. तुमचे लेखही वाचले आहेत.. मूळ नाही.. इंग्रजी वत्तपत्रं आम्ही घेत नाही.. पण मराठी आवृत्तीतला अनुवाद वाचून घेतो. एवढे लिखाण भिंग लावून वाचणं जिकिरीचं.. ऐकूही कमीच येतं.. पण जेवढं ऐकू येतं, तेवढ ऐकायचं..' ते मध्येच गप्प झाले.

'प्रेमानंद हिर्लेकर..' थोड्या वेळाने माझ्याकडे पाहत ते स्वतःशीच पुटपुटतात.

'अशी माणसं जगायलाच हवीत..' ते उशीवरच्या पंच्याने आपले ओठ टिपतात. 'जगतील ते..' त्यांचे वाक्य अंगावर शहारे आणते.

'खरंच?' माझा अधीर प्रश्न ते ऐकतच नाहीत. ते त्यांच्याच तंद्रीत.

'मी वैद्यक जाणत नाही.. पण पत्रिका जाणतो.. आत्ता मृत्युयोग नाही..' न्यायाधीशाने निर्णय दिल्यासारखे दाजीशास्त्री बोलतात. 'शरदने पत्रिका आणून दिली होती.. मी त्याला माझा निष्कर्ष सांगितला होता..' मी गप्प.. वडिलांचे भविष्य खोटे ठरू नये, म्हणून गोखलेने प्रेमावर स्वतःला झोकून दिले की काय? एक भाववश विचार डोक्यात..

'आल्याबद्दल धन्यवाद.. या तुम्ही..' त्यांनी डोके आरामखुर्चीवर टेकले.

'नमस्कार करायचा होता..' मी शब्द आणि खुणांचा वापर करत बोलते.

'दुरून.. स्त्री स्पर्श वर्ज्य आहे आम्हाला..' पोथीकडे बोट दाखवत दाजीशास्त्री म्हणतात.

मी त्यांना खाली वाकून नमस्कार करते.

'यशस्वी भव..' त्यांच्या तोंडून आशीर्वाद.. मला आप्पांना केलेला वांझोटा नमस्कार आठवतो.

मी जायला वळते..

'तुम्ही जरा बाहेर थांबा.. बाईंना पाठवून द्या.. काही द्यायचे आहे.. तुम्ही येणार, ही अटकळ होती.' दाजीशास्त्री.

मी बाईंना त्यांच्याकडे पाठवून पुन्हा कोचावर टेकते.

बाई एक ब्राउन पेपर पिशवी घेऊन येतात आणि माझ्या हातात देतात. आत एक सीडी असल्याची जाणीव.

'ह्याचं काय करायचं, ते तुम्हाला ठाऊक आहे, असं दाजीशास्त्री म्हणाले..' बाई एकदा माझ्याकडे, एकदा पाकिटाकडे पाहत म्हणतात.

'धन्यवाद..' मी जेमतेम आभार मानते.. माझ्या हातात टाइम बॉम्ब असल्याप्रमाणे माझा हात थरथरतो आहे.

रस्त्यात कितीतरी वेळ मी भ्रमिष्टासारखी चालते आहे.. शेवटी एका कोपऱ्यावर थांबून मी त्या पाकिटावर नजर टाकते. ते चारही बाजूंनी टेप लावून सीलबंद आणि वर पसरिचाचे नाव.. मी बेस्टच्या थांब्याजवळ थांबते. कुलाब्याला जाणारी बस त्या स्टॉपवर थांबत असते. बसच्या अप्पर डेकवर माझी नेहमीची आवडती जागा पकडते.. मनात घोंघावणाऱ्या विचारांच्या स्वाधीन मी स्वतःलाच करत.. डोळे मिटून...

लॅच उघडून पसरिचाच्या फ्लॅटमध्ये शिरताच समोर चिठ्ठी!

'मला तातडीनं दिल्लीला जावं लागतंय.. संध्याकाळी किंवा रात्रो उशीरा परत येईन.. स्पोक टू डॉक्टर साने.. तुला हॉस्पिटलमधून हुसकावून लावण्याची विनंती केली. डॉ. शास्त्री पुन्हा एकदा शस्त्रक्रिया करणार आहेत.. ते मला फोन करतील.. आता डोळे मिटून पडून राहा.. आणि शंभरपर्यंत आकडे.. उलटे मोजायला सुरुवात कर.. दोन गोष्टी होतील.. एक तर तुझे डोके फिरेल किंवा तुला झोप लागेल.. जेवणाची वाट पाहा.. जरी तुला माझ्याबद्दल फारसा आदर किंवा प्रेम नसलं, तरी आणखी एक अनाहूत सल्ला.. माझ्या प्रकृतीची काळजी करू नकोस.. कधी नव्हे ते बच्चीला भेटलो.. आमच्यासाठी भविष्य लिहितो ना! ... म्हणालो, सांग माझं भविष्य.. विचारात पडला.. माझा हात पाहून म्हणतो, वेळेवर आलास.. मी विचारलं, का? तर म्हणतो, आणखी एक महिन्याने भविष्य सांगायची गरज पडली नसती. मला कळलंच नाही. तर

म्हणाला.. इडियट्, भविष्य जिवंत माणसाचे सांगतात.. सोऽऽ पुढील एक महिना प्रकृतीला धोका नाही.. ' – पाशी.


मी चिठ्ठी चुरगाळून कचऱ्याच्या बादलीत टाकली आणि सीडो पाशीच्या सेफमध्ये ठेवून सरळ बाथरूम गाठली. डोक्यातल्या कल्ल्यावर एकच उपाय होता.. गरम पाण्याचा शॉवर!! संपूर्ण शरीर गरम पाण्याच्या फवाऱ्याखाली ताजेतवाने करून घेतले.. दहा मिनिटे, पंधरा मिनिटे.. जेमतेम टॉवेलने अंग टिपून बेडरूममध्ये आले आणि बेडवर झोकून दिले स्वतःला.. कधी झोप लागली.. कळलेच नाही.. स्वप्नविरहीत शांत झोप खूप दिवसांनी अनुभवत होते..

जाग आली तेव्हा पाशीच्या फोनवरचा मेसेज लाइट ब्लिप करत होता. मी बटन दाबले.. पाशीचा आवाज ऐकू आला..

'आशू, गूड न्यूज.. डॉ. शास्त्रींचा फोन आला होता.. प्रेमानंद हिर्लेकरवरचे ऑपरेशन यशस्वी.. रक्तस्राव थांबला आहे.. प्रकृतीचा धोका टळला आहे..' फोन डेड्..

काही सेकंद सुन्न झाले.. दाजीशास्त्रींचे वाक्य आठवू लागले.. 'सध्या मृत्यूयोग नाही..' त्याचवेळी बच्चीचे वाक्य आठवले. 'आणखी एक महिन्याने भविष्य सांगायची गरज उरली नसती..' पाठोपाठ दाजीशास्त्रींचे वाक्य.. 'विधिलिखित टाळता येत नाही.. हे त्रिवार सत्य.. शरदचा मृत्यू आम्हाला ठाऊक होता.. मन घट्ट करत होतो..'

विचारांचे ओझे असह्य झाले आणि मी रडू लागले.. स्वतःला दुःखाच्या स्वाधीन केल.



--अकरा--

# प्रेमानंद हिर्लेकर

मला कल्पना आहे की, मी फार दिवस जगणार नाहीए.

हा माझा समज नाही.. आणि निराशेपोटी मनी रुजलेला विचारही नाही.

वैद्यकीय शास्त्राचा निष्कर्ष आहे हा!

डॉ. शास्त्री किंवा डॉ. साने माझ्याशी या विषयावर चर्चा करायला तयार नव्हते. म्हणजे असे आहे, रुग्णाच्या जवळच्या नातेवाईकाला अपरिहार्य शेवटाची कल्पना देऊन त्यांची मानसिक तयार करणे हा वेगळा भाग.. पण रुग्णालाच हे कसे सांगायचे? त्यांची दुसरी अडचण म्हणजे, आशू सोडली तर मला जवळचे असे मित्र नाहीत. नातेवाईकांचा प्रश्नच येत नाही. बायको 'गुंतागूंत' टाळण्यासाठी भेटायलाच आली नव्हती आणि तिचे योग्यच होते. तिची वाट बदलली होती. बदललेल्या वाटेवर शिक्कामोर्तब व्हायचे बाकी होते. परिस्थिती अशी होती की, तिला कदाचित घटस्फोटाचीही गरज लागणार नव्हती. सगळेच नैसर्गिकरित्या होण्याची दाट शक्यता होती. शेवटी चार एक दिवसांपूर्वी मीच डॉ. साने आणि डॉ. शास्त्री यांना रात्री माझ्या खोलीत थांबवून घेतले. मला काय बोलायचे आहे, याची त्यांना बहुतेक कल्पना आली असावी. दुपारीच मला पुन्हा एकदा रक्ताची बाटली चढवली होती. कितवी, तेसुद्धा मला आता आठवत नाही. शरीरात होणारा रक्तस्राव थांबतच नव्हता. 'आणखी किती बाटल्या रक्त चढवणार डॉक्टर?' मी विषयाला तोंड फोडले. माझ्या खोलीत आम्ही तिघेच होतो. आशूला बाहेरच थांबवले होते. एक तर तिच्यासमोर या विषयावर बोलायची माझी इच्छा नव्हती आणि माझ्या प्रकृतीबाबत तिला वाईट काहीही सांगायचे नाही, अशी विनंती मीच त्यांना केली होती. शेवटच्या ऑपरेशनच्या आधी मी डॉ. साने आणि डॉ. शास्त्री यांना सूचना केली होती की, आशू आणि पसरिचाला 'ऑल वेल'चा निरोप द्यायचा. का कुणास ठाऊक, पण आपल्या प्रकृतीचा प्रवास योग्य दिशेने होत नसल्याची जाणीव तेव्हाच मला झाली होती.

'त्याचं असं आहे, प्रेमानंद..' डॉ. शास्त्रींनी शब्द गोळा करायला सुरुवात केली. खरं तर या आधी बऱ्याचदा त्यांनी या संभाव्य दृष्याची तालीम मनातल्या मनात केलेली असणार. प्रत्येक डॉक्टरला वाईट बातमी कशी द्यायची, याची तयारी करावीच लागते. आणि तरीही प्रत्यक्ष वेळ आली की, शब्द पटकन सापडत नाहीत. आणि शब्द सापडले, तरी आवाज सापडत नाही.

'डॉक्टर, नो बूलशिट... प्लिज..' मी त्या दोघांकडे पाहत म्हणालो, 'मला वैद्यकीय परिभाषेच्या चक्रव्युहात ओढू नका. त्यात शिरायची आणि त्यातून बाहेर पडायची कुवत माझ्यात नाही. माझा प्रश्न साधा आहे.. मी जगणार आहे की, मरणार आहे.. आणि मरणारच असेन, तर आणखी किती दिवस?' मी त्यांच्यासाठी अवघड गणित सोपे करायचा प्रयत्न करतो.

'कुठल्याही डॉक्टरला याचं ठाम उत्तर देणं नेहमीच कठीण असतं, प्रेमानंद!' डॉ. सान्यांनी माझा हात हातात घेतला, 'प्रयत्न करत राहणं हे आमचं कर्तव्यच असतं. काही गोष्टी वैद्यकीय शास्त्राच्याही आकलनापलिकडल्या असतात.'

मला जास्त बोलवत नव्हते. कुठल्याही क्षणी माझी शुद्ध हरपेल, याची मला जाणीव होती. माझा शुद्धी आणि बेशुद्धीचा लपंडाव सतत सुरूच होता.

परिस्थिती कठीण होती. जे मला कळत होतं, ते मला सांगायची त्या दोघांचीही तयारी नव्हती, असं मला वाटलं. मे बी, त्यांचा पेशा.. वैद्यकीय शास्त्राची त्यांनी घेतलेली शपथ त्यांच्या आड येत असावी, असं मला वाटलं.

'कठीण आहे ना?' मी क्षीण आवाजात त्यांना प्रश्न केला.

एक शांतता पसरली. दोघे एकमेकांकडे पाहत होते.

'खरं उत्तर..' मी धुरकटलेल्या नजरेने दोघांकडे पाहिले आणि गप्प झालो. पुन्हा एकदा ताकद गोळा करायची नितांत गरज मला वाटत होती.

'ओके मिस्टर हिर्लेकर.. मी तुम्हाला गुंतागुंतीची माहिती सांगणार नाही.. नो डिटेल्स.. इन एनी केस.. डिटेल्स डोण्ट चेन्ज दी रिॲलिटी.. तुमचा निष्कर्ष बरोबर आहे.. फक्त दिवसांचा अंदाज मागू नका..' डॉ. शास्त्री अचानक फॉर्मल झाले.

'प्रेमानंद, आय ॲम रिअली सॉरी.. पण तुझी काही इच्छा असली, तर...' डॉ. साने अवघडले होते.

'डॉक्टर, खरं काय ते सांगितलंत.. थँक्स.. वेळ आली की, आशूला मी सांगेन.. अर्थात ती हुषार आहे आणि हट्टी असली, तरी तिलाही वस्तुस्थितीचा अंदाज आलाच असेल..' मी काही वेळ डोळे मिटून पडून राहिलो.

माझे डोळे जड होत होते. मी पुन्हा एकदा जाणीव नेणीवेपलिकडच्या विश्वात खेचला जात होतो. खूप हलके हलके वाटत होते. वाऱ्याच्या झुळूकेवर एखादे पीस तरंगत जावे.. हेलकावे खात.. अगदी तसेच वाटत होते. असे विहरणे कधीच अनुभवले नव्हते. व्हिस्कीच्या अख्ख्या बाटलीनंतरही असा तरल अनूभव आला नव्हता.

मी हातानेच डॉक्टरांचा निरोप घेतला. आता मला एकटे राहायचे होते. माझ्यातच रमायचे होते. माझ्याशीच खेळायचे होते. गोखलेची खूप तीव्रतेने आठवण होत होती. नुसती आठवण नाही.. भोसडीचा, माझ्या मिटल्या डोळ्यांनी वाकुल्या दाखवत एक कविता गुणगुणत होता. त्याची खूप आवडती कविता.. कुठून अशा कविता गोळा करायचा, मला कधीच उलगडले नाही. तो कविता करायचा नाही, पण गोळा जरूर करायचा आणि त्याची स्मरणशक्ती तगडी होती. ते एक मृत्यूगीत होते. जीवनाचा सोस असलेले मृत्यूगीत! जाणीवेच्या पलिकडच्या विश्वातही.. आठवणीच्या संपुष्टीतले शब्द अलगद फेर धरून नाचू लागले...

मी पुन्हा पुन्हा मरत राहतो..

नसा कोमेजतात, पुन्हा उमलतात..

निद्रीस्त बाळाच्या मुठीच जणू..

उघड बंद होणाऱ्या...

पुरातन थडग्यांच्या आठवणी..

सडणारे मांस आणि अळयांचो रास..

मला जगण्यापासून परावृत्त करत नाही..

माझ्या चेहऱ्यांवरच्या सुरकुत्यांमध्ये

दडला आहे अनेक वर्षांच्या

पराभवाचा इतिहास...

अंधूक करणारा.. माझ्या जीर्ण डोळ्यांना

आणि..

मी मरत राहतो.. सतत मरत राहतो..

कारण मला जगण्याचा ध्यास असतो...

पुन्हा एक सकाळ. मला जरा ताजेतवाने वाटत आहे. वासंती येईल एवढ्यातच. वासंती म्हणजे नर्स. माणूस मृत्युपंथावर असला, तरी शिस्त तीच. वेळच्या वेळी रिडिंग्ज, बी. पी., पल्स, एक इसीजी, रक्ताचे नमुने... त्यात खंड नाही. वासंती पन्नाशीची असावी. मला तिचे आश्चर्य वाटते. म्हणजे तिचा व्यवसायच असा आहे की, दररोज तिला मृत्यूशी सामना करावाच लागतो. काही जीव जिंकतात, काही हरतात. तिला या सर्वाचा आपल्या व्यवसायाचा एक अपरिहार्य भाग म्हणून निर्विकारपणे स्वीकार करावाच लागत असेल. भावनावश होऊन परवडणार नाही तिला. तरीही ती दोन दिवसांपूर्वी एक ताईत घेऊन आली.. म्हणाली, 'उशीखाली ठेवा.'

मी त्या ताईताकडे पाहिले. एक ॲल्युमिनिअमची डबी.. तिला काळा दोर बांधलेला.. एवढ्याश्या डबीत मृत्यूला खाली हात परतवण्याची ताकद? मे बी, थोडीशी ताकद काळ्या धाग्यातूनही येत असेल.. माझ्या डोक्यात कुत्सित विचार..

'माझा विश्वास नाही, अशा गोष्टींवर.. मी लोकांना मारले आहे.. मरण फार जवळून पाहिले आहे. मी ज्यांना मारलं, त्यांचाही असल्याच भाकड गोष्टींवर विश्वास होता. जिहाद.. मृत्युनंतर स्वर्ग.. माझा विश्वास नाही.' मी मान वळवली.

ती थोडावेळ माझ्या उशाशी उभी राहिली.

'ठेवा उशीखाली,' औषध घ्यायला कंटाळा करणाऱ्या मुलाला समजवावे, अशा स्वरात पुन्हा ती म्हणाली.

'माझा विश्वास नसताना?' मी पुन्हा..

'अहो, पण माझा आहे ना.. सेवा मी करते आहे, ती निष्फळ जाऊ नये, अशी माझी इच्छा आहे.. ठेवा हा ताईत उशीखाली,' तिच्या या प्रतिवादाला माझ्याकडे उत्तर नव्हते.

'तुम्ही खास माझ्यासाठी...' माझे वाक्य पूर्ण झाले नाही. माझा आवाज बंद करण्यासाठी जणू तिने माझ्या तोंडात थर्मामीटर खुपसले आणि ती आपल्या मनगटाच्या घड्याळाकडे पाहू लागली.

'सगळे पुरुष इथून तिथून सारखेच असतात.. सतत तम्हाला खात्री करून घ्यावी लागते की, तुम्ही विशेष कोणीतरी आहात.. फक्त तुमच्यासाठी कुणीतरी, काहीतरी करतं आहे,' तिच्या डोळ्यात मिष्किल भाव. ती थर्मामीटर काढते आणि शेजारच्या बाटलीत ठेवते.

'तुमच्याबद्दल आदर वाटतो. अभिमान वाटतो. हल्ली हे शब्द अतिरंजित, भंपक आणि पोकळ वाटतात. कारण आजूबाजूच्या वास्तवाने या शब्दांचा अर्थसुद्धा हिरावून घेतला आहे,' तिचा आवाज, स्वर पन्नास वर्षांच्या आयुष्यात तावून सुलाखून निघालेला वाटतो. ती हलकेच कॅथेटरला जोडलेली युरीनची बॅग वेगळी करते. त्या पारदर्शी पिशवीतली युरीन पाहून तिला किळस येत नाही.

'आम्ही लहानपणी पंधरा ऑगस्ट, सव्वीस जानेवारीला शाळेत झेंडावंदन करायला जायचो.. गणवेश घालून शाळेपर्यंत जातानासुद्धा आमची छाती अभिमानाने फुलून यायची. पासष्ट, एकाहत्तरच्या लढाईच्या बातम्या रेडिओवर ऐकताना छातीत धडधडायचं. जणू त्या सैनिकांच्या जय-परायजायवर आमची सुरक्षा अवलंबून होती. वाटायचं, जणू ती लढाई मीच लढते आहे. आताशा तसं का वाटत नाही? का नाही वाटत की, कुठेतरी जाऊन पंधरा ऑगस्टला झेंडावंदन करावे? झेंडा तोच आहे, देश तोच आहे.. मी बदलले आहे. तो झेंडा उभारणार हात बदलले आहेत. ज्यांच्याबद्दल आदर वाटावा, ज्यांचा अभिमान वाटावा, अशी माणसंच उरलेली नाहीत,' ती स्वच्छ पिशवी आणते आणि कॅथेटरला जोडते.

मी गप्प बसतो कारण मी माझ्याच विचारांच्या तंद्रीत. तिने नेलेल्या बॅगमधल्या युरीनचा रंग गडद लाल.. म्हणजे रक्तस्राव सुरूच आहे!! मीसुद्धा वेडाच आहे.. माणसाची आशा दुर्दम्य असते, हेच खरं!

'माझी एक वेडी इच्छा आहे..' ती आयव्हीचा फ्लो रेट चेक करत म्हणते. मी तिच्याकडे पाहतो.

'मला घड्याळाचे काटे गरागरा उलटे फिरवून चाळीसएक वर्षे मागे जायचे आहे.. मला पुन्हा एकदा ते जुने दिवस जगायचे आहेत,' ती खळाळून हसत बाहेर पडते.

माझ्या मिटलेल्या डोळ्यांसमोर लख्ख प्रकाश पडतो.

इच्छा!

डॉ. सान्यांचा प्रश्न.. तुमची काही इच्छा असल्यास...

जणू मृत्युच्या दारात उभ्या असलेल्या व्यक्तीच्या सर्व इच्छा पूर्ण केल्याच जातात. समजा मी त्याना सांगितले की, माझी जगायची इच्छा आहे!! इज इट पॉसिबल? डॅम इट!!

पण आपली खरी इच्छा काय आहे?

मला जगायचे आहे का?

हा प्रश्न तरी पूर्ण आहे का?

मला आज जगायचे आहे का? आज?

का मला भूतकाळ जगायचा आहे? ते गेलेले दिवस जगायचे आहेत? आयेच्या हातचे लसूण लावलेले कुरमुरे मिळतील पुन्हा? बापाच्या डोळयातले कौतुक पाहता येईल? मी जागावं म्हणून डुलकी आली की, मिरची चावणारा माझा बाप पुन्हा येईल माझ्या सोबतीला? आमच्यामधले साधर्म्य सिद्ध करण्यासाठी तळहातावर ब्लेड फिरवणारा गोखले आता कुठे असेल? भिकू मांगलेच्या छाताडावर रणचंडिकेच्या अवतारात पाय ठेवून उभी राहिलेली सखू अजून रमाइ नगरमध्ये असेल? मादरच्योद असून भागत नाही बाबा.. मादरच्योद दिसायलाही लागतं, असा धडा देणारा ॲकॅडमीतला पवार.. काळा पहाड, कुठे असेल आता?

जुने दिवस पुन्हा जगता येतात?

कदाचित या जुन्या क्षणांच्या आठवणी पुन्हा जिवंत करता येतीलसुद्धा.. त्या मातीची भेट पुन्हा झाली तर!

म्हणजे शेवटी माती! सगळे तिच्याशी निगडीत आहे. हे असेच काहीतरी, कुणीतरी म्हणाले होते.. अगदी अलिकडे.. येस, फिरोज.. फिरोज अब्दुल मसुद पेशावरी! तो म्हणाला होता.. आप नहीं समझोगे, वतन क्या होता है.. मिट्टी क्या होती है.. हम

अपनी मिट्टीसे जुडे थे. और आपने...आपकी सरकारने बरबाद किया हमें.. हम अपनी मिट्टीसे टूट चुके है..

तेव्हासुद्धा मला त्याचे म्हणणे पटले नव्हते.. कारण त्याच्यासाठी ती जमीन एक राजकीय आणि आर्थिक गरज होती.. इट्स ऑल अबाउट द लँड, असे आपण म्हणतो ते तिच्या मालकीसाठी.. मग ती जमीन झाली.. माती नाही.. माती हे एक प्रतीक आहे. तिच्याशी जोडलेल्या आठवणींचे.. त्या आठवणी मातीला आये बनवतात.. बाप बनवतात.. सखू बनवतात.. मग त्या मातीत माझी झोपडी उभी राहते.. शाळा उभी राहते.. रेल्वेस्टेशनशेजारचा किल्ला उभा राहतो.. त्या किल्ल्यावरच्या तळ्याशेजारी सगळे कपडे उतरवून नग्न उभा राहणारा शरद गोखले पण त्या मातीचाच बनतो आणि आशू काळसेकरसुद्धा त्याच मातीतून जन्माला येते.. हे.. हे.. काहीही नसेल, तर माती माती उरत नाही.. ती उरते फक्त जमीन म्हणून.. एक मोठे शून्य!

आठवणींना जवळ करण्याची एक अत्यंत प्रबळ इच्छा माझ्या मनात निर्माण झाली.

आय वॉण्ट टू रिलिव्ह द पास्ट! आय वॉण्ट टू बी क्लोज टू माय पास्ट!!

बापाचे काळेकभिन्न रापलेले शरीर.. आयेचे प्रेमाने ओथंबलेले डोळे.. आणि माझी झोपडी.. व्हाय नॉट?

माझ्या बेडच्या शेजारी असलेली बेल मी दाबली.. दाबली म्हणजे, दाबूनच ठेवली. मला कल्पना होती की, माझ्या या एका कृतीमुळे प्रचंड गडबड उडेल. कित्येकांचे छातीचे ठोके चुकतील.. रात्रीची झोप बरबाद होईल. पण मला त्याची पर्वा नव्हती. आय जस्ट कुड नॉट केअर.. कारण मला काय हवं होतं, ते मला कळलं होतं..

वासंती, रात्रीचा डॉक्टर.. यंग पोरगं.. डॉ. कुमार.. आशू, आणि पहाऱ्यावरचे कॉन्स्टेबल.. सगळे एकदमच खोलीत शिरले.. सगळेच थरकापले होते. कारण माझा हात अजूनही बेलवरच होता. वासंतीने पुढे येऊन तो बाजूला केला..

'काय हवं आहे? काही होत आहे का?' तिचे डोळे मॉनिटरवर खिळले होते.

'मला आशूशी बोलायचं आहे.' मी त्यांना सांगितले.

सगळ्यांचा जीव भांड्यात पडला.

मी नजरेनेच कॉन्स्टेबलना खुणावले.. ते सुटका झाल्यासारखे खोलीबाहेर पडले.. पाठोपाठ वासंती आणि डॉ. कुमारही.. आशू माझ्या उशाशी.. माझा हात पकडून उभी होती.

'काय झालं? किती घाबरवलंस.. सगळ्यांनाच!!' तिच्या आवाजात भीती..

'मला काही हवं आहे..' मी हलकेच तिच्या हातांवर हात ठेवला.

'बोल ना..' ती.

'बैस.. आणि मला अडवू नकोस.. मी थोडक्यातच सांगेन..' तिच्या हातावरचा माझ्या हाताचा दाब वाढवला. स्पर्श बोलत होता. ती हलकेच माझ्या बेडशेजारच्या स्टुलावर टेकली. तिने माझा हात घट्ट पकडून ठेवला होता. जणू तिला भीती होती.. न जाणो, हा पटकन निसटून जायचा.. माझे डोळे मिटले होते.

'आशू.. मला माझ्या भूतकाळाची पुन्हा एकदा गाठभेट घ्यायची आहे.. कधीकधी आपल्या आजच्या जगण्याचा स्रोत आपल्या भूतकाळात असतो.. मला रमाई नगरला भेट द्यायची आहे..' मी श्वास घेण्यासाठी थांबलो.

'अरे पण..' आशू अडचणींचा पाढा वाचणार याची मला कल्पना होतीच. मी तिला हातानेच थांबण्याची खूण केली आणि तिच्याकडे पाणी मागितले. एवढ्याश्या बोलण्यानेही घशाला कोरड पडली होती. तिने भांडे भरले आणि अगदी हळू.. घोट घोट पाणी ती मला पाजू लागली. मी तिला खुणेने थांबायला सांगितले.

'आशू, अडचणींवर मात करण्यात अख्खं आयुष्य गेलं.. आता या क्षणी अडचणी कशा अडवतील मला? रमाई नगरचा चेहरामोहरा आता बदलला असेल.. आशू, पण मला खात्री आहे, तेथे जाताच माझ्या आठवणी पुन्हा जिवंत होतील.. नेशील मला रमाई नगरमध्ये?' का कुणास ठाऊक, भावनावश व्हायचे नाही, असे ठरवले, तरी.. ओठ थरथरतात आणि एक चुकार अश्रू डोळ्यांच्या कोपऱ्यामधून ओघळतोच.. जगण्याच्या अशा टप्प्यावर माणसाला रडणे सहज आणि आपोआप येते. मृत्यूच्या दारात सगळेच विचार प्युअर.. विशुद्ध होत असावेत. आणि औषधांचाही परिणाम होतोच. सगळ्याच नसा इतक्या शिथील होतात. एरवी ह्याच अशा विचारांमुळे डोळ्यात अश्रू तरळतील, असे मला वाटत नाही.

'जाऊ या आपण, रमाई नगरमध्ये.. मी घेऊन जाईन तुला..' आशू स्वतःवर पूर्ण नियंत्रण ठेवत म्हणाली. माझ्या चेहऱ्यावर एक हसू उमटले.

.............................

***--आशू--***

'यू नो आशू, एक डॉक्टर म्हणून मी प्रेमानंदला हलवायची.. हॉस्पिटल सोडायची परवानगी देऊ शकत नाही.. त्यातले धोके तुला पूर्णपणे ठाऊक आहेत,' डॉ. साने आपल्या भूमिकेशी ठाम होते.

'पण डॉक्टर, मी तुमच्याकडे एक डॉक्टर म्हणून आलेच नाही. एक डॉक्टर म्हणून जे काही करता येईल, ते तुम्ही आणि डॉक्टर शास्त्री.. दोघांनीही केलं आहेच. कोण हे नाकारू शकेल!' मी प्रयत्न सोडायला तयार नव्हते.

'थँक्स.. सतत प्रयत्न करत राहणे, हे डॉक्टरांचे कर्तव्यच आहे.. रुग्णाच्या प्रकृतीचा मी विश्वस्त आहे ना..' डॉक्टर.

मी तो मुद्दा तसाच जाऊ दिला. मला त्यांना डॉक्टरच्या पलिकडच्या भूमिकेत न्यायचे होते..

'गल्या महिन्यात आपल्यामध्ये आणि विशेषतः तुम्ही आणि प्रेमानंदमध्ये.. डॉक्टर आणि पेशंट या पलिकडचे नाते निर्माण झाले आहे,' मी.

'खरं आहे ते,' डॉ. साने आपल्या खुर्चीतून उठले आणि त्यांनी एमआरआय स्कॅनची एक फिल्म दिव्याच्या प्रकाशाखाली पाहायला सुरुवात केली. त्यांची नजर काहीतरी शोधायचा प्रयत्न करत होती. 'डॉक्टर, मी त्या मैत्रीच्या नात्याने तुमच्याकडे आले आहे,' माझी नजर त्यांच्या नजरेचा पाठपुरावा करत होती.

'यू नो आशू, माझ्या करिअरमध्ये मी अशी केस पाहिली नव्हती.. कुठून रक्तस्राव होत आहे, हेच आम्ही शोधू शकत नाही..' त्यांच्या कपाळावरच्या शिरा ताणल्या गेल्या होत्या. निराशेने त्यांनी ती फिल्म टबलावर हलकेच आपटली.. 'इट्स सो फ्रस्ट्रेटिंग..'

मी तो धागा पकडला.. 'आणि जेव्हा शास्त्र थकतं, त्याची मती गुंग होते, तेव्हा मानवी इच्छाशक्ती आपला खेळ खेळू लागते ना डॉक्टर.. तुम्हाला आठवतं, डॉ. मर्चंट काय

म्हणाले होते.. ? वोण्ट बेट माय लास्ट रूपी..' मी उत्सुकतेने त्यांच्या प्रतिसादाची वाट पाहू लागले.

'तुला काय सुचवायचं आहे, आशू ?' डॉक्टर माझ्याकडे पाहू लागले.

'डॉक्टर, प्रेमानंदला शेवटी शेवटी मी अत्यंत निराश अवस्थेत पाहिले होते.. लॉकअपमधला प्रत्येक क्षण त्याला पराभूत करत होता.. खरेतर त्याला जगायची इच्छाच उरली नव्हती.. त्याचं वैयक्तिक आयुष्यच विस्कटलं होतं आणि त्याचवेळी त्याचं स्वातंत्र्यही हिरावून घेतलं गेलं होतं.. अहो, त्याचं सर्व्हिस रिव्हॉल्व्हर, त्याचा बेल्ट, त्याचा युनिफॉर्म.. त्याच्यासाठी सर्वस्व होतं हे.. तात्पुरतं का होईना, पण ते गमावणं त्याला सहन नव्हतं झालं.. कोठडीत रात्रो झोपताना त्याला प्रश्न पडायचा, सकाळी जागं का व्हायचं ?'

'मी समजू शकतो, आशू..' डॉक्टर माझ्या खुर्चीशेजारी येत म्हणाले.

'पण आज मी पाहिलेला प्रेमानंद पुन्हा एकदा काहीतरी मागत होता,' मी उठून उभी राहिले, 'त्याला काहीतरी हवं होतं. आपलं बालपण.. आपली झोपडी.. त्या आठवणी.. आणि त्या आठवणींमधली ऊर्जा त्याला हवी होती.. हवी आहे.. पुन्हा एकदा कशाशी तरी जुडण्याची त्याला इच्छा झाली आहे. ही वॉण्ट्स टू कनेक्ट.. आणि त्याची इच्छाशक्ती जागृत होणं, म्हणजे तो पुन्हा एकदा नवी सुरुवात शोधतो आहे, असं नाही तुम्हाला वाटत ?' मी एव्हाना डॉक्टरांचा हात पकडला होता. त्यांनी तो हलकेच सोडवून घेतला आणि त बराच वेळ पुन्हा एकदा एमआरआय फिल्म पाहत राहिले.. नंतर त्यांनी ती फिल्म खाली ठेवली आणि ते माझ्याकडे वळले..

'ओ.के.. वुई विल टेक धिस चान्स ऑल्सो.. पण मला काही फॉरमॅलिटीज पूर्ण कराव्या लागतील.. यू नो, प्रेमानंद हा कोणी साधासुधा पेशंट नाही आणि तुला निर्णय घेण्याचं कायदेशीर स्थान नाही.. पण मला एक सांग, त्याला रमाई नगरमध्ये न्यायचं कसं ? तो त्या झोपडपट्टीत कसा प्रवास करणार आहे ? इन्फेक्शन.. तू.. सगळ्याचा विचार केला आहेस ?' डॉक्टर आता नकार सोडून अडचणींचा विचार करू लागले होते.

'डॉक्टर, तुम्ही सरकारी प्रक्रिया पूर्ण करा.. मी बाकीचे सांभाळते.. इच्छा असते तिथे मार्ग असतो.. एक व्यक्ती आहे, जी प्रेमानंदला मदत करू शकते..' मी उठत म्हणाले.

'येस..' डॉक्टर मला दरवाज्यापर्यंत सोडायला आले.

'ललित सिबल.. ट्रिब्युन वृत्तपत्र समुहाचे सर्वेसर्वा..' मी डॉक्टरांना नमस्कार करून त्यांच्या खोलीबाहेर पडले.

पुढे काय करायचे, मला ठाऊक होते.

..........................................

# --पसरिचा--

माझा दैवावर विश्वास नाही.. भविष्यावरही नाही. अगदी जरी मी बच्चीचे भविष्य सदर.. ट्रिब्युनच्या रविवारच्या आवृत्तीत छापत असलो, आणि जरी मी स्वतः अलिकडे त्याला माझा हात दाखवून भविष्याचा मागोवा घेतला असला, तरी दोन्ही एकप्रकारे करमणूकच!

जे घडायचे असते, ते घडतच असते.

माझा असा विश्वास आहे की, जे घडत असते.. ते चांगलेच घडत असते. म्हणजे, समजा वाईट घडले, तरी माझ्या मनात पहिला विचार येतो... चला, यापेक्षा जास्त वाईट घडले नाही ना!

दुःख हे माणसाच्या वाट्याला यायलाच हवे. दुःख अनुभवल्यानंतर सुखाची चव कळते ना?

आयुष्य असेच असते.

काही महिन्यांपूर्वी प्रेमानंद हिर्लेकरवर एक प्रदीर्घ स्टोरी करावी, असे मला वाटले. त्याला न्यूज व्हॅल्यू होती. मी काही सामाजिक कार्यकर्ता नाही. कुठल्याहो विचारसरणीचा झेंडा खांद्यावर घेणे, मला जमले नाही. मला एकच कळते.. न्यूज व्हॅल्यू.. माझ्या वाचकांना प्रेमानंद हिर्लेकरबद्दल वाचायला आवडेल का?

साधा सरळ प्रश्न.. आणि उत्तर.. दणदणीत होकार!!

पण तेव्हापासून आजपर्यंतचा प्रवास हा अनेक दृष्टींनी नुसता चित्तथरारकच ठरला नाही, तर मनाची कवाडे उघडणारा.. आपल्या व्यावसायिक आणि वैयक्तिक निष्ठांची कसोटी पाहणारा असाच ठरला. इट वॉज अ रिवॉर्डिंग जनी इन एव्हरी रिस्पेक्ट!

विचारांच्या अशा हिंदोळ्यावर हेलकावे घेत मी इण्टॅलिजन्स ब्युरोचे सर्वेसर्वा.. सुब्रतो गुहा यांची वाट पाहत त्यांच्या ऑफिसमध्ये बसलो होतो. एअर कण्डिशनिंग चालू असूनसुद्धा मला घाम फुटला होता. मी कोटाच्या खिशातला रुमाल काढून माझा चेहरा टिपला. अलिकडे असा घाम येणे.. नेहमीचेच झाले होते.. मी बॅगेतून डिओचा फवारा काढला आणि माझ्या अंगावर तो फवारला.. घामाचा वास मला सहन होत नाही.

आमची भेट अकरा वाजता ठरली होती. सुब्रतो गुहा पंधरा मिनिटे लेट झाले होते. मी थोडासा चिडचिडा झालो होतो. पण ही दिल्ली आहे आणि या शहरात सर्व काही 'भारतीय' वेळेनुसार चालते, याची मला कल्पना होती. आमची भेट, सुब्रतो गुहा यांच्या पुढाकारानेच ठरली होती. मध्यरात्री त्यांचा फोन आला आणि मिळेल ते विमान पकडून मी दिल्ली गाठली होती.

प्रेमानंदने जो प्राथमिक पुरावा माझ्याकडे सोपवला होता, त्याची निष्पत्ती आज सुब्रतो गुहाकडून कळेल, असा माझा  अंदाज होता. फोनवर जास्त बोलायचे नाही, असे आमचे, जेव्हा मी पुरावा त्यांच्या हातात सोपवला, तेव्हाच ठरले होते.

माझ्या तळव्यांना पुन्हा घाम फुटला होता.. चेहरासुद्धा पुन्हा घामाने डबडबला होता. इतकी वर्षे काढली पत्रकारीतेमध्ये.. आणि तरीसुद्धा ही एक्साइटमेण्ट! मी रुमाल काढून पुन्हा घाम टिपला आणि एक ग्लास पाणी पटापटा प्यायलो. घशाला कोरडच पडली होती. नशीब सुब्रतो गुहांनी मला त्यांच्या ऑफिसमध्येच थांबवण्याची सूचना त्यांच्या सचिवाला दिलेली होती. एका अर्थाने ते सुचिह्नच होते, असे मला वाटले.

प्रेमानंद डिझर्व्ह इट! त्याची प्रकृती ठीक नाही, याची कल्पना मला आशूने दिली होतीच. आमची सगळ्यासाठी मानसिक तयारी झाली होती. इच्छा एकच होती की, त्याच्यावर झालेल्या अन्यायाचे निवारण व्हायला हवे होते. पोलीस स्टेशनवर अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्यात सहाही अतिरेकी मारले गेले होते. आणि त्यातला एक फिरोज होता. त्यामुळे त्याच्यावरच्या आरोपाचा तसा निकाल लागलाच होता. पण ते अतिरेकी म्हणजे अजस्र हिमनगाचे वरचे टोक होते. एक अष्टमांश भाग!! प्रेमानंदने

माझ्याकड सोपवलेली सीडी....डोळ्यांना न दिसणाऱ्या भागाकडे बोट दाखवत होती. त्याचा खरा विजय त्या सीडीच्या सिद्ध होण्यातच होता. न जाणो, तो विजय त्याला पुन्हा एकदा जगण्याची उर्मी देईल!!

माझे लक्ष घड्याळाकडे गेले. साडेअकरा!! आशू आज प्रेमानंदला घेऊन रमाई नगरमध्ये जाणार होती. मीसुद्धा त्यांच्याबरोबर जाणार होती. पण दिल्लीच्या फोनने सगळी उलथापालथ केली. यात एका माणसाने मला खरेच थक्क कले होते. ललित सिबल यांनी. प्रेमानंदची रमाई नगरची भेट सुखरूप व्हावी, म्हणून त्यांनी ट्रिब्युनची सगळी ताकद पणाला लावली होती. त्यांच्या काही फोनकॉल्समुळे रमाई नगरमधले सगळे रस्ते व्हीलचेअरवर जाण्यासाठी योग्य झाले होते. त्यांनी प्रेमानंदसाठी, त्याला सोयीस्कर ठरेल अशी एक इलेक्ट्रिक व्हील चेअर तडकाफडकी, म्हणजे अठ्ठेचाळीस तासांत बनवून घेतली. ट्रिब्युनच्या इंजीनिअर्सनी ती तपासून घेतली आणि तिची रमाई नगरमध्ये टेस्ट रन घेतली. डॉक्टर्सनीही ती पाहिली.. त्या खुर्चीला सर्व वैद्यकीय सुविधा जोडलेल्या होत्या.

पावणे बारा झाले होते आणि माझा संयम सुटत असताना सुब्रतो गुहांनी त्यांच्या दालनात प्रवेश केला. सहा फूट उंच, राकट चेहरा, डोक्यावरचे क्रू कट केलेले केस, अंगावर नेव्ही ब्लू रंगाचा सूट, गळ्यात सोनेरी टाय, डोळ्यांसाठीचा चष्मा भव्य कपाळावर.. आणि हातात एक फाइल.

'तुम्हाला थांबावं लागलं, माफ करा..' त्यांनी हात पुढे करत माझे स्वागत केले.

'वेल.. उशीर जर का कारणी लागणार असेल, तर माझी तक्रार नाही.' मी पत्रकारी अढो टाकली. सुब्रतो गुहा मंद हसले.

'कॉफी?' त्यांनी कॉफीमेकरकडे जात मला विचारले.

'हो चालेल,' मी.

'मला एक्सप्रेसो आवडते.. हाऊ अबाउट यू?' त्यांनी विचारले.

खरे तर मी कॉफी घ्यायला नको.. स्टिम्युलंट.. उत्तेजक! पण मी फारसा विचार करण्याच्या मनस्थितीमध्ये नव्हतो. फार फार तर समोर ठेवून बसू! मी मान डोलावली. एक्सप्रेसो कॉफीचे छोटे छोटे कप घेऊन सुब्रतो गुहा आपल्या टेबलापाशी आले आणि त्यांनी एक कप माझ्यासमोर ठेवला.

‘साखर?’ त्यांनी विचारले.

‘नो..’ मी विषय तातडीने रुळावर आणण्यासाठी घाईत होतो. ‘यू नो, मिस्टर गुहा, तुमचा निर्णय ऐकण्यासाठी मी उत्सूक आहे.. निर्णय.. निष्कर्ष.. तो माणूस अजूनही जर का सभ्यतेच्या बुरख्याआड..’ माझे वाक्यच पूर्ण होऊ शकले नाही कारण सुब्रतो गुहांनी हातानेच मला रोखले.

‘मिस्टर पसरिचा.. वेट.. हे जरी ऑफिस असले, तरी रूल्स ऑफ दी गेम डोण्ट चेन्ज.. सोऽ नो नेम्स.. नो डायरेक्ट रेफरन्स टू.. एनिथिंग.. तुम्हाला कळतय ना, मी काय म्हणतोय ते?’ त्यांनी एक्सप्रेसो कप ओठांना लावून घोट घेतल्या न घेतल्यासारखे केले.

‘ओके.. तुम्ही बोला. मी ऐकतो..’ मी एक्सप्रेसोच्या कपाशी चाळा करत त्यांना म्हटले.

‘व्हॉइस ॲनालिसिसचा फॉरेन्सिक रिपोर्ट पॉझिटीव्ह आहे.. मी आत्ता महत्त्वाच्या मिटींगमध्ये होतो. अटेण्टेड बाय.. सी.. पी.. एच ॲण्ड डी..’ त्यांचे वाक्य माझ्या कानावर आले आणि शरीरावरचे सगळे केस ताठ उभे राहिले.

‘सोऽऽऽ मिस्टर पसरिचा.. आभारी आहोत. खूप महत्त्वाची माहिती तुम्ही आमच्यासमोर आणली आहे.’ त्यांनी हात पुढे केला.

‘माझे आभार? ज्या व्यक्तीचे आभार तुम्ही मानायला हवेत..’ मी त्यांचा हात हातात घेत म्हणालो.


‘त्याचीही काळजी घेतली जाईल..’ गुहा पुन्हा एकदा आपल्या खुर्चीतून उठून उभे राहिले.

‘आणि कारवाई? दोषींविरुद्ध कारवाई?’ मी अधीर झालो होतो.

‘मिस्टर पसरिचा.. तुम्ही ट्रिब्युनचे संपादक आहात.. तुमची नजर चुकवून या देशात काही घडू शकतं का?’ त्यांनी खोलीच्या दरवाजाच्या दिशेने चार पावले उचलली. आमची भेट संपल्याचा तो एक संकेत होता. मी एक्सप्रेसोचा कप एका घोटात रिकामा केला. पहिली.. मिळेत ती फ्लाइट पकडून मुंबईला परतण्याचा निर्णय मी तेव्हा घेतला. मला आशू आणि प्रेमानंदचे चेहेरे.. त्यांच्या डोळ्यांमधला आनंद.. पाहायचा होता.

अजूनही या देशाबद्दल आशा बाळगायला जागा होती. सुब्रतो गुहांच्या मिटींगमध्ये पो.. म्हणजे पंतप्रधान.. एच.. केंद्रीय गृहमंत्री.. डी.. म्हणजे संरक्षणमंत्री आणि सी.. राज्याचे मुख्यमंत्री हजर होते. दी मॅटर हॅड रिच्ड टॉपमोस्ट लेव्हल.. कारवाई होणारच! मला खात्री वाटली.

लिफ्टमध्ये शिरताच मला पुन्हा एकदा दरदरून घाम फुटला.. माझा शर्ट यावेळेस ओलाचिंब झाला.. छातीमध्ये, एखादी सुपरफास्ट ट्रेन जावी तसा आवाज ऐकू येऊ लागला. मी स्वतःलाच शिव्या घातल्या. मी.. ती.. एक्सप्रेसो कॉफी प्यायला नको होती.. हळूहळू मला श्वास घ्यायलाही त्रास होऊ लागला. मी लिफ्टच्या बाहेर पडलो आणि कार पार्किंगच्या दिशेने जाऊ लागलो. पण माझा माझ्या शरीरावरचा ताबा सुटत चालला होता. आजूबाजूचे जग अंधुक वाटायला लागले होते. माझा हात माझा मोबाइल शोधत होता. मला मदतीची गरज होती. पण कुणाकडे मदत मागावी, मला कळत नव्हते. माझी शुद्ध हरपत होती. हे असे घडत असताना डोक्यात मात्र प्रेमानंदचा विजय होता. मी खूप खूप आनंदात होतो. खाली कोसळतानासुद्धा माझा चेहरा हसरा होता.



*--बारा--*

# *---आशू---*

'प्रेमानंद हिर्लेकर'

कम्प्युटरच्या की बोर्डवर ही अक्षरे टाइप करून मी कितीतरी वेळ थांबले होते. मनात एक द्वंद होते. ही लेखमाला आपण करायची की नाही? वाट्याला आलेली कुठलीही स्टोरी करणारी पत्रकार, मी नव्हे. पसरिचालासुद्धा हे माहीत होते. मला कुठे ठाऊक होते की, त्या रात्री सुरू झालेली प्रेमानंद हिर्लेकरची गोष्ट आज हॉस्पिटलमधल्या त्याच्या मृत्यूशय्येपाशी संपुष्टात येणार आहे ते!

आज मी तुझ्या शेजारी बसले आहे.. तुझ्याशी बोलत. तू ऐकतो आहेस की नाही, याची पर्वा न करता. तुझे डोळे उघडे आहेत, पण त्यात ओळखीची खूण मला दिसत नाही. मिटण्याच्या तयारीत असलेले तुझे डोळे! तुझ्याशो हा शेवटचा संवाद साधताना मला इथे आणखी कुणीही नको होते. मी डॉक्टरांना तशी विनंती केली. भीक मागितली म्हण, हवे तर. स्वभावाविरुद्ध जाऊन. हा आपला एकांत माझ्यासाठी खूप महत्त्वाचा आहे. कदाचित तुझ्यासाठीही.. हां.. तर कुठून सुरुवात केली मी?

'प्रेमानंद हिर्लेकर'

कम्प्युटरच्या मॉनेटरवर ही अक्षरे आणि त्यातून तयार झालेले नाव माझ्याकडे पाहून डोळे मिचकावत होते.

तुझ्यावर स्टोरी कर, असे सांगताना पसरिचा म्हणाला होता, चिखलात इतक्या जोरात उडी टाक की, तो सगळीकडे उडाला पाहिजे.. वरवर यात सेन्सेशनालिझमचा वास येतो ना? पण वरवर दिसणारा त्याचा धंदेवाईक उथळपणा, हा वरवरचा आहे, त्याच्या आत एक अत्यंत संवेदनाक्षम, हळवा माणूस दडलेला आहे, आणि वेळप्रसंगी

प्रवाहाविरुद्ध पोहून आपल्या निष्ठांसाठी झगडणारा पत्रकारही दडलेला आहे, हे मला ठाऊक होते.

जसाजसा तुझा धांडोळा मी घेत गेले, तव्हा जाणवले की, हा चिखल प्रेमानंद हिर्लेकरचा नाहीए.. त्याने नाही केलेला हा चिखल.. आजूबाजूचा समाज, सरकारी यंत्रणा आणि राजकारण.. याच्या चिखलात तू रुतला आहेस. मला आजही कळत नाही प्रेमानंद, तुझो कहाणी आज संपणार आहे की, ती आज खऱ्या अर्थाने सुरू होणार आहे?

किती शांत.. आणि समाधिस्थ चेहरा दिसतो आहे तुझा! तुझा हेवा वाटतो!! एकदा वाटले.. हा शेवटचा संवाद तुझी समाधी भंग तर करणार नाहो ना.. तुझी शांती नष्ट तर करणार नाही ना? का तुझ्या शेवटच्या श्वासातही मी माझीच गरज पूर्ण करण्याची केविलवाणी धडपड करत आहे?

तू नेहमीप्रमाणे चुप्पी साधून पडला आहेस. काल रात्री तू काही वेळ शुद्धीवर आलास. मी तुझ्या शेजारीच बसले होते. प्रेमाचे चार शब्द बोलशील.. पुढल्या एकाकी वाटचालीसाठी त्यांची शिदोरी माझ्याबरोबर देशील, असे मला वाटले होते.. प्रत्येक शब्द उच्चारताना विलक्षण कष्ट होत होते तुला.. आणि काय म्हणालास?? शेवटच्या श्वासाच्या वेळी अश्रूपात नको? मेलोड्रामा नको.. आपण भेटतो, एकत्र प्रवास करतो आणि आपापल्या स्टेशनवर उतरतो.. म्हणजे एकमेकांची संगत आपल्याला नको असते, असे नाही. पण आपल्याला आपली कामे असतात. आपल्या वाटा वेगवेगळ्या दिशांनी जात असतात. मला एकदम पसरिचाची आठवण आली. तो असेच काहीतरी बोलला होता. तुझ्या संदर्भात! वुई मीट.. ॲण्ड वुई पार्ट.. दॅट्स लाईफ! लाइक माय न्यूजपेपर.. वेड्याला एक कळत नव्हतं.. आजच्या जगलेल्या आयुष्याची उद्या रद्दी होत नाही. वर्तमानपत्रासारखी!! उलट आज जगलेले क्षण उद्याची पहाट होतात आणि आज न जगलेले क्षण उद्याचे ग्रहण होतात. सोऽऽ आज हा उद्याच्या संदर्भात खूप महत्त्वाचा असतो. तुला काय वाटतं प्रेमा, ते वरचे मशीन तुझी जीवनरेषा दाखवेनासे झाले की, तुझे अस्तित्त्व संपुष्टात येणार आहे? एकदा पाशी मला ललित सिबल काय म्हणाले, ते सांगत होता. ते म्हणाले होते.. जीवनापासून मृत्यूपर्यंतचा प्रवास विलक्षण असला पाहिजे. म्हणजे एका क्षणी तुमचा श्वास सुरू होतो आणि तो चालू असेपर्यंत तुमची सगळी देणी, तुमची वचने, सगळ्याला तुम्ही बांधोल असता. त्यातले काहीही

तुम्ही नाकारू शकत नाही. पण.. दुसऱ्या क्षणी तुम्ही नसता.. यू आर नो मोअर.. डेड.. मग तुमच्या जबाबदाऱ्या, तुमची देणी, तुमची वचने कशालाही काही अर्थच उरत नाही. मती गुंग करणारा प्रकार आहे हा... मला हे अजिबात पटले नाही. मी पाशीला म्हटले, हा फारच कायदेशीर विचार झाला रे.. आमचे माणसांचे खरे जीवन कायद्याच्या पल्याड आहे.. त्याला वाटलं, मी प्लँचेट, भूत वगैरे बोलते आहे. मी त्याला म्हटलं, पाशी, फॉर गॉड्स सेक, सूर्य अस्ताला गेला, म्हणजे त्याचे अस्तित्त्व संपत नाही. तर तो म्हणे, हवेत बाण मारू नकोस.. वस्तुनिष्ठ बोल. मी त्याला एकच विचारले, सव्यसाची आजसुद्धा तुझ्यासाठी अस्तित्त्वात आहे ना? तूच म्हणाला होतास ना की, सव्यसाचीनंतर मी अशारीरिक झालो आहे? आजसुद्धा भडवा मला पूर्णपणे गिळून उरला आहे. जरी त्याचं शारीरिक अस्तित्त्व नसलं तरी! म्हणजे ज्या दिवशी आम्ही त्याला जाळलं, त्या दिवशीसुद्धा त्याचे अस्तित्त्व संपले नाहीच. पाशी बरोबर बोलला होता, माणसांची नाती शरीरापल्याड असतात. त्या नात्यांशी साथ राहतेच राहते आणि त्या नात्यांची देणी शरीर संपले, तरी द्यावीच लागतात. खरे सांग प्रेमा, अवघे आयुष्य तू जगलास ते बापाचे आणि आयेचे ऋण फेडतच. शपथ घेऊन सांग, तसे नसते, तर आयुष्याचे फासे उलटे पडायला लागल्यावर तू आयेने घ्यायला लावलेल्या बांद्र्याच्या खोलीचा रस्ता पकडला नसतास. खरं की नाही? काय म्हणाला होतास तू तेव्हा? सस्पेंड झाल्यावर सगळंच हरवलं, तेव्हा हीच खोली जवळची वाटली. आयेची उब जणू!

प्रेमा.. ही देणी देण्यातच आपल्या जीवनाची ठेव वाढते, नाही? ही अशी अकच ठेव आहे, जी व्याज भरून कमी होत नाही.. वाढतेच!

पाशीचा मृत्यू आपल्या दोघांसाठी धक्कादायकच होता, नाही प्रेमा? रमाई नगरमध्ये फिरत असताना माझा मोबाइल थरारला. मी कॉल घेणारच नव्हते.. पण पाहिले, तर फोन ट्रिब्युनच्या न्युज डेस्कवरून होता. रफीचा.. मला वाटलं, पसरिचाचा काही निरोप असेल, म्हणून तो कॉल मी घेतला. रफी रडतच होता.. पसरिचा साब.. नहीं रहे.. मॅसिव्ह कार्डियाक अरेस्ट.. क्षणभर वाटलं, माझ्याच मृत्युची बातमी कुणी तरी मला सांगत आहे. मी सुन्न झाले. अगदी खरं सांगते प्रेमा, माझ्यातला खूप मोठा भाग ती बातमी ऐकताक्षणी मेला.. रडूसुद्धा येईना.. चेहरा लालबुंद करून सव्यसाचीचे वाक्य मला ऐकवणारा पसरिचा.. मी सूर्य आहे.. जवळ याल, तर माझ्यातच नष्ट

व्हाल.. वाटायचं, हे पसरिचाच म्हणतो आहे. दॅट ओल्ड मॅन ऑफ केप हॉर्न कविता म्हणताना लहान मुलासारखा हमसाहमशी रडणारा पसरिचा.. माझ्याकडे एक स्त्री, मादी, उपभोग्य वस्तू म्हणून न पाहता एक मित्र, जिवाभावाचा मित्र म्हणून पाहणारा पसरिचा.. आता कुणाच्या कुशीत शिरून आपले मन मोकळे करणार प्रेमा?

भावनांचा आवग ओसरल्यावर जाणवलं.. पाशीसारखी माणसं मरत नाहीत.. कारण ती फक्त माणसं नसतात, ती प्रवृत्ती असतात.. विचार असतात.. आणि विचार काय किंवा प्रवृत्ती काय, कधीच विनाशी नसतात. म्हणून तर सव्यसाचीचे त्याने सांगितलेले वाक्य खूप लक्षात राहिले, जिथे जीवन संपते, तिथे सूर्य उगवतो..

पसरिचाचा शेवटचा फोटो पाहून तर मीसुद्धा स्तिमित झाले.. चक्क हसत मेला रे तो.. कशासाठी? कुणासाठी हसत होता तो? काय विचार होता त्याच्या डोक्यात तेव्हा? त्याच्या चेहऱ्यावर जणू कृतकृत्य झाल्यासारखे भाव होते.

त्याचवेळी आणखी एक बातमी आली.. राज्याच्या गृहमंत्र्यांचा मुंबई–पुणे सुपर एक्सप्रेसवर अपघाती मृत्यू..!!

पाठीच्या कण्यातून एक बर्फासारखा थंडगार प्रवाह गेला.. प्रेमा.. याच गृहमंत्र्यांविरुद्ध तू पुरावा गोळा केला होतास ना? त्यांनीच तुझा काटा काढायचा जिवापाड प्रयत्न केला होता ना? दोन्ही बातम्या तू निर्विकारपणे ऐकल्यास!! मला आश्चर्यच वाटले.

गृहमंत्र्यांच्या अपघाती मृत्युची बातमी तू निर्विकारपणे ऐकलीस, त्याचे मला फारसे आश्चर्य वाटले नाही. तू तोपर्यंत तिरस्कार, राग, द्वेष, या भावनांच्या पलिकडे गेला होतास.

पण पसरिचाच्या मृत्युची हळहळ तुला वाटू नये? तिथेच माझ्या छातीचा ठोका चुकला. मी प्रथमच भांबावले. एकीकडे पाशीचा मृत्यू, दुसरीकडे तुझा शून्य प्रतिसाद!! मी पुन्हा पुन्हा तुझ्याशी बोलायचा प्रयत्न करू लागले.. पाशी.. पाशी.. गेला.. पाशी नो मोअर.. तुझ्या कानीकपाळी ओरडले.. पण तुझ्या डोळ्यांमधली ओळख नष्ट झाली होती. ॲज इफ, ते मलाच विचारत होते.. कशाला आरडाओरडा करते आहेस? कोण पसरिचा.. काय संबंध माझा त्याच्याशी? तू कोण आहेस? मी कुठे आहे?

मी घाबरले.. कुणाला हाक मारणार? कोणाची मदत घेणार? प्रचंड वेगाने सगळं काही घडत होतं. न पेलणारा वेग.. अरे मेंदूने तरी किती घटनांना प्रतिसाद द्यायचा!! त्याच्याही मर्यादा असतातच.. सुदवाने सान्यांनी आपल्याबरोबर एक डॉक्टरही दिला होता. त्याने प्रथम माझी भिरभिरती नजर टिपली. तो धावतच जवळ आला.. त्याने तुला पाहिले आणि म्हणाला, ब्रेन इनफ्राक्ट.. पुढच्या क्षणी त्याने ॲम्ब्युलन्सकडे धाव घेतली. तुला हॉस्पिटलमध्ये आणले..

हे असे अनपेक्षित कसे घडले प्रेमा? सगळ्यांना एकच प्रश्न पडला होता.. म्हणजे त्या क्षणी असे काही घडेल, याची कुणालाही आशंका नव्हती.

हॉस्पिटलमध्ये आल्यावर लक्षात आले की, व्हीलचेअरला बसवलेल्या ऑक्सिजन सिलिंडरची ट्युब सिलिडरपासून निघाली होती.. म्हणजे तुझ्या तोंडावर नुसताच ऑक्सिजनचा मास्क.. पण काही वेळ तरी तुला ऑक्सिजनचा पुरवठा झालाच नव्हता..

एका प्रश्नाचे प्रामाणिक उत्तर देशील, प्रेमा? ती नळी सिलिंडरपासून अपघाताने निघाली होती की, तूच ती काढली होतीस?

डॉक्टर म्हणतात, ब्रेन डेथ.. मेंदुला प्राणवायूचा पुरवठा झाला नाही.

रमाई नगरला भेट दऊन तुझा भ्रमनिरास झाला होता.. खरं ना? वेड्या, आपण भूतकाळाला भेट देत नसलो, तरी तो आहे त्या ठिकाणी थांबत नसतो. भूतकाळ, वर्तमानकाळ संक्रमित होत जातो.. कारण त्याला भविष्यकाळाचे वेध लागलेले असतात. तुला माहिती असलेली, तुला परिचित असलेली रमाई नगरची वस्ती जशीच्या तशी कशी राहणार होती? ज्या विषाणूंनी आपल्या आजूबाजूच्या समाजव्यवस्थेला पोखरले आहे, ते रमाई नगरला कसे सोडतील? विकत समृद्धीची सूज तिलासुद्धा येणारच ना? ती सूज सर्व रमाई नगरमध्ये दिसत होती. प्रत्येक छपरावरची डिश ॲण्टेना.. प्रत्येक चौरसामधले छोटे पडदे.. आणि त्यांच्या अफूने गरळलेले डोळे.. तुला तुझा काळाकभिन्न बाप यात शोधायचा वेडेपणा कोणी करायला सांगितला?

चरस.. गांजा आणि ब्राऊन शुगरचा धंदा करणाऱ्या पोरांना कुठे संघर्ष हवा आहे! अडचणी, समस्या यांची उकल सोड, त्यांना तोंड तरी द्यायची त्यांची तयारी आहे

का? तुझ्या बापाने तुझ्या मनात महत्त्वाकांक्षा रुजवली.. तुझ्यासाठी बारा इंचाचा फूट कधी दहा इंचाचा करायचा प्रयत्न नाही केला. तू शर्यतीत धावतो आहेस, म्हटल्यावर तुझा बाप.. डोळे फाडफाडून तुझ्या विजयाची आस धरून अंत रेषेच्या जवळ उभा राहायचा.. डोळ्यांची दुर्बिण करून तुला शोधत.. आता दहा पावलं चालल्यावर धापा लागणाऱ्यांना धावायची आसच नाही.. हे पाहताक्षणी तुला जाणवले ना? अरे, दररोज, प्रत्येक क्षणाला खोट्या स्वप्नांची अफू त्यांना लागते. मध्यमवर्गीय आणि उच्च मध्यमवर्गीय जर का मोठ्या उच्चभ्रु मॉल्समध्ये नसलेले पैसे खर्च करत त्यांची स्वप्ने विकत घेत असतील, तर रमाई नगरमधले काही पाठीमागे नाहीत. तेसुद्धा कर्जाचे हफ्ते फेडत, स्वतःला जाळत.. तेच करताहेत. हेसुद्धा तुला ओळखायला वेळ लागला नाही.. जागोजागी लागलेल्या आगीत धगधगणाऱ्या भट्ट्या आणि तिथे काम करणारी कच्चीबच्ची आणि तरुण पाहून ना? सगळ्या भंगारातल्या वस्तू वितळवून.. पुन्हा नव्या करण्याचा उद्योग.. ही लहान लहान पोरं.. आपलं अवघं आयुष्य बरबाद करत कोणा कोट्यधीशाचा खजिना आणखी श्रीमंत करताहेत, हे पाहून तुझा संताप अनावर झाला ना?

ज्या पोरांनी शाळांमध्ये आणि कॉलेजात भविष्यावरचा पडदा दूर करायचा.. ती पोरं आगीच्या भट्ट्यांसमोर उघड्या नागड्या शरीराने आणि भकास डोळ्यांनी स्वतःला जाळताहेत, हे पाहून तुला रडू आलं, खरं की नाही?

मी तुझ्या चेहऱ्यावरचे बारीक बारीक भाव टिपत होते राजा!!

रमाई नगरमध्ये तुला तुझ्या आठवणी.. तुझा भूतकाळ नाही भेटला.. पण पुढचा भकास, भयाण भविष्यकाळ मात्र जरूर समोर येऊन ठाकला तुझ्या.. आणि तुझा अंतःप्रेरणेचा स्रोतच खुंटला. तो भूतकाळावरचा पडदा आपण दूर केलाच नसता, तर रे? लेट, स्लीपिंग डॉग लाय.. अशी म्हण आहे ना प्रेमा? एनी वेज.. जे झाले, ते झाले. कटू अनूभव टाळू म्हटले, तरी टाळता येत नाहीत.

तू पुढच्या प्रवासात ही निराशा शिदोरी म्हणून न्यावीस, असे मला वाटत नव्हते, प्रेमा. मग मी ठरवलं, तुझ्या शेवटच्या श्वासापर्यंत तुझ्याशी बोलत राहायचे.. मला माहीत नाही, तू ऐकतो आहेस की नाही.. तुझ्या उघड्या डोळ्यांमध्ये काल रात्रीपासून मी ओळखीचा एक किरण शोधते आहे.. जड हातांमध्ये चेतनेची एक लहर शोधते आहे..

आणि समजा, तू ऐकत नसलास, तरी मी बोलत राहणार आहे. कारण, हे शब्द.. त्यांचा स्वर.. तुझ्या कानांमध्ये गुंजत राहील आणि क्षणभर जरी तुला त्यांची सय लाभली, तरी ते तुला पुढे साथसंगत करत राहतील, याची मला खात्री आहे.

स्पर्श.. प्रेमा, तू कधीच मला स्पर्श केला नाहीस. अस्पर्श ठेवलेस.. मी सर्वस्व द्यायला तयार आणि ते दान घ्यायची तुझी तयारीच नाही, असे का रे? तू.. तू.. एखाद्या चित्रकारासारखा विरक्त.. तुला मी हवी होते, माझा स्पर्श हवा होता.. पण तू तो स्वतःला नाकारत राहिलास.. मी तुझा स्पर्श का मागते आहे, या प्रश्नाचं तुला पटेल, असं उत्तर मिळत नव्हतं, म्हणून? तुला वाटत होतं की, एका स्पर्शाची प्रतारणा मी दुसऱ्या स्पर्शाने पुसून टाकते आहे? प्रेमा, कदाचित ते थोडे खरे असेलही, पण ते पूर्ण खरे नव्हते. एका मोठ्या कारणापाठचे ते एक छोटे कारण होते, असे म्हण हवे तर. आज तुला खरे कारण सांगू?

मला एक भीती सतत छळत राहिली, प्रेमा.. ती म्हणजे, एक दिवस, एक क्षण असा येईल की, मी तुला हरवून बसेन.. मुठीतल्या वाळूच्या कणांसारखा तू निसटून जाशील. मग मी वेड्यासारखी रात्र जागवत काढायचे.. यावर उपाय शोधत.. तुझी खुण माझ्याजवळ असणे, हा त्यावर एकमेव उपाय होता. तुझा अंश माझ्यात..

मातीचा एक गोळा घे

थोडे पाणी घाल त्यावर

मळून एकजीव कर त्याला

आता एक तुझी मूर्ती बनव..

आणि एक माझी मूर्ती बनव

आता दोन्ही मूर्ती फोड, चुरा कर त्यांचा

आणि त्याची माती एकमेकात मिसळ

पुन्हा पाणी घाल आणि...

एकजीव बनव त्या मातीला.

आता पुन्हा एक मूर्ती बनव तुझी

आणि दुसरी मूर्ती बनव माझी..

आता तुझ्या मूर्तीत

थोडीशी मी असेन,

आणि माझ्या मूर्तीत

थोडासा तू असशील...

आता पुन्हा ताटातूट होणे नाही.

पण तसे होणे, तुझ्या मनात नव्हते. कदाचित शरीराने नाही एकजीव झालो आपण, पण मनाने तर झालोच होतो. तक्रार नाही.. काय म्हणाला होतास तू, प्रेमा.. वुई मीट ॲण्ड वुई पार्ट.. आपण भेटतो आणि वेगळे होतो.. बरोबर.. पण मधला एक शब्द तू विसरलास.. वुई मीट.. वुई लिव्ह.. ॲण्ड वुई पार्ट.. आपण भेटतो, आपण जगतो आणि आपण विलग होतो..

येस.. आपण जगतो आणि जगणारही असतो..

मी जगायचं ठरवलं आहे, प्रेमा.. खऱ्या अर्थाने जगायचे ठरवले आहे.

सोऽऽ, दॅट्स इट.. बाहेर उजाडत आलं की रे.. आणि वरच्या मॉनिटरवरची तुझ्या छातीतली स्पंदने मिटली आहेत मित्रा.. पूर्णपणे.. एक सरळ रेषा..

...............................

मी हलकेच त्याचे डोळे मिटले..

...............................

प्रेमानंद हिर्लेकरने शेवटचा श्वास घेतला होता..

सूर्य उगवला होता!!

# दिशा एका दिंडीची

हा एका झंझावाताचा काळ आहे. या झंझावाताचं नांव आहे इंटरनेट.

झंझावातापुढे भले तगडे वृक्ष कोसळतात. लवचिक लव्हाळें वाकतात आणि वाचतात.

पण कोणी असतात जे मोडतही नाहीत आणि वाकतही नाहीत. ते हाच झंझावात शिडांत भरून प्रवासास निघतात. क्षितीजं पार करतात. नवे मुलुख पादाक्रांत करतात.

इंटरनेटच्या काळात, मराठी साहित्याच्या सेवकांतही असे अनेक आहेत. अनेक वेबसाईट्स आहेत. अनेक नेटग्रुप्स आहेत. अनेक व्यक्ती आहेत. इंटरनेटच्या झंझावातातही मराठीचं गलबत झोकात पुढे नेणारे. किंबहुना इंटरनेटच्या झंझावाताचा उपयोग करूनच.

त्यांच्यातलेच आम्ही एक.

आमचा ५ सूत्री कार्यक्रम असा आहे :

१) जास्तीत जास्त मराठी नेट युजर्सपर्यंत पोहोचणं. त्यांच्याशी जिवंत संपर्क ठेवणं. त्यांना सतत मराठी साहित्य पुरवणं. त्यांच्यामार्फ़त त्यांच्या मित्र मैत्रिणींपर्यंत आपलं साहित्य नेणं. यातून वाचकांची एक साखळी बनवणं. या साठी ऑर्कुट, फ़ेसबुक पासून ते ब्लॉग, वेबसाईट, ई मेल अशी सर्व साधनं वापरणं. जगभरात पसरलेल्या सर्व मराठी ई मेल धारकांपर्यंत पोहोचणं हा ध्यास आहे.

२) जास्तीत जास्त मराठी लोकांनी मराठीत, मराठी भाषेत लिहून, इंटरनेट व्यवहार करावा असा प्रयत्न करणे. त्यांना मराठी सॉफ़्टवेअर्सची माहिती देणं. त्यांच्यातील सर्जनशील बाजूला प्रोत्साहन देणं. नवीन लेखक व कवींना लिहायला स्फ़ुर्ती देणं.

३) मराठी लेखकांना ई बुक्स व ई मॅगझीन मध्ये निर्मिती करायला प्रोत्साहित करणं. त्यांचं वितरण, जाहिरात करणं. त्यातील नवनवीन टेकनिक्सची माहिती देणं. जागतिक ट्रेंड्सची जाणिव देणं.

जागतिक पटलावर हे साहित्य उपलब्ध करून देणं. त्यांची गुणवत्ता उंचावत रहाणं. सतत अद्ययावत रहाणं.

४) मराठी साहित्यात चोरी वा तत्सम गैरप्रकार होऊ नयेत याची खबरदारी घेणं, त्याबद्दल जागरूकता निर्माण करणं. कायदेशीर बाजू भक्कम करणं. त्याचबरोबर त्याचा बाऊ करून ई साहित्याची निर्मितीच थांबवण्याची प्रवृत्ती निर्माण होणार नाही याची खबरदारी घेणं. ई साहित्यविषयक कायद्यांचा पाठपुरावा करणं.

५) वरील सर्व कामं करण्यासाठी एक दणकट संगठना बांधणं. लेखक, कवी, चित्रकार, छायाचित्रकार, इंजिनियर्स, वकील, वेब डिझायनर्स अशा तरूण उत्साही कार्यरत व्यक्तींची एक मजबूत फ़ळी उभी करणं. त्याची आर्थिक आणि कायदेशीर बांधणी करणं. अनुभवी समविचारी मंडळींशी संपर्क साधणं. सरकारी, निमसरकारी, बिनसरकारी संस्था, साहित्य मंडळं यांच्यातून या कार्यासाठी पाठिंबा उभा करणं.

अशी अनेक कामं येत्या काळात होणार आहेत. निरनिराळ्या संस्था अशा तऱ्हेची कामं स्वतंत्र रित्या करतच आहेत. अशा समविचारी सममार्गी संस्थांनी एकतर येऊन ही चळवळ जोमाने पुढे न्यावी आणि इंटरनेटच्या युगात “ई”ये मराठीची पताका डौलाने फ़डकत रहावी ही तर श्रींची “ई”च्छा.

अधिक माहितीसाठी

www.esahity.com

www.ednyaneshwari.com

www.marathiriyasat.com

http://etyarth.blogspot.in/

http://esahityapratishthan.blogspot.in/

सामिल होण्यासाठी लिहा : esahity@gmail.com